माझे आजोबा

१९६४

म. ग्रं. सं. ठाणें

विषय निबंध

सं. क्र. १५६७



RTFBK-013725



मराठी ग्रंथ संग्रहालय ठा.
अनुक्रम 3702 वि. नि.पो.
क्रमांक 1464 दि. 20/12/99

एस.एम.जोशी

व्यक्ति वाणी कैरवणी

केदार
प्र का प्र लं

REFBK-0013725

संत पटवर्धन

प्रकाशिका :
सौ. सुनीति दुबळे
केदार प्रकाशन
थोरले बाजीराव रस्ता पुणें २.

आवृत्ति १ ली
१३ डिसेंबर १९६४

किंमत : रुपये तीन फक्त

सर्व हक्क
सौ. ताराबाई जोशी
यांचे स्वाधीन

मुद्रक :
छ. ते. लोधी
सहकार मुद्रणालय
५४० गणेशपेठ, पुणें २.

प्रास्ताविक :

वसंत पटवर्धन

गेल्या पन्नास वर्षांत महाराष्ट्रांत ज्या कांहीं कर्तृत्ववान व्यक्ति निर्माण झाल्या त्यांत 'एसेम' यांचे नांव फार वरच्या क्रमांकावर घ्यावे लागेल. राजकीय, शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रांत आपापलें स्थान निर्विवादपणें सिद्ध केलेल्या बऱ्याच व्यक्तींनीं महाराष्ट्राला ललामभूत केले आहे; पण केवळ अशा एकदोन क्षेत्रांतल्या कामगिरीमुळेंच नव्हे तर त्यांच्या जीवनाकडे बघण्याच्या सर्वंकष निकोप दृष्टीमुळें 'एसेम' त्यांत उठून दिसतात. जिथें जिथें अन्याय तिथें तिथें अत्यंत परखडपणें लढा देण्यांत त्यांनीं जीविताचीहि तमा केली नाहीं. स्वभावानें परखड, वाणीनें निर्भिड, तरीहि लोकनेता होऊन जनतेचा पुढारी होण्यासाठीं लागणारी सहृदयता, ऋजुता, आत्यंतिक कळकळहि त्यांच्याजवळं आहे. किंबहुना अविचल निष्ठा, निर्धार आणि निर्भयता या तीन गुणांमुळेंच 'एसेम' ना आजचे स्थान मिळाले आहे. भारतीय नेत्यांत त्यांची गणना करावी कां नाहीं याबद्दल अनेकांना जरी संदेह पडला तरी चारित्र्यमान भारतीय पुढाऱ्यांत मात्र त्यांचा क्रमांक फार फार वर लागेल. ते प्रसंगावधानी आहेत पण प्रसंगानुरूप शब्द फिरवणारे मात्र नाहींत. संघर्षाचे वेळीं ते सतत पुढें रहाणारे आहेत पण पुढें रहाण्यासाठीं त्यांनीं संघर्ष निर्माण व्हावेत अशा व्यवस्था केल्या नाहींत

आणि पुढारीपण टिकवण्यासाठीं संघर्ष वाढवण्याचे प्रयत्न केले नाहींत. हल्लींच्या दिवसांत असे नेतृत्व क्वचितच आढळेल.

युवक संघटनेच्या निमित्तानें त्यांनीं राजकारण व समाजकारण यांत उडी घेतली. केवळ राजकारणाला महत्त्व न देतां लोकशिक्षण, लोकजागृति हेंच त्यांनीं ध्येय मानले व त्यासाठीं आपली वाणी व लेखणी अविरत वापरली. प्रथम कॉंग्रेस, नंतर समाजवादी पक्ष, राष्ट्रसेवादल, दलित कामगारवर्ग आणि महाराष्ट्र यासाठीं त्यांनीं सतत कष्ट केले व आपले विचार मांडले. या साऱ्या विचारांची मांडणी गेलीं पस्तीस वर्षें होत असूनहि त्यांत एक सुसूत्रता आहे. लोकशाही समाजवादाबद्दल आज बोलण्यामध्यें अहमहमिका लागली असली तरी 'एसेम'नीं त्याबद्दल १९३७ सालापासून सतत आपले सुसूत्र विचार लोकांपुढें मांडले आहेत. सन १९२९ पासून पंडितजींप्रमाणें समाजवादाबद्दल ज्यांनीं सतत निष्ठा बाळगली त्यांत महाराष्ट्रांत 'एसेम' अग्रणी ठरतील. त्यांच्या वेळोवेळीं लिहिलेल्या कांहीं प्रासंगिक लेखांतून, पत्रांतून आणि दिलेल्या भाषणांतून (१) लोकशाही (२) समाजवाद व समाजवादी पक्ष (३) कॉंग्रेस (४) संयुक्त महाराष्ट्र (५) सामाजिक जीवन (६) युवकांचे कर्तव्य व समाजशिक्षण यांवरील आजहि सूचकच वाटतील असे विचार येथें एकत्र केले आहेत. त्यांतून प्रासंगिक दर्शन तर होईलच, पण गेल्या पंचवीस वर्षांचा थोडासा सामाजिक व राजकीय विचारसरणीच्या इतिहासाचे एक अंगहि दिसेल. शिवाय त्यांनीं लिहिलेली कांहीं व्यक्तिदर्शनें व कांहीं पत्रें त्यांच्या आंतरिक जिव्हाळ्याची साक्ष देतील.

आज शाळा, कॉलेजमध्यें व नंतरही युवकांसमोर कांहींही प्रेरणा ठेवल्या जात नाहींत, त्यामुळें सामाजिक शिक्षणांत न्यूनत्व आले आहे. अशा वेळीं मागच्या पिढींतल्या लोकांनीं आपली अस्मिता कशी जागृत ठेवली होती याचे दर्शन म्हणून व नवी प्रेरणा मिळण्यासाठीं अशा संग्रहाचा उपयोग होईल या कल्पनेनें 'एसेम'नीं वेळोवेळीं मांडलेल्या कल्पनांचा हा मांडव घातलेला आहे. पंचवीस वर्षांपूर्वीच्या त्यांतल्या कांहीं कल्पना, कांहीं विचारधारा आजल्या परिस्थितींतहि मान्य होणाऱ्या आहेत, यांतच त्यांचे मोठेपण सामावलें जावें.

◆ ◆ ◆

१. लोकशाही :

आज लोकशाही हा शब्द आपल्याकडे चांगलाच रुळला आहे. पण लोकशाहीची व्याप्ति काय, तिचा बरोबर अर्थ काय याबद्दल नवीन पिढ्यांसमोर कांहींच ठेवलें जात नाहीं. जनतेसाठीं, जनतेनें निवडून दिलेल्या नेत्यांचा कारभार एवढ्या शब्दानें त्याची व्याख्या संपणार नाहीं. आपण स्वातंत्र्यासाठीं लढा दिला तेव्हां पुढें कुठली 'शाही' येणार याचा जरी त्या वेळेला संपूर्ण विचार केला नव्हता तरी त्या वेळींहि स्वराज्याचा अर्थ जनतेचें राज्य हाच अभिप्रेत होता. त्यामुळेंच त्या चळवळीला नैतिक अधिष्ठान आपोआप प्राप्त झालें होतें. हा अर्थ अभिप्रेत होऊं शकला, कारण आपली भारतीय संस्कृति म्हणून जी संस्कृति समजली जाते तींत लोकशाहीचीं सर्व तत्त्वें आहेतच. प्रत्येक व्यक्तीला आत्मा आहे, स्थान आहे व म्हणून मतप्रदर्शनाचा अधिकारहि आहे हें आपल्या संस्कृतींत मान्य झालें आहे. लोकशाहींत व्यक्तिस्वातंत्र्य ही बाब फार महत्त्वाची आहे, व परमतसहिष्णुता हा तिचा गाभा आहे. अर्थात् व्यक्तीला स्वातंत्र्य असलें तरी तें 'मनःपूतं समाचरेत्' या पद्धतीचें साहजिकच नाहीं. या सर्व व्यक्तींचा एक एकजिनसी समाज बनला पाहिजे व या समाजाची सर्वांगीण उन्नतिहि झाली पाहिजे. एकाच्या स्वातंत्र्यामुळें दुसऱ्याच्या हक्कांवर अन्याय्य गदा येतां कामा नये. थोडक्यांत या सर्व व्यक्तींनीं एक गर्दी म्हणून बेशिस्त वागून चालणार नाहीं. तसें झाल्यास एक सामाजिक अराजकच निर्माण होतें व लोकशाही धोक्यांत येते. लोकशाहीला असा धोका पोहोंचूं नये हें बघण्याचें काम राज्यकर्त्यांचें तर आहेच आहे, पण त्यांच्या बरोबरीनेंच विरोधी पक्षांचेंहि आहे. सत्तारूढ पक्षाला नेस्तनाबूद करून सत्ता हस्तगत करणें एवढेंच विरोधी पक्षाचें जसें काम नाहीं, तसेंच विरोधी पक्षाची

वासलात येन केन प्रकारेण लावणें व बहुमताच्या अडणीवर आपलें कायम ठाण मांडून राहील असें बघणें हें राज्यकर्त्यांचें काम नाहीं. जनतेचें उत्स्फूर्त जाणीवपूर्ण सहकार्य मिळवणें हेंच दोन्ही पक्षांचें ध्येय असलें पाहिजे व त्यानुसार त्यांचीं धोरणें आंखलीं गेलीं पाहिजेत. आपला विरोधक हा आपला शत्रु आहे असें समजणारा कोणीहि लोकशाहीचा विकास करूंच शकणार नाहीं. विरोध ठांसून करावा, पण चांगल्याला चांगलें म्हणण्याचें मनोधैर्यहि असावें. असें झालें तर राष्ट्राराष्ट्रांतूनच नव्हे तर अखिल जगांत लोकशाही नांदायला हरकत नाहीं. मग राज्ययंत्रणेचें स्वरूप कांहींहि असो; आणि तसें झालें म्हणजे पर्यायानें एका जागतिक लोकराज्याचीच प्रतिष्ठापना मानव करूं शकेल. जागतिक लोकराज्य म्हणजे सर्व राष्ट्रांचें विश्वराज्य असा अर्थ नाहीं; कारण खऱ्या लोकशाहींत केन्द्रीकरणाला वावच नसतो. त्यामुळें राष्ट्रांराष्ट्रांतहि लोकशाहीचा विकास घडवतांना विकेन्द्रीकरणाचें महत्त्व विसरून चालणार नाहीं. लोकशाहीचें यश हें ग्रामसभेपासून लोकसभेपर्यंत ती यशस्वी राबविण्यांतच आहे. अशी लोकशाही टिकवण्यासाठीं वेळ पडली तर राष्ट्राला आपद्धर्म म्हणून युद्धासहि तयार राहावें लागतें.

लोकशाहीच्या या मूलभूत सिद्धान्ताची शिकवण एसेमनीं गेलीं पंचवीस वर्षं आपल्या शब्दांतून, वाणींतून व लेखणींतून सोप्या शब्दांत दिलेली आहे, त्याची साक्ष पुढील पानांत दिसून येईल.

◆ ◆ ◆

नवं ६५..
अंक ...१५८७... दि. २०/२/६५

लोकशाही :
तत्त्व आणि व्यवहार

लेखनकाल : ऑगस्ट १९५८

सर्व जगांत आज लोकशाहीचे पोवाडे गाइले जात आहेत. तसें पाहिलें तर लोकशाही राज्यपद्धतींतील अनेक उणिवा दाखवितां येण्यासारख्या आहेत, परंतु त्या पद्धतींत दोष असले तरी त्याहून चांगला पर्याय अद्याप तरी दाखवितां आलेला नाहीं. परकीय राज्यसत्तेविरुद्ध झगडत असतांना आम्हीं स्वराज्याची मागणी केली आणि स्वराज्याचा अर्थ लोकशाही राज्य, जनतेचें राज्य असाच केला; आणि म्हणूनच आमच्या लढ्याला व्यापक आणि नैतिक अधिष्ठान प्राप्त झालें. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आपल्या देशांत लोकशाहीचा महान् प्रयोग सुरू झाला. आधुनिक लोकशाही राज्यपद्धतीचा प्रयोग एवढ्या मोठ्या प्रमाणावर आजतागायत कोठेंच झाला नव्हता. या प्रयोगाच्या यशस्वितेवरच प्रचलित लोकशाहीवादी राष्ट्रांचें भवितव्यदेखील अवलंबून आहे, असें म्हटल्यास त्यांत अतिशयोक्ति नाहीं. कारण साम्राज्यशाहीच्या मगरमिठींतून स्वतंत्र होत असलेल्या आशिया-आफ्रिका खंडांतील देशांत येत्या कांहीं वर्षांत ज्या घटना घडतील त्यावरून सांप्रत चालू असलेल्या शीतयुद्धाचें रूपांतर तिसऱ्या महायुद्धांत होणार किंवा नाहीं तें ठरणार आहे.

आपल्याकडे लोकशाहीचा प्रयोग सुरू होऊन आतां दहा-अकरा वर्षें होऊन गेलीं. या कालांतील अनुभव जमेस धरून आपल्या देशांतील लोकशाहीच्या भवितव्याबद्दल अंदाज बांधणें शक्य आहे. लोकशाही पद्धति यशस्वी व्हावी

अशी आपली मनोमन इच्छा असल्यास आपण कोणते संकेत पाळले पाहिजेत आणि पथ्यें संभाळलीं पाहिजेत याबद्दलहि अनुमान करतां येईल. ज्या जुनाट कल्पना, संस्था आणि रूढि लोकशाही जीवनाला मारक असतील त्यांचा त्याग करण्यास आपण सिद्ध असलें पाहिजे. निदानं नव्या पिढीला सिद्ध केलें पाहिजे.

सुदैवानें भारतीय तत्त्वज्ञान लोकशाहीच्या तत्त्वांना पोषक असेंच आहे. कारण व्यक्तिजीवनाची प्रतिष्ठा त्यांत प्राधान्येंकरून मान्य केलेली आहे. दरेक व्यक्तीला सत्याचा साक्षात्कार होऊं शकतो हा आमच्या तत्त्वज्ञानांतील मूलभूत सिद्धान्त आहे. सत्य मलाच दिसूं शकतें, दुसऱ्याला दिसणारच नाहीं, असा आग्रह त्यांत नाहीं. परमतसहिष्णुतेची शिकवण भारतीय लोकांना सातत्यानें दिली जात असते. तोच लोकशाही राज्यपद्धतीचाहि मूलाधार आहे. विरोधी पक्ष हादेखील देशाचें भलें व्हावें या हेतूनेंच प्रेरित झालेला आहे, असें गृहीत धरून त्याप्रमाणें आचरण करण्याचा प्रयत्न करणें हें आमच्या परंपरेशीं विसंगत नाहीं.

व्यवहाराच्या दृष्टीनें मात्र आपल्या मार्गात असंख्य अडचणी उभ्या असलेल्या दिसून येतात. आमच्या तत्त्वज्ञानांत जरी व्यक्तिस्वातंत्र्याचें माहात्म्य वर्णिलेलें असलें तरी आपल्या समाजाची घडण आधुनिक लोकशाहीच्या विकासास पोषक नाहीं. अनेक जातिजमाती आणि वर्णभेद यांच्यावर ती आधारलेली असल्यामुळें विषमता आणि भेदभाव यांनीं समाज जीर्णशीर्ण झाला आहे. प्राचीन काळीं ती व्यवस्था कदाचित् समर्थनीय असली तरी विद्यमान समाजांत त्यामुळें जो द्वेष, मत्सर व ईर्षा निर्माण होत आहे ती लोकशाही जीवनमूल्यांच्या विकासास अतिशय मारक होणार आहे. आधुनिक राजकीय विचारसरणीवर आधारलेल्या राजकीय पक्षांनादेखील या संकुचित भावनेची बाधा झालेली दिसून येते. पूर्वींचे वर्ण आणि जाती जशा एकमेकांपासून स्वतंत्र आणि भिन्न राहात होत्या तसेच आजचे राजकीय पक्ष राहण्याचा

प्रयत्न करीत आहेत. इतकेंच काय पण दुसऱ्या पक्षाचा समूळ उच्छेद केल्याशिवाय देशाचें आणि जनतेचें भलें होणार नाहीं असा दुराग्रह निरनिराळ्या पक्षांत वाढत आहे. पक्षोपपक्षांतील ही आधुनिक शिवाशीव आणि अस्पृश्यता लोकशाहीच्या दृष्टीनें घातुक आहे.

विद्यमान जीवन फारच गुंतागुंतीचें आणि संमिश्र झालें आहे. प्राचीन काळीं निरनिराळ्या जाती आणि वर्ण एकमेकांपासून अलिप्त राहून आपलीं कामें करीत असत. आजच्या समाजांत राजकीय पक्ष तसेंच करूं पाहतील तर तें बरोबर ठरणार नाहीं. पूर्वीच्या जातिजमाती समाजजीवनाला आवश्यक त्या कर्तव्यकर्मानुसार बनविलेल्या होत्या. सुताराचा धंदा गवंड्याच्या धंद्याला मारक नव्हता. ब्राह्मणाचीं कर्तव्यकर्मे आंखून दिलेलीं होतीं आणि क्षत्रियांचें कर्तव्यहि निश्चित केलेलें होतें. ज्यानें त्यानें आपलें नियतकर्म केलें तर परस्परांच्यामध्यें संघर्ष होऊं नये आणि समाजाचा गाडा सुरळीत चालू राहावा अशी योजना होती. आजच्या समाजाचा योगक्षेम चालण्याच्या दृष्टीनें ही व्यवस्था आतां निरुपयोगी झाली आहे. प्राप्त परिस्थितीला धरून आतां नवीन समाजरचना करावयाची आहे. आधुनिक लोकशाहीची कल्पना कर्तव्यकर्मांच्या वर्णनिहाय विभागणीवर आधारलेली नाहीं. समाजशासन कसें चालावें हें ठरविण्याचा अधिकार ही कोणा एखाद्या वर्णाची मक्तेदारी नाहीं. प्रत्येक नागरिकाचा तो मूलभूत हक्क आहे. आजचे राजकीय पक्ष याच भूमिकेवर आधारलेले आहेत. त्यांच्यांतील संघर्ष अपरिहार्य आहे. परंतु त्या संघर्षाला उच्छेदक स्वरूप येऊं न देतां विचार-विनिमयानें आणि मतपरिवर्तनानें ते संघर्ष सौम्य बनविणें आणि समाजरचनेंत आवश्यक ते बदल शांततेच्या मार्गानें घडवून आणणें हें लोकशाहीचें ध्येय आहे. आपल्या समाजरचनेंत मूलग्राही बदल घडवून आणण्याची आज आत्यंतिक आवश्यकता आहे. ती ऐतिहासिक गरज आपण लोकशाहीच्या आणि शांततेच्या मार्गानें घडवून आणूं शकणार कीं नाहीं, यावरच आमच्या लोकशाही प्रयोगाची यशस्विता

अवलंबून आहे. भारतांत तें घडून आलें तर आशिया-आफ्रिका खंडांतील अन्य देशांतहि तें होऊं शकेल.

गेल्या अकरा वर्षांतील अनुभव या दृष्टीनें पुरेसा आशादायक वाटत नाहीं. स्वातंत्र्यपूर्व काळांत देशांतील बहुसंख्य जनता कॉंग्रेसच्या झेंड्याखालीं संघटित झालेली होती. राष्ट्रसभा या नांवानेंच ती ओळखली जाई. स्वातंत्र्याचा लढा तिच्याच निशाणाखालीं लढला गेला. तरीहि समाजांतील सर्वच विभाग पूर्णत्वानें राष्ट्रसभेंत सामील झाले नव्हते, ही गोष्ट लक्षांत घेऊनच पहिल्या राष्ट्रीय मंत्रिमंडळामध्यें डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी इत्यादि थोर नेत्यांचा समावेश करण्याचा सल्ला महात्मा गांधींनीं दिला. गांधीजींच्या या सर्वसमावेशक दृष्टीमुळेंच आपल्या देशाला सर्वसंमत अशी लोकशाही घटना लाभली आणि शेंकडों संस्थानांचें विलीनीकरण शांततेच्या मार्गानें होऊं शकलें. परंतु गांधीजींच्या मृत्यूनंतर ही राष्ट्रीय परंपरा सुटली. कॉंग्रेसचें राष्ट्रीय स्वरूप हळूहळू नाहींसें होत गेलें आणि आतां तो केवळ एक राजकीय पक्ष बनला आहे. ही वस्तुस्थिति ओळखून त्याप्रमाणें वागण्याची वृत्ति मात्र कॉंग्रेस संघटनेमध्यें राहिलेली दिसत नाहीं. पहिल्या सार्वत्रिक निवडणुकींत कॉंग्रेसला सर्व विधिमंडळांत आणि संसदेंत बहुमत मिळालें ही गोष्ट खरी, परंतु ५० टक्क्यांवर मतदारांनीं आपल्या विरुद्ध मत दिलें आहे हें त्यांनीं लक्षांत घेतलें नाहीं. आपण राष्ट्र नव्हे एक पक्ष आहों, याची जाणीव त्यांना राहिली नाहीं. विरोधी पक्षांना सांपडेल ह्या मार्गानें नामोहरन करण्याचा प्रयत्न झाला. राष्ट्रीय स्वरूपाचे प्रश्न सोडवतांना अन्य पक्षांना आणि त्यांतील नामवंत नेत्यांनाहि विश्वासांत घेण्याची त्यांना आवश्यकता वाटली नाहीं. त्यांनीं लोकशाही संकेत पाळले असते तर राज्यपुनर्रचनेच्या चाचतींत मराठी आणि गुजराथी भाषिकांवर जो अन्याय झाला आणि त्यामुळें नंतर लोकमताला जें प्रक्षोभक वळण लागलें तें टाळतां येणें अशक्य नव्हतें. परिणामतः भारतांतील कांहीं प्रांतांत आतां राज्यकर्त्या पक्षाला प्रभावीपणें विरोध करूं शकतील असे विरोधी पक्ष निर्माण

झाले आहेत. केरळ प्रांतांत तर राज्यसूत्रें कम्युनिस्ट पक्षाच्या हातीं आलीं आहेत. मुंबईच्या द्विभाषिक राज्यांत शासनसूत्रें कॉंग्रेसच्या हातांत असलीं तरी अनेक महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा बोर्डें आणि अन्य स्थानिक स्वराज्यसंस्थांत विरोधी पक्षानें बहुमत मिळविलें आहे. आतांच आपल्या सर्वांच्या लोकशाही निष्टेची खरी कसोटी आहे. सामाजिक आणि आर्थिक परिवर्तन घडवून आणून झपाट्यानें समाजविकासाचें कार्य लोकशाही पद्धतीनें साधणें हें आपणां सर्वांचें उद्दिष्ट असावयास पाहिजे. सर्व सत्ता एकाच पक्षाच्या हातीं असेल तेव्हांचा प्रश्न वेगळा. त्यांतहि बहुसंख्य मतदारांचा पाठिंबा त्या पक्षाला असेल तर त्या पक्षाचें कार्य अधिकच सुकर होतें. परंतु तसें नसेल आणि केवळ लोकसभेंत अथवा विधानसभेंत जुजबी बहुमत असेल तर कारभार चालविणें कठीण आहे. तशांतच सामाजिक आणि आर्थिक परिवर्तनाचें ऐतिहासिक कार्य पूर्ण करावयाचें म्हणजे फारच मोठी जबाबदारी आहे. अशा परिस्थितींत आपण जर आपल्या लोकशाही तत्त्वांशीं सुसंगत असा लोकशाही व्यवहार निर्माण करण्याचें शहाणपण आणि त्याप्रमाणें वागण्याचें औदार्य दाखविलें नाहीं तर आपल्याला तरणोपाय नाहीं.

संयुक्त महाराष्ट्र आणि महागुजरात या प्रश्नांसंबंधीं कॉंग्रेस पक्षाचें धोरण लोकशाही तत्त्वाच्या आणि व्यवहारांच्या कसोटीवर उतरण्यासारखें नाहीं. द्विभाषिकाचा निर्णय घेतला गेला त्या वेळीं कॉंग्रेसकडून जो निर्णयप्रमाद घडला तो एक वेळ बाजूला ठेवला तरी गेल्या दोन वर्षांत लोकमताचा कौल कोणत्या बाजूला पडला तें त्यांनीं ओळखलें पाहिजे. सार्वत्रिक निवडणुकीमध्यें आमचा पराभव करीपर्यंत आम्ही आमच्या चुकीच्या निर्णयाला आणि धोरणाला चिटकून बसणार हा दुराग्रह लोकशाहीच्या विकासाला विघातक आहे. मुंबई राज्यांत विरोधी पक्ष चांगला बलवान् आहे. जनतेच्या पाठिंब्याच्या दृष्टीनें पाहतां राज्यकर्त्या पक्षाला जो पाठिंबा आहे त्यापेक्षां अधिक पाठिंबा विरोधी पक्षाला आहे. परिस्थिति प्रक्षोभक आहे. परंतु विरोधी पक्ष लोकशाही

मूल्यांना आणि शांततामय मार्गांना बांधलेला असल्यामुळें सतत प्रक्षोभ जागृत ठेवणें त्याला इष्ट वाटत नाहीं. त्यांच्या या तत्त्वनिष्ठेचा राज्यकर्ता पक्ष गैरफायदा घेऊं पाहात आहे. प्रत्यक्ष प्रतिकाराचा शांततामय लढा उभारला तरीहि त्यांतून थोडाफार प्रक्षोभ निर्माण होणारच. तो टाळतां आला तर पाहावा म्हणून संयुक्त महाराष्ट्र समितीनें वाट पाहण्याचें ठरवलें. परंतु राज्यकर्त्यांना त्याची मातब्बरी वाटत नाहीं असें दिसतें. स्वाभाविकच समिति पक्षाला आपल्या या धोरणाचा फेरविचार करून शांततामय प्रत्यक्ष प्रतिकाराचा लढा पुकारण्यावांचून गत्यंतर राहिलेलें नाहीं. अजूनहि राज्यकर्त्या पक्षाला सुबुद्धि सुचेल, तर प्रत्यक्ष प्रतिकाराचा लढा आणि त्यांतून निर्माण होणारा प्रक्षोभ टाळता येईल. लोकशाहीच्या विकासाच्या दृष्टीनें तेंच श्रेयस्करहि आहे. राज्यकर्त्यांच्या सांप्रतच्या धोरणामुळें कॉंग्रेसला लोकशाही मूल्यांची कदर नाहीं असा समज जनतेंत दृढमूल होत आहे. लोकशाहीच्या विकासाच्या दृष्टीनें कुठल्याहि राजकीय पक्षाबद्दल अशी समजूत जनतेंत वाढत जाणें हें बरें नव्हे.

राज्यकर्त्या पक्षाच्या या दुराग्रही लोकशाहीविरोधी व्यवहारामुळें विरोधी पक्षावरील जबाबदारी अधिकच वाढली आहे. त्यांनीं आपली भूमिका आणि धोरण कसें ठेवावें ही एक महान् समस्या होऊन बसली आहे. समाजवादी विचारसरणीच्या पक्षांनीं कम्युनिस्ट पक्षाबरोबर कशा प्रकारचे संबंध ठेवावेत, या प्रश्नाबद्दल आजकाल पुष्कळ चर्चा चालू आहे. कम्युनिस्ट पक्ष स्वत:ला लोकशाही पक्षच म्हणवितो. परंतु त्या पक्षाचे जे आंतरराष्ट्रीय लागेबांधे आहेत त्यामुळें अन्य लोकशाही पक्षांचा त्यांच्यावर विश्वास बसत नाहीं. कारण सध्यांतरी ज्या देशांत कम्युनिस्ट सत्ता आहे तेथें आपल्या राज्यघटनेंत अनुस्यूत असलेली लोकशाही पद्धति अस्तित्वांत नाहीं आणि येथील कम्युनिस्ट पक्ष त्या एकपक्षीय हुकूमशाही राजवटींची तळी उचलून धरतांना दिसतो. स्वाभाविकच लोकांना त्यांच्या लोकशाहीनिष्ठेबद्दल शंका वाटते. अलीकडे येथील कम्युनिस्ट पक्षानें अमृतसर येथें आपल्या प्रबंधांत बदल केला आहे ही गोष्ट खरी.

परंतु तेवढ्यानें लोकांचें पूर्ण समाधान झालेलें नाहीं. तरीहि राज्यकर्त्या पक्षाच्या आडमुठ्या आणि लोकशाहीविरोधी धोरणामुळें समाजवादी विचारसरणीच्या लोकशाहीवादी पक्षांना कम्युनिस्टांबरोबरच्या आपल्या संबंधांचा फेरविचार करणें अपरिहार्यच होऊन बसलें आहे. आतांपर्यंत कम्युनिस्ट पक्षाबरोबर संबंध जोडूं नयेत, त्यांच्याशीं सहकार्य करूं नये असेंच धोरण रूढ आहे. परंतु राज्यकर्ता पक्ष जनतेचे प्रश्न सोडवण्यास तयार नाहीं, तिच्या रास्त आकांक्षांना मान्यता द्यावयास तयार नाहीं आणि मूठभर संचयवादी लोकांच्या मोहवतीखातर सामान्य जनतेची कोंडी करीत आहे असा अनुभव प्रत्यहीं येतो. अशामुळें एका निराळ्या प्रकारच्या हुकूमशाहीचा धोका निर्माण होईल. म्हणून इतःपर जनतेचे प्रश्न सोडवीत असतांना पूर्वीची तुटक प्रवृत्ति टाकून दिली पाहिजे. आपण आपल्या तत्त्वांचा नुसता आग्रह धरून भागणार नाहीं, त्या तत्त्वांचें व्यवहारांत पालन करून जनतेचे प्रश्न आपल्याला सोडवतां आले पाहिजेत. मार्ग गुंतागुंतीचा आणि अडचणींचा आहे, अनेक आपत्तींना तोंड द्यावें लागणार हेंहि निश्चित; आगींतूनच पुढें जावयाचें आहे, परंतु तेंहि दिव्य केलें पाहिजे.

◆ ◆ ◆

लोकराज्याचो पायाभरणो

लेखनकाल : ऑगस्ट १९४८

"जशी लोकांची पात्रता तसें त्यांचें सरकार" अशी एक म्हण आहे. प्रचलित राष्ट्रीय सरकारबद्दल ज्यांची नापसंती आहे त्यांनीं या म्हणीचा गंभीरपणें विचार करावयास हवा. ज्या अनिष्ट घटना घडत आहेत त्याला आपण किती जबाबदार आहोंत हा प्रश्न प्रत्येकानें आपल्या मनाला विचारला पाहिजे. किंबहुना आपल्याला हवें तसें सरकार निर्माण करण्यासाठीं आपण कोणते प्रयत्न केले याचाहि विचार करावा. थोडक्यांत म्हणजे प्रत्येक व्यक्तीनें सरकारला नांवें ठेवण्याआधीं आपण आपलीं कर्तव्यें कितपत बजावलीं आणि बजावीत आहोंत या प्रश्नाचें प्रामाणिकपणें उत्तर देण्याची आज वेळ आलेली आहे.

ब्रिटिशांचें राज्य होतें तोंवर मोठी सोय होती. प्रत्येक गोष्टींत परकीय सत्तेच्या डोक्यावर खापर फोडून मोकळें होतां येई. दारिद्र्य, दुष्काळ, अज्ञान, रोगराई – सर्वांना जबाबदार साम्राज्यशाही आणि सर्व रोगांवर स्वराज्य हा एकच रामबाण उपाय. परंतु आतां तर ब्रिटिशांनीं आपला गाशा गुंडाळला; स्वराज्यहि आलें; आणि तरीहि आमचें नष्टचर्य संपलेलें नाहीं. इतकेंच काय, पण होती ती स्थिति बरी होती असें म्हणण्यापर्यंतहि कांहीं लोकांची मजल गेलेली आहे. लोक नाराज होऊन सरकारच्या नांवानें खडे फोडूं पाहात आहेत. हें असें कां व्हावें ?

कारण लोकांना वाटतें कीं, ब्रिटिश सरकारच्या अस्तित्वामुळें जर ही सर्व संकटपरंपरा होती, तर तें गेल्यावर ती आपोआपच नष्ट झाली पाहिजे. राज्य-सत्ता परकीयांच्या हातून आपल्या हातीं आली म्हणजे आपलीं दुःखें दूर होतील असेंच आतांपर्यंत आपण शिकविलें. लोकांच्या कर्तव्यावर भर न देतां परकीय सत्तेच्या स्वार्थी लुटारूपणावरच आपण त्यांचें लक्ष केंद्रित केलें. तसें करणें अपरिहार्यहि होतें. अर्थात् त्याचे परिणामदेखील तितकेच अपरिहार्य म्हणून भोगले पाहिजेत. महात्मा गांधी विधायक कार्यक्रमावर एकसारखा भर देत असत तो यासाठींच.

परकीयांचें राज्य जाऊन स्वकीयांचें राज्य आल्यानें सर्व संकटें आपोआप दूर होतील ही कल्पनाच भ्रामकपणाची आहे. राज्यसत्ता मूठभर उपटसुंभांच्या हातीं आली तर त्यामुळें आमच्या जनतेचीं दुःखें थोडींच दूर होणार आहेत ! ज्यांच्या हातीं सत्ता असेल ते प्रथम स्वतःचाच स्वार्थ पाहणार ! म्हणून ज्या श्रमजीवी बहुसंख्य लोकांचीं दुःखें दूर करावयाचीं त्यांच्या हातीं सत्ता येईल तेव्हांच सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सुटूं शकतील. परंतु तेवढ्यानेंच काम भागेल असें समजून चालणार नाहीं. हातीं आलेल्या सत्तेविषयीं लोक उदासीन अगर बेपर्वा राहतील तर त्यांचे प्रश्न सुटणार नाहींत. इतकेंच नव्हे तर ती सत्ता-देखील त्यांच्या हातीं फार दिवस टिकून राहणार नाही. अखंड दक्षता ठेवली तरच स्वातंत्र्याचें रक्षण होईल. स्वातंत्र्याबद्दल बेदरकार राहून कसें भागेल ?

आजचें राष्ट्रीय सरकार भांडवलवाल्यांच्या आहारीं जात आहे असें आपण म्हणतों. परंतु असें होण्याचें कारण काय याबद्दल फारच थोडे लोक विचार करतांना आढळतात; आणि जे चार दोन करतांना आढळतात ते नुसता विचार करून स्वस्थ बसतात. फार फार तर टीका करतात. नुसती टीका करण्यांत हंशील नाहीं. नेहरू सरकार आपोआपच शेतकरी-कामगारांचें होईल अशी तर लोकांची कल्पना नाहीं ना ! एखादें झाड जसें आपोआप वाढत

जावें आणि कांहीं दिवसांनीं त्याला मधुर फळें यावींत, तसें नेहरू सरकारचें आपोआपच शेतकरी-कामगार—राज्यांत रूपांतर होणार नसून शेतकरी-कामगारांनाच तें घडवून आणावयाचें आहे. तसें नसतें तर मग नुसता वाट पाहण्याचाच प्रश्न उरला असता. मग टीका करण्याची तरी काय जरुरी होती ?

सरकारवर आपली पकड बसविण्यांत भांडवलदार लोक यशस्वी होत आहेत. कारण आपला फायदा कशांत आहे तें त्यांनीं ओळखलें असून आपल्या हितसंबंधांचें जागरूकतेनें आणि संघटितरीत्या संरक्षण करण्यास ते अहर्निश दक्ष असतात. शासनसंस्थेचें महत्त्व त्यांनीं जाणलें असून प्रभावी राजकीय पक्षाचें साधन हातीं असल्याशिवाय शासनसंस्था आपल्या ताब्यांत ठेवणें अशक्य आहे हें ते ओळखून आहेत. काँग्रेस पक्षाला ते लक्षावधि रुपयांची मदत करतात आणि सरकारी धोरणें आपल्याला हवीं तशीं वाकवून घेतात.

शासनसंस्था भांडवलदारांना जशी उपयुक्त आहे तशी शेतकरी-कामगारांनादेखील आहे. निदान त्यांच्या हितशत्रूंच्या हातांत तरी ती जाऊं देतां उपयोगी नाहीं. परंतु सर्वसामान्य जनतेला याची असावी तशी जाणीवदेखील नाहीं. मग राजकीय पक्षाचें महत्त्व तरी त्यांना कसें समजावें ? लक्षावधि रुपये तर दूरच राहिले; त्यांच्याजवळ ते असणेंच शक्य नाहीं; परंतु चार पैसे तरी जाणिवेनें आपल्याला उपयुक्त अशा पक्षाला देणारांची संख्या किती आहे ? उलट राजकीय पक्ष म्हटला म्हणजे आमच्यापैकीं बऱ्याच मंडळींना त्याबद्दल एक प्रकारचा तिटकाराच वाटतो. जणू कांहीं राजकारण ही एक तिरस्करणीय गोष्टच आहे. आजच्या जगांत शासनसंस्थेच्या हातांत अतिशय व्यापक सत्ता गेलेली आहे. अशा वेळीं राजकारणाबद्दल उदासीन राहून कोणाचें चालणार आहे ? एखादी व्यक्ति जरी अलिप्त राहूं शकली तरी जनतेला तसें राहून चालणार नाहीं. कारण शासनसंस्था ही एक काठी आहे. ती आपल्या हातीं राहील तर टेकण्यास तिचा उपयोग होईल, परंतु आपल्या पिळणुकीवरच ज्या

वर्गाचें अस्तित्व अवलंबून आहे अशांच्या हातीं गेली तर ती आपल्या टाळक्यांतच बसणार आहे. तथापि आपल्या लोकांना अजून त्याची असावी तशी कल्पना नाहीं. निवडणुकीच्या वेळीं मतदानाचा हक्क बजावण्याची-देखील कित्येकांना आवश्यकता वाटत नाहीं. इतकेंच काय पण आपलें मत ही एखादी विक्रेय वस्तु आहे असें समजून तात्कालिक फायद्यासाठीं तें विरोधी पक्षाला विकण्यासहि कांहीं मंडळी तयार असतात. राजकीय जागृतीच्या दृष्टीनें इतक्या मागासलेल्या समाजांत खऱ्या अर्थानें लोकराज्य कसें स्थापन होईल ? राज्यसंस्थेचें महत्त्वच जर लोकांना समजलेलें नाहीं तर लोकराज्य कुणाचें होणार ? म्हणून जनतेनें आपलें लक्ष राजकीय शिक्षणावर प्रथम केंद्रित केलें पाहिजे.

व्यक्तिमात्राच्या जीवनसाफल्यासाठीं समाजाची आवश्यकता आहे. मानवी समाज नसेल तर रानटी मनुष्याचें जीवन कोणत्याहि प्रकारें विकसित होऊंच शकणार नाहीं. परंतु समाजाचें अस्तित्व आणि सातत्य चालू राहावें आंणि सर्वांचें नाहीं तरी निदान आपलें आणि आपल्या वर्गाचें हित साधावें म्हणून बुद्धिमान् लोकांनीं अनेक संस्था स्थापन केल्या आहेत. शासनसंस्था ही अशीच एक अतिशय महत्त्वाची संस्था आहे. म्हणून शासनसंस्थेशीं आपले संबंध काय आहेत व प्रचलित अधिकारारूढ सरकारचें स्वरूप कोणतें आहे तें नीट समजून घेऊन प्रत्येकानें त्याबाबतचीं आपलीं कर्तव्यें पार पाडलीं पाहिजेत. जनता-शिक्षणामध्यें या विषयाचा प्रामुख्यानें अंतर्भाव होणें जरुरीचें आहे. या व्यापक अर्थानें जेव्हां अधिकांश लोक सुशिक्षित होतील तेव्हांच शासन-संस्था लोकशाहीप्रधान होऊन खरें लोकराज्य अगर लोकसत्ता प्रस्थापित होऊं शकेल.

या दृष्टीनें पाहिल्यास आपली परिस्थिति अति शोचनीय आहे. राजकीय बाबतींत आपलीं कांहीं कर्तव्यें आहेत, याची जाणीवहि फार थोड्या लोकांना

आहे. वास्तविक आज त्याचीच अधिक आवश्यकता आहे. कारण आतां आपण धर्मातीत (secular) राज्याची भाषा करीत आहोंत. एक काळ असा होता कीं, जेव्हां समाजधारणेसाठीं धर्मसंस्थेचा उपयोग केला जाई. किंवहुना जेणेंकरून समाजाची धारणा होते तो धर्म, अशीच धर्माची व्याख्या असे. पापपुण्याच्या-कर्तव्याकर्तव्याच्या कल्पना धर्मसंस्थेकडूनच शिकविल्या जात. सरकारी कायदा मोडला तर सजा होण्याचें भय असतें; पण तें केव्हां ? गुन्हा उघडकीस आला तर ! परंतु ईश्वराला फसवूनकांहींच करता येत नसल्यानें प्रत्येक अधर्माचरणाबद्दल मरणोत्तर यमाच्या दरबारीं सजा भोगावीच लागते अशी समज होती. त्यामुळें कायद्याचें पालन करून घेण्यास सरकारला धर्मसंस्थेची मदत होई. शिवाय कायद्याव्यतिरिक्त समाजधारणेसाठीं कितीतरी नीति-नियमांची आवश्यकता असते. त्यांची अंमलबजावणी धर्माच्या दंडसामर्थ्या-वरच करून घेतली जाई. परंतु आज परिस्थिति बदलली आहे. निरनिराळे धर्म प्रचलित असून परस्परांमध्यें द्वेषभावहि आहे. त्यामुळें स्वधर्मीयांशीं केलेली जी वागणूक गुन्ह्याच्या सदरांत पडते ती परधर्मीयांबरोबर केल्यास हरकत नाहीं, किंबहुना देवाघरीं तें पुण्यच समजलें जाईल, अशा समाजविघातक कल्पना रूढ केल्या जात आहेत. सर्व धर्मांचे पुढारी एकत्र येऊन कांहीं सामान्य नीतिनियम घालून देतील अशी शक्यताहि दिसत नाहीं; आणि पूर्वीसारखी धर्माची भीतिहि लोकांना उरलेली नसल्यामुळें धर्मानें घालून दिलेले नीतिनियमहि ढिले पडले आहेत. समाजाची घडी विसकटलेली आहे; बऱ्याबाइटाच्या जुन्या कल्पना नष्ट झाल्या आहेत, परंतु नव्या निर्माण झालेल्या नाहींत. अशा परिस्थितींत शासनसंस्थेचें अधिकारक्षेत्र व्यापक होऊन तिची सत्ता अनेक पटींनीं वाढली जाणें अपरिहार्यच आहे. म्हणून पूर्वी जरी कोणी शासनसंस्थेबद्दल उदासीन असले तरी आज तसें राहून चालणार नाहीं. सर्व-सामान्य जनतेनें तर त्याबद्दल विशेषच जागरूक राहणें आवश्यक आहे. शासनसंस्था आणि प्रस्थापित सरकार यांच्याशीं आपले संबंध काय ? स्वत:च्या

आणि आपल्या समाजाच्या हिताच्या दृष्टीनें सरकारसंबंधीं आपलीं कर्तव्यें कोणतीं ?- याची जाणीव आज जनतेमध्यें ज्या प्रमाणांत निर्माण होईल त्या प्रमाणांत नवे नीतिनियम तयार होतील आणि आजचें राजकीय आणि नैतिक अराजक थांबून नव्या भूमिकेवर समाजाची घडी पुन्हां एक वेळ बसवितां येईल. या प्रतिक्रियेंतूनच खऱ्या अर्थानें धर्मातीत लोकशाहीचा उदय होऊं शकेल.

भिन्नधर्मीयांमधील भांडणें आणि जुन्या वेडगळ धर्मकल्पना चालू राहण्यांतच ज्यांचा फायदा आहे असे वर्ग हा खटाटोप थोडाच करणार आहेत ? ते तर त्या कल्पना व भांडणें तशींच टिकवून धरून आपल्या वर्गाचें आसन चिरस्थायी करण्याचा प्रयत्न करणार. उलट धर्मातीत लोक-राज्याच्या कल्पनेची ते नेहमीं टवाळीच करतील. म्हणून लोकराज्याच्या स्थापनेसाठीं त्यांच्यावर विसंबून राहणें केव्हांहि इष्ट नाहीं. जनतेनेंच स्वतःच्या पायावर उभें राहिलें पाहिजे.

आजच्या चिकट परिस्थितींतहि प्रचलित सरकारला जनतेच्या फायद्यासाठीं अनेक लहानसहान गोष्टी तरी खासच करतां येण्यासारख्या आहेत. परंतु तेंहि आज होत नाहीं. शेतकऱ्याच्या हिताला पोषक असा एखादा कायदा करण्याचें ठरलें म्हणजे तो पास होऊन अमलांत येईपर्यंत किती अडचणी उभ्या केल्या जातात हें आतांपर्यंतच्या अनुभवानें स्पष्ट झालेलें आहे. एखादा धोरणनिर्णय कामगारांच्या पदरांत चार पैसे अधिक टाकणारा झाला तर कायद्याचीं हजार कुसपटें काढून अगर सरतेशेवटीं बचतीच्या नांवावर तरी तो मागें टाकण्यांत येतो. कामगारांच्या संपाकडे पाहण्याची सरकारची जी दृष्टि असते तीच दृष्टि भांडवलदारांनीं अडवणूक केली म्हणजे नसते. त्यांची मनधरणी करण्याकडेच सरकारी धोरणाचा कल असतो. या सर्व गोष्टी उदाहरणानें दाखवून देणें अवघड नाहीं. परंतु स्थलसंकोचास्तव करतां येत नाहीं.

तितकेंसें प्रस्तुतहि नाहीं. सांगण्याचा मुद्दा इतकाच कीं, या सर्व गोष्टी आज उघड्या डोळ्यांनीं पाहाव्या लागत आहेत. आपल्या हिताला पोषक असें धोरण आंखण्यास सरकारला भाग पाडतां येईल इतकें सामर्थ्य आज जनतेपाशीं नाहीं हें कटु सत्य प्रांजलपणें कबूल करणें भाग आहे. अशा परिस्थितींत सरकारला नुसतीं नांवें ठेवीत बसण्याऐवजीं जनतेमध्यें ती शक्ति कशी निर्माण होईल याचा विचार करून त्या कार्यास लागलें पाहिजे.

सरकारी धोरणावर टीका करूं नये असें सांगण्याचा मुळींच हेतु नाहीं. केवळ टीका करीत राहिल्यानें सर्व सुधारणांसाठीं सर्वस्वी सरकारवरच अवलंबून राहण्याची वृत्ति बळावते. त्यापासून सावध राहिलें पाहिजे. सरकारनें मनांत आणल्याशिवाय कोणतीच गोष्ट होणार नाहीं असें मानलें तर फारच मोठा अनवस्था प्रसंग निर्माण होईल. कारण ज्या मूलभूत सुधारणा सरकारनें कराव्या असें जनतेला वाटतें त्या आजच्या सरकारकडून होऊंच शकत नाहींत. त्या सुधारणा ज्या वर्गाच्या हितास विघातक आहेत तो वर्ग सामर्थ्यवान् आणि संघटित असल्यामुळें अधिकारारूढ सरकारवर त्याचा प्रभाव आहे. म्हणून सर्व कांहीं सरकारनें केलें पाहिजे अशी वृत्ति एक वेळ दृढमूल झाली तर प्रगतीचा मार्गच खुंटला असें म्हणावें लागेल. आपल्या अभ्युदयासाठीं जनतेनें सर्वस्वी सरकारवरच अवलंबून राहिलें पाहिजे ही कल्पना अत्यंत धोक्याची असून नी जितक्या लवकर काढून टाकतां येईल तितकी बरी. कारण आपल्याला हवें तें धोरण आंखील असें सरकार अधिकारावर आलें तरीदेखील जनतेचें उत्स्फूर्त जाणीवपूर्ण सहकार्य मिळालें नाहीं तर त्या सरकारलादेखील यशस्वितेची आशा करावयास नको.

आपल्याला महत्त्वाच्या वाटणाऱ्या गोष्टी अधिकारारूढ सरकारकडून होणार नाहींत असें गृहित धरूनच आपला मार्ग काढला पाहिजे हें नीट लक्षांत यावें म्हणूनच इतकें सविस्तर विवेचन केलें. प्राप्त परिस्थितींत जनतेचें शिक्षण आणि

संघटन यासाठीं जेवढें करतां येण्यासारखें आहे तेवढें सर्व करून जनतेचें सामर्थ्य वाढविलें पाहिजे. ज्या प्रमाणांत तें सामर्थ्य वाढेल त्या प्रमाणांत पुढचा मार्ग मोकळा होणार आहे. संघटना करण्याचीं जीं साधनें उपलब्ध आहेत त्यांचा तरी आपण पुरेसा उपयोग केला आहे काय ? जनताशिक्षणाकडे आपण किती लक्ष पुरविलें ? बारीकसारीक सर्वच गोष्टींत तर सरकार आडवें येत नाहींना ? मोरारजीभाईंचें सरकार ग्रामसफाई करूं नका अथवा तुमची चाळ शक्य तितकी अस्वच्छ ठेवा असें सांगत नाहीं. नगरपालिकेचा कारभार तर जनतेच्या हातीं दिलेला आहे. तो कारभार कार्यक्षमतेनें चालूं नये असा सरकारचा हेतु निश्चित नसणार. मग नगरपालिकांचे असे धिंडवडे कां निघतात ? पैसे घेऊन आपल्या मताचा विक्रय करावा आणि नगरपालिकेचा खेळखंडोबा करावा असें कोणीच सांगत नाहीं. निवडून आलेल्या लोकांबरोबर सामान्य जनता कितीसें सहकार्य करतें ! चार पावलें पुढें जाऊन कचऱ्याच्या पेटींत कचरा टाकण्यासहि आमची तयारी नसते. त्याचे दुष्परिणाम आम्हांला भोगावे लागतील हें ठाऊक असूनहि आम्ही तिकडे दुर्लक्ष करतों. उगीचच्या उगीच वहात असलेला नळ बंद करावासा आम्हांला वाटत नाहीं अगर संडासांत जाऊन आल्यावर साखळी ओढण्याची खबरदारीहि आम्ही घेत नाहीं. असें कां होतें ? कारण आमच्या जीवनांत शिस्त नाहीं. नागरिकत्वाच्या कल्पनेचा उदयहि अद्याप झालेला नाहीं. जमीनदारी आणि सावकारी यांचें नियंत्रण करणारे कायदे सरकारनें केले आहेत त्यांचा फायदा का आपोआप शेतकऱ्यांचा पदरांत पडणार आहे ? कुळांनीं आपली संघटना केली तरच तें शक्य आहे. सहकारी संस्था सचोटीनें चालवून शेतकऱ्यांची कर्जाची गरज भागविली नाहीं, तर सावकारी या ना त्या स्वरूपांत पुन्हां डोकें वर काढील अगर जमिनी पडीत राहून शेतांचें उत्पन्नच घटेल.

भांडवलदारवर्गाकडून कामगारवर्गाची पिळवणूक होते म्हणून आपण आक्रोश करतों. आपली वर्गीय संघटना करण्याचा हक्क कामगारांना कायदेशीररीत्या

मिळालेला आहे. परंतु त्याची जाणीव ठेवून किती कामगार त्याचा फायदा करून घेत आहेत ? एकंदर कामगारांच्या संख्येच्या मानानें संघटित कामगारांची संख्या फारच अल्प आहे. कारण कामगार अज्ञानांत आहेत. संघटनेबद्दल उदासीन आहेत. वैयक्तिक तात्पुरत्या स्वार्थापलीकडे जाऊन वर्गीय अथवा सामाजिक दृष्टीनें आपलीं कर्तव्यें कोणतीं आहेत याबद्दल त्यांनीं विचारच केलेला नाहीं.

सर्वसामान्य जनतेला ही सामाजिक दृष्टि असती, तर बारीकसारीक दुष्ट सामाजिक रूढींचें तिनें कधींच उच्चाटन करून टाकलें असतें. अस्पृश्यता निवारणाचा कायदा सरकारनें केलेला आहे, तरीहि अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या समाजाला माणुसकीनें वागविलें जात नाहीं. मंदिरें, पाणवठे, उपाहारगृहें, खानावळी वगैरे सार्वजनिक जागींदेखील त्यांना सरांस प्रवेश मिळत नाहीं. याला कोण जबाबदार ? ज्यांची आर्थिक पिळवणूक होत आहे असा वर्गच जर आपापसांत असे भेदाभेद चालू ठेवणार असेल तर सामाजिक समता कशी प्रस्थापित होणार ? समाजाच्या आर्थिक व्यवस्थेंत मालकी हक्काच्या दृष्टीनें क्रान्तिकारक बदल घडवून आणला तर सर्वांगीण समाजक्रांतीच्या कार्यास चालना मिळून आपलें सामाजिक उद्दिष्ट अधिक लवकर सिद्ध होईल हें खरें, परंतु श्रमजीवी जनता संघटित होऊन अन्यायाचा यशस्वी प्रतिकार करण्या-इतकी शक्ति तिच्या ठिकाणीं आल्याशिवाय तें कसें शक्य आहे ? म्हणून तूर्त जेवढें होण्यासारखें असेल तें सर्व करून आपलें सामर्थ्य वाढविणें हेंच जनतेचें मुख्य कर्तव्य आहे.

आपल्या जीवनांत शिस्त नाहीं याची जाणीव आतां सर्वांना होऊं लागली आहे. तिकिटें काढतांना, आगगाडींत बसतांना, "रांग धरा" अशी मोठी पाटी पाहूनहि आधीं आलेल्या लोकांच्या पुढें घुसून जातांना, इतकेंच काय पण कोणत्याहि चारचौघांच्या मेळाव्यांत, आपल्या गैरशिस्तपणाचें प्रदर्शन

आपण करीत असतों. आपल्या सामाजिक जीवनांतील अराजकाचें तें लक्षण आहे. आपल्या समाजाला "समाज" तरी कां म्हणावें तें कळत नाहीं. आपलें जीवन जरी एकत्र गुंफलें गेलें असलें तरी ज्यां बंधनांनीं तें निगडित झालें आहे तीं अदृश्य आणि जड आहेत. लोकांना त्यांची जाणीव नाहीं. तीं बंधनें बुद्धिपुरःसर घालून घेतलेलीं नाहींत. समाजांतील बहुसंख्य व्यक्ति जेव्हां एका समान उद्दिष्टाच्या जाणिवेनें अथवा प्रेरणेनें परस्पराशीं निगडित होतात, तेव्हांच त्या जनसमूहाला समाज ही संज्ञा शोभून दिसते. संध्याकाळच्या वेळीं कचेऱ्या सुटल्यावर मुंबई शहराच्या फोर्ट विभागांत लोकांची प्रचंड गर्दी असते त्याला का समाज म्हणायचें ? आपलें सामाजिक जीवन जवळ जवळ त्या गर्दीसारखें आहे. जो तो आपलें लहानसें व्यक्तिगत उद्दिष्ट डोळ्यांपुढें ठेवून धावपळ करीत आहे. आपल्या धावपळींत इतरांना धक्के बसून ते जमीनदोस्त होत आहेत कीं काय याची कोणीच पर्वा करीत नाहीं. या भाऊगर्दींतून आपलें लहानसें व्यक्तिगत उद्दिष्ट तरी साध्य होईल किंवा. नाहीं याचा विचार करण्यासहि आम्हांला फुरसत नाहीं. अशा सामाजिक अराजकाच्या काळांत आपण आहों. हें अराजक नष्ट होऊन आपल्या जीवनांत शिस्त निर्माण होईल असे प्रयत्न आपण करावयास पाहिजेत. शिस्तीशिवाय समाजाची धारणा होणेंच अशक्य आहे.

पूर्वींची समाजरचना आज अगदीं विस्कळीत झाली आहे. पूर्वींच्या काळांतील नैतिक, आर्थिक आणि राजकीय बंधनें आज शिल्लक नाहींत. जीं आहेत तीं परस्परपूरक नाहींत, बरींचशीं परस्पर विसंगतच आहेत. धार्मिक बंधनें ढिलीं पडलीं आहेत. त्यामुळें कोणतीहि गोष्ट करतांना फारच थोड्या लोकांना त्याबद्दल नैतिक विधिनिषेध वाटतो. आपल्याला फायदा होत असला म्हणजे कोणतीहि गोष्ट करण्यास आम्ही तयार असतों. जी काय भीति आहे ती कायद्याची. त्यामुळें व्यक्तीचा स्वार्थ आणि समाजाचें हित यांमध्यें जेव्हां विरोध निर्माण होतो तेव्हां बहुतेक लोक स्वार्थ साधून समाजहितांचा बळी

देण्यास तयार असतात. भांडवलदारी समाजव्यवस्था आर्थिक स्पर्धास्वातंत्र्यावर आधारलेली आहे. ज्यानें त्यानें आपल्याला पसंत असेल तो व्यवसाय करावा, त्यांत स्पर्धा करावी आणि फायदा मिळवावा ही व्यवस्था एका काळीं समाज-धारणेच्या दृष्टीनें उपयुक्त ठरली, परंतु आतां स्पर्धेचा जमाना संपून आपण ठेकेदारीच्या जमान्यांत येऊन पोहोंचलों आहोंत. व्यक्तीचा स्वार्थ आणि समाजाचें हित यांमध्यें कमालीचा विरोध निर्माण झाला. अर्थातच नियंत्रणें आलीं आणि नियंत्रणावरोवरच काळ्या बाजाराचा आणि लांचलुचपतीचा फैलाव झाला.

ही लांचलुचपत आणि अनैतिकता बंद करावयाची असेल तर व्यक्तिगत स्वार्थ आणि समाजहित यांची सांगड घालून दिली पाहिजे. सामान्य जनतेला नैतिकतेचीं नुसतीं व्याख्यानें देऊन काम भागणार नाहीं. त्या नैतिकतेचा त्यांच्या हिताशीं संबंध जोडून दिला तरच तें शक्य होणार आहे. तसें न होईल तर मात्र कशाची तरी भीति निर्माण करूनच अज्ञानी जनतेला शिस्तींत ठेवतां येईल. तो भीति धर्माची असूं शकेल अथवा बडग्याची असेल. केवळ धर्माची भीति दाखवून हें काम करून घेण्याचे दिवस आतां उरले नाहींत. तेव्हां अखेरीस भीतीचाच उपयोग करावयाचा म्हटलें तर बडग्याची भीतीच प्रभावी ठरणार आहे; म्हणजेच हुकुमशाही निर्माण करणें होय. आपल्याला तर हुकुमशाही नको आहे. मग लोकशाही तत्त्वांचें पालन करून समाजांत लोकशाही कशी आणतां येईल ?

चार माणसें एका विशिष्ट उद्दिष्टानें एकत्र येऊन काम करूं लागलीं म्हणजे त्यांच्या जीवनांत शिस्त निर्माण होते. शिस्त म्हणजेच संघटना असें म्हटलें तरी चालेल. सामुदायिक जबाबदारी घेऊन ती पार पाडण्याची आपणाला संवयच राहिलेली नाहीं. ती पुन्हां उत्पन्न केली पाहिजे. आजच्या परिस्थितींत चारचौघानीं एकत्र येऊन काम केल्यानें त्यांत प्रत्येकाचा फायदा होईल, असे प्रश्न घेऊन लोकांची संघटना निर्माण केली पाहिजे. कारखान्यांत काम करणाऱ्या

कामगारांना आपल्या हितरक्षणार्थ अपरिहार्यपणें एकत्र येऊन भांडवलदाराच्या विरुद्ध लढावें लागतें. एकट्यानें लढून भागणार नाहीं, हें त्यांना समजतें. या गोष्टीचा फायदा घेऊन त्यांना संघटित केलें पाहिजे. संघटनेच्या हितांतच आपलें स्वत:चें हित समाविष्ट आहे हें त्यांना पटवून देणें अशा वेळीं अवघड जाणार नाहीं. जी स्थिति कामगारांची तीच शेतकऱ्यांची. आजच्या विशिष्ट परिस्थितींत त्यांना शेतकरी पंचायत आणि सहकारी संस्था यांचें महत्त्व समजावून देतां येईल. सारांश, कामगारसंघ, किसान पंचायती, सहकारी संस्था, वाचनालयें, सेवादलें इत्यादि लोकोपयोगी संस्थांचें जाळें निर्माण केलें तरच प्रत्येकाला शिस्त कळेल व ती अंगीं बाणेल. इतकें सर्व झालें तरी हें काम करण्यांत पुढाकार घेऊन तें निष्ठेनें चालू ठेवण्याची जबाबदारी कोणीं पत्करायची, हा प्रश्न उरतोच. परंतु समाज अज्ञानी असला, तरी त्यांतील कांहीं लोक ज्ञानी असतातच. सर्वांनीं लांचलुचपत केली तरी मी करणार नाहीं; पैसे मिळाले नाहींत आणि त्यामुळें येणारी प्रतिष्ठा मिळाली नाहीं तरी पर्वा नाहीं; मी आपल्या सत्त्वाला जागेन आणि सर्वांच्या हितासाठीं प्रयत्न करीन. अशा ध्रीदाचीं माणसें प्रत्येक समाजांत असतातच. त्यांची संख्या वाढवण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. अशा समाजवादी जीवननिष्ठेनें प्रेरित होऊन जनता-संघटनेचें काम अखंड चालू ठेवणाऱ्या समाजसेवकांची परंपरा निर्माण होऊं शकली तरच हुकुमशाही टाळून धर्मातीत परंतु सर्वोदयी जीवननिष्ठेवर आधारलेल्या समाजाचा पाया घालतां येईल आणि आजचें सामाजिक व नैतिक अराजक नाहींसें होईल.

◆ ◆ ◆

लोकशाहीमध्यें विरोधी पक्षाचें स्थान

लेखनकाल : ऑगस्ट १९४७

आपली राज्यसंस्था लोकशाहीच्या तत्त्वावर आधारलेली असावी याबद्दल आतां दुमत नाहीं. हुकुमशाही राजवटीची उघडपणें तरफदारी करणारे लोक आतां फारसे आढळणार नाहींत. हुकुमशाही पक्ष देखील लोकशाहीच्या गर्जना करीतच आपलें घोडें पुढें दामटीत असतात. कारण तसें केल्याशिवाय आपणांस जनतेचा पाठिंबा मिळणार नाहीं हें त्यांना माहीत असतें. म्हणून लोकशाहीच्या तत्त्वाच्या घोषणा करणारांना तें तत्त्व मान्य झालें असें मानून चालणार नाहीं. धनिकवर्गाला तें मान्य होणें कसें शक्य आहे ? कारण खरोखरच राज्यकारभार लोकांच्या मताप्रमाणें सुरू झाला तर धनिकवर्गाचें अस्तित्वच नष्ट होणार हें त्यांना ठाऊक आहे. म्हणून धनिकवर्गाची लोकशाहीबद्दलची आस्था ही नकली आहे हें लक्षांत ठेवलें पाहिजे. जोंपर्यंत आपल्या संपत्तीच्या आणि संघटनेच्या जोरावर राज्यसूत्रें आपल्या हातीं ठेवतां येतील तोंपर्यंतच ते लोकशाहीचा देखावा चालूं ठेवणार. राजसत्ता आपल्या हातून हिरावून घेतली जाईल अशी भीति निर्माण झाल्याबरोबर हा धनिकवर्ग हुकुमशाही स्वरूपांत प्रगट झाल्यावांचून राहात नाहीं. जनता संघटित होऊन राज्यसूत्रें आपल्या हातून हिरावून घेण्याची शक्यता निर्माण होईपर्यंत ते स्वस्थ बसतील असें मानण्याचें कारण नाहीं. जनता जागृत होऊन आपल्याला विरोध करणारा पक्ष संघटित होऊं लागताच या ना त्या कारणानें हे लोक त्या विरोधी पक्षावर हल्ला सुरू करतात. कारण विरोधी

पक्षाचें बळ जसजसें वाढत जाईल तसतसा आपल्या सर्वाधिकारी सत्तेला अंकुश लागणार हें त्यांना ठाऊक असतें. विरोधी पक्षाच्या मताची पर्वा न करतां हम करे सो कायदा चालू ठेवला तर संघटित विरोधी पक्ष क्रान्तीच्या मार्गानेंदेखील राजसत्ता हस्तगत करण्यास मागें पुढें पाहणार नाहीं याबद्दल त्यांची खात्री असते. म्हणून विरोधी पक्षावर मुळांतच घाव घालून तो खचीं करावयाचा असा त्यांचा डाव असतो. म्हणून आज जे कोणी लोकशाहीच्य तत्त्वांचा पुरस्कार करीत असतील त्यांची परीक्षा करून मगच आपण त्यांवर विश्वास ठेवला पाहिजे.

परमतसहिष्णुता हा लोकशाहीचा आत्मा आहे. आपलें मत बोलून दाखवून त्याप्रमाणें संघटना करण्याचें स्वातंत्र्य ज्या राजवटींत नसेल ती राजवट लोकशाही स्वरूपाची आहे असें म्हणतां यावयाचें नाहीं. या निकषावर घासूनच लोकशाहीच्या आणि समाजवादाच्या घोषणा करणाराची कसोटी केली पाहिजे. अर्थात् विरोधी पक्षाच्या लोकांनींदेखील आपलीं कर्तव्यें पाळलीं पाहिजेत. लोकमताच्या जोरावरच राज्याधिकार आपल्या हातीं घेऊं. परकीय सत्तेला बोलावून राज्यसंस्थाच उखडून काढण्याचा प्रयत्न केव्हांहि करणार नाहीं अशी त्यांनीं हमी द्यावयास हवी आणि त्यांच्या दैनंदिन आचरणावरून तें सिद्ध झालें पाहिजे. या गोष्टी मान्य करणाऱ्या लोकांस शांततेच्या मार्गानें आपल्या मतांचा प्रचार करण्यास आणि संघटना करण्यास पूर्ण वाव असला तरच प्रचलित राजवटीला लोकशाहीच्या तत्त्वाची चाड आहे असें म्हणतां येईल. परंतु या गोष्टी तत्त्वतः मान्य करूनहि विरोधी पक्षांची मुस्कटदाबी करण्याचा प्रयत्न सध्यां होत आहे. कोणतीहि गोष्ट करावयाची असें एकदा ठरविलें म्हणजे कारणें वाटेल तितकीं देतां येतात.

नवजात स्वातंत्र्य टिकविणें हें आमचें मुख्य कर्तव्य आहे. आपण आणीबाणीच्या परिस्थितींतून जात आहों. अशा वेळीं लोकशाहीच्या तत्त्वाखातर

विरोधी पक्षांची गय करणें चूक आहे असें प्रतिपादन करण्यांत येतें. आपलें स्वातंत्र्य आणि राज्यसंस्था टिकून राहण्यासाठींच जर या गोष्टी केल्या जात असतील तर तें सयुक्तिक नाहीं. अशानें राज्यसंस्था स्थायी होणार नाहीं प्रसिद्ध राजकीय तत्त्ववेत्ता एडमंड बर्क यानें एके ठिकाणीं म्हटलें आहे कीं, ज्या राज्यसंस्थेंत बदल घडवून आणण्याचीं साधनें उपलब्ध नाहींत, ती राज्यसंस्था चिरजीवी होऊं शकत नाहीं. (A State without the means of change is without the means of conservation) राजवट कशाहि प्रकारची असली तरी त्यांत थोडाफार असंतोष हा राहणारच. वर्गविभक्त समाजांत तर तें अपरिहार्यच आहे. धनिकवर्गाच्या मोहबतीवर आणि त्याच्या तंत्रानें चालणाऱ्या राजवटींत जनता संतुष्ट कशी राहील ? जनतेचें हित तें राज्यकर्त्या वर्गाचें अहित अशी वस्तुस्थिति असल्यानें सर्वत्र असंतोष निर्माण व्हावयाचाच. या असंतुष्ट जनतेला संघटित होऊन राज्यसूत्रें आपल्या हातीं घेण्याचा लोकशाही अधिकार नसेल तर ती यावच्चंद्रदिवाकरौ गुलाम थोडीच राहील ! प्रस्थापित राज्यसंस्थे (State) मध्यें आवश्यक ते फेरबदल करण्याची शक्यता नसेल तर ती राज्यसंस्थाच मोडून काढण्यास लोक मागें पुढें पाहणार नाहींत; आणि त्यांनीं कां पाहावें ? राज्यसंस्था लोकांच्यासाठीं आहे, लोक राज्यसंस्थेसाठीं नाहींत. म्हणून खरोखरच आपली नवोदित राज्यसंस्था चिरजीवी व्हावी असें अधिकारारूढ पक्षाला वाटत असेल तर त्यांनीं लोकमतानुसार होणाऱ्या आवश्यक त्या फेरबदलासाठीं तयार असलें पाहिजे.

असे फेरबदल करण्यास आम्ही नेहमींच तयार आहों असें पुनः पुनः सांगण्यांत येतें. परंतु हे फेरबदल अगर सुधारणा घडवून आणण्याची प्रक्रिया कोणती याबद्दल कोणी फारशी चर्चा करीत नाहीं. आवश्यक ते फेरबदल घडवून आणण्याचें साधन म्हणूनच पक्षसरकारची योजना ब्रिटिश राज्यघटनेमध्यें मंजूर केलेली आहे. लोकशाही पद्धतीनें निवडणुका व्हाव्यात, निरनिराळ्या

संघटित पक्षानें निवडणुकीस उभें राहावें आणि ज्या पक्षाला बहुमत मिळेल त्यानें राज्यसूत्रें हातीं घेऊन ती चालवावी अशी ही पद्धति असून आपल्या देशांत आपण त्याच पद्धतीचा अंगीकार केलेला आहे. म्हणजे ही पद्धति यशस्वी व्हावयाची असल्यास विरोधी पक्षाचें अस्तित्व महत्त्वाचें आहे. लोकमत आणि प्रस्थापित राज्यसंस्था यांची फारकत झाल्यास राज्यसंस्थाच उखडून निघेल म्हणून ही योजना आहे. विरोधी पक्षाला आपली संघटना करून रास्त टीका करण्याची मुभा नसेल तर ही योजना यशस्वी होणार नाहीं. हिंदुस्थानांतील अधिकारारूढ पक्ष आपण फेरबदल घडवून आणण्यास तयार आहों, इतकेंच नव्हे पण आम्हांला समाजक्रांति करावयाची आहे अशा राणा भीमदेवी घोषणा करीत असतो, परंतु विरोधी पक्षाच्या विकासास यत्किंचित् वाव देण्यास तो तयार नाहीं. कारण जें कांहीं करावयाचें तें आम्हीच करणार आहोंत; आम्हांला सर्व समजतें आहे; विरोधी पक्षाची वास्तविक जरुरीच नाहीं, अशा मनोवृत्तीनेंच आमचा राज्यकारभार चालूं आहे. तोंडानें लोकशाहीचा बकवा करून एकच पक्ष आणि एकच पुढारी अशा घोषणा अधिकाराच्या जागीं बसलेल्या कांहीं महत्त्वाच्या व्यक्ति करीत असतात हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर काँग्रेसनें आपली घटना बदलली आणि सर्व पक्षोपपक्षांचा संयुक्त मोर्चा हें पूर्वीचें स्वरूप बदलून तो एक पक्ष झाला. अन्य पक्षांना अगर गटांना काँग्रेसमध्यें राहण्यास मनाई करण्यांत आली. समाजवादी विचारसरणीचे लोक बाहेर पडले आणि त्यांनीं आपला स्वतंत्र पक्ष स्थापन केला. त्या वेळीं पुष्कळ लोकांनीं या घटनेचें स्वागत केलें. लोकशाही यशस्वी व्हावयाची असेल तर राज्यसंस्थेशीं एकनिष्ठ असूनहि तात्त्विक मतभेदाच्या भूमिकेवर संघटित झालेल्या प्रतिष्ठित विरोधी पक्षाची आवश्यकता आहे असें प्रतिपादन केलें. परंतु हा केवळ मानभावीपणा होता असें खेदानें म्हणावें लागत आहे. समाजवादी पक्षानें प्रत्यक्ष निवडणुकीसाठीं आपले उमेदवार उभे केले तेव्हां त्यांच्यावर शिव्यांची लाखोली वाहण्यांत आली. समाजवादी लोक

देशद्रोही आहेत, असा प्रचार करण्यांत आला. आपल्यापेक्षां निराळें मत असणारा तो देशद्रोही ही मनोवृत्ति निश्चितच लोकशाहीची नव्हे. समाजवाद ही एक विलायती वस्तु आहे असेंहि सांगण्यांत येतें. जणू आजच्या घटनेमध्यें ज्या राज्यपद्धतीचा (पार्लमेंटरी) स्वीकार करण्यांत आला आहे ती शंभर टक्के देशीच आहे. परंतु सूक्तासूक्त मार्गांनीं विरोधी पक्ष हाणून पाडावयाचा असा ज्यांनीं निर्धार केलेला आहे त्यांनीं सत्याची चाड काय म्हणून बाळगावी? कोणाला देशद्रोही, कोणाला जातीय, कोणाला हिंसावादी म्हणून झोडपण्याचा जो प्रकार आणीबाणीच्या परिस्थितीच्या नांवाखालीं चालूं आहे तो लोकशाहीच्या तत्त्वांना धरून नाहीं. इतकेंच नव्हे तर लोकशाहीस विघातक आहे. कामगारांनीं आपल्या न्याय्य हक्कासाठीं अगतिक होऊन एखादा संप केला म्हणजे लगेच देशबुडवे म्हणून कोल्हेकुई करण्यांत येते. इंटकवाल्यांच्याकडे कामगारसंघ असेल आणि त्यांनीं संपाची नोटीस दिली तर अर्थातच ती देशहितार्थ असते. मागल्या लढाईंत इंग्लंडवर जो प्रसंग होता त्याहूनहि आमची आणीबाणीची परिस्थिति आहे काय? इंग्लंडमध्यें त्या वेळीं विरोधी पक्ष नव्हता काय? सुरुवातीपासूनच मजूर पक्ष मंत्रिमंडळांत होता काय? कीं कांहीं अटींवर तो सामील झाला? लढाईच्या काळांत इंग्लंडमध्यें संप झाले नाहींत असें तर सांगायचें नाहींना? परंतु या सर्व गोष्टींकडे जाणूनबुजून दुर्लक्ष केलें जात आहे. ही मंडळी दुसऱ्यांना जातीयवादी म्हणतात, परंतु लोकमताची आणि ज्या सरकारधार्जिण्या नाहींत अशा संस्थांची मुस्कटदाबी करून ते कोणत्या तत्त्वांचा पुरस्कार करीत आहेत? प्रामाणिक मतभेदांना आणि त्यावर आधारलेल्या विरोधी पक्षाला वाढूं न देण्याचें धोरण हुकुमशाही वृत्तीचें आहे. त्यामुळें जातीयवाद कमी न होता त्याला प्रोत्साहन दिलें जात आहे;. आणि पुढें मागें जातीयवादी वृत्ति फैलावल्या तर त्याची जबाबदारी आपल्या आजच्या अधिकारारूढ पक्षावरहि येऊन पडेल हें विसरतां कामा नये. उठल्यासुटल्या मग गांधींच्या नांवाचा उच्चार करून आम्हीच गांधीजींचे खरे वारसदार म्हणून जनतेची दिशाभूल करणारे लोकहि एक प्रकारची संकुचित सांप्रदायिकता निर्माण करीत आहेत. या धोक्यापासून सर्वांनीं वेळींच सावध राहिलें पाहिजे. वेळ पडेल तेव्हां तिरंगी राष्ट्रध्वजासाठीं ते आपल्या प्राणाची आहुति देण्यासहि

सिद्ध होतील. परंतु त्या राज्यांत आपल्या विकासाची संधि आहे हें त्यांना कृतीनें पटवून दिलें पाहिजे. आज अनुभव मात्र अगदीं निराळा येत आहे. विरोधी पक्ष, सरकारची तळी नेहमींच उचलून धरणाऱ्या संघटनांखेरीज अन्य संघटना यांची मुस्कटदाबी, पक्षपात असे प्रकार प्रत्यही चालूं असून वाटेल त्या खोट्यानाट्या सबबीवर नागरिक आपलें नवोदित स्वातंत्र्य अबाधित राहावें, आपली शासनसंस्था चिरजीवी होऊन तिचें सातत्य कायम राहावें असें आज कोणाला वाटत नाहीं ? शेंकडा नव्याण्णवाहून अधिक लोकांची मनोवृत्ति आज तशीच आहे. सर्वांनींच त्या स्वातंत्र्याची आजवर वाट पाहिली, उपासना केली आणि त्यासाठीं हालअपेष्टा भोगून बलिदान दिलें. इतक्या प्रयत्नांनीं निर्माण झालेलें हें राज्य टिकाऊ होऊं नये असें जनतेला वाटणें कसें शक्य आहे ? स्वातंत्र्याची गळचेपी केली जात आहे. सरकारच्या ताब्यांत असलेलीं प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रीत्या सर्व साधनें यावर एकट्या अधिकारारूढ पक्षाचीच मिरासदारी निर्माण करण्यांत आलेली आहे. अधिकारारूढ पक्ष आणि राज्य-संस्था यांमध्यें फरकच करण्यांत येत नाहीं. आम्हीच सरकार, आम्हीच राज्यसंस्था, आम्हीच देश अशी अरेरावी वृत्ति फैलावत आहे. नवोदित स्वातंत्र्याला हाच धोका आहे. त्यापासून सावध राहिलें पाहिजे.

सदैव जागृत राहून आपल्या स्वातंत्र्याची किंमत दिली पाहिजे, जनतेला जागृत करण्यासाठीं कमरा कसून पुढें येणें आवश्यक आहे आणि जेथें आपल्या मूलभूत हक्कांची मुस्कटदाबी होत असेल त्या ठिकाणीं मुकाटपणें गुलामी सहन करतां उपयोगी नाहीं. गुलामी पत्करून आत्मनाश करून घेण्यापेक्षां सत्याग्रहलढा करून लढतां लढतां मरणें हेंच समाजाच्या हिताच्या दृष्टीनें उपयुक्त होईल. त्यांतून जागृति निर्माण होईल आणि मग जागृत जनता येऊं घातलेल्या संकटास तोंड देऊन आपलें स्वातंत्र्य अबाधित कायम टिकविण्यास समर्थ होईल. म्हणून सरकारी दडपशाहीमुळें विरोधी पक्षानें नाउमेद न होतां जनता-संघटनेचें कार्य करीत राहिलें पाहिजे. तसें न होईल तर विरोधी पक्षानें आपलें कर्तव्य केलें नाहीं असें म्हणावें लागेल.

◆ ◆ ◆

लोकशाही आचार व समाज-परिवर्तनाचीं साधनें

वसंत व्याख्यानमालेंत २१ मे १९५९

विद्यमान जगांत लोकशाहीची आवश्यकता आणि महत्ता सर्वमान्य झालेली आहे. कोणतीहि समाजव्यवस्था अथवा शासनप्रणाली श्रेष्ठ कीं कनिष्ठ हें ठरवावयाचें झाल्यास लोकशाहीच्या निकषावरच तपासून घ्यावी लागते. अशीं कांहीं राष्ट्रें आहेत कीं, ज्यांना आम्ही लोकशाहीवादी आहोंत असें सांगावें लागतें. आपल्या राज्यव्यवस्थेचें निरूपण करतांना ते 'जनतेची लोकशाही' (peoples' democracy) असें करतात. लोकशाहीची उघडपणें निर्भत्सना कोणीच करूं शकत नाहीं. किंबहुना लोकशाहीचा नष्टांश करावयाचा असेल तरीहि लोकशाही मूल्यांची जपमाळ ओढीतच करावा लागतो. पहिल्या महायुद्धाच्या वेळीं लोकशाहीसाठीं जग सुरक्षित करणें ही घोषणा होती, दुसऱ्या महायुद्धाच्या वेळीं देखील हुकुमशाही विरुद्ध लोकशाही असाच सामना होता; आणि तरीहि अजून जगांत लोकशाही कशी टिकून राहील याची विचारवंतांना चिंता लागून राहिली आहे.

साम्राज्यवाद्यांच्या महत्त्वाकांक्षेमुळें जागतिक युद्धें होतात. अप्रगत देशांवर आपला कब्जा करण्याची त्यांची धडपंड असते. परंतु या प्रक्रियेमध्यें अप्रगत देशांतील जनतादेखील जागृत होत जाते. दुसऱ्या महायुद्धानंतर फार मोठें परिवर्तन घडून आलें. अनेक राष्ट्रें स्वतंत्र झालीं. जगांतील सत्तर कोटी लोक तत्पूर्वी परतंत्र होते. पण नंतर भारत, पाक, सिलोन, जॉर्डन, इझरायल वगैरे राष्ट्रें स्वतंत्र झालीं. पैकीं चाळीस कोटी जनतेच्या आपल्या देशाकडे सर्व जगाचे

डोळे लागून राहिले आहेत. तेंच एक आशास्थान आहे. आजूबाजूला हुकुमशाहीची भीषण छाया पसरली आहे आणि त्यामुळें आपल्यावर अधिकच जबाबदारी येऊन पडली आहे. आपल्याहि लोकशाहीला जर ग्रहण लागेल तर मोठा बाका प्रसंग उद्भवणार आहे. मानवजातीवर तिसऱ्या अतिभयंकर अशा महायुद्धाची आपत्ति कोसळून त्यांत विद्यमान संस्कृतीचा विध्वंस होण्याची शक्यता आहे. म्हणून आपल्या देशांत लोकशाही टिकविण्यासाठीं आपण अटोकाट प्रयत्न केले पाहिजेत. आपल्यापुढें जे सामाजिक, आर्थिक आणि राजकीय असे प्रश्न आहेत ते लोकशाही मार्गानें सोडविण्याचा प्रयत्न आपण केला तरच लोकशाही या देशांत दृढमूल होऊं शकेल.

शांतता म्हणजे काय ? कांहीं लोकांच्या मतें विद्यमान परिस्थिति कायम राहणें म्हणजेच शांतता. पण तसें नाहीं. World is changing and it should change. न्याय आणि आवश्यक असे फेरबदल जरूर घडवून आणले पाहिजेत. लोकशाही म्हणजे नुसता मतांचा कारभार नव्हे. फेरबदल होण्याची कांहीं योजना नसेल तर लोकशाही टिकणार नाहीं. पाकिस्तानांत आवश्यक असा बदल घडून आला नाहीं म्हणूनच तिथें लोकशाहीचा मृत्यु झाला. भारतांत निदान दोन तरी सार्वत्रिक निवडणुका झाल्या.

या लोकशाहीचा विचार करतांना आपली परंपरा विचारांत घेतलीच पाहिजे. भारतीय संस्कृतीच्या मागें जें तत्त्वज्ञान आहे तें लोकशाहीला पोषक आहे. प्रत्येक व्यक्ति स्वयंपूर्ण आहे, प्रत्येक व्यक्तीला आत्मा आहे अशी आपली श्रद्धा आहे. म्हणूनच प्रत्येक व्यक्तीला, स्त्रीला, पुरुषाला एक मत असलें पाहिजे ही भूमिका आपण मान्य करूं शकलों.

आपलें तत्त्वज्ञान जरी लोकशाहीला पोषक असलें तरी आपली सामाजिक घडण विद्यमान परिस्थितींत आणि प्रचलित लोकशाहीच्या कल्पनांशीं विसंगत आहे. वर्णाश्रमावर आधारलेली आपली समाजरचना आधुनिक लोकशाहीच्या

मार्गातील धोंड होऊन बसूं पाहात आहे. प्रचलित सामाजिक विषमतेमुळें आपल्यामध्यें फूट पडून आपला एकजिनसीपणा नष्ट झाला. महाराष्ट्रावर ओढवलेल्या आपत्तीचें मूळदेखील या विषमतेमध्यें शोधावें लागेल. स्वातंत्र्योत्तर-कालांत जर एखादा महापुरुष येथें उभा राहिला असता तर कदाचित् आजचा प्रसंग आलादेखील नसता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर ही एक मोठी विभूति होती. परंतु त्यांना आपल्या दलित वर्गीय बांधवांवरच्च आपलें लक्ष केंद्रित करावें लागलें. म. गांधींनादेखील भारतीय जनतेचाच प्रश्न हाताळावा लागला. तीच त्यांची मानवतेची सेवा होती.

स्वातंत्र्य चळवळीमध्येंदेखील कांहीं परंपरा घातल्या गेल्या. त्या लोकशाहीला पोषक ठरतील अशाच आहेत. परकीय सरकार अधिकारारूढ होतें. तें सरकार पदच्युत करून त्या ठिकाणीं स्वराज्य सरकार प्रस्थापित करणें हें निवडणुकीच्या द्वारा अशक्यच होतें. आम्हांला घटनाच नव्हती. सनदच नाहीं तर सनदशीर मार्ग कसले असें लोकमान्य टिळक म्हणत. परंतु तशाहि स्थितींत सशस्त्र उठावानें ब्रिटिश सरकार उलथून पाडणें व्यवहार्य राजकारण नव्हतें. ती शक्यता असती तर कदाचित् गांधींचें नेतृत्व जनतेनें मान्य केलें नसतें. गांधींचें तत्त्वज्ञान सत्याग्रहाचें, अहिंसेचें होतें. परंतु जनतेनें मात्र तें धोरण म्हणून, म्हणजेच निःशस्त्र प्रतिकाराचें साधन म्हणून, मान्य केलें. परंतु महात्माजींनीं आपल्या मार्गानें जी जागृति केली ती सर्वांत महत्त्वाची आहे. लोकशाही आचार आणि समाजपरिवर्तनाचीं साधनें या दृष्टीनें त्याला विशेष महत्त्व आहे. ते आपल्याला गोखल्यांचे शिष्य म्हणवत. त्यांतील रहस्य आपण ओळखलें पाहिजे. लोकशाहीचे निःशस्त्र प्रतिकाराच्या साधनाचा वापर केल्यामुळें कांहीं फायदे झाले आहेत तसे तोटेहि झाले आहेत. परंतु आपण आतां तोट्याचा विचार न करतां जमेच्या बाजूचाच हिशेब करणार आहोंत. त्यामुळें लोकशाहीचा पाया या देशांत घातला गेला हें आपण लक्षांत ठेवलें पाहिजे. सशस्त्र क्रांति करून परकीय सत्ता उखडून काढली गेली असती तर या देशांत

लोकशाही राजवट आली असती असें सांगणें धाष्ट्र्याचें होईल. ऐक्य त्यामुळें टिकलें असतें असें म्हटलें तरीहि त्याबद्दल शाश्वति नाहीं. इतर राष्ट्रांत काय परिस्थिति आहे ती आपण पाहतों आहोंतच. इंडोचीन, कोरिया या स्वतंत्र झालेल्या देशांतहि फाळणीचे आणि ऐक्याचे प्रश्न आहेतच. स्वातंत्र्योत्सुक जनतेला जागृत करून तिच्या मार्फत चळवळी झाल्या. आपल्या देशांत लोकशाहीचा पाया घातला गेला. जागृत लोकमत आणि आपल्या सामुदायिक कर्तृत्वाबद्दलचा आत्मविश्वास हीच लोकशाहीची कसोटी आहे. सत्याग्रहाच्या आणि असहकाराच्या चळवळीमुळें आणि विशिष्ट जागतिक परिस्थितीमुळें ब्रिटिश पार्लमेंटला कायदा करून हिंदुस्थानला स्वराज्य द्यावें लागलें आणि आपल्या देशांत एक लोकशाही घटना मान्य होऊन लोकमतानुवर्ती राज्यकारभार सुरू झाला. भारताला राजकीय स्वातंत्र्य मिळून एक फार मोठें सामाजिक परिवर्तनाचें साधन भारतीय जनतेला उपलब्ध झालें. शेंकडों संस्थानें शांततेचा भंग होऊ न देतां सर्व राज्यांत विलीन झालीं ही एक फार मोठी घटना होय. तसेंच आतांपर्यंत उपेक्षिलेल्या वर्गांना, जातींना आतां समाजांत जगण्याची शक्यता निर्माण झाली आहे. निदान आतांपर्यंत ज्या जातींचें वर्चस्व होतें तसें तें राहिलेलें नाहीं.

लोकशाही घटना मिळाल्यानंतर आतां निवडणुकीच्या द्वारा आपण परिवर्तन घडवून आणलें पाहिजे असा एक युक्तिवाद केला जातो. समाजपरिवर्तनाचें साधन म्हणून सत्याग्रहाच्या साधनाचा वापर केला जातां कामा नये असेंहि सांगण्यांत येतें. लोकशाहीमध्यें कायदेभंगासारख्या सत्याग्रहांची आवश्यकता भासूं नये असें मीदेखील म्हणेन. परंतु ती गोष्ट जनतेच्या स्वाधीन नसून राज्यकर्त्या पक्षाच्या धोरणावर प्रामुख्यानें अवलंबून आहे. या दृष्टीनें मी तीन उदाहरणें देऊन माझें म्हणणें विशद करतों. राज्यकर्ते जर जनमताची चाड बाळगणार नसतील, दिलेलीं आश्वासनें पाळणार नसतील आणि स्वत:च कायदे मोडणार असतील तर जनतेनें सत्याग्रह आणि कायदेभंगाच्या मार्गाचा अवलंब

कां करूं नये ! सरहद्दीचा प्रश्न, द्विभाषिकाचा प्रश्न आणि कामगारविषयक कायद्यांचा प्रश्न हीं माझीं तीं उदाहरणें होत. सरहद्दीचा प्रश्न तर बहुमत करून सोडविणें अशक्यच आहे. हें द्वैभाषिक घटनेची अंमलबजावणी न करतां आमच्यावर लादण्यांत आलें. घटनेचें कलम क्रमांक तीन राज्यकर्त्यांनीं पायाखालीं तुडविलें आहे. निदान गुजराथी जनतेला तरी ती संधि द्यायला हवी होती. कारण त्यांनीं तर या महाद्वैभाषिकाविरुद्ध ठराव करूनच महाराष्ट्र प्रांतिक कमिटीची शिफारस धुडकावून लावली होती.

आमची कल्पना अशी होती कीं, सरकार आणि काँग्रेस लोकमताचा आदर करील. परंतु तसें कांहीं दिसत नाहीं. तरीहि आपण सबूरीनें घेत आहोंत. आणि सबूरीनेंच आपण चाललें पाहिजे. बेळगांवचा लढा पुढें टाकणें शक्यच नव्हतें. बेळगांव आज नाहीं याचा अर्थ तें कधींच नाहीं. पक्षोपपक्षामध्यें जशी त्यांची विचारसरणी म्हणजे एक विशिष्ट प्रकृति आहे तशी विकृतिदेखील आहे. ती विकृति अधिक प्रभावी होणार नाहीं अशी खबरदारी आपण घेतली पाहिजे. आपणांस संयुक्त महाराष्ट्र नाकारण्याचें.जें मुख्य कारण आहे त्याबाबतचें आमचें निदान जर बरोबर असेल तर त्या अनुषंगानेंच आपलें धोरण आपण आंखलें पाहिजे. संयुक्त महाराष्ट्र झाला तर श्रमजीवी जनता समाजवादाच्या दिशेनें पाऊलवाट करील अशी भीति भांडवलशाही शक्तींना वाटते. ही जी जनता समाजवादाच्या दिशेनें वाटचाल करण्यास उत्सुक आहे तिची संघटना करण्यांत आपण पुढाकार घेतला पाहिजे. तसें केल्यास पक्षीय विकृतींना प्राधान्य मिळणार नाहीं.

हें निदान जर बरोबर असेल तर महाराष्ट्रांत आणि भारतामध्यें समाजवादाला अनुकूल शक्ति कोणत्या तें पाहून आपलें धोरण आणि लढ्याचे डावपेंच ठरविले पाहिजेत. भारतीय राजकारणांतील अशा शक्ति कमजोर होणार नाहींत याबद्दल आपण खबरदारी घेतली पाहिजे. ब्रिटिशांबरोबर लढतांनादेखील आपण हा विवेक पाळला होता.

काँग्रेसचे सूत्रधार म्हणून संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनांत पंडितजी हे टीकेचें केन्द्र होणें अपरिहार्य आहे. तरीहि आपल्या कुठल्याहि विरोधकाला शत्रु म्हणून चालणार नाहीं. ते आपले विरोधक आहेत, शत्रु नव्हेत. कारण ते जनतेचे प्रतिनिधि आहेत. त्यांच्याहि मागें मत आहे, मतदार आहेत. आपल्याला जनमत वळवतां आलें पाहिजे. तें करावयाचें असेल तर आत्मक्लेशाच्या मार्गानें आणि विधायक कार्यानें तें करतां येईल. चांगल्याला चांगलें म्हटल्यानें आपली शक्ति कमी होत नाहीं. विरोध तेथें ठासून विरोध करूं. आवश्यक तर सत्याग्रह आणि साराबंदीदेखील करूं. प्राणपणानें लढण्याची आमची तयारी आहे. शिव्याशापानें शत्रु कमजोर होत नाहीं. चहा पिऊन आलेल्या तरतरीचा तो प्रकार आहे.

लोकशाही टिकविण्याच्या दृष्टीनें भारताची जशी तशी महाराष्ट्राचीहि जबाबदारी मोठी आहे. एवढेसें बेळगांव. तिथेंच लोकशाही अयशस्वी होऊन कसें चालेल ? लोकशाहीचा मृत्यु टाळला पाहिजे. मग आमचे प्राण गेले तरी हरकत नाहीं. काळाची ती गरज आहे. तें ऐतिहासिक कार्य आहे. देह पडो अगर राहो आपण आपला मार्ग सोडतां कामा नये. आज महाराष्ट्र करील तें उद्यां भारतांत होईल. आमच्या ध्येयासाठीं, आमच्या साध्यासाठीं लोकशाही मार्गानें आम्ही प्रयत्न करीत राहूं. हीच लोकशाहीची उदात्तता. तीच तिची महत्ता. सत्याचा आग्रह धरूं या ! लोकशाही तरच जगेल, लोकशाही तरच टिकेल.

◆ ◆ ◆

जागतिक लोकराज्याकडे

लेखनकाल : ऑक्टोबर १९५०

विश्वराज्याच्या आणि जागतिक लोकसभेच्या कल्पना कांहीं नव्या नाहींत. विश्वराज्याचीं स्वप्नें तर प्राचीन काळींदेखील अनेक सम्राटांनीं रंगविलेलीं आहेत. जागतिक लोकसभेची कल्पना मात्र त्या मानानें आधुनिकच समजली पाहिजे. पहिल्या महायुद्धापूर्वी तर केवळ कवींच्या आणि तत्त्वज्ञान्यांच्या पुरतीच ती मर्यादित होती. सुविख्यात आंग्ल कवि टेनिसन् यानें आपल्या काव्यांत मानवी लोकसभा आणि जागतिक संयुक्त राज्य (Parliament of man and federation of the world) असें चित्र रेखाटलें आहे. तसेंच मार्क्स, लेनिन इत्यादि विचारवंतांनीं आंतर-राष्ट्रीय वादाचा पुरस्कार केलेला आहे. तथापि त्यांच्या या भव्य कल्पनांना सर्वसामान्य जनतेच्या भावी जीवनामध्यें कांहीं स्थान होतें असें म्हणतां येणार नाहीं.

पहिल्या महायुद्धाच्या वेळीं परस्पर विरोध असलेल्या स्वार्थी साम्राज्यांच्या संघर्षाचीं कटु फळें मानवजातीला फार मोठ्या प्रमाणांत भोगावीं लागलीं. त्यांतूनच विश्वशांतीच्या आणि जागतिक राज्याच्या कल्पनेचें बीज जनमनामध्यें रोवलें गेलें. विश्वशांतीच्या आणि लोकशाहीच्या महान् ध्येयाच्या भूमिकेवरूनच 'लीग ऑफ नेशन्स' ही संस्था स्थापन करण्यांत आली आहे, असें प्रतिपादिलें गेलें. परंतु या संस्थेनें जागतिक शांतता आणि लोकशाही यांचा पाया घालण्या-ऐवजीं राष्ट्रसंघाचीं सूत्रें ज्यांच्या हातीं होतीं, त्या विजयी राष्ट्रांनीं स्वार्थीपणानें

जगाची वांटणी करून घेतली आणि या स्वार्थसाधूपणाला 'लीग ऑफ नेशन्स'च्या ध्येयवादाचा फसवा मुलामा दिला. त्यामुळेंच जगांत शांतता आणि लोकशाही प्रस्थापित होण्याऐवजीं अखिल मानवजात दुसऱ्या महायुद्धाच्या खाईत लोटली गेली.

दुसऱ्या महायुद्धांतून संयुक्त राष्ट्रसंघ (United Nations) ही संस्था निर्माण झाली. महायुद्धाचे विध्वंसक परिणाम जनतेला फार मोठ्या प्रमाणावर भोगावे लागल्यामुळें आज तरी युद्ध म्हटल्याबरोबर लोकांच्या हृदयांत धडकी भरते जागतिक शांतता ही सर्वसाधारण जनतेची आकांक्षा होऊं पाहात आहे; आणि म्हणूनच आज सर्वसामान्य माणसालादेखील जागतिक राज्याची आवश्यकता भासूं लागलेली दिसते. त्यामुळें संयुक्त राष्ट्रसंघाकडे युद्धपीडित जनता आशेनें पाहूं लागली. जगांत शांतता प्रस्थापित करून मानवाला समान संधि प्राप्त करून देण्याचें कार्य या संस्थेमार्फत हळूहळू होऊं शकेल, अशी लोकांची अपेक्षा आहे. परंतु त्या संस्थेच्या घटनेंतच चार बड्या राष्ट्रांनीं आपल्याकडे फार मोठा अधिकार बळकावून ठेवलेला आहे. प्रारंभापासूनच अशा प्रकारें विषमतेचें बीजारोपण झालेलें उघड दिसून येतें. हा अधिकार त्यांनीं आपल्याकडे कां घेतला असा प्रश्न मागाहून विचारांत घेऊं. तूर्त या अधिकाराचा अर्थ काय तें पाहणें फायदेशीर होईल. संयुक्त राष्ट्रसंघाला कोणताहि महत्त्वाचा निर्णय घ्यावयाचा असला तर त्याला इंग्लंड, रशिया, अमेरिका, फ्रान्स या बड्या राष्ट्रांची संमति असावी लागते. यांपैकीं एकानें-देखील जरी विरोध केला तरी तो ठराव बारगळून जातो. अशा रीतीनें प्रारंभापासूनच जगांतील राष्ट्रांची कायद्यानेंच श्रेष्ठ आणि कनिष्ठ अशी वर्गवारी करण्यांत आली आहे. चार सत्ताधीश राष्ट्रांच्या हातांत अधिकार एकवटल्यामुळें सर्व जगाचें भलें-वाईट करण्याचा मक्ताच जणूं त्यांना मिळाला आहे. संयुक्त राष्ट्रसंघटना जगांत शांति प्रस्थापित करण्यासाठीं स्थापन करण्यांत आली असली, तरी हीं चार सत्ताधीश राष्ट्रें आपल्या स्वार्थासाठींच तिचा वापर

करीत आहेत. साहजिकच त्यांच्यांत दोन गट निर्माण होऊन ते युद्धाची तयारी करीत आहेत. प्रत्येकानें दुसऱ्याला युद्धखोर म्हणायचें व स्वतः शांततावादी आहोंत अशी टिमकी वाजवायची, असा त्यांचा खाक्या आहे. कोणाहि एखाद्या राष्ट्रानें यूनोकडे न्यायासाठीं दाद मागितली तर तें राष्ट्र कोणत्या गटांत पडतें यावरून काय निकाल मिळणार तें ठरून जातें. फिर्यादी राष्ट्रानें तटस्थतेची भूमिका घेतली तरी न्याय मिळण्याच्या दृष्टीनें त्याचा फारसा उपयोग होत नाहीं. काश्मीरचा प्रश्न हें एक उत्कृष्ट उदाहरण आहे. सारांश, संयुक्त राष्ट्रसंघटना ही संस्थादेखील न्याय प्रस्थापित करण्याच्या दृष्टीनें कुचकामाची बनूं पाहात आहे. कोणी म्हणेल कीं, असें जर आहे तर इतर राष्ट्रांनीं या संस्थेंत जावें तरी कशाला? सकृद्दर्शनीं हा आक्षेप बरोबर वाटला तरी हा प्रश्न वाटतो तितका सोपा नाहीं. युनोमध्यें जाऊं नये तर काय करावें, असें कोणीं विचारल्यास आज तरी दुसरा पर्याय दाखवितां येत नाहीं. युनोमध्यें राहूनच बड्या राष्ट्रांवर दडपण आणावें आणि या संस्थेची पुनर्घटना करण्यासाठीं आवश्यक ती शक्ति निर्माण करावी, असा आजच्या परिस्थितींत व्यवहार्य मार्ग दिसतो. या संघटनेचें रूपांतर जागतिक लोकशाही राज्यामध्यें व्हावें यासाठीं आज कनिष्ठ समजल्या जाणाऱ्या राष्ट्रांनीं एकजुटीनें प्रयत्न करावयास हवा.

जागतिक लोकशाही राज्याची कल्पना कशी मूर्त स्वरूपांत येऊं शकेल, यासंबंधीं सर्वसाधारण जनतेमध्यें जागृति निर्माण करणें आज अत्यंत आवश्यक झालें आहे. कारण, संयुक्त राष्ट्रसंघटनेमधील दोन्ही परस्परविरोधी सत्ताधारी गटांकडून पुष्कळच खोटा प्रचार आणि आभास निर्माण करण्यांत येत आहे. अमेरिका म्हणते कीं, कम्युनिस्ट गट आणि भांडवलशाही गट हे एकाच जगामध्यें गुण्यागोविंदानें राहूं शकतील; मात्र रशियानें आपलें वर्चस्व इतर राष्ट्रांतून पाठविण्याचा प्रयत्न थांबविला पाहिजे. उलट रशियाला वाटतें कीं, अमेरिका व भांडवलशाही राष्ट्रें आज ना उद्यां आपल्यावर आक्रमण

करतीलच. परिणामतः दोन्ही गट वरकरणी शांततेच्या घोषणा करून आपापल्या परीनें लढाईची तयारी झपाट्यानें करीत आहेत. दोघांची महत्त्वाकांक्षा जवळपास एकच आहे. दोघांनाहि जगावर आपलें वर्चस्व निर्माण करून आपल्या हुकमतीखालील विश्वराज्य स्थापन करावयाचें आहे. जरा निराळ्या शब्दांत सांगावयाचें झालें तर दोघांनाहि आपलें साम्राज्य जगावर प्रस्थापित करावयाचें आहे.

जागतिक लोकशाही राज्याचें ध्येय आज नाही उद्यां साकार व्हावयाचें असेल तर तें मानवी समानतेच्या भूमिकेवर आधारलेलें असावयास पाहिजे. जुना राष्ट्रसंघ काय किंवा आजची संयुक्त राष्ट्रसंघटना काय, मुळांतच विषमतेच्या पायावर आधारलेली आहे. तो पाया बदलल्याशिवाय तिचें रूपांतर जागतिक लोकशाही राज्यांत होऊं शकणार नाहीं. आजच्या जगांत सर्वत्र सामाजिक आणि आर्थिक विषमता पसरलेली आहे. ती नाहींशी करण्याचा प्रयत्न आतांपर्यंत तरी संयुक्त राष्ट्रसंघटनेकडून मनापासून असा मुळींच झालेला नाहीं. दक्षिण आफ्रिकेंतील 'मालनचें सरकार' उघडउघड वर्णविद्वेषाच्या भावनेस प्रोत्साहन देऊन मानवी वातावरण दूषित करीत आहे; परंतु या गोष्टीची दखल घेण्यास युनो तयार नाहीं. पृथ्वीवरील सुपीक जमिनी, खाणी इत्यादि नैसर्गिक साधनें रशिया, अमेरिका आणि युरोपांतील सत्ताधारी राष्ट्रांच्या हातांत केंद्रित झालेलीं आहेत. त्यांपैकीं जवळपास तीन पंचमांश हिस्सा सर्वस्वीं त्यांच्या मालकीचा आहे; आणि एकपंचमांश हिश्श्यावर वसाहतीच्या रूपानें त्यांचेंच वर्चस्व आहे. उरलेला एकपंचमांश भागच काय तो आशिया व आफ्रिका खंडांतील स्वतंत्र राष्ट्रांच्या हातांत आहे. लोकसंख्येच्या दृष्टीनें विचार केला तर एकपंचमांश नैसर्गिक साधनें असलेल्या आशिया व आफ्रिका खंडांतील राष्ट्रांची लोकसंख्या औद्योगिक दृष्ट्या पुढारलेल्या सत्ताधारी राष्ट्रांच्या मानानें कितीतरी अधिक आहे. औद्योगिक दृष्ट्या मागासलेल्या या राष्ट्रांचा आर्थिक विकास साधून तेथील

जनतेचें-जीवनमान सुधारलें पाहिजे, असा आरडाओरडा तर खूप ऐकूं येतो, परंतु त्यासाठीं नैसर्गिक साधनांची फेरवांटणी करायला रशियासकट कोणीच तयार नाहीं. मागासलेल्या राष्ट्रांतील जनतेनें उद्योग केला पाहिजे हें खरें; परंतु त्यांच्या परिश्रमाला जें फळ यावयाचें, तें या नैसर्सिक साधनांवरच्च आज तरी प्रामुख्यानें अवलंबून आहे. या साधनांचें समान वांटप झाल्यावांचून जागतिक राज्य आणि विश्वशांति निर्माण होणें अशक्य आहे. खऱ्याखुऱ्या समाजवादी भूमिकेवरच्च जागतिक लोकशाही राज्याची उभारणी करतां येईल.

समाजवादी असें म्हटल्याबरोबर अर्थातच रशियाची आठवण होते. रशिया समाजवादी राष्ट्र आहे, असें सांगण्यांत येतें. रशिया जर समाजवादी आहे, तर जगावर वर्चस्व प्रस्थापित करण्याच्या त्याच्या प्रयत्नाला आपण हरकत कां घ्यावी, असा प्रश्न साहजिकच उभा राहतो. परंतु रशिया जरी समाजवादी म्हणवून घेत असला, तरी नैसर्गिक साधनांत वांटणीचें तत्त्व रशियानेंहि मान्य केलेलें नाहीं. रशियाचें जें पुरातन साम्राज्य होतें, त्या सर्व प्रदेशावर त्यानें आपला कब्जा ठेवलेला आहे. नव्यानें निर्माण झालेल्या कम्युनिस्ट राष्ट्रांनादेखील त्यानें नैसर्गिक साधनांत वांटणी दिलेली नाहीं. त्यामुळें आशिया-आफ्रिकेंतील लोकसंख्येच्या मानानें पुरेशीं नैसर्गिक साधनें नसलेल्या राष्ट्रांच्या आर्थिक प्रगतीचा प्रश्न फार बिकट होऊन बसला आहे.

पहिल्या महायुद्धाच्या दरम्यान रशियामध्यें राज्यक्रांति होऊन तेथें कम्युनिस्ट पक्षाचा अंमल सुरू झाला. रशियन साम्राज्य नैसर्गिक साधनांच्या दृष्टीनें जरी मोठें असलें, तरी औद्योगिक विकासाच्या दृष्टीनें तें भांडवलशाही जेत्या राष्ट्रांच्या मानानें फारच मागासलेलें होतें. भांडवलशाही राष्ट्रांना रशियांत कम्युनिस्ट राजवट प्रस्थापित झालेली रुचणें शक्यच नव्हतें. ती राजवट कोसळून पडावी म्हणून त्यांनीं नानाप्रकारें खटपटी लटपटी केल्या. आपला औद्योगिक विकास झपाट्यानें घडवून आणल्याशिवाय भांडवलशाही

राष्ट्रांपासून आपला बचाव करतां येणार नाहीं, हें कम्युनिस्ट नेत्यांनीं ओळखलें आणि वीस वर्षांच्या काळांत तें कार्य त्यांनीं पार पाडलें. नैसर्गिक साधनांची विपुलता असल्यानें त्यांना तें शक्य झालें. परंतु तेवढ्यानेंहि कार्यभाग झाला नसता. त्यासाठीं त्यांना कम्युनिस्ट पक्षाची हुकूमशाही प्रस्थापित करावी लागली. लोकशाही स्वातंत्र्याची जबर किंमत देऊनच त्यांना हें ऐश्वर्य प्राप्त करून घेतां आलें.

गेल्या महायुद्धाच्या दुसऱ्या पर्वांत रशिया आणि अन्य भांडवलशाही राष्ट्रांची हिटलरविरुद्ध एकजूट झाली आणि त्यांच्या संयुक्त आघाडीनें हिटलरचा पराभव केला. सहकार्याच्या या काळांत परस्परासंबंधीचे गैरसमज कमी झाले असतील आणि आतां हीं राष्ट्रें आपल्या शब्दाला जागून संयुक्त राष्ट्रसंघटनेमार्फत मानवजातीला सुखाचे व स्वातंत्र्याचे दिवस दाखवितील, अशी आशा वाटत होती, परंतु त्या आशा तूर्त तरी धुळीला मिळाल्या आहेत. पुढारलेल्या या भूमिकेवरून जगाचें हित साधण्याचा प्रयत्न केला असता तर ती गोष्ट शक्य झाली असती. परंतु आज हीं राष्ट्रें तोंडानें उदात्त ध्येयवादाच्या घोषणा करून प्रत्यक्षांत सत्तेचीं उपासक बनलीं आहेत. जागतिक राज्यासाठीं लागणारी समानता प्रस्थापित करण्याऐवजीं विषमता चालू ठेवण्याच्याच यांच्या स्वार्थी कारवाया चालूं आहेत. त्यामुळें या दोन्ही गटांपैकीं कोणाचेंच पुढारीपण मागासलेल्या देशांना हितावह होण्यासारखें नाहीं. कारण, प्रत्येक गटाला आपला स्वार्थ साधून जागतिक वर्चस्व प्रस्थापित करावयाचें आहे. रशिया समाजवादाचा पुरस्कार करीत असला तरी नैसर्गिक साधनांच्या बाबतींत आपला साम्राज्यवादी मालकी हक्क त्यानें चालू ठेवलेलाच आहे. ही विषमता कायम टिकविण्याच्या धोरणामुळें तात्कालिक म्हणून स्वीकारलेल्या हुकूमशाहीचा त्याग करणें शक्यच नाहीं. सत्ता ही एक अजब मोहिनी आहे आणि निरंकुश सत्ता तर काय विचारायलाच नको. ती मनुष्याला बिघडविते, तशीच पश्चालादेखील कर्तव्यच्युत बनविते.

आपल्याला विरोध करतील त्या सर्वांचें क्रूरपणें निर्दालन हा तिचा धर्म आहे. त्यामुळें भलेबुरे लोक एकाच जात्यांत भरडले जातात. मनुष्याचें मनुष्यत्व नष्ट करण्यांत येतें. मानव्याचा तेजोभंग होतो. अशा निःसत्त्व व निस्तेज बनलेल्या प्रजेमध्यें हुकूमशाहीला विरोध करून लोकशाही प्रस्थापित करण्याचें सामर्थ्य असूंच शकत नाहीं, तशी अपेक्षा करणें वेडेपणाचें होईल. त्यासाठीं निराळ्या शक्तींचीच आवश्यकता आहे. गेल्या महायुद्धाच्या वेळीं महात्मा गांधी म्हणत कीं, हिटलरचा पराभव त्यांनीं उपयोजिलेल्या विध्वंसक साधनांनीं करून लोकशाही प्रस्थापित होणार नाहीं. त्यांतून पुन्हा हुकूमशाहीच निराळ्या स्वरूपांत उदयास येईल. त्यांच्या त्या उद्गारांचा खरेपणा आज आपल्या प्रत्ययाला येत आहे. रशिया, अमेरिका, इंग्लंड वगैरे राष्ट्रांच्या नामधारी लोकशाही आघाडीचें रूपांतर आतां दोन सत्तास्पर्धा करणाऱ्या युद्धखोर गटांत झालेलें आहे. त्यांच्याकडून जगांत शांतता प्रस्थापित होईल अशी अपेक्षा करणें व्यर्थ आहे.

हुकूमशाहीचा नाश करून लोकशाही प्रस्थापित करण्याचें कार्य लोकशाही-वर आधारलेल्या आणि समतेच्या वातावरणांत वाढलेल्या शक्तींकडूनच होऊं शकेल. म्हणून जगांतील शांततावादी शक्तींचें संघटन या दोन्हीं गटांपासून स्वतंत्र राहूनच करावें लागेल. त्यासाठीं आज जीं राष्ट्रें या दोन गटांपैकीं कोणत्याहि गटांत नाहींत, त्यांनीं आपलें स्वातंत्र्य अबाधित राखलें पाहिजे. यांपैकीं कोणत्याहि गटांत सामील होणें म्हणजे तिसऱ्या महायुद्धाला मदत केल्यासारखें आहे हीं स्वतंत्र राष्ट्रें सध्यां भौतिकदृष्ट्या आणि नैतिकदृष्ट्या-देखील पुरेशीं सामर्थ्यवान् नाहींत, हें उघडच आहे. परंतु हे दोन गट परस्परांवर गुरगुरून आहेत, त्याचा या स्वतंत्र राष्ट्रांनीं फायदा करून घेतला पाहिजे. त्यांनीं तटस्थ राहावयाचें ठरवलें तर त्यांच्यावर उघड उघड आक्रमण करण्याची या दोहोपैकीं कोणाचीहि सहजासहजीं हिंमत होणार नाहीं. त्यामुळें मागासलेल्या या राष्ट्रांना आपलें सामर्थ्य वाढविण्यास वेळ मिळेल. त्यांनीं

आपली जुनाट अर्थव्यवस्था बदलून औद्योगिक दृष्ट्या आपली प्रगति करून घेतली पाहिजे. या राष्ट्रांत ही जी सामाजिक आणि आर्थिक व्यवस्था विद्यमान आहे, ती विषमतेवर आधारलेली आहे. त्यामुळें हीं राष्ट्रें नैतिकदृष्ट्या दुर्बल आहेत. ही विषमता नष्ट करून समानता प्रस्थापित केली तरच त्यांचें नैतिक सामर्थ्य वाढेल व औद्योगिक प्रगतीहि सुकर होईल. मात्र त्यांनीं हें कार्य लोकशाहीच्या आणि शांततेच्या मार्गानें केलें पाहिजे. लोकशाहीच्या आणि शांततेच्या मार्गाचा अवलंब केल्यानें हें कार्य घडवून आणण्यास थोडा अधिक वेळ लागेल हें खरें आहे. आपलें जीवनमानहि विद्यमान भांडवलशाही राष्ट्रांइतकें उंचावतां येणार नाहीं, परंतु जगांत शांतता नांदून सर्वसामान्य जनतेला स्वातंत्र्य आणि समान संधि मिळावी अशी समाजव्यवस्था निर्माण करावयाची असेल तर ही किंमत देण्यास आपण तयार असलें पाहिजे. आजची परिस्थिति त्या दृष्टीनें कांहींशी अनुकूलच आहे. कारण, त्या दोन गटांपैकीं कोणत्याच गटांत न जातां मागासलेल्या राष्ट्रांनीं क्रियाशील तटस्थतेचें धोरण स्वीकारलें व एकजूट केली तर त्यांना महायुद्ध टाळणें अशक्य नाहीं. त्यामुळें लोकशाहीच्या आणि शांततेच्या मार्गानें जी औद्योगिक आणि सामाजिक प्रगति घडवून आणावयाची आहे, तिलाहि पुरेसा वेळ मिळेल. अर्थात् तटस्थ राहिल्यामुळें प्रत्यक्ष आक्रमण होण्याचा धोका कमी झाला तरी युद्धखोर गटाच्या पंचमस्तंभी कारवाया चालूंच राहतील. त्या कारवाया हाणून पाडावयाचें एकच प्रभावी साधन आहे आणि तें म्हणजे विद्यमान सामाजिक आणि आर्थिक विषमता नष्ट करून लवकरांत लवकर समानता प्रस्थापित करणें आणि मानानें जीवन जगतां येईल इतकें निर्वाहाचें साधन जनतेला मिळवून देणें. कारण, आपलें दारिद्र्य व सामाजिक व आर्थिक विषमता या आपल्या दुखण्यावर बोट ठेवूनच पंचमस्तंभी कारवाया चालूं राहतात. रोगाचें हें मूळच उखडून काढलें पाहिजे.

अशा प्रकारें आशिया व आफ्रिका खंडांतील मागासलेल्या राष्ट्रांनीं लोकशाहीच्या आणि शांततेच्या मार्गानें आपली प्रगति करून घेण्यांत यश मिळविलें तर त्यांतून एक नवें सामर्थ्य निर्माण होईल. हें सामर्थ्य निर्माण करण्यास मदत करून तें संघटित करण्याच्या महान् युगप्रवर्तक कार्यात भारतानें पुढाकार घ्यावा अशी दारिद्र्यानें पीडलेल्या आणि युद्धाच्या भीतीनें व्याकुळ झालेल्या जगांतील बहुसंख्य जनतेची अपेक्षा आहे. या कार्यात भारतानें यश मिळविलें तर संयुक्त राष्ट्रसंघटनेमध्यें आज कनिष्ठ समजल्या जाणाऱ्या राष्ट्रांचा प्रभाव वाढेल आणि युद्धखोर गटांना आपली हम करेसो कायदा ही वृत्ति चालविंतां येणार नाहीं. रशियाला आपला पोलादी पडदा दूर करून आणि आपली हेकट असहिष्णु वृत्ति सोडून लोकशाहीचा मार्ग घ्यावा लागेल आणि अमेरिकेला आपला भांडवलशाहीचा उर्मटपणा त्यागून समाजवादी विचारसरणीशीं जुळवून घ्यावें लागेल. सर्वांनाच समानतेच्या तत्त्वाचा खऱ्या अर्थानें अंगीकार करावा लागेल आणि संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या घटनेंत मूलतः बदल करून जागतिक समाजवादी लोकराज्याचा पाया घालतां येईल.

◆ ◆ ◆

लोकशाहीचें यश विकेंद्रीकरणांत आहे

लेखनकाल : सप्टेंबर १९६२.

जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायती यांच्याकडे पाहण्याचा माझा एक विशिष्ट दृष्टिकोण आहे. तो प्रामुख्यानें विधायक आणि शैक्षणिक स्वरूपाचा आहे. माझ्या मतें जिल्हा परिषदांच्या पदाधिकाऱ्यांवरहि एक महान् विधायक आणि शैक्षणिक जबाबदारी पडलेली आहे. त्यांनीं ती स्वखुशीनें स्वीकारलेली आहे. त्यांच्यामध्यें जर पुरेसा ध्येयवाद असेल तरच ती जबाबदारी पार पाडणें शक्य होणार आहे.

पंचायती राज्याचे समर्थक असलेले अखिल भारतीय कीर्तीचे एक पुढारी श्री. जयप्रकाश नारायण मला एकदा म्हणाले की, 'महाराष्ट्राच्या जिल्हा परिषदेच्या योजनेमध्यें मला सत्तेचें वांटप तेवढें दिसतें, त्यांत पंचायती राज्य नाहीं.' त्यांच्या म्हणण्याचा आशय असा कीं, सध्यां राज्यपातळीवर जसे मंत्री आहेत तसे आम्हीं जिल्हा पातळीवर निर्माण केले आहेत. त्यांना अधिकार सुपूर्द केले आहेत. लोकशाहीच्या दृष्टीनें त्यांत नवा आशय आहे असें दिसत नाहीं. आज राज्याच्या पातळीवर लोकशाहीचा जो आशय आहे तो त्यापेक्षां संपन्न झाला पाहिजे. जिल्ह्याच्या पातळीवर मंत्री निर्माण केले म्हणजे तो आशय अधिक संपन्न कसा होऊं शकेल ?

परवां प्रा धनंजयराव गाडगीळ यांनीं एक विशिष्ट शब्द वापरला. ते म्हणाले कीं, जिल्हा परिषदा म्हणजे 'स्वराज्याचें प्रकटीकरण' आहे. त्यांचें

म्हणणें खरेंच आहे. पण त्याच्याच जोडीला लोकशाहीचें विकसनहि घडून आलें पाहिजे. जिल्हा परिषदांचा आशय असा दुहेरी असला पाहिजे. आपल्या लोकशाहीचें हळूहळू विकसन होत आहे कीं नाहीं तें तपासलें पाहिजे. ह्या दृष्टीनें पाहतां जिल्हा परिषदांना अधिकार दिले म्हणजे तेवढ्यानें काम भागत नाहीं. त्या अधिकारांच्या द्वारा लोकशाहीचें अधिक विकसन झालें पाहिजे.

ब्रिटिशांच्या राजवटीमध्यें स्थानिक स्वराज्य संस्थांचा प्रयोग सुरू झाला. मध्यवर्ती सत्ता त्यांच्या नेमणूक केलेल्या अधिकाऱ्यांकडे ठेवून, स्थानिक कारभारामध्यें जनमताची विचारपूस करून, त्यांच्या प्रतिनिधींशीं सल्लामसलत करून राज्यकारभार करण्याची प्रथा सुरू करण्यांत आली. हळूहळू दिल्लीच्या केंद्रीय असेंब्लीपर्यंत तिचें क्षेत्र वाढवण्यांत आलें. परंतु निर्णय घेण्याचे अथवा बजेट पास करण्याचे अधिकार लोकप्रतिनिधींना नव्हते. स्वराज्य मिळाल्यानंतर ही परिस्थिति पालटली. ब्रिटिश लोकांनीं नेमलेल्या अधिकाऱ्यांची सत्ता जनतेनें निवडलेल्या पुढाऱ्यांच्या हातीं आली म्हणजे जनतेच्या संमतीनें चाललेला राज्यकारभार इतकाच त्याचा अर्थ झाला. ज्यांची संमति आहे त्यांना राजकारणांतले बारकावे समजत नसले तरी स्थूलमानानें त्यांचें आकलन होत आहे अशीहि आज परिस्थिति नाहीं त्यामुळें आपल्या देशांत व्यक्तींच्या मोठेपणावर आणि व्यक्तिमत्त्वावर अधिक भर दिला जातो, आणि व्यक्तिपूजेची भावना आपाततः निर्माण होते. मोठ्या विभागांत प्रातिनिधिक लोकशाही अपरिहार्य आहे, परंतु त्याचें कारण सर्व मतदार एकत्र बसूं शकत नाहींत, हें आहे. परंतु आपल्याकडे त्याहिपेक्षां एक निराळें कारण आहे. तें म्हणजे आपल्या मतदारांमध्यें अजून प्रश्न समजून घेऊन निर्णय करण्याची शक्ति निर्माण झालेली नाहीं आणि त्यासाठीं लागणारी शिस्तदेखील आम्हीं आमच्या ठिकाणीं निर्माण केली नाहीं. उदाहरणार्थ, गांवांतील सर्व प्रौढांची ग्रामसभा घेऊन चर्चा करतां यावी, अशी ग्रामपंचायतींना कायद्यानें मुभा आहे. परंतु ती बैठक होऊन ग्रामपंचायतीचा कारभार चालतो अशांतला भाग नाहीं.

कायद्यांत तशी तरतूद आहे, परंतु त्याच्या फायदा घेण्याची मतदारांची इच्छा नाहीं, आपण ती तशी निर्माण करीत नाहीं. गांवांतदेखील आपण प्रतिनिधि नेमतों आणि वर्षभर त्यांच्यावर कारभार सोंपवून देतों. म्हणजे ग्रामपंचायतींत-देखील राज्य व्यक्तीचें आहे, सरपंचाचें किंवा निवडलेल्या मूटभर पंचांचें ! व्यक्ति-माहात्म्य ही गोष्ट अशी आहे कीं, ती नाहींशी करावी असें त्या व्यक्तीला स्वतःला वाटत नाहीं. म्हणून सरपंच हे आपण होऊन आम ग्राम-जनांना जागृत करण्याचा प्रयत्न करतील असें समजण्याचें कारण नाहीं.

वास्तविक खरी लोकशाही म्हणजे जनतेची सत्ता. जनतेची सत्ता म्हणजे जनतेच्या केवळ संमतीनें प्रतिनिधींनीं राज्य करणें नव्हे, तर जनतेनें जाणून-बुजून आपला कारभार चालविणें. जनतेचें सार्वभौमत्व प्रस्थापित झालें म्हणजे लोकशाहीचें विकसन झालें असें नाहीं. प्रत्येक मतदार खऱ्या अर्थानें निर्णय घेण्याला स्वतंत्र झाला पाहिजे. केवळ पांच वर्षांनीं मतदान करून आपले हुंगामी राजे निवडण्याचा अधिकार मिळाला म्हणजे लोकशाही अवतरली असें समजतां कामा नये. परंतु आज अवस्था जवळपास तशीच आहे. कारण अजून आम्हीं सर्वसामान्य मतदाराला विचार करायला प्रवृत्त केलेलें नाहीं. त्याच्यामध्यें ती शक्ति अद्याप आलेली नाहीं, त्यामुळें आम्ही जे प्रश्न त्याच्या-कडे घेऊन जातों ते त्याच्या आवांक्याबाहेरचे असतात. त्यामुळें सगळेच प्रश्न श्रद्धेचे होऊन बसतात; आणि भावना, श्रद्धा यालाच प्राधान्य मिळालें म्हणजे सामाजिक विषमतेमुळें शतखंड झालेल्या समाजामध्यें आपल्याला नको असलेले समूह एकत्र येऊं लागतात, मग आपण त्यांची जातीयता, ज्ञातिनिष्ठा इत्यादि विशेषणांनीं संभावना करतों. यावर इलाज काय ? यावर इलाज एकच, मतदारांच्यामध्यें निर्णयशक्ति उत्पन्न करणें आणि त्याला खऱ्या अर्थानें स्वतंत्र बनविणें, हें एक महान् जागरणाचें कार्य आहे. माझ्या मतें पंचायती राज्याच्या निरनिराळ्या संस्थांचें नेतृत्व ज्यांच्याकडे आलें आहे, त्यांच्यावर

ही जबाबदारी आहे. त्यांना ही एक अपूर्व संधि प्राप्त झालेली आहे, असें त्यांनीं मानलें पाहिजे.

राज्याचे पुढारी निवडण्याऐवजीं आपण जिल्ह्याचे हंगामी राजे निवडण्याचा अधिकार लोकांना दिला आहे, असा नव्या योजनेचा अर्थ नाहीं. 'स्वराज्याच्या प्रकटनाच्या' आणि 'लोकशाहीच्या विकसनाच्या' कार्यातील तो एक टप्पा झाला. अजून पुष्कळच मजल मारावयाची आहे. अर्थात् पंचायतीला अधिकार देऊन तेथें कार्य करण्यावर भर दिला म्हणजे पंचायती राज्याच्या दृष्टीनें अधिक कार्य झालें असें कांहींना वाटतें; आणि म्हणूनच ते म्हणतात कीं, जिल्हा हा घटक नसावा. कोणाला वाटतें कीं, तालुका हा घटक असावा.

महाराष्ट्रानें जिल्हा हा घटक कां निवडला, निदान मीं त्याला पाठिंबा कां दिला, याचें कारण सांगतों. माझें उद्दिष्ट स्पष्ट आहे. 'स्वराज्याचें प्रकटन' आणि 'लोकशाहीचें विकसन' झपाट्यानें व्हावें असें मला वाटतें. म्हणजे लोकांमध्यें निर्णयशक्ति आणली पाहिजे. त्यासाठीं जी योजना अधिक हितावह ती मला पाहिजे. या निकषावरच आपण निरनिराळ्या योजना तपासून पाहिल्या पाहिजेत. लोकांना आकलन होतील अशा प्रश्नांवर स्वतः निर्णय करण्यास त्यांना सिद्ध केलें पाहिजे. उदाहरणार्थ, प्रत्येक ग्रामपंचायतीनें जर आपल्या गांवासाठीं एक मास्टर प्लॅन बनविला तर त्या बाबतींत निर्णय घेणें ग्रामस्थांना अशक्य नाहीं. हा मास्टर प्लॅन अगदीं स्वतंत्र असूं शकत नाहीं, राष्ट्राच्या आणि जिल्ह्याच्या कोंदणामध्यें तो बसविला पाहिजे. कोंदणापेक्षां त्यांत बसवण्याची वस्तु अधिक मूल्यवान् आहे, हें विसरतां कामा नये. ग्रामयोजना त्या कोंदणांत बसविण्यासाठीं ग्रामस्थांना जिल्ह्याचा, राज्याचा आणि राष्ट्राचा प्लॅनदेखील कांहीं प्रमाणांत समजून घ्यावा लागेल. गांवच्या योजनेच्या अनुषंगानें जर आपण त्यांना समजावून

दिलें, तर त्यांची निर्णय करण्याची कुवत हळूहळू वाढत जाईल आणि लोकशाहीच्या विकसनाला त्याचा फार उपयोग होईल. तालुका आणि राज्य हा टप्पा फार मोठा व दूरचा आहे. यावरच्या पातळीवरील मंडळींना खालच्या सर्व मंडळींना समक्ष सारें समजावून देण्यास वेळ मिळणार नाहीं. त्याचें महत्त्वहि त्यांना तितकें जाणवणार नाहीं. जिल्हा पातळीवर जर ही जबाबदारी ठेवली तर ते अधिक श्रेयस्कर आणि उपयुक्त होईल. अशा तऱ्हेनें खालपासून वरपर्यंत शिक्षकांची एक सांखळी निर्माण करणें शक्य होईल. मी ज्या वेळीं या उपक्रमाकडे शैक्षणिक दृष्टीनें पाहतों असें म्हणतों त्या वेळीं त्याच्यामागें माझी ही भूमिका आहे. ज्यांना हें अधिकाराचें पद मिळालें आहे, त्यांनीं आपल्या अधिकाराचें वांटप अधिकाधिक कसें होईल याचा प्रयत्न केला पाहिजे.

या उपक्रमामध्यें मंत्रिमंडळाची कल्पना जशीच्या तशी स्वीकारलेली नाहीं, अध्यक्षांनीं ज्या समित्या होणार आहेत त्यांच्याशीं एकरूप होऊन अधिकारांचा वापर करावयाचा आहे. परवां ना. आबासाहेब खेडकर यांनीं सांगितलें कीं, पक्षभेद न करतां सर्व ठिकाणीं लक्ष दिलें गेलें पाहिजे. त्या दृष्टीनें समित्यांची पद्धति सोईस्कर आहे. प्रा. गाडगीळ यांनीं सांगितलेले उभे आडवे भेद आहेत. त्यांची सांगड घालून एकात्मता निर्माण करण्याच्या दृष्टीनेंहि ह्या पद्धतीचा उपयोग होणार आहे. सामान्य मतदारांमध्यें निर्णय-शक्तीची वाढ झालेली नाहीं तोंपर्यंत तत्त्वाधिष्ठित पक्ष प्रभावी होऊं शकत नाहीं. श्रद्धा आणि सामूहिक निष्ठा यांचाच प्रभाव अधिक पडतो. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्यें पक्षाचें स्तोम माजवूं नये, असें आम्ही म्हणतों त्याचें हें एक कारण आहे. येथें कारभारविषयक प्रश्नांना महत्त्व आहे आणि येथें लोकशाही विकसनाची शैक्षाणिक जबाबदारी आपल्याला पूर्ण करावयाची आहे.

मुख्यमंत्र्यांनीं सांगितल्याप्रमाणें जिल्हा परिषदेचें काम चालवतांना आपल्याला कांहीं संकेत निर्माण करावे लागतील, लोकशाहीच्या विकासाच्या

दृष्टीनें त्यांची आवश्यकता आहे. हे संकेत मीं आतां सांगितलेल्या उद्दिष्टांशीं सुसंगत असावेत. तें उद्दिष्ट साध्य करून घेण्या·या दृष्टीनें पोषक आणि सहायक असावेत. आपण शासकाचा एखादा नवा वर्ग निर्माण करावयास निघालेलों नाहीं. ज्याला अध्यक्षपद मिळालें आहे त्याचें तें पद निरनिराळ्या मार्गांनीं कारस्थानें करून काढून घेण्याचा उपद्व्याप कोणी करतां उपयोगी नाहीं. अविश्वासाचे ठराव उठल्यासुटल्या करून चालणार नाहीं. त्या दृष्टीनें नियम आणि संकेत तयार झाले पाहिजेत. अल्पमतवाल्या सदस्याला जर अधिकाराची जागा मिळाली असेल तर त्याच्याशीं आपण कसें वागावें याबद्दल संकेत हवेत.

जसा पक्षांचा अगर गटांचा संघर्ष आहे तसा संस्थांचा संघर्षदेखील होईल. सहकारी संस्था आणि पंचायती राज्यांच्या संस्था यांच्यांत सघर्ष झाला तर त्याचा निरास कसा करावयाचा याबद्दलहि आपल्याला संकेत करावे लागतील. ज्या प्रमाणांमध्यें आपण विषमता नष्ट करून एकात्मतेकडे जाऊं, त्या प्रमाणांत आपली लोकशाही समर्थ आणि आपलें राष्ट्र संपन्न होऊं शकेल, ही गोष्टहि विसरून चालणार नाहीं. हीं ध्येयें आणि उद्दिष्टें डोळ्यांपुढें ठेवून आपण सर्वांनीं कार्य करावयाचें आहे.

◆ ◆ ◆

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ... . वि: ....
क्रमांक ... ... क्रमांक दि:

युद्धकालीन लोकशाही

लेखनकाल : मे १९६३

"तोफांची गर्जना सुरू झाली म्हणजे कायद्याच्या तोंडाला कुलूप बसतें" असें सिसेरो म्हणाला होता. रोमन साम्राज्याच्या जमान्यांत त्यानें सांगितलेला तो सिद्धान्त आजहि अबाधित आहे. तें एक त्रिकालाबाधित सत्य आहे. युद्ध सुरू झालें म्हणजे कायद्यानें प्राप्त झालेले अधिकार जनतेला नेहमींसारखे उपभोगतां येत नाहींत. त्यावर मर्यादा पडतात. कायद्याचें राज्य म्हणजे लोकशाही असें म्हणतात (Rule of the law). मात्र ते कायदे लोकांनीं मंजूर केलेले असले पाहिजेत. युद्धाच्या काळांत कायद्याचें तोंड बंद होतें याचा अर्थ तेवढ्या अर्थानें लोकशाही स्वातंत्र्यावर मर्यादाच पडतात. लोकशाही शाबूत होते पण मग लोकशाहीच्या रक्षणासाठींच जीं युद्धें पुकारण्यांत येतात त्यांचें काय ? जगामध्यें लोकशाही जीवन निर्वेध राहावें म्हणून आम्ही लढत आहों असें पहिल्या महायुद्धाच्या वेळीं जर्मनीविरुद्ध लढणाऱ्या दोस्त राष्ट्रांनीं घोषित केलें होतें. दुसऱ्या महायुद्धाच्या वेळीं तर सामना बोलूनचालून हुकूमशाहीविरुद्ध लोकशाही असाच होता. त्यावेळीं देखील युद्ध चालूं असतांना लोकांच्या हक्कांवर मर्यादा घालण्यांत आल्याच होत्या. लोकशाही आणि युद्ध या परस्पर विसंगत गोष्टी आहेत असें एक वेळ मान्य केलें, तर लोकशाहीखातर हीं महायुद्धें लढण्याची कांहीं आवश्यकता होती काय ! लोकशाहीला मारक अशा साधनांचा वापर करून

लोकशाहीचें साध्य प्राप्त करून घेतां येईल काय ! लोकशाहीवर निष्ठा ठेवून त्याप्रमाणें आचरण करणाऱ्या राष्ट्रावर शत्रूनें हल्ला चढवला तर त्या वेळीं काय करावें ? इत्यादि प्रश्न चिनी आक्रमणाच्या संदर्भात उपस्थित होतात. त्यांचीं उत्तरें लोकशाही जीवनाबद्दल श्रद्धा बाळगणारांनीं शोधून काढलीं पाहिजेत.

राष्ट्राच्या स्वातंत्र्यावर घाला पडला तर युद्धामुळें लोकशाही हक्कांवर मर्यादा पडतात म्हणून युद्धच करूं नये असें म्हणतां येईल काय ? लोकशाही-साठीं शरणागति असाच त्याचा अर्थ होईल. शरणागति पत्करल्यावर लोकशाही ती शिल्लक काय राहणार ? अशा वेळीं आपद्धर्म म्हणून लोकशाही-निष्ठ राष्ट्रानें युद्धास तयार झालेंच पाहिजे असेंच कोणीहि म्हणेल. त्याबद्दल वाद असूंच शकत नाहीं. महात्मा गांधींनीदेखील काश्मीरवर टोळीवाल्यांनीं आक्रमण केलें तेव्हां सैन्याचा वापर करून राष्ट्राचें रक्षण करण्याचा सल्ला दिला होता. राष्ट्र आपत्तींत असेल तेव्हां युद्ध पुकारावें लागतें आणि आणी-बाणीची परिस्थिति जाहीर करावी लागते. त्यामुळें जनतेच्या लोकशाही अधिकारांवर मर्यादा येतात. कांहीं मूलभूत हक्क गोठवलेहि जातात; परंतु त्याला इलाज नसतो. कारण राष्ट्र जगलें तरच सारे अधिकार आणि हक्क. राष्ट्र पराभूत झालें म्हणजे मग कसची लोकशाही ! समाजजीवनाचें नियमन करणारी शासनसंस्था टिकून राहिली तरच कायद्याची अम्मलबजावणी होऊं शकते कायद्याचें राज्य म्हटल्यावर त्याच्या अंमलबजावणीची व्यवस्था करावीच लागते. सारांश, राष्ट्रीय आपत्तीच्या वेळीं युद्ध पुकारावें लागल्यानें लोकशाही अधिकारांचा संकोच होत असला तरी "जीवन् धर्ममवाप्नुयात्" या सिद्धान्तानुसार तें सहन केलेंच पाहिजे.

सन १९४७ सालीं ब्रिटिशांनीं आपली सत्ता या देशांतून काढून घेतली आणि भारत स्वतंत्र झाला. एक लोकशाही राज्यघटना तयार करून एक नवी राजवट आपण निर्माण केली. घटनेनें जनतेला लोकशाही हक्क प्रदान केले

आहेत. जनतेला लोकशाही जीवनाचा पुरेपूर आस्वाद घेतां येईल अशी भारतीय जीवनाची जडणघडण करण्याच्या महान् उद्दिष्टानें प्रेरित होऊन एका नव्या मन्वंतराचा प्रारंभ झाला. शासनाचें सार्वभौमत्व अबाधित राखून जनतेला राज्यकारभारामध्यें अधिकाधिक सहभागी करून घेणें हा लोकशाहीचा गाभा आहे. त्यांतूनच सर्वांना जीवन-विकासाची समान संधि उपलब्ध होऊं शकते. त्या दृष्टीनें राष्ट्राचे प्रयत्न चालू असतांनाच कम्युनिस्ट चीननें भारतावर विश्वासघाती हल्ला चढवला. आपल्या सार्वभौमत्वाला आणि लोकशाहीला आव्हान देण्यांत आलें. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आपल्या राष्ट्रावर आलेली ही एक महान् आपत्ति आहे. राष्ट्राच्या जीवन-मरणाचा प्रश्न निर्माण झाला आहे. या संकटाचा निरास करण्यांत आपण यशस्वी होऊं शकलों तरच लोकशाही जीवन-ध्येयाच्या मार्गावरील आपली प्रगति पुढें चालू ठेवणें शक्य होईल. आज चिनी आक्रमकांविरुद्ध आपलें अघोषित युद्ध चालूं आहे. आणीबाणीची परिस्थिति घोषित करण्यात आली आहे. राष्ट्रीय आपत्तीच्या या काळांत शासनाला नेहमींपेक्षां जास्त अधिकार प्राप्त होतात. घटनेनें दिलेले मूलभूत हक्क कायद्यानें प्रस्थापित करणें शक्य होत नाहीं. विशिष्ट मुदतींत कोर्टांत हजर न करतां बेमुदत अटकेंत ठेवण्याचा अधिकार शासकांना प्राप्त होतो. भाषण-स्वातंत्र्य, लेखन-स्वातंत्र्य, संघटन-स्वातंत्र्य यांचा उपभोग किती मर्यादेपर्यंत घेऊं द्यावयाचा तें शासनाच्या मर्जीवर अवलंबून राहतें मालमत्तेच्या अधिकारावरहि मर्यादा घालतां येतात. देशाच्या स्वातंत्र्याचें रक्षण करण्याच्या दृष्टीनें शासनाला तसे अधिकार देणें आवश्यक होऊन बसतें. कारण आपत्कालीं राष्ट्राची प्रतिकारक्षमता क्षीण करणाऱ्या शक्तींचा झटकापटकीं बंदोबस्त करावा लागतो. आपत्कालीं समाजविघातक आणि देशद्रोही शक्तींना मोकळें रान सोडून भागत नाहीं. राष्ट्रावर आलेल्या आपत्तीचा स्वार्थासाठीं उपयोग करून घेणाऱ्या समाजकंटकांना कठोरपणें शासन करावें लागतें. नाहींपेक्षां युद्धपरिस्थितीमुळें भोगाव्या लागणाऱ्या हालअपेष्टांमध्यें या समाजकंटकांकडून भरच पडत जाते.

सारी शक्ति एकवटून शत्रूचा प्रतिकार करण्याचे समाजाचे प्रयत्न ढिले पडतात. जे आपल्या राष्ट्राशीं एकनिष्ठ नाहींत, शत्रूचे पंचमस्तंभ आहेत, अशा देशद्रोह्यांचाहि कठोरपणानें बंदोबस्त करावा लागतो. राष्ट्राचा घात करूं मागणारांना लोकशाही स्वातंत्र्याचे अधिकार भोगण्याचा मुळींच हक्क नाहीं. लोकशाही हक्कांचें पालन करण्याच्या नांवाखालीं अशा लोकांची गय करणें सर्वस्वीं अनिष्ट होय.

आजच्या परिस्थितींतहि ज्यांना आपल्या देशाबद्दल आणि त्या देशामध्यें लोकांच्या प्रयत्नानें प्रस्थापित झालेल्या शासनाबद्दल आत्मीयता नाहीं, त्यांना घटनेनें बहाल केलेल्या हक्कांची मागणी करण्याचा काय अधिकार? ज्या शत्रूनें आमच्या स्वातंत्र्यावर घाला घातला आहे, त्या शत्रूची तरफदारी करून भारतीय जनतेमध्यें बुद्धिभेद करण्याचा जे प्रयत्न करतात, त्यांचा बंदोबस्त कठोरपणें आणि तडकाफडकी करतां येईल असे अधिकार शासकांना मिळालेच पाहिजेत. नाहींपेक्षां त्यांच्या घरभेदेपणामुळें आपलें स्वातंत्र्यच नष्ट होऊन पुन्हा एकवेळ परकीयांचे गुलाम होऊन राहण्याची पाळी आपणावर येईल. दुसऱ्या महायुद्धाच्या वेळीं हिटलरनें जोंवर रशियावर हल्ला केला नव्हता, किंबहुना रशियाचा आणि हिटलरचा करार झालेला होता, तोंवर तें युद्ध साम्राज्यवादी युद्ध आहे असें कम्युनिस्ट म्हणत होते. सर्व देशांतील लोकांना आपल्या सरकारविरुद्ध उठाव करण्याचें आवाहन ते करीत होते. परंतु हिटलरनें रशियावर हल्ला केला आणि रशिया हिटलरचा शत्रु झाला, तेव्हां त्यांनीं तें युद्ध लोकयुद्ध आहे असा पुकार करून भारतांतील साम्राज्यवादी सरकारशीं संगनमत केलें. आपल्या स्वातंत्र्यासाठीं आंदोलन करणाऱ्या भारतीय जनतेचा द्रोह केला. तिच्या नेत्यांना हिटलरचे बगलबच्चे म्हणून शिव्या दिल्या. आज तेच कम्युनिस्ट चीनचा पाठपुरावा करतांना दिसतात. चीननें आक्रमण केलें कीं नाहीं, याची चर्चा करीत बसतात. शेवटीं कण्हत, कुथत चीनच्या आक्रमणाबद्दल नापसंतीचा ठराव करतात. परं

तोहि बहुमतानें, एकमतानें नव्हे. कारण त्यांना चिनी सरकारबद्दल आपुलकी आहे. चीन कम्युनिस्ट आहे आणि भारतामध्यें कम्युनिस्ट पक्षाच्या हातांत सत्ता आलेली नाहीं. चिनी फौजा भारतांतील श्रमजीवी जननेला भांडवल-शाहीच्या जुलमांतून मुक्त करण्यासाठीं येत आहेत असा प्रचार कांहीं मंडळी करतात, तर दुसरे सांगतात कीं, चीनवरोबर तडजोड केली पाहिजे. अमेरिकेसारख्या देशांकडून आपल्या संरक्षणासाठीं मदत घेतां उपयोगी नाहीं. थोडक्यांत म्हणजे कम्युनिस्ट लोक हे चीनचे हस्तक आणि घटनेनें प्रस्थापित झालेल्या भारतीय स्वातंत्र्याचे मारेकरी आहेत. आज त्यांच्यापैकीं कांहीं लोक जरी तथाकथित राष्ट्रीय भूमिका घेत असले, तरी तो एक पवित्रा आहे. आजची प्रतिकूल परिस्थिति अनुकूल झाली कीं, तो पवित्रा एका दिवसांत बदलला जाईल. अशा राष्ट्रद्रोही लोकांना घटनेनें दिलेले मूलभूत हक्क उपभोगूं देणें म्हणजे आपण होऊन आपल्या पायावर कुऱ्हाड पाडून घेण्यासारखेच आहे. देशांतील सर्व शक्ति एकवटण्याची ज्या वेळीं आवश्यकता आहे, त्या वेळीं बुद्धिभेद करून फुटीर भावना निर्माण करणाऱ्यांना शासन केलेंच पाहिजे. त्यासाठीं शासकांच्या हातीं जादा अधिकार द्यावे लागतात. घटनेप्रमाणें राष्ट्रीय संकटाची घोषणा करून राष्ट्रपतींना तसें करतां येतें. परंतु याचा अर्थ असा नव्हे कीं, शासकांनीं त्या अधिकाराचा दुरुपयोग करावा. लोकशाहीच्या संरक्षणासाठीं त्यांना हे अधिकार बहाल करण्यांत येतात. त्यांचा वापर लोकशाहीला मारक अशा पद्धतीनें होतांच उपयोगी नाहीं. राज्यकारभारामध्यें अधिकाधिक लोकांना सहभागी होण्याची संधि उपलब्ध करून देणें हा लोकशाहीचा आत्मा आहे. राष्ट्रीय संकटाच्या वेळीं आर्थिक आणि सामाजिक क्षेत्रांतील राष्ट्रीय प्रयत्नांमध्यें जनतेला जाणीवपूर्वक गोंवून घेतलें तरच आणीबाणीच्या परिस्थितीमुळें संकुचित झालेल्या लोकशाही हक्कांची भरपाई होईल. राष्ट्रीय प्रयत्नांमध्यें आपणहि आपली जबाबदारी उचलीत आहों या भावनेचें समाधान विरोधी मतवाल्यांसकट सर्वांना मिळेल

आणि लोकशाही जीवनाचा गाभा सुरक्षित राहूं शकेल. याबाबतींत बहुमतवाल्या राज्यकर्त्या पक्षाची जबाबदारी फार मोठी आहे. त्यांनीं आपलें धोरण अधिकाधिक औदार्याचें ठेवलें पाहिजे. हातीं सत्ता आहे म्हणून आपल्यापेक्षां निराळीं मतें असणारांची अथवा आपल्याला लोकशाही पद्धतीनें विरोध करणाऱ्या पक्षांची मुस्कटदाबी करून चालणार नाहीं. तसें करणें लोकशाहीच्या विकासाला मारकच होईल. उलट अशा आणीबाणीच्या वेळीं ज्यांची राष्ट्रनिष्ठा शंकातीत आहे, ज्यांची लोकशाही जीवनावरील श्रद्धा अधिक नाहीं तरी आपल्या इतकी खासच आहे, या सर्व पक्षांचें आणि लोकांचें सहकार्य प्राप्त करून घेण्याचा राज्यकर्त्यांनीं प्रयत्न केला पाहिजे. नाहींतेव्हां संरक्षणाच्या नांवाखालीं हुकूमशाहीला पोषक अशा अपप्रवृत्तींना खतपाणी मिळत राहील आणि हा लढा लोकशाहीच्या अभिवृद्धीसाठीं आणि हुकूमशाहीविरुद्ध आहे, असा तोंडानें जर चालूं असतांनाच लोकशाही जीवनपद्धतीचाच नष्टांश ओढवेल.

दुसऱ्या महायुद्धाच्या दरम्यान ब्रिटिश लोकांनीं लोकशाही जीवनमूल्यांवर आधारलेली आपली जीवनपद्धति अबाधित ठेवली. श्रमजीवी जनतेला पूर्वीपेक्षां-देखील अधिक विश्वासांत घेण्यांत आलें. आर्थिक जीवनांतील महत्त्वाचे निर्णय त्यांना विश्वासांत घेऊन घेतले गेले. राजकीय धोरणें ठरवितांना श्रमजीवी जनतेच्या पुढाऱ्यांनीं जबाबदारीचा आपला वांटा उचलतांना कच खाल्ली नाहीं. विरोधकांच्या प्रतिपादनांतील सत्यांश समजून घेण्याच्या दृष्टीनें त्यांचें स्वातंत्र्य त्यांना उपभोगूं दिलें आणि त्यांची कदरहि केली गेली. श्रमजीवी जनतेच्या मागण्यांबाबत विशाल दृष्टिकोण स्वीकारून त्यांना राष्ट्रीय प्रयत्नांमध्यें पुरुषार्थ करण्याची संधि मिळवून दिली. हुजूर आणि मजूर पक्षांच्या संमिश्र मंत्रिमंडळाचा कारभार चालूं असतांना मजूर पक्षांतील पुढारी श्री. बेव्हन पंतप्रधान चर्चिल यांच्या धोरणावर भाषणांतून आणि वृत्तपत्रांतून कडक टीका करूं शकत होते. त्याबद्दल त्यांना कोणीं देशद्रोही म्हटलें नाहीं. एका

अनुक्रम ..... वि: .....
क्रमांक ..... दि: .....

मंत्र्याचा मुलगा शत्रूला सामील झाला, तर त्याची गय कोणीं केली नाहीं. त्याला फांसावर चढविण्यांत आलें. जो न्याय सामान्य जनतेला तोच मंत्रिपद भूषविणारांना लागूं केला तरच जनतेमध्यें लोकशाही ध्येयासाठीं अधिकाधिक त्याग करण्याची ईर्षा आणि "जिंकूं किंवा मरूं" अशी जिद्द निर्माण करतां येते. भारतांतील विद्यमान परिस्थिति लक्षांत घेतां, संमिश्र अथवा राष्ट्रीय सरकारची मागणी करण्यांत कांहींच अर्थ नाहीं. संसदेमधील निरनिराळ्या पक्षांची सदस्य संख्या लक्षांत घेतां तशी मागणी करणें निरर्थकच नव्हे तर हास्यास्पदहि ठरेल. याचा अर्थ अगा मात्र नव्हे कीं, विरोधी पक्षांतील लोकांना विश्वासांत घेऊं नये. उलट तसें करणें राष्ट्राच्या दृष्टीनें हानिकारकच आहे. कारण ज्या ठिकाणीं विरोधी मताच्या लोकांना जनतेचा पाठिंबा आहे, त्या ठिकाणीं विरोधकांना झिडकारणें अगर उपद्रव देण्याचा प्रयत्न करणें म्हणजे त्याचा अर्थ जाणूनबुजून जनतेचें सहकार्य नाकारणें असाच होतो. लोकशाहीवर विश्वास ठेवणारांनीं तरी अशा गोष्टी नेहमींच टाळल्या पाहिजेत. आणीबाणीच्या वेळीं तर तसें करणें म्हणजे लोकशाही मूल्यावर प्रहार करण्यासारखें आहे. संसदेमध्यें लोकशाही पद्धतीनें विरोध करणाऱ्या पक्षांची संख्या कमी असली तरी सर्वच ठिकाणीं तशी अवस्था नाहीं. राज्यांतील विधिमंडळें, स्थानिक स्वराज्य संस्था, पंचायती राज्यांतील निरनिराळ्या संस्था, सहकारी संस्था, कामगार संघ इत्यादि क्षेत्रांत विरोधकांना मुळींच पाठिंबा नाहीं असें कसें म्हणतां येईल? अशा क्षेत्रांमध्यें राज्यकर्त्या पक्षानें अन्य लोकशाहीवादी आणि राष्ट्रनिष्ठ पक्षांबरोबर सलोख्याचे संबंध ठेवून राष्ट्रीय प्रयत्नांमध्यें जनतेला सहभागी करून घेतलें पाहिजे. राष्ट्रीय आपत्तीच्या काळांत श्रमजीवी जनतेचे कष्ट वाढत जाणारच. अशा वेळीं मूठभर मालकवर्गाच्या मोहवतीखातर कामगारांच्या रास्त मागण्या डावलणें राष्ट्रहिताचें नाहीं. आणीबाणीच्या परिस्थितीमुळें जनतेच्या मूलभूत हक्कांवर जी मर्यादा पडली आहे, तिचा फायदा मूठभर संधिसाधू स्वार्थी

लोकांना होऊं दिला तर लोकशाहीचीं मुळेंच उखडलीं जाण्याचा धोका आहे. जे लोक या संधीचा फायदा घेऊन विरोधकांना नेस्तनाबूद करण्याचे मनसुबे रचून ते यशस्वी करण्याच्या दुष्ट कारवाया करीत आहेत, ते लोकशाही स्वातंत्र्याचे शत्रूच समजले पाहिजेत. आणीबाणीची परिस्थिति जाहीर केल्यामुळें कायद्याच्या दृष्टीनें जनतेचे लोकशाही अधिकार कमी झाले असले, तरी त्याची भरपाई समाजाचा प्रपंच चालवून युद्धप्रयत्न प्रभावी करण्याच्या कामांत अधिकाधिक लोकांना सहभागी करून घेतलें पाहिजे; आणि असें होईल तर युद्धकालांतहि लोकशाहीचा आत्मा शाबूत राहील.

◆ ◆ ◆

२. समाजवाद :

लोकशाहीचा विकास हें आपलें ध्येय आहे आणि त्यासाठीं अविकसित देशांना समाजवादाची कांसहि धरणें अत्यावश्यक आहे. ह्या लोकशाही समाजाबद्दल आज जास्त बोललें जात असलें तरी त्याबद्दल नक्की शब्दांत आपलीं मतें प्रकट करण्यामध्यें 'एसेम्' नीं गेलीं पस्तीस वर्षें घालवलीं आहेत. समाजवाद म्हणजे काय, समाजवादी पक्षाचें धोरण काय असावें, पूर्वीच्या कॉंग्रेसकडून त्याबाबत काय केलें गेलें, कॉंग्रेस समाजवादासाठीं बद्धपरिकर झाली आहे असें म्हटलें जात असतां दुसऱ्या समाजवादी पक्षाची आवश्यकता आहे काय व असल्यास त्याकडून काय अपेक्षित आहे, समाजवादी लोकांना काय करावें लागेल, या सर्व अंगांचा १९३४ सालीं कॉंग्रेसांतर्गत समाजवादी पक्ष स्थापन करण्यांत भाग घेतलेल्या दिवसापासून ते करीत आहेत. खासगी भांडवलशाहीऐवजीं केवळ सरकारी भांडवलशाही (Public sector) सुरू करणें म्हणजेच समाजवाद अमलांत आणणें हा समाजवादाचा खरा अर्थ नाहीं. समाजवाद म्हणजे समाजांत कुणीहि दलित न राहणें. भांडवलशाहीचा नाश केला म्हणजे समाजवाद आला असें नाहीं. त्यानंतर येणाऱ्या समाजालाहि कांहींतरी नैतिक अधिष्ठान ठेवावें लागतें. समाजवाद म्हणजे व्यक्तिस्वातंत्र्याचा होम नव्हे. ज्या वेळेला असें होईल, समाजाकडून व्यक्ति-जीवनाचा उच्छेद होऊं लागेल तर तिचा प्रतिकार करणें हा व्यक्तीचा धर्म ठरेल. पण त्याच वेळीं बहुमत आपल्या विरुद्ध आहे तें कसें बदलतां येईल याचाहि व्यक्तीला विचार करावा लागेल. समाजवादी घटनेंतहि त्यामुळेंच लोकशिक्षण व जनताजागृतीला मोठें महत्त्व आहे. गांधीजींनीं भारतीय समाजवादाला याची शिकवण देऊन समाजवादांत एक नवीन अर्थ आणला. या कार्यासाठीं तरुण रक्तानें

नेहमींच आसुसलेलें असलें पाहिजे. आपण पारतंत्र्यांत होतों तेव्हां परकीय सत्तेचा उच्छेद या एकाच कल्पनेनें युवकवर्ग भारून गेला होता. आतां स्वातंत्र्यांत त्याच्यापुढें कांहींहि ध्येय ठेवलें गेलेलें नाहीं. पण सामाजिक क्रांतीचें ध्येय घेऊन आजचा युवकवर्ग ध्येयवेडा होऊं शकेल. किंबहुना ती क्रांति त्यांच्याकडून जनताजागृतिद्वारा अपेक्षित आहे. ध्येयाकांक्षा म्हणजेच तारुण्य आणि ध्येयहीनता म्हणजेच वार्धक्य, हें तरुणांचें ब्रीद असावें व त्या ब्रीदाची परिपूर्ति करण्यासाठीं जिवापाड कष्ट केले गेले तरच भारतीय समाजवाद हा खऱ्या अर्थानें लोकशाही समाजवाद ठरूं शकेल. केवळ औद्योगिक प्रगति व सर्व बाबींचें सरकारीकरण असें समजून आज नकली समाजवाद आणला जात आहे. नेतृत्वाऐवजीं व्यक्तिमाहात्म्याची पूजा वाढूं लागली आहे. नवसमाज निर्मितीबद्दल आस्था नाहींशी झालेली आहे. ज्ञातिनिष्ठेला भर येऊं लागला आहे. अन्यायाची चीड येईनाशी झालेली आहे. सामाजिक कर्तव्याची जाणीव विसरली गेली आहे. संधिसाधूपणा, सत्ताभिलाषा व असत्याचरण वाढूं लागलें आहे. हें होत असतांना, समाजवाद येत आहे असें म्हणणें ही वंचना आहे. खऱ्या समाजवादात हें असूं शकत नाहीं. हें नाहींसें करणारा, सर्वांना समान संधि देणारा, अन्यायाविरुद्ध प्रतिकार करणारा, व्यक्तिमाहात्म्य न वाढवणारा पण व्यक्तिस्वातंत्र्य मानणारा व टिकवणारा व 'सर्वेऽपि सुखिनः सन्तु' असें मानणारा पक्षच समाजवादी विचारसरणीचा पक्ष म्हणून मानला जाऊं शकेल. निवडणुकांतील यश हें त्याचें गमक राहणार नाहीं, राहूं नये, तरच आपण समाजवादी आहोंत असें म्हणतां येईल. पुढील कांहीं पानांतून या समाजवादी विचारसरणीबद्दल एस्. एम्. किती ठाम मतें अनेक वर्षें बाळगून आहेत व त्यांचें शाश्वतमूल्य किती आहे याचें दिग्दर्शन होऊं शकेल.

◆ ◆ ◆

ऑगस्ट क्रान्ति आणि काँग्रेस समाजवादी पक्ष

लेखनकाल : जुलै १९४६

अखिल भारतीय काँग्रेस कमिटीनें तारीख ८ ऑगस्ट १९४२ रोजीं मुंबईच्या अधिवेशनांत मंजूर केलेल्या इतिहासप्रसिद्ध 'चले जाव'च्या ठरावानंतर हिंदुस्थानांत जो क्रान्तीचा उठाव झाला, तेव्हांपासून काँग्रेस समाजवादी पक्ष जनतेमध्यें अधिकाधिक लोकप्रिय होत गेला. आज हिंदुस्थानांत जे जहाल म्हणवणारे पक्ष आहेत त्यांमध्यें सर्वांत अधिक मान्यता काँग्रेस समाजवादी पक्षालाच आहे, ही गोष्ट कोणीहि कबूल करील. बहुसंख्य काँग्रेसजन आणि सर्वसाधारण दलित जनता यांनाहि त्या पक्षाबद्दल जिव्हाळा वाटतो. तसें पाहिल्यास १९४२ च्या सुरुवातीला हा पक्ष जितका रोड आणि कमजोर झाला होता, तितका तो पूर्वी कधींच नव्हता, ही गोष्ट मी माझ्या अनुभवानें सांगूं शकतों. मग १९४२ च्या क्रान्तीमध्यें या पक्षानें अशी काय जादू केली, कीं तो एकदम इतका लोकमान्य झाला ! या प्रश्नाबाबत आज पुष्कळ चर्चा होत असलेली दिसते. जो तो आपापल्या आवडीनिवडीप्रमाणें त्या पक्षाला ऑगस्टच्या क्रान्तिप्रयत्नांत कमी-अधिक महत्त्वाचें स्थान देतो. तें कांहींहि असलें तरी या पक्षाकडून जनतेच्या फार मोठ्या अपेक्षा आहेत ही गोष्ट अगदीं उघड आहे. आणि म्हणूनच समाजवादी लोक आतां कोणतें धोरण आणि कार्यक्रम आंखतात याकडे सर्वांचें लक्ष लागून राहिलेलें आहे. लवकरच समाजवादी पक्षाचें धोरण आणि कार्यक्रम अधिकृतरीत्या जाहीर होईल. पण त्याआधीं ज्यांना त्याबाबत विशेष

आतुरता आहे अशा लोकांच्या माहितीसाठीं आणि पुढें अधिकृतरीत्या प्रसिद्ध होणाऱ्या कार्यक्रमाचें महत्त्व आणि सयुक्तिकता लवकर पटावी म्हणून मीं माझे विचार थोडक्यांत मांडण्याचें ठरविलें आहे.

समाजवादी पक्षाचें आजचें धोरण समजण्याच्या दृष्टीनें त्या पक्षाची स्थापना केव्हां झाली, कोणत्या ध्येयास्तव झाली आणि आतांपर्यंत या पक्षाकडून कोणत्या धोरणाचा पुरस्कार करण्यांत आला, या गोष्टी माहीत असणें आवश्यक आहे. १९३०—३२ चो सत्याग्रहाची चळवळ अयशस्वी झाल्यानंतर १९३४ सालीं काँग्रेस समाजवादी पक्षाची मुहूर्तमेढ रोवण्यांत आली. १९३०-३२ च्या आंदोलनांत युवक संघाच्या चळवळींतून आलेले जे कार्यकर्ते पुढें आले होते त्यांनीं अत्यंत हिरीरीनें भाग घेतला. ते पूर्ण स्वातंत्र्यवादी होते. गांधीजींनीं सुरू केलेल्या काँग्रसच्या चळवळींतून एक प्रचंड आंदोलन निर्माण होईल; अखेरीस सैन्यांतील हिंदी लोकहि जनतेच्या बाजूनें उभे राहतील; आणि प्रस्थापित राज्यसत्ता उलथून टाकून स्वातन्त्र्य-सरकारची स्थापना करतां येईल, असा त्यांचा आशावाद होता. पण तो निष्फळ ठरला. तुरुंगांतील शांत वातावरणांत त्यांनीं आपलीं डोकीं पुष्कळ खाजवलीं; इतर देशांच्या स्वातंत्र्यलढ्यांचें आणि घडलेल्या क्रान्त्यांचें त्यांनीं परिशीलन केलें. या विचारमंथनांतून एक गोष्ट त्यांच्या निदर्शनास आली. हिंदुस्थानांत खरोखरच जर राज्यक्रान्ति घडवून आणायची असेल तर त्यासाठीं दलित जनतेचें संघटन केलें पाहिजे. पिळला जाणारा शेतकरी, कामकरी आणि कनिष्ठ मध्यमवर्ग यांनाच स्वातंत्र्याची अधिक निकड आहे. त्यांच्या भाजी-भाकरीचा प्रश्न त्यावर अवलंबून आहे आणि म्हणून तेच स्वातंत्र्यप्राप्तीसाठीं अधिकाधिक शौर्य आणि स्वार्थत्याग करूं शकतात. म्हणून ज्यायोगें हा दलित वर्ग संघटितपणें लढ्यास तयार होईल अशी संघटना आपण केली पाहिजे. त्यांच्या दैनंदिन अडीअडचणी दूर करण्यासाठीं त्यांची वर्गीय संघटना करण्याचें त्यांनीं ठरविलें. अर्थात् हा विचार त्यांना

मार्क्सवादामुळें सुचला हें सांगण्याची जरुरी नाहीं. सामाजिक आणि राजकीय स्थित्यंतरांकडे ऐतिहासिक दृष्टिकोणांतून पाहण्याची वास्तववादी भूमिका घेतल्याबरोबर १९३०–३२ सालचा स्वातंत्र्यलढा कां फसला ही गोष्ट चटकन् लक्षांत आली व कितीतरी चिकट प्रश्नांचा उलगडा होऊं शकला. मानव-समाजाचा आतांपर्यंतचा इतिहास हा वर्ग-युद्धाचा इतिहास आहे. या मार्क्सच्या सुप्रसिद्ध आणि प्रभावी सूत्रांतून समाजाच्या इतिहासाकडे पाहूं लागलें म्हणजे एक नवीनच दृष्टि मिळाल्याखेरीज राहात नाहीं आणि पूर्वी जेथें अंधार होता तेथें प्रकाश दिसूं लागतो या नवीन दृष्टीनें ताजेतवानें झालेल्या त्या नवतरुणांनीं समाजवादी पक्षाची स्थापना केली.

ही नवीन मंडळी त्या वेळीं अस्तित्वांत असलेल्या, किंबहुना मीरत कटाच्या खटल्यामुळें प्रसिद्धीस आलेल्या कम्युनिस्ट पक्षांतच कां सामील झाली नाहीं हा प्रश्न स्वाभाविकपणें उद्भवतो. म्हणून त्यासंबंधीं थोडासा खुलासा करणें आवश्यक आहे. कम्युनिस्ट पक्ष हा स्वतःला मार्क्सवादी म्हणवीत होता हें खोटें नाहीं. पण काँग्रेसकडे पाहण्याचें त्या पक्षाचें धोरण अगदीं भिन्न होतें. काँग्रेस ही भांडवलदारांची संस्था आहे आणि तिच्या झेंड्याखालीं उभें राहणें म्हणजे भांडवलशाहीस आणि पर्यायानें साम्राज्य-शाहीस मदत करण्यासारखें आहे अशी त्यांची भूमिका होती. म्हणून त्यांनीं १९३० च्या राष्ट्रीय आंदोलनास विरोध केला होता. तिरंगी ध्वज खालीं ओढून काढण्यापर्यंतदेखील त्यांची मजल गेली होती. काँग्रेसच्याच आंदोलनामुळें जागृत झालेल्या नवीन तरुणांना हा काँग्रेसद्रोह मानवण्यासारखा नव्हता. शिवाय मार्क्सच्या नांवावर बोलणाऱ्या या ठोकळेबाज मार्क्सवाद्यांनीं समाज-वादाची मुख्य शिकवणच पायांखालीं तुडविली होती, असें समाजवादी मंडळींचें म्हणणें होतें. वर्गयुद्धाचा सिद्धान्त जरी महत्त्वाचा असला तरी तो इतिहासाच्या आणि वास्तववादाच्या कोंदणांतून बाहेर काढून चालणार नाहीं. देशकाल-परिस्थिति पाहूनच त्या सिद्धान्ताचा उपयोग करावयास हवा, ही गोष्ट

कम्युनिस्ट विसरले. हिंदुस्थानसारख्या गुलाम देशामध्यें जनतेच्या लढाऊ शक्तीचा केंद्रबिंदु राष्ट्रीय स्वातंत्र्य हाच होऊं शकतो, ही गोष्ट त्यांनीं दृष्टीआड केली आणि केवळ शब्दाचे दास बनून निर्भेळ वर्गलढ्याचा पुरस्कार केला. त्यामुळें लढा दुसरीकडेच राहिला आणि जनतेच्या लढाऊ शक्तीवर मात्र त्यांनीं आघात केला. समाजवादी लोक राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या आंदोलनांतूनच तयार झालेले असल्यामुळें त्यांना राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या भावनेचें महत्त्व सहजच समजण्यासारखें होतें. ती भावना किती तीव्र होऊं शकते याचा अनुभव त्यांनीं घेतलेला होता. म्हणून कम्युनिस्ट पक्षाचें हें धोरण चुकीचें असल्याची त्यांची खात्री झाली. त्यांनीं आपला पक्ष राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळीपासून पूर्णपणें अलग करण्याचें नाकारलें आणि एकमेव साम्राज्यविरोधी संघटना जी राष्ट्रीय कॉंग्रेस त्यामध्येंच राहून कार्य करण्याचें ठरविलें. हिंदुस्थानांत समाजवादी लोकराज्य निर्माण करणें हें जरी त्यांचें अंतिम उद्दिष्ट असलें तरी राष्ट्रीय स्वातंत्र्याचा प्रश्न हा निकडीचा प्रश्न समजून त्यांनीं साम्राज्यविरोधी एकजूट प्रभावी करण्याचें धोरण स्वीकारलें.

गेल्या पन्नास-साठ वर्षांमध्यें भारतवर्षामधील ऐक्यवर्धक शक्तींचा केंद्रबिंदु कॉंग्रेस हाच आहे ही गोष्टहि ते दृष्टिआड करूं शकत नव्हते. या केंद्राचा नाश करून समाजवादाची प्रस्थापना करण्याचा प्रयत्न करणें म्हणजे केवळ आत्मवंचना होय, असें ते सारखे सांगत होते. सबब कॉंग्रेसला प्रतिस्पर्धी अशी संघटना निर्माण करण्याचा प्रयत्न करणें धोक्याचें आणि मूर्खपणाचें होतें. कॉंग्रेसची संघटना जर परिवर्तनशील नसती तर मात्र असें करणें एक वेळ बरोबर ठरलें नसतें. पण कॉंग्रेसच्या इतिहासाकडे पाहिलें तर तिच्यामध्यें अनेक परिवर्तनें घडून आलेलीं आपल्यास पाहावयास मिळतात. मूठभर सुशिक्षितांच्या मेळाव्यापासून प्रारंभ करून आजचें भव्य स्वरूप तिला प्राप्त झालेलें आहे. लोकमान्य टिळक, महात्मा गांधी या थोर पुरुषांनी कॉंग्रेसमध्यें दोन वेळां क्रान्ति घडवून आणली आहे. १९३०-३२ साली समाजवादी

मंडळींच्या पुढें हाच प्रश्न होता. काँग्रेसची त्या वेळची संघटना स्वातंत्र्य-प्राप्तीच्या दृष्टीनें कमजोर होती हें उघडच होतें. सत्याग्रहाचें तंत्रहि क्रान्ति करून प्रतिराज्य स्थापन करण्यास अपुरें असल्याची त्यांची खात्री होती. सत्याग्रही तंत्रानें फार झालें तर राज्ययंत्र बंद पाडतां येईल; पण प्रतिराज्य निर्माण करतां येणार नाहीं. सत्याग्रही अहिंसात्मक तंत्रानें जावयाचें म्हटल्यास सत्तासंक्रमणानें येणारें स्वराज्य यावरच्च आपल्याला संतुष्ट राहिलें पाहिजे. अर्थात् समाजवादी मंडळी यावर संतुष्ट कशी होणार ! त्यांना नुसती राष्ट्रीय क्रान्तिच नाहीं, तर सामाजिक क्रान्ति घडवून आणावयाची होती. ब्रिटिश साम्राज्यशाहीचें राज्य उलथून पाडून लोकांचें प्रतिराज्य प्रस्थापित करावयाचें होतें. काँग्रेसमध्यें राहून ही गोष्ट होऊं शकेल काय ? खऱ्या अर्थानें काँग्रेस-कडून कधीं बंडाची घोषणा होऊं शकेल काय ? असा प्रश्न होता. काँग्रेसच्य निशाणाखालीं जनता आज येत आहे ती केवळ अहिंसा त्यांना प्रिय आहे म्हणून नाहीं, तर स्वातंत्र्यासाठीं झगडणारी ती एकमेव संस्था आहे म्हणून येत आहे. क्रान्तिकारक परिस्थिति निर्माण झाली तर जनता काँग्रेसच्य निशाणाखालीं असली तरी बंडाचा उठाव करण्यास मागेंपुढें पाहणार नाहीं, असा निर्णय घेऊन समाजवादी पक्षानें काँग्रेसमध्यें राहूनच ती चळवळ करण्याचें ठरवलें. अर्थात् साम्राज्यशाहीबरोबर टक्कर देण्यास तिची शक्ति वाढली पाहिजे या गोष्टीची जाणीव त्यांना होती. काँग्रेस कितीहि सुसंघटित असली, तिच्यामध्यें दाखल झालेल्या मध्यमवर्गीय तरुणांची स्वातंत्र्यभावना कितीहि ज्वाज्वल्य असली तरी तेवढ्यानें साम्राज्यशाहीचें जूं फेकून देतां येणार नाहीं. वस्तऱ्याचें पातें कितीहि तीक्ष्ण असलें तरी त्यानें बाभळीची गांठ फोडतां येणार नाहीं. फार झालें तर पेन्सिल करतां येईल. साम्राज्यशाही ही एखाद्या बाभळीच्या गांठीसारखी आहे. ती गांठ फोडण्यास मोठी कुऱ्हाडच पाहिजे – जरी बोथट असली तरी चालेल. बहुजनसमाजाला जागृत आणि

संघटित स्वरूपांत काँग्रेसच्या झेंड्याखालीं आणलें तर ही शक्ति काँग्रेसमध्यें निर्माण होऊं शकेल असें ठरवून समाजवादी पक्षानें शेतकरी-कामकरीवर्गाच्या वर्गीय संघटना करून त्यांना स्वातंत्र्यलढ्यासाठीं काँग्रेसच्या निशाणाखालीं आणण्याचें ठरविलें; आणि ज्या ज्या वेळीं काँग्रेसमध्यें फूट पडण्याचा प्रसंग येई त्या त्या वेळीं आपल्याकडे कमीपणा घेऊन आणि जनतेची अप्रीति सहन करून समाजवादी पक्षानें तो टाळला आहे. याचा फायदा अन्य तथाकथित जहाल पक्षांनीं घेतला आणि गांधी व काँग्रेस साम्राज्यशाहीचे हस्तक आहेत, फॅसिझमचे प्रच्छन्न मित्र आहेत आणि समाजवादी पक्ष हा काँग्रेस आणि गांधीजी यांचा बगलबच्चा आहे असा प्रचार करून त्यांनीं समाजवाद्यांना खूपच बदनाम केलें. १९४२ च्या सुरुवातीला पक्ष अगदीं रोडावला होता त्याचें कारण हेंच होतें.

अन्य जहाल पक्षांचें असें म्हणणें होतें कीं, काँग्रेस ही कधींच क्रांतिकारक लढा करूं शकत नाहीं–किंबहुना देशांतील क्रान्तिकारी शक्ति दडपून ठेवणें हेंच गांधीजींचें आणि काँग्रेसचें इतिहासकार्य आहे. लढा केल्यास क्रान्तिकारी शक्ति विमुक्त होतील आणि मग भांडवलशाही व साम्राज्यशाही या दोघांना उलथून समाजवादी लोकराज्य निर्माण करतील या भीतीमुळें भांडवलदारांचो ही काँग्रेस क्रान्तिकारी लढ्याची घोषणा अत उत्तर कधींच करणार नाहीं अशी त्यांची कल्पना होती. याच्या उलट काँग्रेस समाजवादो मंडळी मात्र अशी अपेक्षा बाळगून होती कीं, क्रान्तिकारी परिस्थिति आल्यास काँग्रेस मागें राहणार नाहीं. काँग्रेसच्या स्वातंत्र्यप्रेमावर त्यांची श्रद्धा होती. १९४२ च्या आंदोलनामध्यें समाजवादी पक्षाची काँग्रेसबद्दलची ही अपेक्षा खरी ठरली. नुसता तथाकथित डावा गटच नाहीं, तर खरेखुरे डावे आणि उजवे मिळून सर्वच्या सर्व काँग्रेस क्रान्तिपथावर आली. समाजवादी मंडळींनीं त्यामध्यें इथेंनें भाग घेतला; त्यांच्या क्रान्तिकारी तंत्रालादेखील जनतेनें पाठिंबा दिला; आणि म्हणूनच समाजवादी पक्षाला आजची लोकप्रियता मिळालेली आहे. उलट पूर्वी जे आपल्याला डावे

आणि ज्वलज्जहाल म्हणवीत होते त्यांनीं मात्र 'हें साम्राज्यशाही-युद्ध नसून लोकयुद्ध आहे' अशी घोषणा करून सामाज्यशाही सरकारची युद्धकालांत गुलामी केली आणि जे स्वातंत्र्यसाठीं लढले, त्यांची देशद्रोही म्हणून बदनामी केली ! १९३९ सालीं महायुद्ध सुरू झालें त्या वेळीं कॉंग्रेसमधील सर्वच पक्षोपपक्ष हें साम्राज्यशाही युद्ध आहे असें म्हणत होते. युद्धविरोध करून साम्राज्यशाहीविरुद्ध लढा पुकारावा असें म्हणत होते. कॉंग्रेसमधील डावे सामुदायिक कायदेभंगाची चळवळ करावी असा आग्रह धरीत होते. कॉंग्रेसनें लढा सुरू केला तरच तो परिणामकारक होऊं शकतो याबद्दल कॉंग्रेस समाजवाद्यांची खात्री होती. आणि कॉंग्रेस लढा पुकारणारच नाहीं असें त्यांना वाटत नसल्यानें वैयक्तिक सत्याग्रहावर त्यांचा विश्वास नव्हता तरी आपण होऊन स्वतंत्रपणें सामुदायिक लढ्याची घोषणा करून स्वत: तुरुंगांत जाऊन बसण्याचा आतताईपणा त्यांनीं केला नाहीं. कम्युनिस्ट पक्षाने मात्र सामुदायिक लढ्याच्या नांवानें पण प्रत्यक्षामध्यें पाहावयाचें झाल्यास वैयंक्तिक सत्याग्रहाचा लढा पुकारला आणि ते तुरुंगांत जाऊन बसले. पुढें रशियावर जर्मनीनें हल्ला केला. सहा महिने गेल्यावर कम्युनिस्टांनीं 'युद्ध आतां साम्राज्यशाही राहिलें नसून तें लोकयुद्ध झालें आहे' अशी घोषणा केली; आणि देशांत वाणीबाणीची क्रान्तिकारक परिस्थिति निर्माण झाली तेव्हां क्रान्तीच्या प्रयत्नांना फॅसिझम विरोधाच्या नांवाखालीं विरोध करण्यासाठीं साम्राज्यशाही सरकारला तसें अभिवचन देऊन ते तुरुंगाबाहेर पडले. त्या वेळची परिस्थिति खरोखरच क्रान्तिकारी होती.

ब्रिटिशांची युद्धस्थिति अत्यंत हलाखीची होती. युरोपांत इंग्लंडखेरीज दोकें टेकायला त्यांना जागा उरली नव्हती. इकडे हिटलर रशियांतून आणि इजिप्तमधून मध्यपूर्वेंत व अरबी समुद्रांत येण्याच्या मार्गावर होता. जपाननें अमेरिकेविरुद्ध युद्ध सुरू केलें, सिंगापूर पडलें, ब्रह्मदेशांतून ब्रिटिश फौजांना पळून यावें

लागलें. जपान आतां हिंदुस्थानांत येणार आणि तेथूनहि आपल्याला पळ काढावा लागणार अशी भीति इंग्लंडला वाटूं लागली. तेव्हां हिंदी जनतेची समजूत करण्याचा बहाणा क्रिप्ससाहेबांना पाठवून करण्यांत आला. क्रिप्स्-योजना हिंदुस्थानांतील कोणत्याहि पक्षाला मंजूर होण्यासारखी नव्हती. काँग्रेसनें तडजोडीची शिकस्त केली. पण व्यर्थ ! शेवटीं सर्व खापर काँग्रेसच्या माथ्यावर फोडून आणि मुस्लीम लीगला चुचकारून क्रिप्स् निघून गेले. देशांत सर्वत्र निराशा पसरली. ज्याला क्रान्तिकारी परिस्थिति म्हणतात ती ब्रिटिश राजवटींत हिंदुस्थानांत प्रथम निर्माण झाली. प्रचलित राज्यसत्ता डळमळीत झाली. जनतेचा तिच्यावरचा विश्वास नष्ट झाला. यांच्या हातून आपलें संरक्षण होणार नाहीं असें जनतेला वाटूं लागलें. जपानचें आक्रमण झालें तर काय करावें ! बाँब-हल्ले झाले तर आपली काय अवस्था होणार ! अशी जनतेला चिंता पडली. शहरांतले लोक तर अधिकच भयभीत झाले. अशा परिस्थितींत काय करावें, असा काँग्रेसपुढें प्रश्न होता. ब्रिटिशांविरुद्ध बंडाचा घोषणा केली तर कदाचित् अत्यल्पपणें जपानला मदत होईल अशी भीति काहीं पुढाऱ्यांना वाटत होती, म्हणून त्यांनीं ब्रिटिश सत्तेविरुद्ध लढा पुकारण्याचा विचार बाजूला ठेवला आणि जनतेनें संरक्षक दलें निर्माण करावीं असा आदेश दिला. जपानच्या आक्रमणानें बेबंदशाही माजली तर या दलांनीं जनतेचें संरक्षण करावें अशी कल्पना होती. परिस्थिति दिवसेंदिवस चिघळत गेली. संरक्षक दलांनीं जनतेचें संरक्षण होईल याबद्दल कोणालाच खात्री वाटत नव्हती. अशा बिकट प्रसंगीं महात्मा गांधींनीं खऱ्या क्रान्तिकारकाला साजेल असें क्रान्तिकारी धैर्य व राजनैतिक चातुर्य दाखविलें. त्यांनीं पाहिलें कीं, खरोखरच प्रजेचें संरक्षण करावयाचें असल्यास राजदंड हातीं असावयास पाहिजे. प्रचलित राज्ययंत्र जनतेचें संरक्षण करण्यास नालायक आहे अशी आपली खात्री झाली असेल तर तें राज्ययंत्र उलथून टाकून आपलें लोकराज्य प्रस्थापित केलें पाहिजे. असें करण्यानें देशांत कांहीं काल अराजक अगर बेबंदशाही माजण्याचा

संभव आहे; पण खऱ्या क्रान्तिकारकानें त्याबद्दल भय बाळगतां उपयोगी नाहीं. जपानधार्जिणेपणाचा आरोप कोणी करतील त्याची पर्वा बाळगतां उपयोगी नाहीं. लेनिननें सीलबंद जर्मन गाडींतून रशियांत प्रवेश केला तेव्हां त्यालादेखील 'जर्मन हेर' म्हणणारे लोक नव्हते असें नाहीं. हें सर्व धोके पत्करून गांधीजींनीं बंडाचा आदेश दिला यांतच त्यांचें मोठेपण आहे. दुसऱ्या महायुद्धामध्यें क्रान्तिकारी परिस्थितीचें आकलन करून, क्रान्तिकारी शक्तींना आवाहन करून लढ्याचा महामंत्र कोणी महापुरुषानें दिला असेल तर तो महात्मा गांधींनींच. असें कबूल करावें लागेल. एवढ्या एकाच गोष्टीसाठींदेखील गांधीजींचें नांव इतिहासामध्यें युगपुरुष म्हणून अजरामर राहील. कॉंग्रेस-मधील सर्व शक्ति-वृत्तींचें गांधीजींना सम्यक् ज्ञान आहे. कॉंग्रेस ही प्रामुख्यानें स्वातंत्र्याचा प्रयत्न करणारी राजकीय संस्था आहे, हें त्यांनीं ओळखलेलें आहे. अहिंसक बंडाचा आदेश दिला तर त्यामधून अराजक होईल, हिंसा होईल हें ठाऊक असूनहि त्यांनी तसा आदेश देण्यास मागें पुढें पाहिलें नाहीं. कारण गांधीजींच्या अहिंसेत भ्याडपणाला वाव नाहीं. अन्यायाचा प्रतिकार अहिंसेनें करतां आला नाहीं तर भ्याडपणानें पळून जाण्यापेक्षां हिंसेनें प्रतिकार करणें अधिक श्रेयस्कर असें त्यांनीं वेळावेळीं सांगितलें आहे. आणि म्हणूनच समाजवादी लोक हे क्रान्तिकारी परिस्थितींत आपलें प्रस्थापित लोकराज्य कायम ठेवण्यास आवश्यक त्या हिंसेचा उपयोग करण्यास मागें पुढें पाहणार नाहींत हें ठाऊक असूनहि त्यांना कॉंग्रेसमध्यें त्यांनीं राहूं दिलें.

महात्मा गांधींच्या घोषणेनें आणि कॉंग्रेसच्या ९ ऑगस्टच्या ठरावानें समाजवादी लोकांना आनंद झाला. त्यामध्यें "चले जाव"ची घोषणा तर होतीच; पण त्याचबरोबर किसान – कामगारांच्या राज्याचीदेखील घोषणा होती. पुढारी पकडले गेल्यावर देशामध्यें जनतेनें क्रांतिकारक उठाव केला. समाजवाद्यांना त्याची अंधुकशी कल्पना होती म्हणून आपण पकडलें जाणार नाहीं अशी त्यांनी खबरदारी घेतली. तुरुंगभरतीची ही चळवळ नव्हे, असें

अगोदरच गांधींनी सांगितलें होतें. तात्काळ समाजवाद्यांपैकीं आणि अन्य स्वातंत्र्यवादी महत्वाच्या मंडळींनीं भूमिगत होऊन जनतेचें मार्गदर्शन करण्यास सुरुवात केली. समाजवाद्यांनीं आपल्या पक्षाच्या वतीनें ती गोष्ट केली नाहीं, तर कॉंग्रेसमधील जे जे कोणी आले त्या सर्वांना घेऊन कॉंग्रेसच्या नांवानेंच चळवळ चालविली. पक्षाच्या नांवाने चळवळ चालवली असती तर त्यांत केवळ पक्षसंघटनेच्या दृष्टीनें फायदाहि झाला असता. पण पक्षाच्या उद्दिष्टालाच खो बसला असता. कारण एक तर त्या वेळीं पक्षाचीं अशी मोठी संघटना नव्हतीच ! उलट ती कमजोर होती. आणि राष्ट्रीय क्रान्तीचें कार्य कॉंग्रेसमार्फत होणेंच शक्य होतें पक्ष एका बाजूला ठेवून कॉंग्रेसच्या झेंड्याखालीं साम्राज्यशाही-दडपशाहीचा प्रतिकार चालूं ठेवला नसता तर तो प्रतिकार कधींच विरून गेला असता. प्रतिकारांतून आज ज्या शक्ति निर्माण झाल्या आहेत त्या एवढ्या मोठ्या प्रमाणांत निश्चितच झाल्या नसत्या. अखेरीस या प्रतिकारशक्तीवरच आमची सर्व मदार आहे.

समाजवादी पक्षानें आपल्या नांवानें चळवळ केली नाहीं म्हणून कांहीं लोकांचें असें म्हणणें आहे कीं, समाजवादी क्रान्तीशीं त्यांनी प्रतारणा केली ! पण हें नुसतें पुस्तकी पांडित्य आहे. त्या वेळीं जी परिस्थिति होती त्यामध्यें राष्ट्रीय क्रांतीच्या साम्राज्यविरोधी झेंड्याखालींच अधिकाधिक प्रतिकार होऊं शकला हें लक्षांत ठेवलें पाहिजे. समाजवादी पक्षाचें तितकें बळ असतें तर या राष्ट्रीय क्रांतीचेंदेखील समाजक्रांतींत रूपांतर करतां आलें असतें. कारण कॉंग्रेसच्या ठरावांत किसान कामगारांच्या राज्याची घोषणा होतीच. पण क्रांतीचें लोण तेथपर्यंत पोहोंचूंच शकलें नाहीं. त्याआधीच शत्रूने आपली बाजू सावरली. आणि आम्हांला आमच्या क्रांति प्रयत्नांमध्यें तात्पुरतें अपयश आलें. ज्या ठिकाणीं ग्रामराज्यें झालीं त्या ठिकाणीं शेतकऱ्यांची सत्ता प्रभावी झाली हीं गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे. अर्थात् १९४२ च्या क्रांतीमध्यें

आम्हांला सामाजिक क्रांति घडवून आणतां आली नाहीं हें नाकबूल करण्याचा मुळींच हेतु नाहीं. सांगण्याचा मुद्दा इतकाच, की ज्या वेळीं क्रांतिकारी परिस्थिति असेल त्या वेळीं स्वत.ला क्रांतिकारक म्हणवणाऱ्या पक्षानें माझ्या ध्येया माणें क्रांति होत नाहीं म्हणून स्वस्थ बसणें हें महामूर्खपणाचें आहे. ज्या कोणी प्रगतिपर शक्ति असतील, त्यांच्याबरोबर एकजूट करून पुढें जाण्याचा प्रयत्न करणें हाच मार्ग त्यांनीं घेतला पाहिजे. म्हणून राष्ट्रीय स्वातंत्र्यवाद्यांच्याबरोबर ऐक्य करून ब्रिटिश सत्ता उलथून पाडण्याचा प्रयत्न करणें हेंच त्या वेळीं उचित होतें. कारण त्यामुळें आमच्या मार्गीतील एक अडसर दूर झाला असता. या प्रयत्नांत विमुक्त होणाऱ्या क्रान्तिकारी शक्ती-मुळें आपलें बळ वाढतें आणि पुढील टप्पा जवळ येतो. सामाजिक क्रान्ति होत नाहीं म्हणून राष्ट्रीय क्रान्तीलादेखील आम्हीं मदत करणार नाहीं, हें धोरण प्रगतिपर नाहींच; पण प्रतिगामी ठरलें असतें. १९ · २ च्या क्रान्तिमध्यें जेथें ग्रामराज्यें प्रस्थापित झालीं त्या ठिकाणीं हरिजनांवरचे जुलूम फारसें नष्ट केले नाहींत असें धरलें, तरी तेवढ्यानें ग्रामराज्य स्थापन करणेंच चुकीचें होतें असें म्हणणें बरोबर होणार नाहीं. ग्रामराज्याच्या स्थापनेमुळें हरिजनांचा प्रश्न अधिक बिकट झालेला नाहीं, तर त्यामुळें हरिजनांच्या बाजूनें उभें राहाणाऱ्यांची संख्या आणि शक्ति वाढली आहे ही गोष्ट टीकाकारांनीं विसरूं नये, अशी त्यांना आग्रहाची विनंती आहे.

ऑगस्टची क्रान्ति यशस्वी न होतांच काँग्रेस पुन्हां कायदेशीर झालेली आहे. तिचें बळ मात्र कितीतरी पटींनीं वाढलेलें आहे. आंदोलनांतून फार मोठी जागृति जनतेमध्यें झालेली आहे. लोकांच्या मनोवृत्तींत एक क्रान्तिकारी बदल घडून आलेला असून एका नव्या समाजाचें दृश्य त्यांच्या मनःचक्षूंपुढें दिसूं लागलें आहे. ही जागृति समाजाच्या एखाद्या थरापर्यंत मर्यादित नाहीं; तर तिचें लोण शहरांतां सैन्य आणि आरमारापर्यंत पोहोंचलें आहे आंतरराष्ट्रीय परिस्थिति ब्रिटिशांच्या दृष्टीनें अडचणीची झाली आहे. या युद्धांतून सोव्हिएट

रशिया अतिशय प्रभावी आणि बलशाली होऊन बाहेर पडला आहे त्या दृष्टीनें इंग्लंड दुसऱ्या दर्जाचें राज्य झालें आहे. त्याला रशियाचें भय वाटूं लागलें आहे व इंग्लंडच्या जनतेचें राहणीचें मान टिकवून धरावयाचें झाल्यास व्यापार आणि उद्योगधंद्यांची परिस्थिति सुधारणें त्यांना भाग आहे. म्हणून हिंदुस्थानची मैत्री जर योडक्यांत मिळाली तर रशियाविरुद्ध मिळवावी आणि आपल्या व्यापारधंद्याच्याहि सवलती मिळवाव्या म्हणून त्यांनीं ब्रिटिश मंत्रिमंडळाची योजना हिंदुस्थान देशाला देऊं केली आहे. ती योजनाच अशी आहे कीं, भावी हिंदी सरकार जितकें कमजोर होईल तितकें बनवावें, म्हणजे आपल्याला आपला कार्यभाग साधतां येईल आणि या नाहीं त्या स्वरूपामध्यें आपली सत्ता येथें टिकवून धरतां येईल. ही योजना लीग आणि काँग्रेस यांच्याकडून थोडीशीं घासाघीस करून मान्य केली जाणार असें दिसतें. तसें झाल्यास देशामध्यें नांवापुरतें तरी राष्ट्रीय सरकार स्थापन होईल आणि ब्रिटिशांबरोबरचा काँग्रेसचा प्रत्यक्ष प्रतिकाराचा लढा संपेल असें वाटतें. अर्थात् याचा अर्थ काँग्रेसच्या घोषणेप्रमाणें शेतकरी-कामगारांचें राज्य स्थापन झालें असें नाहीं. दिल्ली बहोत दूर है असेंच म्हणावें लागतें. अशा परिस्थितींत आतां समाजवादी लोक काय करणार, असा प्रश्न आहे.

ब्रिटिश साम्राज्यशाहीबरोबर समोरासमोर युद्ध चालूं होतें तोंवर काँग्रेस समाजवादी पक्षाच्या वतीनें स्वतंत्र लढा चालवणें बरोबर नव्हतें; पण तो लढा संपल्यावर पुन्हां काँग्रेस समाजवादी पक्षाला आपली संघटना करणें आवश्यकच आहे. विशेषतः काँग्रेसनें प्रांतांत आणि मध्यवर्ति सरकारांत जाऊन अधिकार-ग्रहण केल्यावर तर त्याची अधिकच आवश्यकता आहे. कोणी म्हणतील कीं काँग्रेसनें किसान-कामगारांचें राज्य हें आपलें ध्येय आहे अशी घोषणा केल्या-नंतर तुमच्या पक्षाची आतां आवश्यकता काय ? पण नुसत्या घोषणा करून काम भागत नसतें. त्या घोषणा प्रत्यक्षामध्यें उतरविण्यासाठीं संघटना करावी लागते. १९४२ च्या आंदोलनांत ज्या शक्ति निर्माण झाल्या त्याचा समावेश

काँग्रेसमध्यें खऱ्या अर्थानें होऊं शकेल आणि काँग्रेसची संघटना एका नव्या पायावर उभारली जाईल तर गोष्ट वेगळी. पण आज तरी अशी स्थिति नाहीं. अजून सर्व जुन्या विचारांच्या आणि कित्येक ठिकाणीं तर १९४२ च्या आन्दोलनाला आणि समाजवादी विचारसरणीला विरोध करणाऱ्या लोकांच्या हातांतच काँग्रेसची सूत्रें जात असल्याचें दिसून येत आहे. अधिकारग्रहणामुळें ही प्रवृत्ति अधिकाधिक बळावत जाणार हें निश्चित आहे. नव्या कार्यक्रमाला आणि ध्येयाला त्या ध्येयाशीं आणि कार्यक्रमाशीं तन्मय झालेली मंडळीच पाहिजेत. १९४२ च्या आन्दोलनांतून बाहेर पडलेल्या हजारों-लाखो तरुण कार्यकर्त्यांस आज काँग्रेसमध्यें मिळावा तसा वाव मिळत नाहीं. त्यांना जर काँग्रेस संघटित करूं शकत नसेल तर त्या नव्या ध्येयाचा विडा पूर्वीपासून ज्यानें उचलला आहे अशा काँग्रेस समाजवादी पक्षानें तें कार्य केलें पाहिजे. या नवीन मंडळींकडे आणि पर्यायाने काँग्रेस समाजवादी पक्षाकडेच जनता आता आशेनें पाहात असेल तर त्यांत नवल नाहीं.

ब्रिटिश मंत्रिमंडळाची योजना मान्य केल्यामुळें आतां काँग्रेच्या गतिप्रवृत्ती-मध्येंच (डायनॅमिक्स) महत्त्वाचा फरक घडून येण्याचा संभव आहे. आतांपर्यंत सरकार आणि काँग्रेस यांमध्यें छत्तिसाचा आंकडा होता. पण आतां काँग्रेस आणि सरकार हळूहळू एकरूप होत जाणार. काँग्रेसजनाकडे पाहण्याचा सामान्य माणसाचा दृष्टिकोणदेखील त्यामुळे बदलल्याशिवाय राहणार नाहीं. आतांपर्यंत कोणीहि काँग्रेसचा मनुष्य असला तरी तो अन्यायाचा प्रतिकार करण्याच्या बाजूचा आहे अशी लोकांची खात्री होती. पण आतां खुद्द काँग्रेसचेंच सरकार झाल्यानें सर्वच काँग्रेसवाले अन्यायाविरुद्ध उभे राहतील असें म्हणतां येणार नाहीं. उलट आमचें मंत्रिमंडळ अडचणींत येईल म्हणून अन्यायाकडे डोळेझाक करण्याची प्रवृत्तीदेखील बळावेल. सबब जनतेवर होणारा अन्याय दूर करण्या-साठीं जो उभा आहे, अन्यायाच्या प्रतिकारार्थ जो नेहमीं झटेल, अशा कार्य-कर्त्यांची आणि त्यांच्या पक्षाची आतां पूर्वी नव्हती इतकी जरूरी आहे. काँग्रेस

समाजवादी पक्षच तें कार्य करूं शकेल. कारण त्याच्या दृष्टीनें ध्येय प्राप्त झालेलें नाहीं. राष्ट्रीय स्वातंत्र्य हेंच ज्याचें ध्येय होतें अशा तांत्रिक स्वातंत्र्यवाद्यांचा उत्साह आता मावळत जाणार हें निश्चितच आहे.

कॉंग्रेस ही हिंदी ऐक्याचा केंद्रबिंदु आहे ही गोष्ट पूर्वी सांगितलीच आहे. ब्रिटिश कॅबिनेटची योजना मंजूर केल्यामुळें कॉंग्रेसच्या या भूमिकेमध्यें जरा कमजोरी येणें अपरिहार्य आहे. उपसंघराज्यांची योजना (मुस्लिम गट आणि हिंदु गट) मान्य केल्यामुळें आणि कॉंग्रेसनें अधिकारग्रहण केल्यामुळें मुस्लिम प्रांतातील लोकांची कॉंग्रेसनिष्ठा कमी झाल्यास नवल नाहीं. ते आतां स्वाभाविकत: आपल्या उपसंघराज्याकडे पाहूं लागणार. या दृष्टीनें विचार करतां ज्यांना हिंदुस्थानांत कामगार-किसानाचें एक संयुक्त राज्य स्थापन करावयाचें आहे, जे आज शासनसंस्थेशीं एकरूप झालेले नाहींत आणि ज्यांच कार्यक्रम प्रामुख्यानें आर्थिक स्वरूपाचा आहे अशा कॉंग्रेस समाजवादी पक्षाच्या लोकांवर फार मोठी जबाबदारी येऊन पडते. ऐक्याचा केंद्रबिंदु हें कॉंग्रेसचें स्थान टिकविण्याची जबाबदारी कोणी पार पाडूं शकेल तर समाजवादी लोकच असें म्हणतां येईल. म्हणून त्यांनीं आपली जबाबदारी ओळखून आपला पक्ष योग्य तऱ्हेनें स्थापन केला पाहिजे. कॉंग्रेसच्या ऑगस्ट घोषणेची पूर्ति करून हिंदुस्थानांत किसान-कामगारांचें राज्य स्थापन करणें हें ह्या पक्षाचें ऐतिहासिक कार्य राहील. कॉंग्रेसमध्यें असा पक्ष स्थापन केल्यास शिस्तीच्या नांवावर त्यांना कॉंग्रेसमधून घालवून देण्याची भाषादेखील ऐकूं येईल. पण तो धोका त्यांनीं पत्करलाच पाहिजे म्हणजे आज ना उद्यां कॉंग्रेसचें हें परंपरागत हत्यार त्यांच्या हातीं येईल आणि त्यांना आपलें ध्येय गाठणें सोपें जाईल. या बाबतींत सध्या महत्वाच्या घटना घडत आहेत. आणि कॉंग्रेस समाजवादी पक्षाचे पुढारी त्यासंबंधीं अंदाज घेऊन आपलें निश्चित धोरण आंखीत आहेत. त्यांची निश्चित योजना बाहेर पडेल आणि मगच या विषयाची सांगता करणें उचित होईल.

◆ ◆ ◆

समाजवादी व
गांधीजींची शिकवण

लेखनकाल : ऑक्टोबर १९५०

प्रतिवर्षी आपण गांधी जयंति साजरी करीत असतों. त्याप्रमाणें यावर्षीं-देखील साजरी होईल. परंतु एखाद्या थोर पुरुषाची जयंति साजरी करणें म्हणजे केवळ त्याच्या नांवाचा जयघोष करणें नव्हे. त्यांनीं आपणांस जी शिकवण दिली ती आपण किती प्रमाणांत आत्मसात केली अथवा अव्हेरिली याचा आढावा घेण्याचा हा दिवस आहे. त्याचबरोबर त्यांनीं आमरण ज्या तत्त्वांचें प्रतिपादन केलें त्यांचें मनन आणि चिंतन करून त्या तत्त्वासंबंधीं आजच्या घटकेला आपणांस काय वाटतें याचा विचारहि त्यांच्या जयंतीच्या दिवशीं आपण केला पाहिजे.

राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या लढ्यांत महात्मा गांधींनीं आमचें मार्गदर्शन केलें. आतां राजकीय स्वातंत्र्य आपल्याला मिळालें आहे. परंतु त्यांचें मार्गदर्शन केवळ स्वातंत्र्य लढ्यापुरतेंच मर्यादित नव्हतें. त्या लढ्याच्या निमित्तानें त्यांचा आमचा संबंध आला. परंतु तो संबंध वरवरचा राहिला नाहीं. हळूहळू त्यांनीं आमचें समग्र जीवन व्यापून टाकलें. जीवनाविषयीं मौलिक विचार करण्यास त्यांनीं आम्हांस शिकविलें आणि आमच्या जीवनांत एक नवीन आशय भरला.

स्वातंत्र्याच्या उत्कट आकांक्षेमुळें जनता साम्राज्यविरोधी लढ्यांत ओढली गेली, परंतु स्वातंत्र्यलढ्याच्या त्या प्रतिक्रियेंत गांधीजींनीं आमच्या नैसर्गिक आकांक्षांना परिष्कृत केले. त्यांच्यांतील परस्परविरोध मिटवून आम्हांला एक

नवीन जीवनदृष्टि आली म्हणून त्यांनी अहिंसेचा प्रयत्न केला, म्हणून त्यांच्या हातून गंभीर स्वरूपाचें प्रमाद घडले अगर जाणूनबुजून त्यांच्या शिकवणीविरुद्ध आम्ही वागलों तरी त्यांनीं आमचा त्याग केला नाहीं. सर्व प्रमाद पोटांत घातले आणि आम्हांला मार्गावर आणण्याचा प्रयत्न चालूंच ठेवला. म्हणूनच आपणां-सर्वांचें मनांत राष्ट्रपित्याबद्दल अपार प्रेम आणि आदर वसत आहे.

आम्ही जो नवसमाज निर्माण करूं मागतों त्याचें नैतिक अधिष्ठान कोणतें या प्रश्नाचें उत्तर शोधूं लागलें म्हणजे हमखास आम्हांला गांधीजींचीच आठवण होते. समाजपरिवर्तनशास्त्राची भौतिक बाजू मार्क्सनें शास्त्रशुद्धरीत्या मांडली, भांडवलशाही समाजाचा अंत कसा करता येईल तें दाखविलें. परंतु भांडवल-शाहीनंतर येणाऱ्या समाजाचें नैतिक अधिष्ठान काय असेल याबद्दल पुरेसें विवेचन कार्ल मार्क्सच्या लिखाणांत मिळत नाहीं. कदाचित् सोशालिझमची कल्पनाच युरोपियन सोशालिस्टांच्या नैतिक प्रेरणेंतून जन्माला आलेली आहे हें विचारांत घेऊन कार्ल मार्क्सला त्या वेळीं त्या मुद्यावर भर देणें आवश्यक वाटलें नसेल. तें कसेंहि असलें तरी मार्क्सच्या लिखाणांत याबाबत पुरेसें मार्ग-दर्शन नाहीं असें म्हणणें भाग आहे. याच्या उलट महात्मा गांधींनीं मानवी जीवनमूल्यांच्या दृष्टीकोनांतूनच राष्ट्रीय स्वातंत्र्याचा आणि समाजक्रान्तीचा प्रश्न हाताळला. ज्या शाश्वत मूल्यांचा त्यानीं पुरस्कार केला तीं आपल्या जीवनामध्यें उतरविण्याचा त्यांनीं आमरण प्रयत्न केला. त्यांच्या दृष्टीनें जीवन ही एक प्रयोगशाळाच होती म्हणूनच आपल्या आत्मचरित्राला त्यांनीं "सत्याचे प्रयोग" असें अर्थपूर्ण नाव दिलें. मूल्यवान विचार आणि तत्त्वें त्यांनीं आम्हांला दिलींच परंतु आपल्या जीवनद्वारां त्या तत्त्वांचा साक्षात्कारहि त्यांनीं आम्हांला करून दिला. गांधीजींचें जीवन हा एक अमर ग्रंथ होऊन राहिला आहे. आपल्या मागून येणाऱ्यांसाठीं नैतिक जीवनाचे महान वस्तुपाठ त्यांनीं निर्माण करून ठेवले आहेत. सात्त्विक जीवनाची ही परंपरा आपल्या जीवनांत

आपण कायम टिकविली तरच त्यांनीं दिलेल्या अमूल्य ठेव्याचें जतन केल्या-सारखें होईल.

समाजवादी पक्षाच्या मद्रास अधिवेशनांत साथी जयप्रकाश नारायण म्हणाले कीं, मार्क्सवादी दृष्टिकोण आम्हीं स्वीकारला असला तरी महात्मा गांधींना आम्हीं विसरूं शकत नाहीं. तसें करणें म्हणजे वस्तुस्थितीशीं प्रतारणा करणें होय. मार्क्सच्या वास्तववादी तत्वज्ञानाशींच तें विसंगत होईल. गेलीं कित्येक वर्षें आमच्या समाजजीवनांतील महात्मा गांधी ही एक महान प्रेरक शक्ति होती. लक्षावधि लोकांच्या मनांत क्रांति करून त्यांनीं समाजमन घडविलें ही गोष्ट नाकबूल करण्यांत काय अर्थ आहे ? गांधीजींनीं दिलेली प्रेरणा लक्षांत न घेतां नवसमाजनिर्मितीचा प्रश्न सोडवूं पहाणें म्हणजे वस्तुस्थितीलाच नाकारण्यासारखें आहे.

साथी जयप्रकाश नारायण यांच्या या विधानाचा समाजवादी पक्षाच्या हितशत्रूंनी जाणून बुजून विपर्यास केला. परंतु प्रामाणिकपणें विचार करणाराला त्यांतील सत्य सहज दिसून येईल. महात्मा गांधींच्या मार्गदर्शनाखालीं स्वातंत्र्याचा लढा लढला गेला नसता तर आजची लोकशाही समाजवादी निष्ठा आम्हांला प्राप्त झाली असती किंवा काय याबद्दल शंकाच वाटते. त्यांनीं आम्हांला सत्याग्रहाचा मार्ग उपलब्ध करून दिला म्हणून तर आजच्या प्रतिकूल परिस्थितींतहि हिंसावादाच्या आहारीं न जातां आम्हीं आपली निष्ठा खंबीरपणें टिकवून धरूं शकलों आहोंत.

आपल्या सदसद्विवेकबुद्धी-माणें आचरण करून आत्मविकासाचा प्रयत्न करण्याचा अधिकार व्यक्तीला असला पाहिजे. प्रत्येकाचा तो जन्मसिद्ध हक्क आहे. तथापि एकाला ज्या सत्याचा साक्षात्कार झाला तें सत्य दुसऱ्यांवर जबरदस्तीनें लादण्याचा अधिकार कोणालाच असतां उपयोगी नाहीं. आपल्या मताचा आग्रह धरण्याच्या अधिकाराबरोबरच दुसऱ्याच्या मताबद्दल सहिष्णुता

बाळगण्याचें कर्तव्यहि येतें. समग्र सत्य मलाच समजलें आहे असा अहंकार बाळगणें म्हणजे सत्याचाच अपलाप करणें होय. गांधीजींनीं ही तत्त्वें आमच्यावर बिंबविलीं नसतीं, परमतसहिष्णुतेचा आग्रह धरला नसता आणि त्याप्रमाणें आचार करून दाखविला नसता तर लोकशाहीबद्दलचें आमचें प्रेम दुबळें राहिलें असतें.

व्यक्तीचा आत्मविकास करून घेण्याचा हक्क केवळ कागदोपत्रीं असून भागणार नाहीं. त्यासाठीं प्रत्येकाला समान संधिदेखील मिळाली पाहिजे. तसेंच एकाचा विकास तो दुसऱ्याचा नाश असतां उपयोगी नाहीं. निदान मूठभर लोकांच्या विकासासाठीं बहुसंख्यांच्या हिताची आहुति तरी पडतां कामा नये. आत्मोद्धाराच्या कल्पनेंत बहुसंख्यांच्या किंबहुना सर्वांच्या उद्धाराची कल्पना अभिप्रेत असली पाहिजे. परंतु आजपर्यंतच्या मानवी इतिहासांत हें सहसा घडलेलें नाहीं. कारण व्यक्तीच्या इच्छाआकांक्षा फलित होण्यासाठीं व्यक्तीप्रमाणेंच संघटित समाजाचें अस्तित्वहि आवश्यक असतें. आतांपर्यंत मूठभर सामर्थ्यवान् आणि हिकमती लोकांच्या वर्गानें हें समाजयंत्र आपल्या ताब्यांत ठेऊन आपला स्वार्थ साधून घेतला आहे. व्यक्ति विकासासाठीं संघटित आणि स्थिर समाजाची आवश्यकता आहे. या तत्वाच्या नांवावर त्यांनीं प्रस्थापित समाजघडीविरुद्ध चळवळ करणारांना समाजद्रोही म्हणून दडपून टाकण्याचा प्रयत्न केला. अर्थात् त्यांना नेहमींच यश आलें असें नाहीं. उत्पादनतंत्रांत क्रांति घडून आल्यामुळें जुन्या समाजव्यवस्थेच्या पोटांत ज्या वेळीं नवसमाजरचनेचा उदय होऊ लागला त्या वेळीं अधिक प्रभावी आणि कार्यक्षम उत्पादन पद्धतीनें निर्माण केलेल्या वर्गाचा जय होऊन जुना वर्ग पराभूत झाला. तथापि तेवढ्यानें समाजघटना अजिबात नष्ट झाली असें नाहीं. एक घटना जाऊन तिच्या जागीं दुसरी आली इतकेंच. समाज ही वस्तु मानवी समाजाच्या सुरुवातीपासून आजपावेतों सतत अस्तित्वांत होती आणि पुढेंहि रहाणार ही गोष्ट आपण गृहीतच धरली पाहिजे. प्रश्न आहे तो व्यक्ति

आणि समाज यांपैकीं कोणाचें प्राधान्य मान्य करावें हा आहे. व्यक्तीच्या विकासाकरितां समाजाची आवश्यकता आहे म्हणून समाज सांगेल त्या सर्व गोष्टी व्यक्तीनें निमूटपणें मानल्याच पाहिजेत काय ? प्रस्थापित समाज बहुसंख्य व्यक्तींच्या विकासाआड येत आहे अशी खात्री पटली तरीहि व्यक्तीनें समाजाचे कायदे मानलेच पाहिजेत काय ? बहुसंख्य समाजाचें मत देखील प्रस्थापित समाजव्यवस्थेविरुद्ध असेल तर अशा परिस्थितींतहि जुन्या समाजाच्या कायद्यापुढें सर्वांनीं मान वाकविली पाहिजे काय ? जुनी समाज व्यवस्था लोकमतानुसार बदलण्यास सत्ताधारी वर्ग तयार नसेल तर त्यांच्या विरुद्ध बंड करण्याचा अधिकार प्रजेला नाहीं काय ? असें अनेक प्रश्न समाजांत डोळसपणें जगूं मागणाऱ्या माणसाच्या मनांत उभे रहातात. केवळ मनाच्या समाधानासाठीं या प्रश्नांचीं उत्तरें आपणांस शोधावीं लागतात असें नव्हे तर त्याप्रमाणें आचरण करण्याचे प्रसंगदेखील पुष्कळ वेळीं येत असतात. अशा प्रश्नाबाबत गांधींनीं आपलें मार्गदर्शन केलेलें आहे.

समाजाचें अस्तित्व व्यक्तीच्या विकासासाठीं आवश्यक आहे असें आपण पाहिलें. परंतु याचाच अर्थ असा होतो कीं, समाज जर व्यक्तीच्या विकासाविरुद्ध येऊं पहात असेल आणि व्यक्तिजीवनाला गौण समजून त्याचा बळी देऊं मागत असेल तर ते गैर आहे. अशा वेळीं व्यक्तीनें काय करावें ? गांधीजींनीं या प्रश्नाचें उत्तर अगदीं स्वच्छ शब्दांत देऊन ठेवलें आहे. व्यक्तिजीवनाचा उच्छेद करणारी आज्ञा समाजानें दिली तर तिचा प्रतिकार करणें हाच व्यक्तीचा धर्म होय. परंतु हा अधिकार जसा मला आहे तसा तो दुसऱ्यांनादेखील आहे हें विसरून चालणार नाहीं. माझ्या जीवनाचा उच्छेद करण्याचा अधिकार दुसऱ्यांना नाहीं हें खरें परंतु, तसें कोणी करूं मागत असेल तर केवळ तेवढ्यासाठीं त्याच्या जीवनाचा उच्छेद करण्याचा मला अधिकार नाहीं हें तत्त्व गांधीजींनीं आपणाला शिकविलें आहे. आपलीं साधनें शुद्ध असलीं पाहिजेत असा आग्रह ते धरीत त्याचा अर्थहि हाच आहे

परंतु, दुसऱ्याच्या जीवनाचा उच्छेद करण्याचा अधिकार मला नसला तरी समाजाची अन्याय्य आज्ञा मी मानलीच पाहिजे असें मुळींच नाहीं. ती आज्ञा मोडण्याचा अधिकार मला आहे. मात्र बहुसंख्य लोक माझ्या मताचे नाहींत तोपर्यंत आज्ञाभंगाबद्दल समाज जी शिक्षा करील ती मी आनंदानें सहन केली पाहिजे. सविनय कायदेभंगाचा हा सत्याग्रही मार्ग महात्माजींनींच आपणाला दाखवून दिला आहे.

प्रस्थापित समाजव्यवस्थेविरुद्ध बहुसंख्य जनतेचें मत आहे अशी आपली खात्री असेल आणि समाजव्यवस्था बदलण्याचा कायदेशीर मार्ग उपलब्ध नसेल तर ती समाजव्यवस्था टिकवून धरणाऱ्या सरकारबरोबर जनतेनें असहकार करावा. हा असहकार बऱ्हंशीं यशस्वी झाला आणि तरीहि सरकार नमतें घेण्यास तयार झालें नाहीं व उलट राज्ययंत्राची दंडशक्ती उपयोगांत आणून जनतेला दडपून पाडूं मागेल तर अशा वेळीं काय करावें हा अत्यंत बिकट प्रश्न आहे. अशा वेळीं अन्यायापुढें मान तुकविण्यापेक्षां जनतेनें बंड करून राजसत्ता हातीं घेण्याचा प्रयत्न केल्यास ते योग्यच नाहीं काय ?

अशा प्रकारें बंड करणें केवळ रास्तच नाहीं तर अत्यंत आवश्यक आहे असा समाजवादी पक्षाचा दृष्टिकोण आहे आणि म्हणूनच समाजवादी पक्षानें गांधीजींचें तत्त्व पूर्णतया मान्य केलेलें नाहीं, असा गांधीवाद्यांचा आमच्यावर आक्षेप आहे. या प्रश्नाबाबत गांधीजींची नेमकी भूमिका कोणती होती हें सांगणें कठीण आहे. ते स्वतः नैष्ठिक अहिंसावादी होतें. त्यांनीं स्वतः हातीं शस्त्र धरलें नसतें हें निर्विवाद आहे. परंतु तशी प्रतिज्ञा करणें एखाद्या राजकीय पक्षाला शक्य आहे किंवा काय हा प्रश्न आहे. वर उल्लेखिलेल्या आणीबाणीच्या परिस्थितींतहि एखादा पक्ष अहिंसा म्हणून राज्ययंत्र हातीं घेण्यासाठीं बंड करण्याचें टाळणार असेल तर ते समर्थनीय होईल असें वाटत नाहीं. व्यक्तीची गोष्ट अर्थातच याहून निराळी आहे. जनतेला आणि

तिच्या संघटीत राजकीय पक्षाला असें करण्याची पाळी येईपर्यंत नैष्ठिक अहिंसावादी स्वस्थ बसणार नाहीं. हिंसात्मक क्रांति टाळावी म्हणून तो जिवाचें रान करील. वेळप्रसंगीं पंचप्राणांचा आहुति देईल. अहिंसेच्या नांवावर भ्याडपणें अन्यांयापुढें मान तुकवण्यापेक्षां हिंसा परवडली असें गांधीजी म्हणत असत. तें कां निरर्थक होतें ! अशा आणीबाणीच्या प्रसंगीं सच्चा अहिंसावाद्यानें प्राण पणाला लावून अन्यायाचा प्रतिकार केला पाहिजे. हीच त्यांची शिकवण होती. प्रत्येकाच्या अंगीं असें अहिंसक बळ निर्माण करण्यासाठीं त्यांचा प्रयत्न होता. व्यक्तीच्या जीवनामध्यें याहून उच्चतर असें कोणतें ध्येय असूं शकेल .

परंतु आपल्या समाजांत आज तशा प्रकारचीं आणीबाणीची परिस्थिति आलेली आहे असें म्हणतां येणार नाहीं. नागरिक स्वातंत्र्याची ठिकठिकाणीं पायमल्ली होत असली तरी अजूनहि बऱ्याच अंशानें नागरिक-स्वातंत्र्य अस्तित्वांत आहे. त्याचा उपयोग करून जनमत जागृत करता येण्यासारखें आहे. इतकेंच काय परंतु नागरिक-स्वातंत्र्याची गळचेपी होत असेल तर विशिष्ट परिस्थितींत सविनय कायदेभंग करूनहि आपण अन्यायाचा प्रतिकार करूं शकतो. नव्हे तो केला पाहिजे कारण आपण जर गांधीजींच्याकडून कांहीं शिकलों असूं तर सरकार हुकूमशाही बनत असतांना आपण उघड्या डोळ्यांनीं ते पहातां उपयोगी नाहीं. सत्याग्रही मार्गानें प्रतिकार करून आपण जनमत जागृत केलें पाहिजे. आपण लोकशाही वातावरण टिकविण्याचा आटोकाट प्रयत्न केला पाहिजे. शांततेच्या आणि लोकशाही मार्गांनीं समाज-परिवर्तन घडवून आणावयाचें ज्यांचा निर्धार असेल त्यांनीं केवळ शांतिपाठ म्हणत बसून चालणार नाहीं; तर लोकशाहीचें वातावरण निर्माण केलें पाहिजे. कारण लोकशाही असेल तर समाजपरिवर्तनासाठीं हिंसात्मक साधनें वापरूं नका असें सांगण्याचा हक्क निर्माण होऊं शकतो.

ज्या वेळीं एखादी विशिष्ट समाजव्यवस्था बहुसंख्य जनतेच्या मतावर चाललेली असेल आणि विरोधी पक्षाला आपल्या मताचा प्रचार करून

चेण्याची संधि असेल त्या वेळीं जनता अज्ञानी आहे, तिला आपले हित समजत नाहीं, असें म्हणून मूठभर लोकांनीं सशस्त्र बंडाचा उठाव करणें लोकशाहीच्या तत्त्वाशीं विसंगत आहे. अशा परिस्थितींत लोकशाहीनिष्ठ पक्षानें बहुसंख्याचें मतानें राज्यकारभार होऊं दिला पाहिजे. समाजवादी पक्षानें हें तत्त्व मान्य केलें आहे. गांधीजींच्या शिकवणीचाच हा परिणाम आहे. कारण बहुमताच्या जोरावर पास केलेलें जे कायदे अन्याय वाटतील ते सत्याग्रही मार्गानें मोडून जनमत जागृत करण्याचें साधन त्यांनीं आम्हांला दिले आहे. तें साधन उपलब्ध नसतें तर केवळ सनदशीर मार्गांनीं आमचें समाधान होणें शक्य नव्हतें. या साधनाचा उपयोग कुशलतेनें केला तर आजच्या परिस्थितींत शांततेच्या मार्गानें हिंदुस्थानांत समाजक्रांति घडवून आणतां येईल अशी समाजवादी पक्षाची भूमिका आहे.

समाजवादी पक्षानें सत्याग्रहाची भाषा करूं नये आणि केवळ सनदशीर मार्गांनीच समाजवाद आणावयाचा आम्ही प्रयत्न करूं अशी हमी द्यावी असा उपदेश अलिकडे बरेच लोक करीत असतात. याच्या उलट असेंहि म्हणणारे लोक आहेत कीं, हिंदुस्थानांत लोकशाही परंपरा नसल्यामुळें आणि जनता अज्ञानी व खेडोपाडीं विखुरलेलीं असल्यामुळें या देशांत शांततेच्या मार्गानी क्रान्ति घडवून आणण्याची भाषा फोल आहे. कित्येक वेळीं तीच ती माणसें हें दोन्ही प्रकारचें युक्तिवाद करीत असतात. कारण येनकेन प्रकारेण समाजवादी पक्षाला नेस्तनाबूद करणें एवढाच त्यांचा हेतु असतो.

हिंदुस्थानांतील जनता अज्ञानी आहे, येथें उद्योगधंद्याची वाढ झालेली नाहीं, बहुसंख्य लोक खेडोपाडीं विखुरलेलें आहेत या सर्व गोष्टी समाजवादी पक्षाला ठाऊक आहेत. म्हणूनच सत्याग्रही मार्गाचा त्याग करून केवळ सनदशीर मार्गांना बांधून घ्यावयास आम्ही तयार नाहीं.

उद्योगप्रधान देशांत आजच्या घटकेला सनदशीर मार्ग पुरेसे असण्याचा संभव आहे. कारण तेथें कामगारवर्गानें संपाच्या रूपानें प्रत्यक्ष लढ्याचा मार्ग

चोखाळून पुरेसें जनता शिक्षण आणि संघटन केलेले आहे. आमच्या देशांतील परिस्थिति याहून फारच भिन्न आहे शेतीवर उदरनिर्वाह करणाऱ्यांच्या मानानें कामगार वर्ग फार लहान आहे. त्यांच्यांत पुरेशी वर्गभावनाहि अद्याप निर्माण झालेली नाहीं. कॉंग्रेस सरकारचे धोरण आणि कामगारविषयक कायदे उघड उघड कामगारविरोधी आहेत. कामगारांचा संप करण्याचा हक्क त्यांच्यापासून हिरावून घेण्याच्या कारवाया सुरू आहेत. दिवसेंदिवस कायदेशीर संप ही अशक्य कोटींतील गोष्ट होऊन बसणार आहे. संप म्हटला म्हणजे तो बेकायदा ठरविण्याची शक्यताच अधिक. अशा परिस्थितींत संप करावयाचा म्हणजे एका दृष्टीनें तो कायदेभंगाचा लढाच होतो. सनदशीर मार्गांना बांधून घेतलें तर हा मार्गहि बंद होतो.

खेडोपाडी विखुरलेल्या असंघटित शेतकरी वर्गाची गोष्ट तर विचारायला नको. त्यांच्यांत जागृति करण्याचें काम आपणांस करावयाचें आहे. बरें सावकाशीनें होईल म्हणून सबुरीनें घ्यावे तर तें धोक्याचें आहे. आर्थिक परिस्थिति सुधारू म्हटल्यास तें शक्यच नाहीं. त्यामुळें परिस्थिति जसजशी बिघडत जाते तसतसा असंघटित वर्गाला तिचा अधिकाधिक ताण सहन करावा लागतो. आपल्या समाजांत शेतकरी समाज सर्वांत मागासलेला आणि असंघटित आहे. त्यामुळें कष्टाचा बोजा त्या वर्गाच्या डोक्यावर देण्याचाच नेहमीं प्रयत्न होतो. परिणामतः शेतकऱ्यांवर निरनिराळ्या प्रकारचे जुल्म करण्यांत येत आहेत. त्यांच्या शेतांत पिकणाऱ्या धान्याचें भाव त्याच्या हिताहिताचा विचार न करतां आणि त्यांना न विचारतां निश्चित केलें जातात. या अन्यायाचें निराकरण करण्याचें प्रभावी परन्तु शांततामय साधन त्याला मिळालें नाहीं तर तो चुकीच्या मार्गाचा अवलंब करण्याचीदेखील शक्यता आहे. पांच वर्षांनीं निवडणुका होतील त्या वेळीं अधिकारारूढ पक्षाच्या विरुद्ध मत देऊन तू न्याय मिळव असें सांगून त्यांचे समाधान होणार

नाहीं. लवकरांत लवकर आपलें गाऱ्हाणें वेशीवर टांगून जनतेचें लक्ष त्याकडे वेधलें जाईल असें साधन आज शेतकऱ्याला हवें आहे. सत्त्याग्रह हेच तें प्रभावी साधन होय.

गांधीजींकडून हिन्दी समाजवादी चळवळीला काय मिळाले आहे, समाजवादी पुढारी गांधीजीबद्दल निष्ठा कां बाळगतात वगैरे प्रश्न विचारणाऱ्यांनीं, गांधीजींनीं जनतेला दिलेल्या एका सत्याग्रहशास्त्राचा जरी विचार केला तरी त्यांना गांधीजींची महति कळून येईल. या शस्त्राचा उपयोग प्रभावीपणें करून त्यांनीं जर सत्याग्रही परंपरा निर्माण केली नसती तर औद्योगिक दृष्ट्या मागासलेल्या या देशांत लोकशाहीचें तत्त्व केवळ पुस्तकांतच राहिलें असतें. त्यांचा मोठेपणा केवळ त्यांनीं प्रतिपादिलेल्या तत्त्वांत नाहीं. तीं तत्त्वें त्यांनीं आपल्या जीवनांत उतरून दाखविलीं म्हणूनच या तत्त्वाचें रूपांतर एका खंबीर जीवननिष्ठेमध्यें होऊं शकलें. लोकशाही जीवनाचा एक उदात्त आणि सुंदर आदर्श त्यांनीं आमच्यापुढें ठेवला आहे. त्यांची जयंति खऱ्या अर्थानें साजरी करावयाची असेल तर त्यांनीं दाखविलेल्या जीवनादर्शांची आपण प्रयत्नपूर्वक उपासना करून लोकशाही परंपरा टिकाविली पाहिजे.

◆ ◆ ◆

समाजवादाचे भवितव्य

लेखनकाल : १९४६.

हिंदुस्थानांत आणि एकंदर जगांत आज जो गोंधळ आणि वखेडा माजून राहिला आहे तो कोणाहि विचारी मनुष्याला अस्वस्थ केल्यावांचून रहाणार नाहीं. पाशवी शक्तींचें सर्वत्र थैमान सुरू असून सर्व जीवनच जणूं काहिलींत टाकल्याप्रमाणें झालें आहे. समाजवादाच्या कसोटीचीदेखील हीच वेळ आहे. आतांपर्यंत मानवी समाजानें पुष्कळच प्रगति केली. पण यापुढचा टप्पा गांठावयाचा असल्यास समाजवादाच्या पायावर समाजरचना व्हावयास पाहिजे असें कार्ल मार्क्सचें प्रतिपादन आहे. ज्या उत्पादनतंत्राचा समाजाला अधिकाधिक फायदा मिळावा म्हणून भांडवलशाही समाजव्यवस्था निर्माण करण्यांत आली त्या उत्पादन-तंत्रांत आतां क्रांति घडून आली आहे. या नव्या उत्पादन तंत्राचा समाजाला जास्तींत जास्त फायदा मिळावयाचा असेल तर भांडवलशाही समाजव्यवस्था मोडून समाजवादी व्यवस्था निर्माण करण्याखेरीज गत्यंतर नाहीं असा समाजवाद्यांचा दावा आहे. पण सांप्रत जगांत जी उलथापालथ चालूं आहे त्यांतून काय बाहेर पडतें यावरच समाजवादाचें भवितव्य अवलंबून आहे असें म्हटल्यास वावगें होणार नाहीं.

मार्क्सवादाची शिकवण घेऊन गेलीं शंभर वर्षें जगामध्यें समाजवादी लोक प्रयत्न करीत आहेत. समाजवादी व्यवस्था निर्माण झाल्यास मनुष्याचें आजचें दुःख आणि दारिद्र्य नष्ट होऊन सर्वांना सुखासमाधानानें जगतां येईल,

आणि विकासाचा मार्ग सर्वांनाच मोकळा होईल, या निष्ठेनें हे लोक झगडत आहेत. गेल्या महायुद्धाच्या वेळीं लेनिननें जागतिक क्रांतीची घोषणा करून आंतरराष्ट्रीय समाजवादाच्या प्रस्थापनेसाठीं जोराचा प्रयत्न केला. झारच्या रशियांत त्यांनीं जनतेला अचूक कार्यक्रम देऊन आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीनें जुनी राजवट उलथून टाकली व समाजवादी तत्त्वावर नव्या समाज-रचनेस सुरुवात केली. पण इतर देशांत क्रांति यशस्वी होऊं शकली नाहीं. प्रतिगामी भांडवलशाहीनें समाजवाद्यांवर मात करून लेनिनच्या रशियाभोंवतीं एक कडें निर्माण केलें. मात्र भांडवलशाही समाजरचना जागतिक दृष्ट्या कुचकामाची झालेली असल्यामुळें तिला चिकटून राहिलेल्या राष्ट्रांत अंतर्गत विरोध वाढूं लागले आणि फॅसिझमच्या वाढीला वाव मिळाला. फॅसिझमची वाढ होऊं दिल्यामुळेंच मानवी समाज दुसऱ्या महायुद्धाच्या खाईत पडला आणि त्यांतूनच आजची ही भीषण परिस्थिति निर्माण झाली आहे.

यावर समाजवाद हाच एक उपाय आहे असें सांगणें हें सोपें सत्य आहे. परंतु खरोखरच या परिस्थितींतून यशस्वीरीतीनें बाहेर पडण्याची शक्ति समाजवादाजवळ आहे काय? कीं आतांपर्यंत मानवानें जशीं निरनिराळीं साधनें वापरलीं व तीं निरुपयोगी म्हणून टाकून दिलीं त्याप्रमाणें समाजवादालादेखील अडगळीच्या खोलींत जाऊन पडावे लागणार आहे? या प्रश्नाचें उत्तर देतां आलें तरच समाजवादाच्या भवितव्याबद्दल कांहीं सांगतां येईल. पहिल्या महायुद्धा-पासून आतांपर्यंत ज्या घडामोडी झाल्या त्यावरून तरी समाजवादाचा विजय होणें शक्य आहे असें वाटतें. आजच्या घटकेला युरोपमध्यें एका बाजूला समाजवादी व्यवस्था आणि दुसऱ्या बाजूला भांडवलशाही व्यवस्था असा अटीतटीचा सामना चालूं आहे. युरोप समाजवादी होऊं नये म्हणून अमेरिकन भांडवलशाही 'निकराचा प्रयत्न करीत आहे. ही गोष्ट कोणाच्याहि लक्षांत येण्यासारखी आहे.

या झगड्यांत यशस्वी व्हावयाचें असल्यास समाजवादासाठीं झगडणाऱ्या लोकांनीं कांहीं पथ्यें संभाळलीं पाहिजेत. उदाहरणार्थ आजच्या परिस्थितीत हिंदुस्थानसारख्या अफाट देशाचें एकदम एकच राज्य करण्याचा अट्टाहास धरणें अयोग्य होईल. तें शत्रूच्याच पथ्यावर पडेल. नेपोलियनला नामोहरम करण्यास राष्ट्रवादाचा उपयोग शत्रूंनीं यशस्वी रीतीनें केला ही गोष्ट आपण विसरून चालणार नाहीं. या दृष्टीनें सोव्हिएट युनियनच्या आधिराज्याखालीं समाजवादी विचारसरणी मंजूर असलेल्या सर्व राष्ट्रांना आणण्याचा आग्रह धरणें हें अयोग्य आहे पण पूर्व युरोपांत व चीनमध्यें असा प्रयत्न सोव्हिएट रशियाकडून होत आहे असें दिसते. सोव्हिएट रशियाच्या नियंत्रणाखालीं कार्य करणाऱ्या देशोदेशीच्या कम्युनिस्ट पक्षांचें अस्तित्व हें समाजवादाच्या दृष्टीनें विघातक आहे असें म्हणणें त्या त्या पक्षांच्या हल्लींच्या वर्तनावरून क्रमप्राप्त झालें आहे. लोकशाहीचें अधिष्ठान असेल तरच समाजवाद यशस्वी होईल. किंबहुना समाजवादामध्यें हुकुमशाहीला वावच असतां उपयोगी नाहीं. समाजवादाला हुकूमशाही प्रवृत्तीपासून बचावलें पाहिजे. लोकशाहीला आणि व्यक्ति-जीवनाला स्थान नसेल तर समाजवाद उरलाच कोठें ?

समाजवादाचें भवितव्य केवळ युरोप, अमेरिकेंतील लढ्यावरच अवलंबून नाहीं. आशिया व आफ्रिका या खंडांतील वसाहतींच्या देशांतील राजकीय आणि सामाजिक घडामोडी या तितक्याच किंबहुना अधिक महत्त्वाच्या आहेत. चीन, हिंदुस्थान, इंडोनिशिया वगैरे प्रचंड लोकसंख्येच्या देशांत कोणाची सत्ता प्रस्थापित होते यावरच जागतिक समाजवादाचें भवितव्य प्रामुख्यानें अवलंबून आहे. या देशांतील लोकांवर प्रतिगामी संघटनांच्या आणि आपल्या हस्तकांच्या मार्फत साम्राज्यवादी राष्ट्रें आपली पकड टिकवूं शकली तर समाजवादाची गाडी कांहीं कालपर्यंत तरी बाजूला पडल्यावांचून रहाणार नाहीं. वसाहतीच्या देशांतील स्वातंत्र्यवादी राष्ट्रवाद ही एक पुरोगामी शक्ति आहे. राष्ट्रवादाच्या झेंड्याखालीं ज्या संघटना उभ्या केलेल्या आहेत

त्यांत बहुसंख्य श्रमजीवी दलित समाज समाविष्ट आहे. जनतेमध्यें अपूर्व जागृति निर्माण झाली असून साम्राज्य विरोधी लढ्याच्या शेवटच्या टप्प्यापर्यंत जनता येऊन पोहोचली आहे. आतां सर्व बळ एकवटून एक धडक दिली तर स्वातंत्र्याचा दरवाजा उघडेल अशी अवस्था आहे. पण तसें झाल्यास या देशांतहि भांडवलशाहीची सद्दी संपून समाजवादी युगास प्रारंभ होईल. म्हणून जनतेच्या संघटना खिळखिळ्या करण्याचा डाव साम्राज्यशाहीनें सुरू केला आहे. जुनाट सरंजामदार, संस्थानिक आणि भांडवलदार यांच्या साहाय्यानें या प्रयत्नांत त्यांना यश आलें तर भांडवलशाहीला कांहीं दिवस तरी जीवदान मिळाल्याशिवाय राहाणार नाहीं.

या दृष्टीनें देशांतील समाजवाद्यांनीं आपलीं धोरणें ठरविलीं पाहिजेत. स्वातंत्र्यवादी संघटना भांडवलशाहीच्या आहारीं जाणार नाहींत आणि त्याचें परराष्ट्रीय धोरण प्रतिगामी राष्ट्राच्या बाजूचें रहाणार नाहीं अशी खबरदारी घेतली पाहिजे. हिंदुस्थानांत समाजवादाभिमुख अशा राष्ट्रसभेच्या निशाणाखालीं हिंदी जनता आपला लढा आतांपर्यंत यशस्वी रीतीनें लढत आली. त्या राष्ट्रसभेच्या भविष्यावरच येथील समाजवादाचें भवितव्य अवलंबून आहे आणि अप्रत्यक्षपणें जागतिक समाजवादावरहि त्याचा परिणाम होणार आहे. देशांत प्रतिक्रियावादी जातीयवादाचें भूत उभें करून पुरोगामी राष्ट्रवादावर मात करण्याचा प्रयत्न चालू आहे. हे प्रयत्न हाणून पाडणें हें समाजवादाचें आज पहिलें व महत्त्वाचें काम आहे. एका बाजूनें जातीयवादाचे आक्रमण आणि दुसऱ्या बाजूनें आपलें आसन स्थिर करण्याचा हिंदी भांडवलदारांचा प्रयत्न अशा दुहेरी अडचणींतून आपल्याला मार्ग काढावयाचा आहे.

पंडित जवाहरलाल यांच्या नेतृत्वाखालीं कॉंग्रेसचें परराष्ट्रीय धोरण जागतिक समाजवादाच्या प्रस्थापनेस अनुकूल असेंच आंखण्यांत येत आहे. संयुक्त राष्ट्राच्या परिषदेंत हिंदुस्थानचें प्रतिनिधि ब्रिटिश आणि अमेरिकन

भांडवलशाहीविरुद्ध आणि दलित राष्ट्रांच्या बाजूनें भांडत आहेत. सोव्हिएट रशियाबरोबर मैत्री हें काँग्रेसचें परराष्ट्रीय धोरणातील महत्त्वाचें अंग आहे. पण येथील कम्युनिस्ट पक्षाला त्याची दखल नाहीं. ते काँग्रेसवर अप्रामाणिक टीका करतात इतकेंच नव्हें तर काँग्रेसविरोधी तिगामी पक्षाबरोबर एकजूट करण्यासदेखील त्यांना कांहीं वाटत नाहीं. संकुचित पक्षस्वार्थाच्या आहारीं जाऊन ते आपल्याच पायावर दगड पाडून घेत आहेत. मुस्लिम लीगच्या प्रत्यक्ष प्रतिकारदिनाला पाठिंबा देऊन त्यांनीं प्रतिक्रान्तीची नांदी म्हणण्यांत आपला सूर मिळविला आहे मुस्लिम लीगच्या धोरणानें आज देशांत जी परिस्थिति निर्माण झाली आहे ती समाजवादाच्या प्रगतीस निश्चितच हितावह नाहीं. उलट आतांपर्यंत आपण जी प्रगति केली ती टिकवायची कशी असा प्रश्न निर्माण झाला आहे. काँग्रेस ही भांडवलदारांची सस्था आहे हें सिद्ध करण्यांत येथील कम्युनिस्ट पक्षानें आपलें उभें आयुष्य खर्ची घातलें. पण त्यांचें हें निदान वस्तुस्थितीपेक्षां त्यांच्या इच्छेचेंच द्योतक आहे. काँग्रेस भांडवलदारांची आहे म्हणून तिच्यावर हल्ले चढविण्यांत ते पुरुषार्थ मानीत असून ती नामशेष होण्यांत अगर प्रतिगामी लोकांच्या हातीं जाण्यांत समाजवादाचें हित आहे असें त्यांना वाटते असावेसें दिसतें. काँग्रेस मोडली अगर भांडवलदारांच्या आहारीं गेली म्हणजे आपल्याला कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वाखालीं किसान-कामगारांची एकजूट करतां येईल अशी शेख महंमदी त्यांनीं चालविली आहे. पण दुर्दैवानें त्यांच्या या दुष्ट प्रयत्नांत त्यांना यश लाभण्यास शेख महंमदाच्यावर जशी पाळी आली तशीच त्यांच्यावरहि आल्यावांचून राहाणार नाहीं.

वास्तविक काँग्रेसला विरोध करावयाचा कीं पाठिंबा द्यावयाचा हा प्रश्न काँग्रेस कोणाबरोबर लढत आहे हें पाहूनच सोडविला पाहिजे. काँग्रेस ज्या वेळीं साम्राज्यविरोधी लढा करीत असेल अगर प्रतिक्रियावादी जातीयपक्षाबरोबर झगडत असेल तेव्हां तिला पाठिंबा देणें हेंच धोरण अचूक आहे. अशा वेळीं तिची शक्ति क्षीण करण्यास कारणीभूत होणें हा क्रान्तिद्रोह आहे. ज्या वेळीं या

प्रतिगामी शक्ति नष्ट होऊं लागतील आणि कॉंग्रेसमधील पुरोगामी शक्तींचा प्रतिगामी शक्तीबरोबर संघर्ष सुरूं होईल त्या वेळींच कॉंग्रेसमधील आपला विरोध तीव्र करणें श्रेयस्कर होईल. आतांपर्यंत अनेक वेळीं कॉंग्रेसचें जसें परिवर्तन घडून आलें आणि ती श्रमजीवी वर्गाच्या अधिकाधिक समीप गेली तसें पुन्हां अनेकदां घडवून आणणेंदेखील अशक्य कोटीतील नाहीं. आपलें प्रयत्न त्याच दिशेनें व्हावयास पाहिजेत. समाजवादी पक्षाचें हेंच धोरण आहे. हें धोरण यशस्वी करून कॉंग्रेसला खऱ्या अर्थानें किसान-कामगारांची संघटना बनविता आली तरच प्रतिक्रियावादी जातीयता आणि प्रतिगामी साम्राज्यशाही यांच्यावर मात करणें नजिकच्या भविष्यांत शक्य होईल. समाजवादी मंडळींनीं आपल्या कंबरा कसून पुरोगामी विचाराचें लोण थेट शेतकरीकामकऱ्यांपर्यंत नेऊन पोहोंचवलें तर त्यांच्या अभेद्य संघटना उभारतां येतील अशी खात्री वाटते. तेवढी जागृति आतां जनतेमध्यें झालेली आहे. म्हणून समाजवादाच्या भवितव्याबद्दल शंका उरत नाहीं.

समाजवादाचें भवितव्य उज्वल आहे असें मानण्यास दुसरेंहि महत्त्वाचें कारण आहे. समाजवाद ही एक नुसती शास्त्रशुद्ध विचारसरणीच आहे असें नाहीं तर ती जीवननिष्ठा आहे. समाजवादाला सर्वोदयवादी श्रेष्ठतम जीवन-मूल्यांचें अधिष्ठान नसतें तर तें केव्हांच कचऱ्याच्या टोपलींत जाऊन पडलें असतें आणि लौकिकी यशाची पर्वा न करतां ह्या ध्येयासाठीं झगडून प्राणार्पण करणारें हजारों लोक निघाले नसते. परंतु झगडणाऱ्या व्यक्तीला केवळ प्रयत्नांमध्येंहि पुरुषार्थ वाटावा अशी उदात्तता त्यांत आहे. सामाजिक न्यायाच्या प्रस्थापनेसाठीं समाजवादाचा अविष्कार झालेला असून व्यक्ति आणि समष्टि या उभयतांचें जीवनसाफल्य त्यांत सामावलेलें आहे समाजवादाच्या उज्ज्वल भवितव्याची सर्वांत महत्त्वाची हमी हीच आहे.

◆ ◆ ◆

समाजवादी युवक-सभाच कां ?

लेखनकाल : १९४६

कोणतेंहि महान् कार्य करावयाचें म्हटलें म्हणजे प्रत्येकानें तरुण पिढीकडे आशेनें पाहूं लागावें हीच तरुणांची खरीखुरी दौलत होय. कार्य विधायक असो अथवा लढाऊ असो त्यांत तरुणांनीं आपला जिव्हाळा, कर्तबगारी आणि शक्ति आलेलीं नाहीं तर त्या कार्यांत अपुरेपणाच रहावयाचा राष्ट्र संकटांत असले तरी तरुणांनाच हांक देण्यांत येते. सर्वांची मदार तरुणांवरच.

अलीकडे कॉंग्रेसचें पुढारी आपल्या संघटनेंत तरुण रक्त आणण्यासाठीं व्याकुळ झालेले दिसतात. तरुणांच्याबद्दल आतांच त्यांना कां आठवण झाली ? कारण अगदीं उघड आह. तें असें कीं, कित्येक वर्षांच्या प्रयत्नानें जनतेंत, स्वातंत्र्याकांक्षा निर्माण झाली होती, स्वातन्त्र्याची उत्कट तहान लोकांना लागली होती आणि स्वातंत्र्याचा लढा करण्याचे महान् ऐतिहासिक कार्य कॉंग्रेसनें आपल्या शिरावर घेतलें होतें. त्यामुळें आपोआपच स्वातंत्र्यप्रेमी तरुणांचें मस्तक आतांपर्यंत कॉंग्रेसपुढें नमत राहिलें. कॉंग्रेसला तरुण रक्त मिळविण्याचा खास प्रयत्न करावा लागला नाहीं. परंतु आतां परिस्थिति बदलली आहे.

आतां राजकीय स्वातंत्र्य आपल्याला मिळाले आहे. आर्थिक आणि सामाजिक समता मात्र अजून प्रस्थापित झालेली नाहीं. तरुणांना या ध्येयाची

तीव्र इच्छा आहे. परंतु काँग्रेसला आज तशी निकड भासत नाहीं. स्वातंत्र्या-साठीं काँग्रेसनें जशी लढाऊ भूमिका घेतली तशी समाजक्रांतीसाठीं घ्यावयास ती तयार नाहीं. काँग्रेस आज स्थितिप्रियं झालेली असून प्रचलित समाजरचना टिकवून धरण्याचेच कंकण जणूं तिनें बांधलें आहे.

स्वातंत्र्य मिळाल्यामुळें आतां आपलें कार्य प्रामुख्यानें विधायक स्वरूपाचें झालें आहे. सबब आतां तरुणानें या विधायक कार्याला वाहून घ्यावे असा आक्रोश काँग्रेस पुढारी करीत आहेत. परंतु केवळ विधायक कार्यद्वारा समाज-क्रांतीचें कार्य पूर्ण करतां येईल असें तरुणांस वाटत नाहीं. त्यासाठीं राजकीय आघाडीचीहि आवश्यकता आहे. काँग्रेसनें जर लढाऊ भूमिका स्विकारून समाजक्रांतीसाठीं लागणारी राजकीय भूमिका पुरविली असती तर तरुणपिढीनें आनंदानें काँग्रेसला आपली निष्ठा वाहिली असती. परंतु काँग्रेसकडून ही अपेक्षा करणें व्यर्थ असल्याचे तरुणांना कळून चुकले आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळांतहि काँग्रेसनें समाजक्रान्तीच्या विधायक कार्यक्रमाबद्दल विशेष आस्था दाखविली नाहीं. स्वातंत्र्याच्या लढाऊ कार्यक्रमाबरोबरच नव-समाजरचनेच्या क्रान्तिकारक विधायक कार्याबद्दल कधींच प्रेम निर्माण केलें नाहीं. ज्यानें कोणी तसें करण्याचा प्रयत्न केला त्यांचें पाय मात्र ओढले. परिणामत: स्वातंत्र्यपूर्वकाळीं ज्या कांहीं तरुणांच्या संघटना झाल्या त्यांची निष्ठा परंपरेनें समाजवादी अगर कम्युनिस्ट पक्षाकडे राहिली. आज तर काँग्रेस उघड उघड समाजवादी चळवळीच्या विरुद्ध दंड थोपटून उभी आहे. मग काँग्रेसमध्यें हें तरूण रक्त कसें येणार ?

हिंदुराष्ट्रवादी तरुणांच्या संघटनांना आपल्यांत ओढून घेण्याची शक्तीहि काँग्रेसपाशीं नाहीं. कारण त्या तरुणांना हवी तशी उघड उघड हिंदुमहासभा-वादी भूमिका घेण्याची तिची तयारी नाहीं. तसा प्रयत्न झाल्यास पंडितजींच्या-सारखें लोकप्रिय पुढारी काँग्रेसपासून अलग होतील अशी भीति समाजवाद

विरोधी कॉंग्रेस पुढाऱ्यांना वाटते. अशा विकट परिस्थितींत कॉंग्रेसनें आपली स्वतंत्र युवक संघटना करण्याचा कितीहि प्रयत्न केला तरी त्यांत तिला यश येणार नाहीं.

कॉंग्रेसला तरूण रक्त आपल्याकडे आकृष्ट करतां आले नाहीं म्हणजे आपोआपच ते विरोधी पक्षाकडे जाईल असें समजणें अर्थातच चुकीचें होईल. तरूण वर्ग आज भांबावल्यासारखा आहे. स्वातंत्र्य मिळाल्यामुळें अ तां पूर्वीची ईर्षा राहिलेली नाहीं स्वातंत्र्यासाठीं आपण त्याग केला पाहिजे, लढले पाहिजे ही कल्पना गेल्या कित्येक वर्षांत तरूण पिढीच्या हृदयांत दृढमूल झाली होती. आज देशांत सामाजिक क्रान्तीच्या ध्येयाचा बोलबाला असला तरी स्वातंत्र्या-बाबत जसें लोकमत तयार झालें होतें आणि त्यासाठीं झगडण्याचा मार्ग कोणता व संस्था कोणती हें ठरून गेले होते, तसें समाजक्रांतीच्या ध्येयाबद्दल अजून झालेले नाहीं. सर्वसामान्य तरूणाला जुनीं मुल्यें टाकाऊ वाटत असली तरी नवी मूल्यें त्याच्या ठिकाणीं बाणलेलीं नाहीत. त्याच्या जीवनात एक प्रकारची नैतिक आणि राजकीय पोकळी निर्माण झाली आहे ही पोकळी नष्ट करून नव्या ध्येयासाठीं झगडण्याची ईर्षा कशी निर्माण करावयाची हा फार बिकट प्रश्न होऊन बसला आहे.

ज्या तरुणांना समाजक्रांतिबद्दल आत्मीयता वाटते त्यांना ती क्रांति कशी घडवून आणतां येईल आणि कोणत्या संस्थेमार्फत घडवून आणतां येईल हें अद्याप चांगलेसें समजलेलें नाहीं. सर्वसामान्य लोकांना कॉंग्रेसबद्दल असमाधान वाटत असलें तरी कॉंग्रेसमार्फत समाजक्राति होणारच नाहीं हें त्यांना पुरेसें उमगलें नाहीं. त्यासाठीं आपल्याला एक नवीन हत्यार घडविलें पाहिजे. याची जाणीव लोकांना अद्याप झालेली नाहीं. ज्या कांहीं लोकांना हें समजून चुकले आहे त्यांना जनतेचा पुरेसा पाठिंबा अद्याप मिळालेला नाहीं. त्यामुळें बहुसंख्य जनतेपासून अलग होऊन समाजवादी विचारसरणीचा पुरस्कार करणाऱ्या

पक्षाबरोबर समरस होण्याची तरुणांची तयारी होऊं शकत नाहीं. परिणामतः समाजवादी चळवळींतहि नवीन कार्यकर्त्यांची भर जितकी झपाट्यानें पडावयास पाहिजे तितकी पडत नाहीं.

सध्यां आपल्या देशांत समाजक्रांतीच्या ध्येयाच्या नांवाखालीं कार्य करणारें कॉंग्रेसव्यतिरिक्त दोन पक्ष आहेत. कम्युनिस्ट आणि समाजवादी हेंच ते दोन पक्ष. हे दोन पक्ष दोन प्रकारच्या विचारसरणीचे प्रतिनिधि आहेत. कम्युनिस्टांनीं हिंदुस्थानांत आज जहालवादाच्या नांवाखालीं जो दहशतवाद चालविला आहे त्यामुळें ते जनतेपासून दूर फेकले जात आहेत सोव्हिएट युनियनच्या धोरणाशीं ते बांधलेले आहेत जागतिक राजकारणांत सोव्हिएट युनियनची जी भूमिका असेल ती उचलून धरणें हें त्यांचें कर्तव्यच ठरते. त्यांच्या पोरकट जहालवादामुळें आणि कट्टर सांप्रदायी कार्यपद्धतीमुळें कांहीं तरुणांना कम्युनिस्ट पक्षाबद्दल आकर्षण वाटते. ज्यांना स्वतः कांहीं करणें अशक्य आहे त्यांना दुसऱ्यानें केलेल्या त्यागाबद्दल आदर वाटावा हें स्वाभाविकच आहे. त्या त्यागांतून काय निष्पन्न होत आहे याचा विचार करण्याइतका तर्कनिष्ठ व्यवहारवाद तरुणांच्या ठिकाणीं असणें कसें शक्य आहे ! पोरकट जहालवादामुळें कांहीं तरुणांचीं मनें कम्युनिस्ट पक्षाकडे आकृष्ट होत असलीं तरी दहशतवादाला ज्या त्यागाची आवश्यकता असते तो त्याग करणें फारच थोड्यांना शक्य होते. सारांश कम्युनिस्ट पक्षाकडेदेखील तरूण मोठ्या संख्येनें आकर्षिले जात नाहींत.

हिंदुस्थानांतील समाजवादी क्रांतीचा पुरस्कार करणारा दुसरा प्रमुख पक्ष समाजवादी पक्ष होय कॉंग्रेसमध्यें कित्येक वर्षें काम केलेल्या कार्यकर्त्यांचा भरणा या पक्षांत आहे. अखिल भारतीय कीर्तीचे लोकहि पक्षाचें नेतृत्व करण्यासाठीं उपलब्ध आहेत. त्यामुळें कॉंग्रेसला विरोध करणारा पक्ष म्हणून समाजवादी पक्ष मान्यता पावत आहे हळूहळू जनता या पक्षाकडे आकृष्ट होत आहे. तथापि कॉंग्रेसपासून जनता ज्या वेगाने दूर जात आहे, त्या वेगानें ती

समाजवादी पक्षाशीं एकजीव होत आहे असें मात्र म्हणतां येणार नाहीं. आपल्या देशाच्या राजकारणांत जर कोठें धोक्याची जागा असेल तर हीच होय. काँग्रेसपासून विमुख झालेल्या जनतेला एक नवीन श्रद्धास्थान प्राप्त करून देणें आणि तिच्या इच्छा-आकांक्षा साकार करण्यासाठीं लागणारी संघटना निर्माण करून देणें हें महान ऐतिहासिक कार्य हिंदुस्थानांतील समाजवादी चळवळीला आणि तिचे मार्गदर्शन करणाऱ्या समाजवादी पक्षाला करावयाचें आहे. हें कार्य ज्या प्रमाणांत यशस्वी होईल त्या प्रमाणांतच आपलें स्वातंत्र्य टिकवून जनतेला समाजक्रान्ति घडवून आणता येईल.

कम्युनिस्ट पक्षाप्रमाणें समाजवादी पक्ष जहालवादाचा आणि सशस्त्र क्रान्तीचा पुरस्कार करीत नाहीं. प्राप्त परिस्थितींत सशस्त्र क्रांतीची भाषा करणें आणि त्याची अंमलबजावणी करण्याचा आदेश देणें हें केवळ पोरकटपणाचेच नव्हे तर क्रान्तिविरोधीदेखील आहे असें समाजवादी मानतात. जनतेंत आपल्या ध्येयाचा प्रचार करून आणि जनतेची संघटना उभारून तिचा पाठिंबा मिळविणें हें आजचें पहिलें आणि महत्त्वाचें कार्य आहे. त्यासाठीं निरनिराळ्या कार्यक्रमाचा अवलंब करावा लागतो. निवडणुकी लढविण्यापासून थेट संप-सत्याग्रहापर्यंत सर्व लोकशाही साधनें वापरूनच हा पाठिंबा मिळवितां येईल. समाजवादी पक्षाची ही भूमिका तरुण वर्गाला पुरेशी आकर्षक वाटली नाहीं तर तें स्वाभाविकच आहे. क्रान्ति म्हटली म्हणजे हिंसा करूनच करतां येते अशी एक भोळी समजूत लोकांच्या मनांत दृढमूल होऊन बसली आहे. सशस्त्र क्रान्ति अपरिहार्यच झाली तरी जनतेच्या पाठींब्यावांचून तो होऊं शकत नाहीं. किंबहुना लोकमताचा पाठिंबा नसतांना मूठभर लोकांनीं केलेलें हिंसात्मक प्रयत्न प्रतिक्रांतिकारी लोकांचें हात बळकट करण्यास कारणीभूत होतात. अशा परिस्थितींत प्रथम जनतेचा पाठिंबा मिळविणें हेंच महत्वाचें कार्य होऊन बसतें. मूठभर लोकांनीं आत्मसमर्पण केलें तर त्यामुळें त्या हुतात्म्यांच्याबद्दल जनतेंत प्रेम निर्माण होईल आणि ज्या पक्षाचें लोक तसें करतील तो पक्ष

लोकप्रिय होईल असें आडाखे बांधून हिंसावादाचा पुरस्कार करणें आपल्या ध्येयाच्या दृष्टीनें हितावह नाहीं. जनतेला पुढाऱ्याबद्दल केवळ प्रेम असून मागणार नाहीं. पुढारी ज्या ध्येयाचा पुरस्कार करतात तें ध्येय मूर्त स्वरूपाला आणण्यासाठीं स्वयंप्रेरणेनें काम करण्याचा उत्साह जनतेंत निर्माण झाला पाहिजे. क्रान्ति म्हणजे जुन्या समाजव्यवस्थेचा विध्वंस एवढाच अर्थ करून भागणार नाहीं. विध्वंसाहूनहि अधिक महत्त्वाचें रचनात्मक कार्य आहे. तें होईल तरच खऱ्या अर्थानें समाजक्रान्ति झाली असें म्हणतां येईल. म्हणून आजच्या परिस्थितींत जनतेचें विधायक कर्तृत्व जेणेंकरून वाढीस लागेल अशा कार्यावरच अधिक भर दिला पाहिजे फांसावर जाणें म्हणजेच मोठा त्याग नव्हें. जनतेची विधायक शक्ति जोपासण्यासाठीं प्रत्यहि अणुरेणूनें झिजत राहाणें आणि मिशनरी वृत्तीनें कार्य करणें हा देखील महान त्याग आहे. प्राप्त परिस्थितींत शांततेच्या आणि लोकशाही मार्गानेंच समाजक्रान्ति करूं अशी ईर्षा बाळगणें हाच शंभर नंबरी क्रान्तिवाद आहे.

या विधायक कार्यासाठीं मिशनरी वृत्तीचें तरूण कसें मिळवावें याचा विचार करणें महत्त्वाचें आहे. स्वातंत्र्यपूर्वकाळीं प्रत्यक्ष प्रतिकाराच्या लढ्यात भाग घेऊन ज्यांचा ध्येयवाद प्रखर झाला असें कार्यकर्ते राष्ट्रीय चळवळीला मिळत. आतां उठल्या सुटल्या असें लढे करून त्यांतून कार्यकर्ते मिळतील हें संभवनीय नाहीं. लढा केला तरी केवळ लढा म्हणून तरूण त्यांत येणार नाहींत. कम्युनिस्ट लोक कामगार-संघटनांत लढाऊ वृत्तीच्या नांवाखालीं चढाऊ धोरण ठेवून पक्षाला कार्यकर्ते मिळवतात. संप यशस्वी होवो अगर न होवो त्यांतून कांहीं कार्यकर्ते त्यांना मिळत असत. लोकशाही समाजवादाचा पुरस्कार करतांना कामगार चळवळींत पक्षाला कार्यकर्ते किती मिळतात यापेक्षां कामगारांचें नफानुकसान कशांत आहे याचाच प्रामुख्यानें विचार करावयास पाहिजे. पूर्वीसारखें आतां संपहि सहजासहजीं यशस्वी होत नाहींत. पूर्वी ब्रिटिशांविरुद्ध आपला लढा असल्यामुळें कामगारांच्या संपांत जनतेची सहानुभूति आपोआप

मिळे. परंतु आतां तें शक्य नाहीं. सारांश संप–सत्याग्रहांतून कार्यकर्ते निर्माण होण्याची शक्यता आतां कमी झाली आहे.

मग हें कार्यकर्ते कोठून मिळवावयाचें ? त्या दृष्टीनें तरुणांच्या संघटनेचें महत्त्व विशेष आहे. समाजवादी युवक सभा अगर तत्सम तरुणांच्या संस्था जर आपण जोपासल्या नाहींत तर नवीन कार्यकर्ते मिळणार नाहींत आणि लोकशाही समाजवादाचें आपलें स्वप्न हवेंतच राहील. लहान मुलांमुलींना आणि युवकयुवतींना संघटित करून त्यांच्यावर संस्कार केले पाहिजेत. नवसमाज निर्मितीसाठीं लढाऊ त्याचप्रमाणें विधायक कार्य करण्याची स्फूर्ति त्यांना होईल अशा प्रकारें त्यांचीं मनें घडविलीं पाहिजेत. केवळ व्याख्यानें देऊन हें उद्दिष्ट साध्य होणार नाहीं. सामान्यतः मनुष्य जशा प्रकारचें काम करतो तशा प्रकारची त्याच्या मनाची घडण होत असते. तरुण पिढीनें सेवाभावी आणि समाजनिष्ठ व्हावें असें वाटत असेल तर लहानपणा-पासून त्यांच्याकडून जनसेवेची कामें करून घेतली पाहिजेत. ज्या सामाजिक समतेचा आपण आग्रह धरतो ती सामाजिक समता प्रत्यक्ष आचरणांत आणण्यावर आपला भर असला पाहिज. तसें होईल तरच नवसमाजासाठीं लागणारें आदर्श नागरिक निर्माण होतील. तरुणांच्या संघटनांमार्फत आपण जनतेंत विधायक कार्याबद्दल आस्था उत्पन्न केली पाहिजे. गटागटांनीं तरूण मंडळी खेड्यापाड्यांत जाऊन दिवाबत्ती, रस्तें सफाई, वाचनालयें, साक्षरताप्रसार, व्यायामशाळा इत्यादि बाबतींत आजच्या परिस्थितींतहि काम करतां येणें शक्य आहे तें आपल्या उदाहरणानें दाखवितील तर फार मोठें कार्य होणार आहे. आजचें निष्क्रियतेचें वातावरण बदलण्याची शक्ति तरुणांच्यांतच आहे. मात्र त्यांनीं नव्या ध्येयवादानें प्रेरित होऊन कार्य करण्यास सुरवात केली पाहिजे. दुसरें काय करतात याचा विचार न करतां आपणच आपल्या तत्वानुसार आचरण करण्यास सुरवात केली तर दुसरें लोकहि आपल्या मागें येतील अशा श्रद्धेनें कार्यारंभ केला पाहिजे. ध्येयाकांक्षा म्हणजच तारुण्य आणि ध्येयहीनता म्हणजे वार्धक्य हें तरुणांचें ब्रीद असावें.

◆ ◆ ◆

प्रजासमाजवादी पक्षाचें जीवित-कार्य

लेखनकाल : जुलै १९६२

गेल्या सार्वत्रिक व जिल्हापरिषदांच्या निवडणुकांमध्यें प्रजासमाजवादी पक्षाला अपेक्षित यश मिळालें नाहीं. या गोष्टीचा परिणाम पक्षांतील कार्यकर्त्यांवर झाला आहे. कॉंग्रेस व प्र. स. पक्ष वेगळे हवेत कीं नकोत ? आपल्या दोन तपांच्या कार्याला फळ कां येत नाहीं ? पर्यायी पक्ष म्हणून आपण वाढूं शकतों का ? असें नाना प्रश्न कार्यकर्त्यांना विचारलें जात आहेत. या प्रश्नांचीं सोडवणूक म्हणून दोन मार्ग सुचवण्यांत येत असतात.

(१) प्रजासमाजवादी पक्ष स्वखुषीनें विसर्जित करावा व ज्यांना जिकडे जावयाचें असेल तिकडे जाण्याचा मार्ग मोकळा करून द्यावा. मानवेंद्रनाथ रॉय यांच्या पक्षानें व्यवहारतः हाच मार्ग स्वीकारला होता. पक्षाची वाढ होत नसतांना उगाच हट्टानें तो चालूं ठेवण्यानें बऱ्याच कर्तृत्ववान् माणसांचीं जीवनें कुंठित होतात.

(२) पक्षानें कॉंग्रेसमध्यें जाऊन समाजवादी विचारसरणीची जोपासना करावी. विद्यमान कॉंग्रेस ही पूर्णतया समाजवादी झालेली नाहीं, ती एक राष्ट्रीय आघाडी आहे. त्यांत समाजवादाला प्रतिकूल अशाहि शक्ति आहेत. आपण आंत गेल्यानें समाजवादी शक्तींना मजबूत करण्याचें कार्य करतां येईल आणि समाजवादी समाजरचना निर्माण करण्याच्या कार्यांत कांहींतरी भरीव कामगिरी करतां येईल.

पक्ष विसर्जित करणें अगर पक्षानें सामुदायिक निर्णय घेऊन कॉंग्रेसमध्यें प्रवेश करणें या दोन सूचनांचें नि:पक्षपाती आणि वस्तुनिष्ठ भूमिकेवरून परीक्षण केलें पाहिजे. पलायनवाद अथवा संधिसाधुपणा म्हणून त्यांची वासलात लावणें योग्य होणार नाहीं. जे लोक अशी भूमिका मांडीत आहेत, त्यांच्यापैकीं कित्येकांनीं आजतागायत प्रजासमाजवादी पक्षासाठीं पुष्कळच खस्ता खाल्ल्या आहेत आणि त्यागहि केला आहे. अशांची भूमिका समजून घेऊन अन्य पर्याय असल्यास तो त्यांना पटवून देण्याचा यथाशक्ति प्रयत्न केला पाहिजे.

जातिधर्मनिरपेक्ष आणि वर्गरहित नवसमाजरचना, हें आमचें साध्य होतें व आहे त्या समाजांत जन्मानें कोणी उच्च नसेल अथवा नीचहि समजला जाणार नाहीं. कोणी एका विशिष्ट धर्माचा म्हणून त्याला कमी अधिकार, असें होणार नाहीं. धनवान म्हणून अधिक चांगली संधि आणि गरीब म्हणून संधि नाहीं अशी अवस्था त्या समाजांत राहणार नाहीं. जन्मानें येणारी उच्चनीचता नष्ट केली तरी भांडवलदारी औद्योगिक क्रांतींतून येणारी वर्गीय विषमता निर्माण होण्याचा धोका राहतोच. म्हणून वर्गविरहित समाजवादी समाजरचनेचें ध्येय आपण पुढें ठेवलें आणि वर्गविग्रहानें बिचकून न जातां पिळल्या जाणाऱ्या वर्गाची संघटना करून शोषण करणाऱ्या वर्गाला निष्प्रभ करून त्यांच्या हातीं सत्ता जाणार नाहीं अशी खटपट सुरू केली. साम्राज्यविरोधी स्वातंत्र्यवादी आंदोलनांत सक्रिय भाग घेत असतांना या विचारसरणीवर भर देऊन जन-जागृति आणि संघटन करण्यासाठीं कॉंग्रेस समाजवादी पक्ष स्थापन केला. कॉंग्रेस संघटनेवर गांधीजींच्या विचारसरणीचा प्रभाव होता. समाजवादी विचार-सरणीशीं गांधीजींचें कित्येक विचार आणि श्रद्धा आम्हांला विसंगत वाटल्या. जुनी समाजरचना टिकून राहण्यास त्यांच्या विचारसरणीमुळें अप्रत्यक्षपणें मदत होते असें आम्हांला वाटलें. अहिंसेचा त्या वेळीं निष्ठा म्हणून आम्हीं स्वीकार

केला नाहीं, धोरण म्हणून स्वीकार केला होता. मानवी हत्त्या करावयाची नाहीं इतक्या मर्यादेपर्यंत आम्हीं त्या तत्त्वाचा अंगीकार केला होता. म्हणूनच १९४२ सालीं भूमिगत राहून लढा करण्यांत आम्हांला कांहीं पाप वाटलें नाहीं.

राष्ट्रीय आंदोलनामध्यें ज्या लोकांनीं भाग घेतला अथवा सक्रिय साहाय्य केलें ते सर्वच कांहीं नैष्ठिक गांधीवादी नव्हते. ते स्वतःला गांधीवादी म्हणवीत असले तरी त्यांच्यापैकीं बहुसंख्य लोकांनीं गांधीजींच्या मार्गाचा केवळ धोरण म्हणूनच स्वीकार केलेला होता. कारण गांधीजींचें नेतृत्व राष्ट्रीय स्वातंत्र्य मिळवून घेण्याच्या दृष्टीनें उपयुक्त आहे असें त्यांना वाटत होतें. राष्ट्राची स्वातंत्र्याकांक्षा शांततेच्या मार्गानें आपण पुरी करूं शकलों तर जीवनमार्ग म्हणून आपल्या विचारसरणीचा अंगीकार जनतेकडून केला जाईल, असें गांधीजींना वाटत होतें. समाजवादी विचारसरणीच्या लोकांची तीच आकांक्षा होती. पण प्रत्यक्षामध्यें तसें कांहीं घडलें नाहीं. देश स्वतंत्र झाला आणि देशनिर्मितीच्या कार्यामध्यें भांडवलदार वर्गाचें प्रस्थच अधिक वाढलें. त्यांच्याच दडपणामुळें समाजवाद्यांना काँग्रेसमध्यें राहणें अशक्य करण्याचा निर्णय झाला आतां काँग्रेस गांधीवादी नाहीं, तर समाजवादी म्हणवून घेत आहे! परंतु स्वातंत्र्यपूर्व काळच्या काँग्रेसमध्यें जशी समाजवादी विचारसरणी ही मुख्य प्रेरक शक्ति नव्हती, त्याचप्रमाणें आजच्या काँग्रेसमध्यें समाजवादी विचारसरणी ही महत्त्वाची प्रेरणा आहे असें वाटत नाहीं स्वातंत्र्य लढ्यांच्या वेळीं गांधीवादाचा आणि काँग्रेसचा जितका संबंध होता, तितकाच आजहि समाजवादाचा आणि काँग्रेसचा आहे.

आजच्या काँग्रेसचें स्वरूप हें एका ऐसपैस राष्ट्रीय आघाडीचें आहे. पूर्वीच्या काँग्रेसमध्यें पुंजीवादी शक्तींचा जितका जोर होता त्यापेक्षां आज तो अधिक वाढला आहे. राष्ट्र-उभारणीच्या कामीं संमिश्र अर्थव्यवस्थेचा काँग्रेसनें अंगीकार केला आहे तो उगाच नव्हे. भांडवलशाहीच्या विकासासाठीं ज्या सर्वसाधारण

आर्थिक पार्श्वरचनेची आवश्यकता असते ती रचना भारत सरकारलाच उभी करावी लागत आहे. राष्ट्राची पत वापरूनच उभारणी करावी लागत आहे. त्याचा भार सर्वसामान्य जनतेवर पडत आहे. काँग्रेसच्या पुढाऱ्यांनी किंवा सांगितलें तरी त्यांना समाजवादी मूल्यांनुसार समाजाचे आर्थिक व्यवहार हाकतां येत नाहींत. झपाट्यानें औद्योगिक प्रगति करण्यासाठीं त्यांना गोरगरिबांचें शोषण करावें लागत आहे. फार झालें तर ' सरकारी भांडवलशाही ' असें त्याला म्हणावें. पण त्यामुळें आज काँग्रेसमध्यें पूर्वीपेक्षांहि अधिक भांडवलदार झाले आहेत. औद्योगिक प्रगतीला अग्रक्रम देण्याबाबत काँग्रेसमधील तथाकथित पुरोगामी व भांडवलदार यांचें एकमत आहे त्यालाच ते समाजवाद म्हणत आहेत पण खरें म्हणजे काँग्रेसनें समाजवाद नव्हे, केवळ ' नेहरूंचें नेतृत्व ' स्वीकारलें आहे. हा समाजवाद नव्हे, ही व्यक्तिपूजेची, व्यक्तिमहात्म्याची वृत्ति आहे. काँग्रेसची आजची परिस्थिति व घडण पाहतां समाजवादी समाजरचना हें त्यांच्या दृष्टीनें गौण कार्य आहे. फारतर कांहीं पुढाऱ्यांच्या मनांत तें असेल. काँग्रेसचें प्रधानकार्य औद्योगिक प्रगति आहे. प्रधान-गौण यांच्यांत विवेक करून प्रधान गोष्ट बाजूला सारून गौण गोष्टीकडे वळण्याच्या ह्या वृत्तीलाच लेनिननें संधिसाधुपणा (ऑपॉर्च्युनिझम) असें म्हटलें आहे.

मग प्रजासमाजवादी पक्ष आहे कशासाठीं ? त्यालाहि सत्ता हवी, परंतु ती इष्ट तें घडविण्यासाठीं हवी आहे. तें कार्य काँग्रेसमध्यें जाऊन होणार नाहीं. सत्तासंपादन हा गौण हेतु आहे. आपणांस अभिप्रेत असणारी नवसमाजनिर्मिति हा मुख्य हेतु आहे. काँग्रेसमध्यें समाजवादी मूल्यांबाबत आग्रह धरणारी कांहीं मंडळी असतीलहि, परंतु आपण आंत जाऊन त्यांचें हात बळकट होऊं शकणार नाहींत. ज्ञातिनिष्ठांचा जो संघर्ष चालू आहे, त्यामध्यें काँग्रेसवाले या ना त्या पक्षाची बाजू घेण्यास मागेंपुढें पाहात नाहींत. हिंदु-मुस्लीम ऐक्याच्या पुरस्कर्त्यानें मी हिंदु, मी मुस्लीम म्हणून मतें मागितलीं तर हिंदु-मुस्लीम ऐक्य कसें होणार ? ज्या शक्तींच्या साहाय्यानें काँग्रेसवाले

सत्तेवर येतांना, त्या शक्तींचा बीमोड त्यांच्याकडून होईल अशी अपेक्षा करणें फोल आहे. अतिपैशानें पैशांचा वापर मोठ्या प्रमाणावर केला म्हणून प्र. स. पक्ष उमेदवार पडले. लोक म्हणाले, 'पैशांचा ॲटम बॉंब तुमच्याकडे नाहीं, मग तुमचा काय पाड लागणार?' पण मी भांडवलदारांच्या साहाय्यानें निवडून आलों तर त्यांच्या विरुद्ध कसा लढा देणार? ज्या स्टुलावरून वर चढणार त्याला लाथ मारतां येणार नाहीं. जे लोक खऱ्या अर्थानें जाति-भेदातीत संघटना करण्याचा प्रयत्न करतील त्यांनी झटपट यश मिळणार नाहीं. ते विचार एकदम समाजामध्यें रुजणार नाहींत रुजले तरी मूळ धरणार नाहींत आणि आजच्या पद्धतीच्या निवडणुकींत त्यांचा सहजासहजीं टिकाव लागणार नाहीं

सत्ताधारी लोकांच्या हातांत सर्व साधनें व संपत्ति असणार. त्यांची त्या बाबतींत बरोबरी समाजवादी विचारसरणीचा आणि विशुद्ध लोकशाहीचा पुरस्कार व आचार करणारा पक्ष करूं शकत नाहीं. जी सामाजिक समतेची आणि मानव्याची भावना तो निर्माण करूं पाहात आहे व जी विचारसरणी त्यांना रूढ करावयाची आहे, ती भावना व विचारसरणी प्रभावी होऊन तिच्या जोरावर त्यांना निवडणुकीमध्यें यश मिळालें तरच त्यांना अभिप्रेत अशी समाजव्यवस्था निर्माण करणें शक्य आहे. ही भावना जोंवर प्रभावी झालेली नाहीं तोंवर निवडणुकींमध्यें मोठें यश मिळणें असंभव आहे राजकीय पक्ष हा सत्तासंपादनासाठींच असतो हें खरें, परंतु ती मिळवतांना साध्यसाधनांचाहि विवेक करावाच लागेल. जातीयवादी भावनांच्या जोरावर निवडणूक जिंकून जातिवर्णधर्मातीत समाजरचना कशी निर्माण करतां येईल? 'निवडणुकीतील यश' एवढाच निकष सर्व गोष्टीना लावून चालणार नाहीं. प्रजा समाजवादी पक्षाची विचारसरणी आणि सामाजिक न्यायाची प्रेरणा जिवंत टेवूनच निवडणुकींत यश मिळवावयाचें आहे, सत्ता हस्तगत करायची आहे. कांहींतरी करून सत्ता मिळाविणें हें कांहीं उद्दिष्ट नाहीं. मनुष्य एखादी

कंपनी काढतो तेव्हां नफ्याची प्रेरणा असते. परंतु पक्ष काढतो तेव्हा त्यामागें कांहींतरी 'ध्येयवाद' असतो, असावा लागतो. काँग्रेसमध्यें आज बहुसंख्य कार्यकर्त्यांमध्यें फक्त सत्तेसाठीं चढाओढ दिसते. त्यासाठीं संधिसाधुपणा करण्यांत येतो. पक्षान्तरें केलीं जातात. अशा काँग्रेसमध्यें जाऊन देशाची कोणती सेवा करतां येईल ? निवडणुकींतील पराजयानें एखादा राजकीय पक्ष नष्ट होऊं शकतो, हें मानण्यास मी तयार नाहीं पेरणें हें आपलें काम आहे. त्यासाठीं उत्तम प्रकारचें बीज जतन करून ठेवणें हें आपलें कर्तव्य आहे. तें आपण केलेंच पाहिजे.

आपल्याला जर परिणामकारक राजकारण करतां येत नसेल तर पक्ष बरखास्त करावा अथवा काँग्रेसमध्यें जावें, असा जो युक्तिवाद केला जात आहे, तो माझ्या दृष्टीनें भ्रामक आहे. केवळ निवडणुका जिंकल्या म्हणजे परिणामकारक राजकारण झालें काय ? निवडणुकीपूर्वी ज्या काँग्रेस राजवटीला आपण 'सरकारी भांडवलशाही' म्हणून संबोधलें ती निवडणुकींत यश मिळालें म्हणून लगेच समाजवादी झाली काय ? जनतेनें त्यांना मतें दिलीं म्हणून त्यांचा समाजवाद खरा, असें आपण म्हणणार आहों काय ? परिणामकारक राजकारणाचा असला विचार ही एक आत्मवंचना आहे. आमचा पराभव झाला असला तर तो आपण उमद्या मनानें कबूल करूं. पण म्हणून काय आमचे विचार खोटे ठरले ? आम्हीं पुरेशीं शक्ति संघटित केली नाही हें खरें आहे, पण मग पुन्हां प्रयत्न केला पाहिजे. ज्या भावना निर्माण कराव्याच्या, जी विचारसरणी रुजवायची ती रुजेपर्यंत आम्हांला प्रयत्न करीत राहिलेंच पाहिजे. त्यांत आम्ही नष्ट झालों तरी तें श्रेयस्कर ठरेल, परंतु आपले विचार सोडून आजच्या ह्या काँग्रसला शरण जाणें म्हणजे लोकशाहीच्याच पराजय मान्य करण्यासारखें आहे. सत्तेच्या वापरानें; आणि अन्य निषिद्ध साधनांनीं इतर पक्षांतील कार्यकर्त्यांना नामोहरम करण्याचा प्रयत्न कँग्रेस करीत आहे. त्याला शरण जाणें म्हणजे एका अर्थानें हुकुमशाहीचाच जय होय.

आज कित्येक ठिकाणीं जबाबदार कार्यकर्त्यांना अडचणींत गांठून ' तुमची सोय लावूं ' असें आश्वासन कॉंग्रेसची मंडळी देत आहेत. हिटलरनें जर्मनींतील बेकाराचा प्रश्न कसा सोडविला? बेकार आला कीं, त्याला ' खाकी गणवेश ' चढवीत. या मार्गानें कॉंग्रेसला सर्व बेकारांचा प्रश्न सोडवितां येणार नाहीं. परंतु राजकीय बेकार आला कीं, त्याला खादीची झूल घालण्याचा कॉंग्रसचा मार्ग आहे.

एका मतदारसंघांत चक्की व्याख्यानांत प्रजा समाजवादी पक्षाच्या उमेदवारानें आपली भूमिका उत्तम मांडली व कॉंग्रसवर बिनतोड टीकास्त्र सोडलें. कॉंग्रेस उमेदवार युक्तिवादाच्या भानगडींत पडलाच नाहीं, त्यानें सांगितलें, " हे एक चांगले गृहस्थ आहेत हें त्यांच्या ह्या व्याख्यानावरून आपल्याला दिसलेंच आहे. पण ते कॉंग्रसमध्यें नाहींत. ह्याना पाडा ' म्हणजे ते कॉंग्रेसमध्यें येतील! " तुमची रसद तोडायची म्हणजे तुम्ही कॉंग्रेसमध्यें याल, ही या मागची भूमिका! स्वतंत्र निष्ठा ठेवून जगां येणार नाहीं, आमची निष्ठा स्वीकारा म्हणजे जगाल, अशी ही विचारसरणी ती घाणेरडी आहे. याला शरण गेलों तर हुकुमशाही येईल.

सत्तेच्या जोरावर कॉंग्रेस जरी आर्थिक विकास घडवून आणीत असली तरी नैतिक दृष्ट्या पाहिल्यास ज्या मूल्यांची जोपासना व्हावयास पाहिजे त्यांची उपेक्षाच नव्हे तर विटंबना होतांनाच आज दिसत आहे. संधिसाधुपणा, लांचलुचपतीचे व्यवहार, असत्य आचरण, सत्ताभिलाषा दिवसेंदिवस वाढत आहे. सत्ता आणि संपत्ति असली म्हणजे झालें, मग ती कोणत्याहि मार्गानें आणि साधनांनीं मिळविली तरी हरकत नाहीं, अशी प्रवृत्ति समाजांत दृढ होऊं पाहात आहे. नव्या समाजरचनेसाठीं ज्यांची नितांत आवश्यकता आहे अशा नैतिक मूल्यांची आणि ध्येयवादाची प्रेरणा उत्तरोत्तर तरुण पिढीच्या मनात क्षीण होत असतांना दिसते. सामाजिक कर्तव्याची जाणीव दिसत

नाहीं. दुसऱ्याच्या हक्कांबद्दल बेपर्वाई तर पदोपदीं पहावयास मिळते. माझा स्वार्थ साधला म्हणजे झालें, मग त्याकरतां दुसऱ्यांच्या हक्कांचा बळी पडला तरी पर्वा नाहीं, अशी वृत्ति दिसून येते. अन्यायाची चोड आजच्या तरुण पिढीमध्यें कमी दिसते. स्वतःवर अन्याय झाला म्हणजे आपण रागावतों, परंतु दुसऱ्यावर झाला तर गप्प बसतो ! ही परिस्थिति बदलायचें काम प्रजा समाजवादी पक्षाला करावयाचें आहे. सत्ताधाऱ्यांकडून तें होणार नाहीं.

नवीन विचारांची पेरणी करणें आणि सामाजिक न्यायासाठीं अन्यायाचा प्रतिकार करण्याची भावना वाढीस लावणें हीं कामें प्रजा समाजवाद्यांनीं केलीं पाहिजेत. निवडणुकी येतील आणि जातील, त्यामध्यें आपल्याला यश मिळेल किंवा क्वचित् मिळणारहि नाहीं. परंतु तें आपलें एकच काम नाहीं. नव्या समाजाची कल्पना जनमानसामध्यें रुजविणें आणि त्यासाठीं प्रयत्नशील राहाण्यास त्यांना प्रवृत्त करणें, हें आपलें महत्त्वाचें काम आहे. तें काम करण्यासाठीं प्रजासमाजवादी पक्षाचा जन्म झाला आणि तें कार्य पूर्ण होईपर्यंत तो चालूच राहाणार आहे. म्हणून इतःपर काँग्रेसनें आतां समाजवाद स्वीकारला आहे, म्हणून आपला पक्ष बरखास्त करावा, अगर काँग्रेसमधील 'समाजवाद्यांचें' हात बळकट करावयास काँग्रेसमध्यें जावें, ही चर्चा थांबली पाहिजे. आंतील समाजवाद्यांचें हातच बळकट करावयाचे असतील तर तें काम बाहेर राहून आपल्या पक्षातर्फे समाजवादी विचारांचा प्रचार व त्यासाठीं आचार करूनच अधिक प्रभावीपणें करतां येईल; काँग्रेसमध्यें जाऊन नव्हे आपल्याबरोबर येण्यास जे तयार असतील त्यांना बरोबर घेऊन आपल्या मार्गावर आपण वाटचाल केली पाहिजे.

◆ ◆ ◆


३. काँग्रेस :

'इन्किलाब जिंदाबाद, थोडे दिनमें काँग्रेसराज' या घोषणा स्वातंत्र्यापूर्वी सारख्या दुमदुमत होत्या. त्यानंतर काँग्रेसचं राज्य आलं पण काँग्रेसचे राज्य म्हणजे सुराज्य होईल, गोरगरिबांचं राज्य होईल ही लोकांची अपेक्षा दिवसेंदिवस फोल ठरूं लागली. काँग्रेस जोंपर्यंत परकीय सत्तेविरुद्ध झगडत होती तोंवर ती एक राष्ट्रीय शक्ति होती पण स्वातंत्र्यानंतर तिचा एक पक्ष झाला आणि तिच्या विरोधांत अनेक पक्षहि तेव्हांपासून उभे राहिले आहेत. खुद्द काँग्रेसमध्येंहि तेव्हां मतांमतांचा गलबला नव्हता असें नाहीं; पण दरवेळीं त्यांतील सुजाण प्रवृत्तींनीं उचल खाल्ली. काँग्रेसला पुरोगामी विचारसरणी त्यामुळेंच अप्रतिहत लाभली. तीच काँग्रेस आतां समाजवादाच्या भ्रामक कल्पना घेऊन उभी आहे असें अनेकजण अनेक वर्षं म्हणत आहेत. काँग्रेस अशी प्रतिगामी होईल कां ? झाल्यास काय होईल याची ज्या वेळीं कुणाला स्वप्नेंहि न पडावींत त्या वेळेला म्हणजे १९३८ सालींच एसेमनीं त्यावर विचारहि केला होता व किर्लोस्करमध्यें लेखरुपानें तो मांडला होता आणि ती प्रतिगामी झाल्यास तींत त्यांना स्थान राहाणार नाहीं हा उघड गोष्ट सांगितली होती. काँग्रेसच्या नांवावर प्रेम करण्याऐवजीं त्याशीं निगडीत असलेल्या पुरोगामी विचारसरणीवर त्यांचे प्रेम होते. काँग्रेसपेक्षां तिचीं तत्त्वें मोठी आहेत हे परखडपणें सांगायला आजहि धैर्य लागतें. तें त्या वेळीं सुमारें सव्वीस वर्षांपूर्वी दाखवण्यांत त्यांनी धैर्याची परिसीमा दाखवली होती. ती वेळ आली आणि त्यांच्यासारख्या अनेक ध्येयवेड्यांना काँग्रेस-बाहेर अनिच्छया पडावें लागले. काँग्रेसचा कायाकल्प होईल कां ? हा प्रश्न स्वतःला विचारल्यावर त्यांना नकारार्थी उत्तरच द्यावें लागले त्याचा हा परिणाम होता. काँग्रेसचा लढाऊ कार्यक्रम संपल्यावर तिचें जीवनकार्य

सरलें तेव्हां तिचे विसर्जन करा असें गांधीजींनाहि म्हणूनच म्हणावं लागलं होतं. गांधीजींच्या सूचनेप्रमाणें श्री. नरेंद्र देव किंवा जयप्रकाशजी जर कॉंग्रेसचें अध्यक्ष झाले असतें तर आज वेगळें चित्र दिसलें असतें पण कॉंग्रेसला नवीन आकार देण्यासाठीं, गांधीजी दुर्दैवानें फार काळ आपल्यांत राहू शकलें नाहींत आणि कॉंग्रेसमधला एक निकोप गट बाहेर पडला, एकाकी झाला. 'कॉंग्रेस' या नांवाची जादू खेड्यापाड्यांत अजूनहि पडूं शकतें. जागृत जनतेच्या जनशिक्षणांत जीव ओतणें म्हणजे आपल्या पायावर धोंडा पाडून घेणें हें आज तिला माहीत आहे म्हणून तें टाळूनच कॉंग्रेसच आज या भारलेल्या किसान-दलितांना तसेंच भारलेले ठेवूं इच्छित आहे.

कॉंग्रेसमध्यें आयुष्यांतील उत्कृष्ट वर्षांचा ज्यांनीं अठरावीस वर्षं होम केला त्यांनीं तेव्हांहि व नंतरहि केलेली कॉंग्रेसची 'क्ष-किरण परीक्षा' राजकीय इतिहासाचा एक वाचनीय भाग ठरावा.

◆ ◆ ◆



काँग्रेस
प्रतिगामी झाली तर ?

लेखनकाल : जून १९३८

आयुष्यामध्यें एक काल असा होता कीं, ज्या वेळीं 'काँग्रेस प्रतिगामी आहे' असें स्पष्ट विधान करणें तर दूरच राहील, पण तशी नुसती शंका जरा कोणी प्रदर्शित केली तर माझ्या अंगाचा तिळपापड होई. सार्वजनिक आयुष्यांतील तो उषःकाल होता. प्रीतीच्या पहिल्या उन्माद्भरामध्यें दंग असलेल्या एखाद्या तरुणाच्या प्रियेच्या एकनिष्ठेबद्दल कोणी शंका घेतली तर त्याची जी अवस्था होईल, येट तशीच माझी त्या वेळीं होत असे. तो उन्माद म्हणजे एक और अनुभव असतो जगांतील सर्व वस्तुजात, नातींगोतीं, स्नेहसंबंध सर्व कांहीं त्या नव्या अनुभवापुढ अगदीं कस्पटासमान वाटतात. उन्मादाच्या भरांत सर्व संबंध एक प्रकारच्या बेपर्वाईनं तोडण्याला आपण तयार होतो. पण प्रेमाभिसाटाची ही उत्कटता चिरकाल टिकणारी नसते. परिस्थिति सारखी बदलत असते. आणि आंधळं प्रेमदेखील हळूंहळूं डोळस होऊं लागतं.

थोडासा काळ लोटला आणि वर प्रदर्शित केलेली काँग्रेसबद्दलची शंका घेणाऱ्यांच्या विचारसरणीचादेखील सहिष्णुतेनं विचार करण्याची हळूहळूं मला संवय झाली. प्रयम प्रथम ही गोष्ट अवघड जाई, पण अभ्यासानं त्या गोष्टीचा माझ्या मनाला सराव पडला. इतकंच काय, पण हळुंहळुं परिस्थितींत इतका फरक पडला कीं, प्रसंगविशेषीं अशी शंका माझ्या मनांतहि डोकावूं लागली. आजची स्थिति तर फारच पालटली आहे. काँग्रेसच्या संघटनेमध्यें झपाट्यानें

फरक पडत आहे. नुसता फरकच नव्हे, तर एक मोठं स्थित्यंतरदेखील घडून येण्याचा संभव दिसूं लागला आहे. दुर्दैवानं जर होऊं नये तें झालं आणि कॉंग्रेस प्रतिगामी झाली, तर त्याचा परिणाम देशांतील असंख्य कार्यकर्त्यांच्या जीवनावर कशा प्रकारचा होईल याची नुसती कल्पनादेखील करवत नाहीं.

एकाद्या भाड्याच्या जागेंत जरी फार दिवस राहिलं तरी सोडतांना आपल्याला दुःख होतं. तुरुंगामध्यें दीर्घकालापर्यंत राहणाऱ्या कैद्यालादेखील तेथील स्नेही-सोबती सोडून बाहेर येतांना किंचित् वेदना होतात; दोन मित्रांमधील मैत्रीचें बंध तुटूं लागले तर कांहीं काल जीव नकोसा वाटतो. मग ज्या एका गोष्टीसाठीं आपण हें सर्व स्नेहसंबंध सोडून मोकळे झालों, ती गोष्टच सोडून द्यायची वेळ आली तर मनाची काय अवस्था होईल बरें ? कित्येक वर्षपर्यंत ज्या एका आधारावर मनाची उभारणी केली, तो आधारच सुटला तर काय होईल?

इमारतीचा पाया काढून घेतल्यावर ती खचावी त्याप्रमाणं मन खचणार नाहीं कां ? पत्याच्या बंगल्याप्रमाणें मनाची इमारत निमिषमात्रांत ढांसळून जमीन दोस्त होणार हें उघड आहे. पुन्हां एकदां चिकाटीनं पहिल्यापासून रचना करणं हें किती महाकर्म कठीण आहे हें ज्यांच्यावर असा प्रसंग आला असेल, तेंच जाणूं शकतील. ज्यांनीं कॉंग्रेसची आजपर्यंत अगदीं एकनिष्ठपणानं सेवा केली, तिजपायीं आपल्या सर्वस्वाची होळी केली, त्यांची मनःस्थिति अशा प्रसंगीं काय होईल याचा विचार करूं लागलं म्हणजे मति गुंग होऊन जाते.

अशा प्रकारच्या शंकेनें ग्रासल्यामुळें कॉंग्रेसमधील एकांतिक ध्येयवादी कार्यकर्ते त्यांच्या दृष्टीनं चुकीच्या अशा कॉंग्रेसच्या आजकालच्या धोरणावर टीका करूं लागले म्हणजे पुष्कळशा नव्या आणि जुन्या कॉंग्रेसभक्तांना त्यांचा राग येतो. पण त्या टीकेच्या मागें कोणत्या भावना आहेत, ती कशाच्या

पोटीं जन्माला आली आहे, याची त्यांना कल्पना नसते. या गोष्टीचा थोडासा जरी त्यांनीं विचार केला. तरी त्यांना आमच्याबद्दल सहानुभूति वाटल्यवाचून राहाणार नाहीं. त्यांचीं शंका खरी ठरली तर जे मानसिक क्लेश आणि वेदना पुः भोगाव्या लागतील, त्याच भेसूर चित्र त्याना भेडसावीत असतं. सर्व आधार तुटल्यामुळं जग शून्यवत् आणि जीवनयात्रा भीषण वाटूं लागते. माझ्या मनाला प्रथम ज्या दिवशीं या शकेनें ग्रासलं, त्या दिवसाची मला चांगली आठवण आहे त्यांतून पुन्हां एकवार मनाची उभारणी करतांना काय प्रयास पडले याची आठवण झाली म्हणजे मन अजूनहि अस्वस्थ होतं. असेंब्लीच्या निवडणुकींची ती दंगल होती. कॉंग्रेस आणि कॉंग्रेसविरोधी पक्ष यांच्यांतलं संबंध इतके दुरावलेले माझ्या आठवणींत नाहींत वातावरण अगदीं प्रक्षुब्ध होऊन प्रकरण अगदीं हातघाईवर आलं होतं. एकमेकांच्या सभा उधळण ही एक सामान्य गोष्ट असंच वाटूं लागलं होतं. त्या दिवशीं विरोधकांच्या अगदी बालेकिल्ल्यांत आम्हीं सभा घेतली होती. सभेला गर्दी बरीच होती. सभेला सुरुवात होऊन पहिल्या वक्त्याचं भाषण सुरू होतं न होतं तोंच एक मोठा थोरला दगड अध्यक्षांच्या टेबलावर येऊन आदळला! सभेंत गोंधळ माजला, शांतता होण्याचं चिन्ह दिसेना! सभा उधळली जाणं ही मोठी नामुष्कीची गोष्ट होती. नकळत मी पुढं सरसावलों आणि अत्यंत आवेशपूर्ण भाषण करण्यास सुरुवात केली. मीं म्हटलं,

'काय! एका दगडानं आपण गडबडून जाणार काय! शत्रूच्या लाठीमाराला आणि गोळीबारालादेखील ज्या कॉंग्रेसवाल्यांनीं तोंड दिलं, ते एका लहानशा दगडानं भिऊन जातील! हिंमत असेल तर दगड मारणारानं एकामागून एक दगडांचा पाऊस पाडावा आणि आमच्यांपैकीं कोणी जागचा हालतो का पाहावं! आमचे मुडदे पाडल्याखेरीज कॉंग्रेसची सभा मोडल्याचा आनंद त्याला मिळणार नाहीं.'

लोकांनीं उत्साहभरानं टाळ्या वाजवल्या, दगडहि थांबले आणि सुदैवानं सभा सुरळीतपणें पार पडली.

सभा संपवून आम्हीं घरीं जात होतों. सभेसंबंधींच बोलणीं चाललीं होतीं. सहज एका शंकेखोर मित्रानं मला विचारलं, 'काय रे, ज्या कॉंग्रेसकरितां स्वत:चा मुडदा पाडून घ्यायला तयार झाला आहेस, ती कॉंग्रेस उद्यां प्रतिगामी झाली तर ? '

तो प्रश्न त्यानं सहज विचारला होता. कदाचित् माझी गंमत करावी म्हणूनहि विचारला असेल. पण त्यानं सहज काढलेल्या शंकेनं माझ्या मनाला चांगलाच धक्का दिला ! रात्र फार झाली होती. मी घरीं गेलो आणि बिछान्यावर अंग टाकलं. वास्तविक पाहातां सभा जिंकल्याच्या समाधानामुळं मला चांगली झोप यायला पाहिजे होती; पण माझ्या मित्राच्या प्रश्नानं माझं मन अस्वस्थ झालं होतं. बिछान्यावर पडल्यापडल्या माझ्या मनांत विचारांचं चक्र सुरू झालं. झोंपेचा मागमूसहि राहिला नाहीं. मीं म्हटलं, 'खरंच तसं झालं तर माझी काय अवस्था होणार बरं ? ' माझ्या गतायुष्याचा चित्रपट माझ्या डोळ्यांपुढं दिसूं लागला कॉलेजमधें असतांना एका विद्याव्यासंगी जीवनाचं रम्य चित्र मीं रेखाटण्याला सुरवात केली होती; पण तें पुरं होण्यापूर्वीच मला त्यांत गोडी वाटेनाशी झाली आणि मीं सार्वजनिक जीवनांत पदार्पण केलं. त्यांतहि पर्यंकपंडितीकरण माझ्या स्वभावाला आवडलं नाहीं म्हणून चळवळीच्या ऐन धारेमधें मीं साहसानं उडी घेतली. 'विद्यार्थ्यांनीं चळवळींत भाग घ्यावा, तरुणांनीं चळवळींत पडावं ' असें शब्दप्रयोग एका मोठ्या पुढाऱ्यानं केलेले ऐकून माझ्याच्यानं राहावलं नाहीं; मी बोलावयास उठलों आणि म्हटलं, " राजकारणांत ' पडावं ' कसलं ? तरुणांनीं त्यामध्यें उडी घेतली पाहिजे. "

त्या धामधुमीच्या जीवनांत माझ्या मनाला समाधान वाटलं. पण त्यामुळें माझ्या आप्तेष्टांच्या अपेक्षांची मीं राखरांगोळी केली. रक्तामांसाचा संबंध

असलेली, एक वेळ प्रेमळपणानं हवं-नको करणारी माणसंच माझ्याशी त्रयस्था-प्रमाणं आणि तुटकपणानं वागूं लागलीं आणि मी बाह्यतः गृहस्थासारखं दिसणारं पण वस्तुतः फकिरासारखं जीवन घालवूं लागलों. एक वेळ अशीदेखील होती कीं, माझ्या वयस्क आईची भेट घेऊन चार जिवाभावाच्या गोष्टी करणंदेखील माझ्या राजकारणामुळं मला अशक्यप्राय होऊन बसलं होतं. तरीपण फकिरा-सारख्या धुंदीतच मी राहात होतों. एक प्रकारच्या अपूर्व उन्मादानं मला चेव आल्यासारखं झालं होतं. जीवनासंबंधींच्या ज्या कल्पनांनीं आणि वैयक्तिक महत्त्वाकांक्षांनीं माझ्या मनावर जादू टाकली होती, त्यांत मला मौज वाटे. त्यासाठीं हालअपेष्टा भोगण्यांत एक प्रकारचा 'रोमान्स' वाटे. नवीन विचारांनादेखील मद्यासारखी एक प्रकारची निशा असते असं म्हणतात, तें कांहीं खोटं नाहीं. माझ्यासारखेच ज्यांचे विचार आहेत अशा मित्रांच्या मेळाव्याच्या आधारावरच माझी मस्ती उभारलेली होती. 'नात्याचीं माणसं गेलीं तर गेलीं; या मित्रांचा आधार तरी आपल्याला शेवटपर्यंत लाभणार' अशा सुखस्वप्नांत मी होतों पण सत्याचा मार्ग सोपा नाहीं, कांटेरी आहे ही गोष्ट मला लवकरच कळून आली.

मतांमतांचा गलबला झाला; मैत्रीचं वातावरण अशुद्ध झालं; जीवनप्रवाह गढूळ झाला आणि आम्ही एकमेकांना पारखे झालों ! दोष कुणाचा तें सांगणं फार कठीण आहे. मीं मनाशीं खूप विचार केला, मनाचे सर्व कोपरें, एक वेळ नाहीं अनेक वेळ तपासून पाहिले. मला माझ्यामध्यें पुष्कळ दोष सांपडले. माझ्यांत दोष नाहींत असं मला कधींच वाटलं नाहीं. माझं मन समतोल नाहीं असं माझे मित्र मला म्हणत; पण माझं मन समतोल राहावं म्हणून माझ्या जीवनांत कुणीं काय प्रयत्न केले ? जाऊं दे, तोहि एक इतिहासच आहे. पण हें सर्व खरं असलं तरी मला माझा रस्ता चुकला आहे अस अजून पटलेलं नाहीं. माझे दोष गेले पाहिजेत असं मलाहि वाटतं; पण ते जाणार कसं ? शिवाय याच दोषामुळं माझं व त्याचं बिनसलं असं थोडंच होतं ? आणि एक वेळ

तसं असलं तरी मला ते दोष एकदम थोडेंच काढ़न टाकतां येणार आहेत ? ज्या जड शरीरावर मानवी मन अधिष्ठित आहे, त्याच्या अंगभूत गुणधर्मापासून मानवी मनाची पूर्णपणें सुटका कशी होणार ? ज्या परिस्थितींत तें जखडलेलं आहे, त्याच्या अटळ मर्यादा ओळखून आपण प्रयत्न करावयाचे आहेत. मनुष्यानं आपलं मानसिक जीवन कितीहि उदात्त आणि उच्चतर बनविण्याची महत्त्वाकांक्षा धरली, कितीहि उंचउंच भराऱ्या मारण्याचा यत्न केला, तरी एका विशिष्ट मर्यादेपलीकडे तो जाऊं शकत नाहीं आणि म्हणूनच आमच्या तावत्कालपर्यंतच्या स्पृहणीय स्नेहसंबंधाचा अंत झाला.

सारांश, त्या वेळीं मी जगामध्यें अगदीं एकाकी असल्याचं मला प्रतीत झालं. नवे स्नेहसंबंध निर्माण करण्याची पात्रता माझ्या अंगीं उरली नव्हती आणि तसं करण्याची माझी इच्छाहि नव्हती. आधार कोणाचा असेल तर माझ्या तत्त्वांचा आणि त्या तत्त्वांना प्रत्यक्षांत उतरविण्यास साधनीभूत झालेल्या कॉंग्रेसचाच होता.

पण आज एक नवीनच प्रश्न माझ्या सहकाऱ्यानं उपस्थित केला होता. कॉंग्रेस प्रतिगामी झाली तर मला कॉंग्रेसमध्यें स्थान राहणार नाहीं ही गोष्ट उघडच होती. मग माझ्या जीवनास आधार कोणाचा ? त्या स्थितींत घालवाव्या लागणाऱ्या माझ्या भावी जीवनाचं मेरूर दृश्य माझ्या डोळ्यांपुढं उभं राहिलं. ज्या एका दोराला पकडून मी जीवनाकाशांत मोठ्या मौजेनं हेलकावे खात होतों, तो दोरच कोणींतरी कापून टाकीत असल्याचा भास झाला. ज्या एका नावेच्या विश्वासावर जीवनाच्या अथांग सागरांत मी उडी घेतली, तिचेच फुटून तुकडे झाल्याचं चित्र माझ्या डोळ्यांना दिसूं लागलं. नुसत्या कल्पनेनंच माझ्या अंगावर काटा उभा राहिला ! पण इतक्यांत महात्मा गांधींच्या शूरास साजेल अशा एका वाक्याची मला आठवण झाली. 'सत्याच्या मागं लागलेल्या मनुष्यानं जीवनाच्या तुफानास तोंड देण्यास सिद्ध

असलंच पाहिजे आणि प्रसंग पडल्यास सख्ख्या भावांनीदेखील आपले जिव्हाळ्याचे संबंध निष्ठुरपणानं तोडून भिन्न भिन्न मार्गांचा अवलंब करावयास हवा.

अडचणीच्या वेळीं मदत केव्हां व कोठून होणार तें सांगतां येत नाहीं असं म्हणतात तें खोटं नाही. तुफान दर्यामध्यें नांव फुटलेल्या नावाड्याच्या मेसूर चित्रामुळंच मला गांधींच्या या वचनाची आठवण झाली. मनाला एकदम हुरूप आला. माझ्या भेकडपणाचं मला हंसूं आलं. मीं म्हटलं, 'खरंच, कॉंग्रेस प्रतिगामी झाली तर त्यांत एवढं घाबरण्यासारखं काय आहे? कॉंग्रेस या संस्थेमध्यें आपणाला स्थान राहिलं नाहीं म्हणून त्यांत एवढं घाबरण्यासारखं काय आहे? कॉंग्रेस या नांवावर का आपलं प्रेम आहे? आपल्या आकांक्षा कॉंग्रेसमार्फत फलद्रूप होतील म्हणूनच ना आपण तिचे उपासक बनलों! कॉंग्रेस त्या कार्याला नालायक ठरली तर कॉंग्रेसमध्यें तरी काय राहील? कॉंग्रेस मोठी असेल, पण ज्या तत्त्वांच्यामुळं तिला आज हें मोठेपण प्राप्त झालं आहे, तीं तत्त्वं त्याहून मोठी आहेत. शिवाय कॉंग्रेस एकदम प्रतिगामी होणं तरी शक्य आहे काय? आज सर्व दलित जनतेच्या व लक्षावधि शेतकरी-कामकऱ्यांच्या इच्छा-आकांक्षांचे तें एक प्रतीक आहे. या सर्वांना धोका देणं कसं शक्य आहे? या सर्वांना जागृत केल्यास ते कॉंग्रेसला आपल्या मार्गांवरून विचलित होऊं देणार नाहींत. ते तितके जागृत होण्यापूर्वीच कोणीं दगलबाजपणा केला तर—? तरीहि त्याचं मला भय नाहीं. आतां ही गोष्ट खरी कीं, कॉंग्रेसवर आमची निष्ठा आहे आणि कॉंग्रेस-प्रेम हा एक आमच्या मनाचा धर्मच होऊन बसला असल्यामुळें तो पाश तोडतांना आम्हांला दुःख झाल्याशिवाय कसं राहील? आपलं शरीर अगदीं जर्जर झालं तरी तें टाकून देण्याची वेळ आल्यास आपणांस दुःख होतं, आपली आसक्ति त्या जड शरीरावर जडून राहाते. त्याचप्रमाणं कॉंग्रेसमधील आत्मा गेला असं सिद्ध झालं तरी ती सोडतांना जीव तिळातिळ

तुटतो, तें अवघड वाटतं, पण अशक्य खास नाहीं. आपल्यावर अत्यंत प्रेम करणारी आई आजारी पडली तर तिला जगविण्याकरितां आपण वाटेल ती खटपट करतों. पण ती नाहींच जगली, तर आपण आत्महत्या थोडीच करतो!

आपला रस्ता चुकला असं कळलं तर पुन्हां एक वेळ खऱ्या मार्गाचा शोध लावणं हें शूर मनाचं काम आहे. सर्वांना हें जमणार नाहीं ही गोष्ट खरी. बांधलेलं घर पाडून पुन्हां बांधायला काढणं हें सामान्य मनुष्याला जमणार नाहीं. ज्यांना तें जमणार नाहीं, त्यांच्या आहुति या स्वातंत्र्य-होमकुंडांत पडल्या असंच समजलं पाहिजे. आपण मात्र आतांपर्यंत तयार झालेली मनोरचना पुन्हां एक वेळ बदलण्याचं सामर्थ्य मिळवलं पाहिजे असा मीं निश्चय केला. अशा प्रकारच्या बहादुरांचीं उदाहरणं मी आठवूं लागलों. स्पेनमधील कॅबेलेरोचं उदाहरण मला आठवलं. अगदीं उतारवयांत वयाच्या साठाव्या वर्षींदेखील या पठ्ठ्यानं आपला रस्ता सुधारला. मनाला हुरूप वाटला; त्याचं चरित्र धुंडून वाचून काढण्याचा मीं निश्चय केला

काँग्रेस प्रतिगामी झाली तर– ? होऊं द्या ! मला त्याची काळजी नाहीं. मी पुरोगामीच राहाणार आहे.

◆ ◆ ◆

काँग्रेस स्वतःचा कायाकल्प करूं शकेल काय ?

लेखनकाल : नोव्हेंबर १९४७

समाजवाद हा शब्द आज सन्मान्य झालेला आहे पण थोड्याच वर्षांपूर्वी बहुसंख्य काँग्रेसवादी पुढारी व कार्यकर्ते समाजवादाला नाकें मुरडीत असत. १९३६ सालीं पं. जवाहरलाल नेहरू यांची दुसऱ्यांदा काँग्रेसच्या अध्यक्षपदी निवड झाली होती. त्या वेळीं त्यांनीं जाहीरपणें आपली समाजवादावरील श्रद्धा व्यक्त केली होती. त्यांनीं प्रचारार्थ तुफानी दौरे काढले आणि समाजवादाचा संदेश हिंदी बहुजन समाजापर्यंत पोहोंचविला.

यामुळें भांडवलदार हादरून गेला. मुंबईच्या वीस उद्योगपतींनीं एक पत्रक काढून पंडितजींच्या समाजवादाच्या प्रचाराबद्दल नापसंती व्यक्त केली. त्यांचें म्हणणें असें कीं, काँग्रेसचें ध्येय राष्ट्रीय स्वातंत्र्य असल्यानें तिच्या अध्यक्षानें काँग्रेसच्या व्यासपीठाचा उपयोग समाजवादाच्या प्रचाराकडे करणें गैर होय. हें एवढ्यावरच थांबलें नाहीं. काँग्रेस वर्किंग कमिटीपुढेंहि हा प्रश्न विचारार्थ आला होता. आणि 'पंडितजींनीं आपल्या जाहीर भाषणांत जरा जपून बोलावें' अशी वर्किंग कमिटीकडून त्यांना 'विनंती' करण्यांत आली होती असें म्हणतात !

आणि याच लोकांपैकीं कांहीं जण समाजवादी राष्ट्रकुटुंब स्थापण्याची भाषा आतां बोलतात, त्याशिवाय हिंदी जनतेचा प्रश्न सुटणार नाहीं असें तें म्हणूं

लागले आहेत हें विशेष होय. पण हा सर्व पोकळ पुरस्कार आहे. समाजवादाच्या या पुरस्काराचें पोकळ स्वरूप लक्षांत येण्यासाठीं या ठिकाणीं १८ जून १९३५ रोजीं काँग्रेस वर्किंग कमिटीनें केलेल्या ठरावांतील पुढील उतारा नजरेखालीं घालणें उद्‌बोधक ठरेल. तो ठराव म्हणतो, "खाजगी मालमत्ता जप्त करण्यासंबंधीं व वर्गयुद्धाच्या आवश्यकतेसंबंधीं जी स्वैर चर्चा सध्यां चालू आहे ती लक्षांत घेऊन काँग्रेसभक्तांना जाणीव देणें भाग आहे कीं. कराची ठरावांत खाजगी मालमत्तेची जप्ती व वर्गयुद्ध अभिप्रेत नाहीं. वर्किंग कमिटीचें असेंहि मत आहे कीं, मालमत्तेचें अपहरण व वर्गयुद्ध हीं दोन्हींहि काँग्रेसच्या अहिंसेच्या सिद्धान्ताशीं विसंगत आहेत." आणि इतकें असूनहि आजपर्यंत वर्किंग कमिटींत जवाहरलालजींच्या भूमिकेशीं विरोधी असलेल्या गटांत असलेले काँग्रेसचे सरचिटणीस श्री शंकरराव देव यांनीं आतां एक पत्रक काढून, काँग्रेसनें आपलें उद्दिष्ट आतां बदलून समाजवादी लोकशाही हें उद्दिष्ट स्वीकारलें पाहिजे अशी घोषणा केली आहे. खुद्द काँग्रेसचें अध्यक्ष आचार्य कृपलानी यांनींहि नुकतीच समाजवादाच्या ध्येयाचा स्वीकार करण्याची आवश्यकता प्रतिपादिली आहे. काँग्रेसचे अध्यक्ष आणि सरचिटणीस यांच्या त्या घोषणांना सरदार पटेल यांचाहि पाठिंबा आहे, म्हणतात.

या घटनांमुळें आधींच समाजवादाकडे ओढा असलेल्या काँग्रेसभक्तांपुढें एक महत्त्वाचा प्रश्न उभा राहिला आहे तो असा. काँग्रेसद्वारां समाजवादाची प्रस्थापना परिणामकारकपणें करतां येईल काय ?

समाजवादी पक्षानें गेलीं तेरा-चौदा वर्षें काँग्रेसमध्यें राहून कार्य केलें. या पक्षालाहि या प्रश्नाचें सुस्पष्ट उत्तर द्यावयाचें आहे. खरें सांगावयाचें म्हणजे या प्रश्नाला या पक्षांकडून जें उत्तर दिलें जाईल त्यावरच या पक्षांचें भवितव्य अवलंबून आहे. वरील प्रश्नांचें उत्तर समाजवादी पक्षानें होकारार्थी दिले, तर मग त्याच्या स्वतंत्र अस्तित्वाला—स्वतंत्र अस्तित्व राखून त्याचबरोबर काँग्रेसमध्यें राहून कार्य करण्याला कांहीं हरकत रहात नाहीं.

तथापि, काँग्रेसनें केवळ समाजवादाच्या ध्येयाचा स्वीकार केल्यानें तिच्याद्वारां समाजवादी समाजव्यवस्था प्रस्थापितां येईल असें मानणें चुकीचें होईल. काँग्रेसला जर या उद्दिष्टाची पूर्ति करावयाची असेल तर काँग्रेसच्या कार्यक्रमांत, स्वरूपांत व स्वभावांतहि आमूलाग्र बदल घडवून आणणें आवश्यक आहे.

१९३४ सालीं काँग्रेस समाजवादी पक्षाची प्रस्थापना झाली तेव्हां, काँग्रेसला समाजवादी कार्यक्रम स्वीकारायला लावतां येईल असें कुणाच्या स्वप्नांतदेखील नव्हतें. काँग्रेसचें स्वरूप विशद करतांना समाजवादी पक्षातर्फे अगदीं स्पष्टपणें सांगितलें गेलें होतें कीं, काँग्रेस ही जरी साम्राज्यशाहीविरोधी आघाडी असली तरी तिच्या नेतृत्वाचें स्वरूप प्रधानतः 'बूर्ज्वा' म्हणजे भांडवलशाही आहे आणि काँग्रेसच्या ठरावांतील वर उद्धृत केलेला उतारा वाचल्यानंतर काँग्रेसची ही स्वरूप-मीमांसा चूक होती असें म्हणण्याचें धाडस कोणीहि करूं धजणार नाहीं.

तरीपण त्या वेळीं समाजवादी पक्षानें काँग्रेसमध्यें राहूनच कार्य करण्याचें ठरविलें. कारण समाजवादी पक्षानें हिंदुस्थानसारख्या परतंत्र देशांतील राष्ट्रीय चळवळ पुरोगामी राहाणारच असें त्या चळवळीचे मूल्यमापन केलें असून त्या चळवळीपासून पक्षानें अलिप्त रहाणें मूर्खपणाचें ठरलें असतें.

काँग्रेसचें प्रमुख कार्य राष्ट्रीय स्वातंत्र्य संपादन करणें हें होतें, तर श्रमजीवी, पिळल्या जाणाऱ्या जनतेला काँग्रेसमध्यें आणून स्वातंत्र्य संपादनाच्या कार्यासाठीं काँग्रेसला सामर्थ्यसंपन्न बनवावयाचें आणि त्याबरोबर जनतेची वर्गसंघटना करून, तिला वरिष्ठ वर्गीयांच्या वर्चस्वापासून मुक्त करायचें असें दुहेरी कार्य समाजवादी पक्षानें अवलंबिलें.

काँग्रेसचें स्वातंत्र्य संपादनाचें कार्य आतां परिपूर्ण झालें आहे. यापुढेंहि काँग्रेस समाजकार्य करीत राहील हें खरें, पण तें समाजकार्य म्हणजे वर निर्देशिलेल्या वार्किंग कमिटीच्या ठरावांतील मूलभूत तत्त्वावर राष्ट्र सुसंघटित

करणें हें असेल. उलट समाजवाद्यांपुढील प्रश्न अगदीं निराळा आहे. राष्ट्रीय स्वातंत्र्य संपादनाचें साधन झालेल्या काँग्रेसचें यापुढें समाजवादाची प्रस्थापना करण्याच्या साधनांत रूपांतर होऊं शकेल काय असा तो प्रश्न आहे.

आज आपल्यापुढें 'आ' वासून असलेले प्रश्न समाजवादाचा अवलंब केल्याशिवाय सुटणार नाहींत हें सर्वजण आतां कबूल करीत आहेत. पूर्वी समाजवादाला विरोध करणाऱ्या काँग्रेस पुढाऱ्यांचा आजच्या परिस्थितीच्या दडपणामुळें 'हृदयपालट' झालेला आहे. इतकेंच नव्हे, यापुढें समाजवादाचा कोणता ना कोणता तरी छाप असलेले लेबल लावल्याखेरीज या पुढाऱ्यांचें कांहींच कोणी ऐकणार नाहीं. अर्थात् त्याचा एक परिणाम झाला आहे तो असा कीं, समाजवादी म्हणविणाऱ्या पक्षांचें आणि गटांचें पावसाळी छत्र्या-प्रमाणें पीक आलें आहे. खुद्द काँग्रेसचे अध्यक्ष आणि सरचिटणीस बोलूं लागले आहेत कीं, काँग्रेस ही समाजवादी संस्था बनली पाहिजे.

काँग्रेस हें कार्य तडीस नेणाऱ्या नव्या कार्यासाठीं, नवरूप धारण करूं शकेल असें त्याना खरोखरच म्हणावयाचें आहे काय? काँग्रेसला समाजवादाची प्रस्थापना करण्याचें परिणामकारक साधन बनविण्यासाठीं काँग्रेसच्या कार्यक्रमांत, स्वरूपांत व मानसिक भूमिकेंत कोणकोणतें बदल घडवून आणावयास पाहिजेत? असें कांहीं रूपांतर केल्याखेरीजहि काँग्रेस हें नवें कार्य अंगावर घेऊं शकेल असें खात्रीनें त्यांना म्हणावयाचें नसेल.

प्रथम कार्यक्रमाचा प्रश्न. काँग्रेसनें अत्यंत स्पष्टपणें पुढील गोष्टी जाहीर केल्या पाहिजेत : (१) जमीनदारी पद्धतीचें भरपाई देऊन अगर न देतां उच्चाटन (२) संस्थानिकांचें उच्चाटन (३) उत्पादन साधनांची सामाजिक मालकी.

मूलभूत हक्कांसंबंधींच्या ठरावाच्या चौकटींत राहून हें साध्य करतां येईल काय? जर नसेल तर पुरेशी भरपाई न देतां मालमत्ता ताब्यांत घेणें हें

आमच्या सामाजिक न्यायाच्या कल्पनांशीं विसंगत नाहीं हें म्हणणें आम्ही स्वीकारलें पाहिजे. याचा अर्थ, आमच्या विद्यमान समाज व्यवस्थेंतील वर्ग-विग्रहाचें अस्तित्व मान्य करणें होय. कारण जर पिळल्या जाणाऱ्या शेतकरी कामकरी वर्गाचा प्रश्न सोडवायचा असेल तर ज्यांचे हितसंबंध अगदीं विरोधी आहेत अशा जमीनदार व भांडवलदारवर्गाचें विसर्जन अपरिहार्य आहे. वर्ग-कलहासंबंधीची आपली भूमिका काँग्रेस नेत्यांनीं बदलली असें समजावयाचें कीं काय ! वर्गकलह म्हटला कीं, हिंसा आलीच असें समजण्याचें कारण नाहीं असें म्हटलें जाईल पण उत्पादन साधनांवर सामुदायिक मालकी स्थापतांच मालकवर्गाचें अंशतः तरी उच्चाटन अटळ आहे. हें ह्या लोकांना मान्य आहे काय ?

समाजवादाची प्रस्थापना करण्याचें एक साधन म्हणून वर्गकलहाच्या तत्त्वाचें महत्त्व समाजवादी पक्षानें वारंवार प्रतिपादिलें आहे. उलट, दलित जनता व मालकवर्ग यांच्यांत वर्गयुद्ध पेटविण्याचा प्रयत्न करण्याबद्दल समाजवादी पक्षावर काँग्रेसनें वारंवार टीका केलेली आहे. काँग्रेस वर्किंग कमिटीचा वर दिलेला ठराव या बाबतींत अगदीं स्पष्ट आहे. काँग्रेस नेत्यांपैकीं कांहींनीं वर्ग–विग्रहाऐवजीं वर्ग–समन्वयाचा पुरस्कार केलेला आहे. आजहि ते करीत आहेत.

वर्ग समन्वयावर जर त्यांचा विश्वास असेल तर मग, ते पिळणाऱ्या वर्गाला काँग्रेसमध्यें राखूनहि त्याच काँग्रेसच्या द्वारा समाजवादाची प्रस्थापना करूं इच्छितात कीं काय !

समाजवादी पक्षाचा, या वर्गसमन्वयाच्या तत्त्वावर विश्वास नाहीं. आणि म्हणून समाजवादी पक्षाचें ठाम मत आहे कीं, काँग्रेस ही संपूर्णतः पिळल्या जाणाऱ्या वर्गाचीच संघटना बनल्याखेरीज, तिला समाजवादाची स्थापना करण्याचें कार्य पार पाडतां येणें शक्य नाहीं. काँग्रेसची घटना आमूलाग्र

बदलावी लागेल. आज कोणत्याहि वर्गाचा इसम काँग्रेसच्या ध्येयपत्रिकेवर स्वाक्षरी केली व चार आणे वर्गणी भरली कीं काँग्रेसचा सभासद होऊं शकतो. इतकेंच नव्हे तर काँग्रेसधील कोणत्याहि अधिकारपदाच्या निवडणुकीला तो उभा राहूं शकतो. यामुळें गब्बर वर्गाचे लोक, आपल्या हातच्या विपुल साधनांमुळें संघटनेंतील महत्त्वाच्या जागा काबीज करूं शकतात. आपले स्वतःचे प्रतिनिधि प्रत्यक्ष पाठविण्याचेंच कारण नाहीं, त्यांचे हस्तक त्या जागीं असले तरी त्यांना चालतें. अशा परिस्थितींत पिळणाऱ्या वर्गाला काँग्रेसपासून दूर ठेवण्याच्या दृष्टीनें तिच्या स्वरूपांत आमूलाग्र बदल करणें केवळ अशक्य आहे.

काँग्रेसच्या निवडणुकींत बहुमत मिळवून काँग्रेस काबीज करण्याची कल्पना, काँग्रेस परकी सरकारच्या सत्तेला विरोध करण्याच्या भूमिकेंत असतांहि, समाजवादी पक्षानें कधीं बाळगली नव्हती. आतां काँग्रेस अधिकारारूढच आहे, तेव्हां ही कल्पना अगदींच अशक्य कोटींतील आहे. जनतेला पिळणाऱ्या वर्गाची काँग्रेसमधून हकालपट्टी करणें कसे शक्य आहे ! आणि म्हणून आम्ही या निर्णयास येणें भाग आहे. या कार्यासाठीं स्वतंत्र पक्षाची आवश्यकता आहे.

कांहीं लोक म्हणतात, काँग्रेसच्या स्वरूपांत आतांपर्यंत अनेकदां फेर-बदल झालेले आहेत. तुम्हांला पाहिजे तो बदल पुन्हां एकदां होण्याची सहज शक्यता आहे. हा मुद्दा मान्य करून, समाजवादी पक्षाच्या स्थापनेच्या वेळींच, काँग्रेसांतर्गत अशा पक्षाची आवश्यकता नाहीं असें प्रतिपादण्यांत येत असे. काँग्रेसमध्यें जसा गांधीवादी गट आहे, त्याप्रमाणें समाजवादी पक्ष हा एक गट म्हणून काँग्रेसमध्यें राहूं शकेल असें म्हटलें जात असे.

हें प्रतिपादणाऱ्यांनीं लक्षांत घ्यायला पाहिजे कीं, काँग्रेसचीं वेळोवेळीं जीं स्थित्यंतरें झालीं ती काँग्रेस ही एक प्रवाही चळवळ होती. तेव्हां व ती सत्तेला विरोधी होती तेव्हां झालेलीं आहेत. दुसरी गोष्ट अशी कीं जीं जीं काय स्थित्यंतरें

झालीं तीं मुख्यतः राष्ट्रीय स्वातंत्र्य संपादन करण्याच्या मार्गांधानतच झालीं. त्यांचा संबंध मूलभूत प्रश्नांशीं, मालकी हक्क वगैरेशीं कधींच आला नव्हता

आतां कॉंग्रेसनें राज्यसत्ता हातीं घेतली आहे. अशा परिस्थितींत कॉंग्रेसमध्यें बहुमत मिळवून ती काबीज करून तिच्या कार्यक्रमांत व स्वरूपांत मूलभूत स्थित्यंतर घडवून आणण्याची कल्पना ही केवळ इच्छारंजनच ठरेल. हेंच दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे, गेलीं कित्येक वर्षें कॉंग्रेस नेतृत्वावर वजन असलेल्या हितसंबंधीं श्रीमंत लोकांविरुद्ध तें उघड युद्ध पुकारण्यासारखें होईल.

अशा परिस्थितींत, कॉंग्रेसद्वारां समाजवादाची प्रस्थापना करतां येण्यासाठीं तिचें स्थित्यंतर घडवून आणतां येईल ह्या कल्पनेवर विश्वास ठेवणें समाजवाद्यांना शक्य नाहीं. आणि म्हणूनच हिंदुस्थानांत समाजवादाची प्रस्थापना करण्याचें ऐतिहासिक कार्य करण्यासाठीं स्वतंत्र पक्षाची आवश्यकता आहे.

कॉंग्रेसचा कार्यक्रम व तिचें आजचें स्वरूप यांचा विचार झाल्यानंतर, आज कॉंग्रेसमध्यें अधिकारारूढ असलेल्या लोकांच्या मानसिक घडणींत कांहीं बदल घडवून आणणें शक्य आहे कीं नाहीं या प्रश्नाचा विचार योग्य ठरेल.

हे लोक समाजवादासंबंधीं खूप लांबलांब गप्पा मारीत असले तरी ते जुन्यापुराण्या रिंगणांतच घुमत आहेत. खाजगी मालमत्तेसंबंधींच्या आपल्या कल्पना बदलण्यास ते मुळींच तयार नाहींत. जमीनदार प्रभृति गब्बर वर्गाला द्यावयाच्या भरपाईचा प्रश्न उपस्थित करण्यांत येतो तेव्हां त्यांच्या होणाऱ्या प्रतिक्रियेचें निरीक्षण करणें उद्‌बोधक असतें. जमीनदारी नष्ट करावी हें त्यांना मान्य आहे. कांहीं धंदे सामाजिक मालकीचे करण्यालाहि त्यांची मान्यता आहे. पण या गोष्टी मालकांना कांहींहि भरपाई दिल्यावांचून करण्याचा विचार त्यांच्या मनाला मुळींच शिवत नाहीं. खुद्द महात्मा गांधींनीं १९४२ सालीं लुई फिशरशीं बोलतांना स्पष्टपणें मान्य केलें होतें कीं, "शेतांवर राबणाऱ्यांकडे जेव्हां त्या शेतांची मालकी जाईल तेव्हां जमीनदारांना

भरपाई देणें शक्य होणारहि नाहीं''. पण कॉंग्रेसमध्यें अधिकारपदावर असलेल्या लोकांच्ची एक विशिष्ट वर्ग-मनोवृत्ति दिसून येतें. त्यांच्या दृष्टीनें मालमत्तेच्या मालकीचा हक्क पवित्र आहे, तो कदापि धुडकावला जातां कामा नये. या मालमत्तेच्या हक्काच्या मुळाशीं जाऊन ते कसे संपादन करण्यांत येतात हें पाहाण्याची तसदी हे लोक कदापि घेत नाहींत. इतकेंच नव्हें तर, मामुली कर्जापायी, किंमतीनें त्यापेक्षांहि अधिक असलेल्या शेतकऱ्यांच्या जमिनी सावकारांनीं गिळंकृत केलेल्या असल्या तरीदेखील शेतकऱ्यांची मागणी न्याय्य आहे असें त्यांना वाटत नाहीं. शेतकऱ्यांनीं सत्याग्रह केला, सावकारावर सामाजिक बहिष्कार पुकारला तर शेतकऱ्यांची भूमिका तिच्या योग्यपणावर कधींच विचारांत घेतली जात नाहीं. एकादा धंदा विकत घेण्यांत येत असतां त्यांतील कामगारांनीं 'गुडविल' मागितलें तर या मागणीला ते नाकें मुरडतात. एकाद्या धंद्याचें 'गुडविल' ही केवळ मालकांची मत्ता आहे, तिला कामगारांनीं कांहींच हातभार लावलेला नाहीं, असें त्यांना वाटतें.

ही निश्चितपणें मालकवर्गाच्या बाजूची मनोवृत्ति आहे. अशा लोकांच्या मानसिक घडणींत स्थित्यंतर घडवून आंणणें केवळ अशक्य आहे. पिळल्या जाणाऱ्या वर्गाला अनुकूल असलेल्या लोकांच्या हातीं अधिकारपदें सुपूर्द करायला ते लोक कदापि तयार होणार नाहींत, आतां सरकारी सत्ता त्यांच्या हातीं असल्यानें तिचा उपयोग आपल्या हातीं कॉंग्रेसचीं सूत्रें राखण्यासाठीं ते करणारच. अशा परिस्थितींत हे लोक समाजवादाच्या प्रस्थापनेसाठीं आवश्यक असलेलें वातावरण निर्माण करण्याला मदत करतील अशी कल्पना करणें अशक्यप्रायच आहे.

देशांत जोरदार समाजवादी चळवळ उभारणें ही आजच्या घटकेची निकड आहे अशी जोरदार चळवळ असल्याखेरीज आपण हिंदुस्थानांत समाजवादी व्यवस्था निर्माण करूं शकूं असें मानणें चुकीचें आहे, शिवाय आज कॉंग्रेस अधिकारारूढ आहे. आणि बहुसंख्य कॉंग्रेस पदाधिकाऱ्यांना वाटतें कीं,

आपल्याला जें काय सामाजिक स्थित्यंतर घडवून आणावयाचें आहे तें कायदे करून आणतां येईल. असें कायदे करण्यासाठीं व त्यांची अंमलबजावणी करण्यासाठीं जनतेची चळवळ आवश्यक आहे असें त्यांना वाटत नाहीं.

या प्रश्नाबाबत समाजवाद्यांचा दृष्टिकोन भिन्न आहे. वर्गकलहावर आधारलेल्या समाजवादी चळवळीशिवाय समाजवादाची स्थापना हें एक केवळ स्वप्नच राहील. प्रत्यक्ष प्रतिकाराच्या शस्त्रानें सज्ज अशी राष्ट्रीय चळवळ असल्याशिवाय स्वातंत्र्य संपादन हेंहि एक स्वप्नच ठरलें असतें. राष्ट्रीय चळवळीचें ऐतिहासिक कार्य आतां परिपूर्ण झालें आहे. आतां ही चळवळ ओहोटीला लागलेली आहे. तिच्या जागीं एकप्रकारची पोकळी निर्माण होत आहे. ही पोकळी भरून काढणारी समाजवादी चळवळ नसेल तर लोकशाही-विरोधी शक्ति बलवान् बनून प्रतिगामी शक्ति विजयी होतील. देशांत सामर्थ्य-संपन्न समाजवादी चळवळ उभारून या घसरगुंडीला आळा घालण्याला काँग्रेस समर्थ ठरेल असें मानणें हें केवळ मनोवांछित ठरेल.

अशा परिस्थितींत हे ऐतिहासिक कार्य करण्यासाठीं नेटानें पुढाकार घेण्याला समाजवादी पक्ष पुढें येईल अशी जनता अपेक्षा करीत आहे.

◆ ◆ ◆

काँग्रेसबद्दलच्या माझ्या वैचारिक प्रतिक्रिया :

लेखनकाल : ऑगस्ट १९५०

काँग्रेसचा जयजयकार करण्यांत माझ्या ऐन तारुण्यांतील जवळजवळ सतरा वर्षें गेलीं. " इन्किलाब जिंदाबाद, थोडे दिनमें काँग्रेस राज " ही घोषणा देखील एके काळीं मी अगदीं मनापासून ओरडत असे. आज काँग्रेसचेंच राज्य चालूं आहे. परंतु माझ्या मनाचें समाधान झालेलें नाहीं. काँग्रेसच्या छत्राखालीं मी लहानाचा मोठा झालों. परंतु काँग्रेसवरच मला आतां कठोर टीका करावी लागत आहे. नुसती टीकाच नव्हे तर, काँग्रेसचा त्याग करून मी आतां विरोधी पक्षांत उभा आहे. अशा या विचित्र परिस्थितींत काँग्रेसबाबतच्या माझ्या मानसिक प्रतिक्रियांचा मागोवा घेणें उद्बोधक होईलसे वाटतें.

काँग्रेसच्या झेंड्याखालीं १९२० सालीं असहकारितेची चळवळ झाली. त्या वेळीं मी एक लहान शाळकरी मुलगा होतो. त्या वेळीं आमच्या आजूबाजूचें वातावरण अगदीं गरम झालें होतें बरोबरीचे किती तरी शाळासोबती परधार्जिण्या शिक्षणावर बहिष्कार घालून राष्ट्रीय शाळेंत दाखल झाले. त्यांचे पालक काँग्रेसनिष्ठ होते. मला मात्र प्रतिकूल परिस्थितीमुळें माझ्या देशप्रेमाच्या ऊर्मि तशाच दडपून टाकाव्या लागल्या. पण त्यामुळें राष्ट्रीय चळवळीबद्दलचें माझें आकर्षक कमी होण्याऐवजीं अधिकच वाढलें. काँग्रसचें नांव त्या वेळीं विशेष महत्त्वाचें नव्हतें. महात्मा गांधी आणि अन्य राष्ट्रीय पुढारी हेंच आमच्या डोळ्यापुढें असत.

पुढें असहकारितेच्या चळवळीचा भर ओसरला. कॉंग्रेसमध्यें फेरवाले-नाफेरवाले असे वाद सुरूं झालें. माझें असहकारी चळवळीचे प्रेमहि ओसरलें. युसुफ मेहेरअली, नेताजी सुभाषचंद्र बोस आणि पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रेरणेनें चालणाऱ्या युवक चळवळीकडे मी आकृष्ट झालों. आम्ही पूर्ण स्वातंत्र्याचे उपासक होतों; आम्हांला कॉंग्रेसचें वसाहतीचें स्वराज्य मुळींच पसंत नव्हतें; शांततेच्या मार्गानें स्वातंत्र्य मिळेल या गोष्टीवर आमचा विश्वास बसणें शक्यच नव्हतें. अशा परिस्थितींत मला कॉंग्रेसचा सभासद होण्याचें काय कारण होतें ?

परंतु महात्मा गांधींनीं तरुणांच्या आकांक्षा आणि कोटयवधि जनतेची भूक ओळखली. संपूर्ण स्वातंत्र्याच्या ध्येयास पाठिंबा देऊन पंडित जवाहरलाल नेहरू यांची कॉंग्रेसच्या अध्यक्षपदीं निवड होईल असा बनाव बनवून आणला. इतकेंच नव्हे तर सत्याग्रहाचा लढा सुरूं करून त्यांनीं साम्राज्यशाहीला आव्हान दिलें.

आम्ही तरुण मंडळी कॉंग्रेसच्या झेंड्याखालीं सुरूं झालेल्या सत्याग्रह-लढ्यांत सामील झालों. हिंसाअहिंसेचा प्रश्न होता. शांततेच्या मार्गानें संपूर्ण स्वातंत्र्याचें आपलें उद्दिष्ट प्राप्त होईल असें आम्हांला अजूनहि वाटलें नव्हतें. कारण युवक-संघाचा चिटणीस या नात्यानें तरुणांना लढ्यांत सामील होण्यासाठीं हांक देणारें पत्रक मी काढलें तें मला अजूनहि चांगलें आठवतें. पत्रकाची सुरुवातच, 'बॅ. सावरकरांनीं दिलेली स्फूर्ति अद्याप विसरलेली नाहीं,' अशा वाक्यानें केली होती. कॉंग्रेसने तर न्याय्य आणि शांततेच्या मार्गानीं स्वातंत्र्य मिळविण्याचें आपलें तत्त्व सोडलेलें नव्हतें. परंतु कायदेभंगाच्या चळवळीनें आमच्या लढाऊ आकांक्षांना वाव मिळाला असल्यामुळें आम्हीं तो प्रश्न जरा बाजूला ठेवला. कायदेभंगाच्या चळवळीचा विस्तार आणि जोर हळूहळू वाढत जाऊन जनता बंड करून उठेल, मग त्यांत हिंदी लष्करहि सामील होऊन देशांत क्रान्ति होईल आणि परकीय सत्तेला मूठमाती मिळून संपूर्ण स्वातंत्र्याची

प्रस्थापना होईल अशी आशा त्या पत्रकाच्या शेवटीं मी व्यक्त केली होती. सशस्त्र क्रान्तीचीं गोड स्वप्नें, पहात पाहतच आम्हीं सत्याग्रह-लढ्यांत उतरलों होतों. स्वातंत्र्याच्या सामाजिक अंगावर आमचें विशेष लक्ष नव्हतें. पंडित जवाहरलाल नेहरूंनीं युवक परिषदेचे अध्यक्ष म्हणून केलेल्या भाषणांत समाजवादी ध्येयाचा पुरस्कार केला होता. परंतु त्या गोष्टीचें महत्त्व त्या वेळीं आमच्या ध्यानांत आलें नव्हतें. त्याची महती पटण्यास तुरुंगांतील दोन-अडीच वर्षांच्या अध्यापन-चिंतनाची आवश्यकता होती.

कायदेभंगाच्या लढ्यांत शिक्षा होऊन आम्ही तुरुंगांत गेलों आणि जनतेच्या क्रांतिकारक उठावाचीं आमचीं स्वप्नें हळूंहळूं हवेंत विरून जातांना आम्हीं विचार करूं लागलों. अन्य देशांच्या स्वातंत्र्यलढ्यांचे इतिहास वाचले. आणि जनतेनें उठाव कां केला नाहीं याचीं कारणें आम्हांला सांपडलीं. स्वातंत्र्याची सामाजिक बाजू स्पष्ट होत नाहीं तोंवर जनतेला लढ्याबद्दल उत्साह कसा वाटेल? अन्नवस्त्राच्या त्यांच्या दैनंदिन अडचणीं दूर करण्यासाठीं आम्हीं पुढें सरसावलों तरच त्यांना कांहीं तरी करावें असा उत्साह वाटणार. स्वातंत्र्याचा अर्थ त्यांच्या अडी-अडचणींच्या आणि त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाच्या भाषेंत मांडला तरच त्यांना समजूं शकेल हें सत्य आम्हांला सांपडलें. काँग्रेसच्या साम्राज्य-विरोधी लढ्याच्या कमजोरीबद्दल आम्ही आपलें आडाखे बांधले आणि तुरुंगांतून बाहेर आल्यावर काँग्रेस-समाजवादी पक्षाची स्थापना केली. मी काँग्रेस-समाजवादी-पक्षाचा सभासद झालों.

काँग्रेसबद्दल उदासीन होण्याचा हा दुसरा प्रसंग होता. असहकारितेच्या चळवळीची लाट ओसरल्यानंतरहि काँग्रेस मनांतून उतरली होती. परंतु त्या वेळची प्रतिक्रिया सर्वस्वीं भावनात्मक होती. या वेळची प्रतिक्रिया प्रामुख्यानें वैचारिक स्वरूपाची होती. साम्राज्यविरोधी लढ्याची मीमांसा शास्त्रीय दृष्टिकोनांतून करावयास पाहिजे, वर्गीय जागृतीच्या खंबीर पायावरच त्याची उभारणी केली जाणे आवश्यक आहे, आणि त्या दृष्टीनें काँग्रेसचें नेतृत्व अपुरें

पहत आहे, या भावनांतूनच काँग्रेस-समाजवादी-पक्ष उदयास आला. राष्ट्रीय चळवळीचा उपयोग हिंदी भांडवलदारवर्ग आपल्या नफेबाजीसाठीं करून घेतो आणि काँग्रेसचे पुढारीदेखील जमीनदार-भांडवलदारांच्या वर्गीय हितसंबंधांचा अधिक सहानुभूतीनें विचार करतात असें आमचें प्रतिपादन होतें. किसानांच्या वर्गीय संघटनांना आ'ण लढ्यांना अधिकारारूढ काँग्रेसकडून जो विरोध होई त्यामुळें आमच्या प्रतिपादनास दुजोरा मिळे. जातिधर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाचें काँग्रेसचें ध्येय होते. परंतु जोंवर आर्थिक आणि वर्गीय पायावर जनतेची संघटना करून स्वातंत्र्याचा सामाजिक अर्थ तिला समजावून दिला जात नाहीं तोंपर्यंत अजातीय राष्ट्रवादाचा या घोषणा व्यर्थ आहेत असाहि आमचा आक्षेप होता. आर्थिक पायावर जनसंघटना केली तरच जातीय भांडणें लावून देण्याच्या साम्राज्यवादी डावाला जनता बळी पडणार नाहीं असा आमचा दावा होता. परंतु काँग्रेसच्या पुढाऱ्यांनी त्याची पर्वा केली नाहीं. सारांश, सामाज्यविरोधी मोर्चा अधिक व्यापक आणि मजबूत कसा करावा, त्यामध्यें कोणत्या वर्गांकडे अधिक लक्ष द्यावें, कोणते वर्ग स्वातंत्र्यविरोधी आहेत इत्यादि गोष्टींबाबतच आमचे मतभेद होते. निराळ्या शब्दांत सांगावयाचें झाल्यास क्रांतितंत्राच्या दृष्टीनें काँग्रेसचा दृष्टिकोन अशास्त्रीय आहे असा आमचा मुख्य आक्षेप होता.

त्या वेळीं रशियन क्रान्तीची आणि तेथें चालूं असलेल्या समाजवादी प्रयोगाचीं आकर्षक चित्रें रंगविणारीं पुस्तकें आम्हीं वाचीत होतों कार्ल मार्क्सच्या ज्या शास्त्रीय समाजवादाच्या आधारें रशियन क्रान्ति लेनिननें यशस्वी केली त्या मार्क्सवादाचा अभ्यास आम्हीं केला. आम्हांला तो दृष्टिकोन पटला आणि आम्ही मार्क्सवादी बनलों. मार्क्सवादाच्या दृष्टिकोनांतून हिंदुस्थानांतील परिस्थितीचा अभ्यास करण्याच्या दृष्टीनें एस्. एन् रॉय यांच्या लिखाणाचा मला फार उपयोग झाला. मार्क्सवादावर आधारलेल्या कम्युनिस्ट पक्षाचा त्यावेळीं बराच बोलबाला होता. मीरत कटाचा खटला गाजला होता. परंतु राष्ट्रीय चळवळीपासून अलिप्त राहाण्याचें किंबहुना तिला विरोध करण्याचें

त्याचें धोरण मला मानवण्यासारखें नव्हतें. तथापि एम् एन् रॉय यांचीं पुस्तकें मला वाचावयास मिळालीं नसतीं तर काँग्रेससंबंधींच्या औदासीन्याच्या भरांत मी कम्युनिस्ट पक्षांतहि सामील झालों असतों. काँग्रेसचे सभासद होणें देखील कम्युनिस्टांना त्या वेळीं पसंत नव्हतें. तसें नसतें तर काँग्रेस-समाजवादी पक्षाची स्थापना तरी झाली असती किंवा नाहीं याबद्दल मला शंका आहे. आणि मग काय झालें असतें हें सांगणें फार कठिण आहे.

परंतु तसें कांहीं घडलें नाहीं. साम्राज्यशाहीच्या टांचेखालीं असलेल्या वसाहतीच्या देशांतील राष्ट्रीय स्वातंत्र्याचा लढा प्रतिगामी नसून पुरोगामी असतो हें तत्त्व आम्हांला पटलेलें असल्यामुळें आम्हीं काँग्रेसमध्येंच राहून काम करीत राहिलों राष्ट्रीय स्वातंत्र्याचा प्रश्न निकालांत निघेपर्यंत काँग्रेसमध्यें रहावयाचें आम्हीं निश्चित केलें होतें. आंत राहून स्वातंत्र्याच्या लढ्याला खऱ्या अर्थानें साम्राज्यविरोधी बनविण्याचा आम्ही प्रयत्न करीत होतों. बहुसंख्य जनता काँग्रेसच्या झेंड्याखालीं येईल आणि तिच्यांत वर्गीय जागृति झालेली असेल तर, साम्राज्यविरोधी लढ्यांतून उदयास येणाऱ्या स्वातंत्र्याचा उपयोग हळूंहळूं समाजक्रान्तीसाठींदेखील करून घेतां येईल अशी उमेदहि आम्हीं बाळगली होती. ही आमची आशा खरी ठरली नाहीं हें प्रांजलपणें कबूल केलें पाहिजे.

सन १९३७ मध्यें काँग्रेसनें प्रांतांमध्यें मंत्रिपदाचा स्वीकार केला आणि काँग्रेसचें स्वरूप झपाट्यानें बदलूं लागलें. सत्तेचा वापर आपल्या वर्गीय स्वार्थासाठीं करून घेण्याच्या महत्त्वाकांक्षेनें पूर्वी काँग्रेसला विरोध करणारे लोक आणि वर्गहि काँग्रेसमध्यें शिरले. त्यांचें स्वागत करण्यांत आलें. एवढेंच नाहीं तर, मंत्रिमंडळांची धोरणेंदेखील या वर्गांना पोषक आणि दडपलेल्या वर्गांना जाचक अशीं होऊं लागलीं. आपलीं दुःखें वेशीवर टांगण्यासाठीं आणि आपल्या मागण्या विधिमंडळाला सांगण्यासाठीं काढण्यांत आलेल्या शेतकरी

मोर्चालादखील काँग्रेस विरोध करूं लागली. बिहारमध्यें जमीनदारांनीं बेकायदेशीरपणें दडपलेल्या जमिनी परत मिळाव्या म्हणून किसानांनीं सत्याग्रह केले तर काँग्रेस श्रेष्ठींचा संताप झाला आणि वर्किंग कमिटीच्या अनुमतीशिवाय सत्याग्रह करणें नियमबाह्य ठरविण्यांत आलें. संस्थानिकांविरुद्ध संस्थानी प्रजेचे लढे चालत. त्यांची झळ काँग्रेसला लागूं नये म्हणून संस्थानी विभागांतील काँग्रेस-कमिट्यांचे मुख्य काँग्रेसपासून संबंध तोडण्यांत आले. संस्थानी प्रजेच्या स्वतंत्र संघटना करण्याच्या धोरणास प्रोत्साहन देण्यांत आलें.

काँग्रेसचें लढाऊ कार्यक्रमाबद्दलचें धोरण हें असें होतें. मुस्लिम लीगनें-देखील या संधीचा फायदा घेऊन प्रतिगामी शक्तींच्या वाढीस फार मोठी चालना दिली. सर्व सत्ता काँग्रेस-मंत्रिमंडळांच्याद्वारें हिंदूंनीं आपल्या हातांत घेतली आहे असा प्रचार करून मुस्लिम जनतेंत जातीयतेचें रान उठवून दिलें. सार्वत्रिक निवडणुकींत एकाहि प्रांतांत मुस्लिम लीगला बहुमत नव्हतें. परंतु अवघ्या दोन वर्षांच्या काळांत बहुसंख्य मुसलमान लीगच्या झेंड्याखालीं जमा झाले. काँग्रेसच्या साम्राज्यविरोधी एकजुटींत हें भलें मोठें खिंडार होतें ब्रिटिश साम्राज्यवादी मुत्सद्द्यांनीं काँग्रेसवर मात केली यांत शंका नाहीं.

मंत्रिमंडळाच्या या कालखंडांत काँग्रेसकडून काँग्रेसमधील जहालमतवाद्यांचा तेजोभंग करण्याचा प्रयत्न सतत चालूं राहिला. काँग्रेसश्रेष्ठींच्या विरुद्ध निवडणूक लढवून नेताजी सुभाष बोस काँग्रेसच्या अध्यक्षपदीं निवडून आले. लोकमत लक्षांत घेऊन त्यांच्या बरोबर तडजोड होणें हितावह ठरलें असतें; परंतु तें घडलें नाहीं. परिस्थिति हळूहळू इतकी बिघडत गेली कीं, एक वेळीं तर इतःपर काँग्रेसकडून स्वातंत्र्यार्थ लढा होऊं शकेल कीं नाहीं याबद्दलच्या शंका वाटूं लागली.

परंतु, याच सुमारास दुसरें महायुद्ध सुरू झाले. पंडित जवाहरलाल नेहरू यांनीं चालविलेल्या परराष्ट्रीय धोरणामुळें आणि गांधीजींच्या अहिंसातत्त्वामुळें

काँग्रेसला युद्धविरोधाची भूमिका घेणें भागच पडलें आणि मंत्रिमंडळाच्या या खोड्यांतून काँग्रेसची सुटका झाली पुढें सोव्हिएट युनियनवर हिटलरनें हल्ला चढवला तेव्हा फिरून एक वळ काँग्रेसच्या भूमिकेंत डळमळीतपणा निर्माण झाला. साम्राज्यवादी युद्ध लोकयुद्ध झालें म्हणून कम्युनिस्ट तर सरळ सरळ युद्धसहकार्याचा प्रचार करूं लागले. या संधीचा फायदा घेऊन ब्रिटिश सरकारनें क्रिप्सना चोलणीं करण्यासाठीं पाठविलें; परंतु त्यांची शिष्टाई निष्फळ ठरून गांधीजींनीं इतिहासप्रसिद्ध "छोडो हिंदुस्थान" चळवळीचा उद्घोष केला. समाजवादी पक्षाची काँग्रेसबद्दलची आशा सफळ होऊन काँग्रेसच्या झेंड्याखालीं एकोणीसशें बेचाळीसचा क्रांतिकारक लढा लढला गेला.

बेचाळीसच्या संग्रामांत काँग्रसबद्दल मला वाटणारें प्रेम शिगेला पोहोंचलें होतें. जनक्रान्तीचें माझें स्वप्न त्या लढ्याच्या रूपानें साकार होऊं लागलें होतें. समाजवादी पक्षानें लढ्याच्या काळांतहि आपली स्वतंत्र संघटना चालूं ठेवावी असा एक विचारप्रवाह होता. परंतु मला तो रुचला नाहीं. लढ्याचें नेतृत्व करण्यांत अग्रभागीं असलेल्या समाजवादी पुढाऱ्यांनीदेखील ही सूचना मान्य केली नाहीं.

ऑगस्टमध्यें सुरू झालेली ही क्रांति अपुरी राहाणार नाहीं, जनतेचे प्रश्न सोडविण्यास समर्थ अशी समाजव्यवस्था निर्माण करण्याचें ऐतिहासिक कार्य या क्रांतींतून होईल अशा आशेनेंच आम्ही काम करीत होतों. परंतु काँग्रेसच्या पुढाऱ्यांनीं महात्मा गांधींची अनुमति नसतांनादेखील पाकिस्तानच्या मुद्द्यावर तडजोड करून "माँटबॅटन योजना" मान्य केली. पाकिस्तान आणि भारत असें देशाचें दोन तुकडे पडले. जातीय प्रश्न सलोख्यानें सुटून दोन्हीं राज्यांतील जनतेच्या प्रगतीचा मार्ग मोकळा व्हावा म्हणून केलेल्या या तडजोडीनें तो प्रश्न सुटला नाहीं. जातीय दंगे, खून, जाळपोळ, अत्याचार बेसुमार झाले. निर्वासितांचा भयंकर प्रश्न अकल्पितपणें उभा राहिला. काश्मीरच्या लढाईत

हिंदुस्थानला पडावेंच लागलें. स्वातंत्र्याचें तांबडें फुटतें न फुटतें तोंच गडद अंधःकार माजला, आणि त्यांतच विश्ववंद्य राष्ट्रपित्याचा अमानुषपणें खून करण्यांत आला.

स्वातंत्र्य मिळाल्यावर समाजक्रांतीचा कार्यक्रम हातीं घेतला जाईल अशी आमची कल्पना होती. त्यासाठींच काँग्रेसमध्यें राहून आम्हीं धडपडत होतों; जनतेची संघटना करण्याचा प्रयत्न करीत होतों. बेचाळीसच्या लढ्यांत अग्रभागीं राहिल्यामुळें समाजवादी पक्षाची लोकप्रियता पुष्कळच वाढली होती. परंतु काँग्रेसमधील काहीं पुढाऱ्यांना तें मानवलें नाहीं. समाजवाद्यांचा हेवा-दावा करणारांचे दोन वर्ग करतां येतील. दुय्यम दर्जाच्या पुढाऱ्यांना समाजवादी पक्षाच्या पुढाऱ्यांच्या लोकप्रियतेबद्दल हेवा वाटला तर कांहीं पुढाऱ्यांचा समाजवादी ध्येयालाच विरोध होता. खाजगी उद्योगधंद्यांच्या मार्फतच देशाची औद्योगिक प्रगति होऊं शकेल असें त्यांना वाटतें. आम्हांला उद्योगधंद्याचें राष्ट्रीयीकरण करावयाचें नाहीं आणि आमच्याजवळ तितकी शक्तीहि नाहीं असें ते उघडपणें बोलून दाखवितात. परंतु आपले हे विचार जनतेला पसंत नाहींत हें त्यांना कळून चुकलें होतें. अशा परिस्थितींत फाळणीमुळें निर्माण झालेल्या जातीय असंतोषावर पुष्ट झालेल्या संस्थांना चुचकारण्यासहि त्यांनीं कमी केलें नाहीं. त्यांचें हें धोरण अधिकारारूढ काँग्रेसमधीलहि पुष्कळ लोकांना मान्य नव्हतें. तरी पण समाजवाद्यांच्या विरुद्ध मात्र सर्वांची एकजूट होती हें विसरून चालणार नाहीं.

महात्मा गांधी हयात होते तोंपर्यंत समाजवाद्यांना काँग्रेसमध्येंच रहातां यावें असा त्यांनीं प्रयत्न केला. काँग्रेसनें आपल्या कार्यक्रमांत आवश्यक ती सुधारणा करून या लोकांना आत्मसात् करावें अशी त्यांची कल्पना होती. बसाहतीच्या स्वराज्यासाठीं झगडणाऱ्या काँग्रेसला जसें त्यांनीं स्वातंत्र्यवादी बनविलें तसेंच आता काँग्रेसला समाजवादाची दीक्षा देण्याचा त्यांचा मानस

होता. समाजवादाच्यीं तत्त्वें त्यांना शंभर टक्के मान्य होती असें म्हणतां येणार नाहीं परंतु काँग्रेस ज्या राजकीय भूमिकेवरून काम करीत आहे ती लक्षांत घेतां आजच्या युगांत तिला लोकशाही समाजवादाचा अंगीकार केल्यावांचून गत्यंतर नाहीं हें त्यांनीं ओळखलें होतें, म्हणूनच त्यांनीं आचार्य नरेंद्र देव अथवा जयप्रकाश नारायण यांच्यीं नांवें काँग्रेसच्या अध्यक्षपदासाठीं सुचविलीं होतीं. प्रथम श्रेणीची सर्व वडीलधारी माणसें मंत्रिमंडळांत गेल्यानें काँग्रेसच्या अध्यक्ष निवडतांना आजकाल कशी तारांबळ उडते तें पाहिलें म्हणजे महात्माजींची सूचना किती दूरदर्शीपणाची होती हें कळून येतें. परंतु अधिकारारूढ गटांतील बहुसंख्य काँग्रेस पुढाऱ्यांना गांधीजींचें हें धोरण पसंत पडण्यासारखें नव्हतें. तुरुंगांतून बाहेर पडल्याबरोबरच त्यांनीं समाजवाद्यांना नामोहरम करण्याचा प्रयत्न सुरू केला. कित्येकांनीं तर तुरुंगांत असतांनाच त्याबद्दलच्या योजना आंखून ठेवल्या होत्या.

बेचाळीसच्या लढ्यांत भाग घेतलेल्या बऱ्याचशा तरुणांनीं कम्युनिस्टांच्या धोरणाला विरोध करून राष्ट्रीय-मिल-मजदूर-संघामध्यें कार्य करण्यास सुरुवात केली होती. हळूहळू कामगारांची कम्युनिस्टविरोधी आघाडी प्रभावी होऊं लागली होती तरुण पिढीमध्यें नव्या दमाचे कार्यकर्ते तयार करण्याचें काम महाराष्ट्रांत आणि मुंबईत राष्ट्रसेवादलामार्फत होत होतें. १९४१-४२ पासून जातीयवाद्यांना तोंड देण्यास कार्यक्षम अशी तरुणांची आघाडी तयार होत होती. नव्या जमान्यांतील प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीनें काँग्रेसचा कायापालट करण्यासाठीं याच मार्गाचा अवलंब करणें आवश्यक होतें. परंतु या सर्व तरुण कार्यकर्त्यांना बेचाळीसच्या क्रांतिकारकांबद्दल आणि समाजवादी पुढाऱ्यांबद्दल आदर आणि जिव्हाळा वाटे, ही गोष्ट महाराष्ट्र आणि मुंबईच्या काँग्रेस पुढाऱ्यांना रुचली नाहीं.

राष्ट्रीय मजदूर-संघामध्यें या मंडळींचें बहुमत होऊं नये म्हणून घटनात्मक अडचणी उपस्थित करून त्यांना निवडणुकीस उभे राहतां येणार नाहीं अशी

कारवाई करण्यांत आली आणि राष्ट्रसेवादलावर आपली संपूर्ण हुकमत चालवून समाजवादी विचारांच्या कार्यकर्त्यांना त्यांतून हुसकून काढतां यावें अशा प्रकारचें डावपेंच महाराष्ट्रांत होऊं लागले. राष्ट्रसेवादलाच्या घटनेंत आम्ही म्हणतों तसा बदल झालाच पाहिजे असा आग्रह काँग्रेस-श्रेष्ठींनीं धरला आणि प्रांतिक काँग्रेस-कमिटींतील आपल्या हुकमी बहुमताच्या जोरावर तसा ठरावहि पास करून घेतला. काँग्रेसची हुकूमशाही मान्य करण्याऐवजीं काँग्रेसपासून अलग होण्याचेंच सेवादलांतील बहुसंख्य कार्यकर्त्यांनीं पसंत केलें. आणि समाजवादी विचाराच्या मुंबई कामगारांनीं आपली स्वतंत्र मिल-मजदूर-सभा काढली. समाजवादी पक्ष काँग्रेसमधून बाहेर पडला नव्हता त्या वेळच्या या घटना आहेत हें लक्षात ठेवलें पाहिजे.

या घटनांचा माझ्या मनावर विलक्षण परिणाम झाला काँग्रेसच्या पुढाऱ्यांची ही वृत्ति पाहून मला काँग्रेसचा वीट आला. वैचारिक मतभेद असले तरी केवळ सत्तेच्या राजकारणासाठीं असें केलें जावें हें मला पटलें नाहीं. स्वातंत्र्योत्तरच्या संक्रमणावस्थेंतून आपला देश जात होता. अशा वेळीं थोडे सबुरीनें घेणें आवश्यक होतें. सर्व गोष्टींचा सांगोपांग विचार होऊन निर्णय घेण्याची ती वेळ होती. परंतु पुढारीपणासाठीं घिसाडघाई झाली.

वैचारिक मतभेद तर सोडून द्या, परंतु या घटनांमुळें नैतिक दृष्ट्याच काँग्रेसबद्दल माझ्या मनांत अप्रीति उत्पन्न झाली. आम्ही तरुण मंडळी राजकारणांत उतरलों त्या वेळची मनःस्थिति नेमकी काय होती हें सांगणें कठिण आहे. आमच्या मनांत साहसाची, चमकण्याची, अगर पुढें येण्याची महत्त्वाकांक्षा होती. परंतु तीच एकमेव भावना नव्हती. देशसेवेची आकांक्षा-देखील आम्हांला पुढें ढकलीत होती. ही नैतिक प्रेरणा हळूंहळूं वृद्धिंगत होत गेली. राजकारण ही गोष्ट केवळ पुढें येण्यासाठीं आणि लोकप्रिय होण्यासाठीं नसून आपल्या नैतिक विकासाचें साधन म्हणून त्यांचा आम्ही स्वीकार केला

त्या मार्गावर प्रगति करीत राहिलों. काँग्रेसमध्यें राहिल्यानें इतःपर हें उद्दिष्ट साध्य होणार नाहीं अशी माझी खात्री पटली आणि समाजवादी पक्षानें काँग्रेसमध्यें राहूं नये या मताचा मी जोरानें पुरस्कार करूं लागलों. वैचारिक दृष्ट्यादेखील समाजवादी मंडळी याच निर्णयाला येऊन पोंहोंचली होतां. काँग्रेसचीं धोरणें लक्षांत घेतां समाजवादाची प्रस्थापना करण्याचें साधन म्हणून तिचा उपयोग होऊं शकणार नाहीं असेंच मत प्रभावी होत गेलें. तथापि, आमच्यापैकीं बऱ्याच मंडळींचा महात्माजींच्या कर्तृत्वावर विश्वास असल्यामुळें ते अजूनहि काँग्रेसचा कायापालट घडवून आणतील अशी त्यांना आशा वाटत होती. परंतु गांधीजींचा अमानुषपणें खून झाला आणि त्या आशा धुळीस मिळाल्या. काँग्रेसनेंदेखील आपली घटना बदलून समाजवादी पक्षाच्या अंतर्गत अस्तित्वास बंदी केली. काँग्रेसचें स्वरूप बदललें. ती आतां निरानिराळ्या मतांच्या लोकांची साम्राज्यविरोधी आघाडी राहिली नाहीं. तो एक पक्ष बनला. अर्थातच समाजवादी पक्षाला काँग्रेसबाहेर पडण्याखेरीज गत्यंतर उरलें नाहीं.

काँग्रेसमधून बाहेर पडणें म्हणजे एकाद्या राजप्रासादांतून अरण्यांत जाण्यासारखें होतें. परंतु माझ्यासारख्या शेंकडों लोकांची नैतिक आणि वैचारिक गरज त्यामुळें भागविली गेली आहे. काँग्रेसच्या छत्राखालीं राहून आतां आपली प्रगति होऊं शकत नाहीं अशी खात्री पटल्यावर बाहेर जाणें हेंच एक कर्तव्य होतें. एके काळीं काँग्रेसचें जसें संरक्षणछत्र होतें तसें संरक्षणछत्र देण्याची शक्ति आज समाजवादी पक्षाजवळ नाहीं. परंतु आज ना उद्यां समाजवादी पक्ष बळकट होईल, आपल्याला जो मार्ग सत्याचा वाटतो त्याप्रमाणें चालणाऱ्या लोकांची प्रगति होऊन समाजाचाहि त्यांत फायदा होईल, असा विश्वास मला वाटतो. सत्याच्या मार्गापासून समाजवादी पक्ष चळेल तर मात्र ही आशा फोल ठरेल. या मार्गांत धोका आहे हें मी मान्य करतों; परंतु देशांतील सर्व पुरोगामी आणि सत्याग्रही शक्तींना आपल्यामध्यें

सामावून घेण्याचें कार्य कॉंग्रेसकडून होऊं न शकल्यानें तो धोका पत्करून कॉंग्रेसमधून बाहेर पडणें आवश्यक होतें.

आम्ही कॉंग्रेसमधून बाहेर पडण्यानें समाजाचें देखील हित होईल असें वर म्हटलें आहे. त्याबद्दल जरा अधिक खुलासा करणें आवश्यक आहे. कॉंग्रस ही संस्था समाजवादाच्या प्रस्थापनेचें साधन होऊं शकत नाही असें इतर समाजवाद्यांप्रमाणें माझेंहि मत असलें तरी त्याचा अर्थ कॉंग्रेस आतां पूर्णपणें प्रतिगामी अगर हुकूमशाही बनली आहे असें नाहीं. बाहेर राहून आम्ही आपलें ऐतिहासिक कार्य पूर्ण करूं शकलों नाहीं, तर मात्र तसें होण्याचा धोका आहे.

आपल्या देशाला राजकीय स्वातंत्र्य मिळालें असलें तरी साम्राज्यशाहीच्या पकडींतून त्याची पूर्ण सुटका झाली असें म्हणतां येणार नाहीं. फाळणीमुळें आपल्या स्वातंत्र्यांत फारच मोठा उणेपणा आला आहे. ब्रिटिशांची कायदेशीर पकड सुटली परंतु साम्राज्यवादी अँग्लो-अमेरिकन भांडवलशाहीचे अदृश्य पाश आपल्याभोंवतीं गुंडाळले जात आहेत. हिंदुस्थानांतील सट्टेबाज, मक्तेदार, भांडवलवाले त्या कटांत सामील होत आहेत. या पाशांत हिंदी जनता अडकणार कीं काय असा प्रश्न आहे. तसें झाल्यास फार मोठी आपत्ति येणार आहे. मग महायुद्ध टळणार नाहीं. कोरिअन जनतेची जशी लांडगेतोड होत आहे तशीच आपली होण्याची शक्यता आहे.

या दृष्टीनें पाहतां गेलीं तीन वर्षें कॉंग्रेस सरकारचें आर्थिक धोरण उलट्या दिशेनें चालल्याचें आढळून येईल. जे सट्टेबाज भांडवलदार आपल्या ठेकेदारीच्या जोरावर कृत्रिम दुष्काळ पाडून आणि काळा बाजार करून जनतेला नागवीत आहेत त्यांनाच चुचकारण्याचा सरकारचा प्रयत्न चालूं आहे. हें धोरण कसें बदलावें हा प्रश्न आहे. आज कॉंग्रेसमध्यें जे लोक आहेत त्या सर्वांना हें धोरण पसंत आहे असें नाहीं. परंतु पसंत नसणारांची

शक्ति अत्यल्प आहे. समाजवादी मंडळी काँग्रेसमध्येंच राहिली असती तरी, त्यांची शक्ति या कामासाठीं पुरी पडली नसती, कारण, पक्षाचें विसर्जन करूनच त्यांना काँग्रेसमध्यें राहनां आलें असतें. काँग्रेसच्या बाहेर पडून श्रमजीवी जनतेचो संघटना करण्याचा प्रयत्न करणें याशिवाय त्यांच्यापाशीं दुसरा मार्गच नव्हता.

लोकशाहीच्या दृष्टीनें त्यांनीं केलें तें योग्यच केलें असें मला वाटतें. काँग्रेसचीं धोरणें चुकत असतील तर, जनमत आपल्या बाजूला करून घेऊन आपल्याला हवें तसें धोरण आंखलें पाहिजे. काँग्रेसच्या आजच्या धोरणानुसार जनतेचे प्रश्न सोडविण्यास ती असमर्थ आहे हें उघड दिसत आहे. जनतेला तें पटवून द्यावयाचें आहे. समाजवादी पक्ष आपल्या लोकशाही समाजवादाच्या धोरणाशीं एकनिष्ठ राहून कार्य करील, तर एक ऐतिहासिक गरज भागविण्याचें श्रेय त्याला मिळवितां येईल.

आपण ज्या लोकशाही पद्धतीचा अंगीकार केला आहे ती यशस्वी व्हावयाची असेल तर, देशांत किमान दोन संघटित राजकीय पक्षांची आवश्यकता आहे. शासनसंस्था ही दंडावर आधारलेली असते. म्हणजेच वेळप्रसंगीं हिंसेचा अवलंब करण्याची तिला कायदेशीर मुभा असते. ज्या प्रमाणांत लोकमत जागृत आणि संघटित असेल त्या प्रमाणांत हिंसेचा हा अंश कमी होत जाईल. देशांत विरोधी पक्ष नसेल तर अधिकारारूढ पक्षाची वृत्ति उत्तरोत्तर हुकूमशाही होत जाण्याचा फार संभव असतो. आजच्या परिस्थितींत काँग्रेस ज्या ध्येयांचा पुरस्कार करूं इच्छिते तीं सिद्ध व्हावयाचीं असल्यास लोकशाहीच्या तत्त्वावर आधारलेल्या एका विरोधी पक्षाची अत्यंत आवश्यकता आहे. या दृष्टीनेंच काँग्रेसनें विरोधी समाजवादी पक्षाचें महत्त्व लक्षांत घ्यावें असें मला वाटतें. तसें न होईल तर, देशांतील लोकशाहीविरोधी शक्ति बळावत जातील आणि लोकशाही आणि शुद्ध साधनें यांवर विश्वास ठेवणाऱ्या लोकांना दीर्घकाळपर्यंत नामशेष व्हावें लागेल.

समाजवादी पक्षाला देशांत लोकशाहीनिष्ठ समाजवादी समाजरचना निर्माण करावयाची आहे. तसें होईल तरच जनतेचे प्रश्न सुटतील. जनतेचें दास्य द्विविध आहे. आर्थिक दास्य आणि सामाजिक दास्य. केवळ राज्यसत्ता हातीं घेऊन हें प्रश्न सुटणार नाहींत. राज्यसत्ता हातीं आली तर आजचीं धोरणें बदलतां येतील; परंतु तेवढ्यानें लोकशाही समाजवादाची प्रस्थापना होणार नाहीं. त्यासाठीं जनतेमध्यें त्या ध्येयाबद्दल आकर्षण निर्माण झालें पाहिजे. त्याच्या निर्मितीसाठीं जाणीवपूर्वक परिश्रम करण्यास बहुसंख्य जनता आपखुशीनें सिद्ध होईल असें आपणांस करावयाचें आहे. म्हणून समाजवाद्यांनीं राजकारणाबरोबरच नवसमाजनिर्मितीच्या विधायक अंगावर भर दिला पाहिजे.

हा मार्ग बराच दूरचा आहे; कष्टाचा तर निश्चितच आहे. परंतु ज्या ध्येयाची उपासना समाजवाद्यांना करावयाची, त्यासाठीं तें अपरिहार्यच आहे. यावर असा एक प्रश्न विचारतां येण्यातारखा आहे कीं, हें सर्व होईपर्यंत जागतिक परिस्थिति तुम्हांला स्वस्थ बसूं देईल काय ? हा प्रश्न अगदीं सयुक्तिक आहे आणि त्या दृष्टीनेंच हिंदुस्थानच्या परराष्ट्रीय धोरणाचें मूल्यमापन केलें पाहिजे.

पंडित जवाहरलाल नेहरूंनीं अमेरिका आणि रशिया यांपैकीं कोणत्याच गटांत सामील व्हावयाचें नाहीं असें तटस्थतेचें धोरण आंखलें आहे. जागतिक वर्चस्वासाठीं आज दोन गटांत स्पर्धा चालूं आहे आणि त्यामुळें तिसऱ्या महायुद्धाची भीति निर्माण झाली आहे. महायुद्ध टळावें आणि यापैकीं कोणाचेंच वर्चस्व प्रस्थापित होऊं नये यासाठीं आशियांतील राष्ट्रांनीं आपलें तटस्थतेचें स्वतंत्र धोरण ठेवावें हेंच योग्य आहे. परंतु हें धोरण यशस्वी व्हावयाचें असेल तर, नुसतें स्वस्थ बसून भागणार नाहीं. स्वस्थ बसावयाचें म्हटलें तरी तें शक्यच नसतें. स्वस्थ बसणारे आपोआप या ना त्या गटांत

गोंधळें जातातच. उत्तर कोरियानें दक्षिण कोरियावर केलेल्या आक्रमणाचा विरोध करणाऱ्यांना आपण नैतिक पाठिंबा द्यावयास हरकत नाहीं; परंतु त्यांतील अमेरिकेचा डावहि आपण ओळखला पाहिजे. 'कम्युनिस्ट चीनला सिक्यूरिटी कौन्सिलमध्यें घ्या' हा आग्रह बरोबर आहे; पण तेवढ्यानें काम भागणार नाहीं. हिंदुस्थान आणि अन्य आशियाई राष्ट्रांत विद्यमान असलेली जुनाट समाजव्यवस्था बदलून काळाच्या हांकेला आपण ओ देणार कीं नाहीं असा प्रश्न आहे. दुसऱ्या महायुद्धाच्या वेळीं आपण म्हणालो कीं, हिंदुस्थान स्वतंत्र होईल तरच दोस्ताचे युद्धहेतु सिद्ध होतील. आजहि तीच परिस्थिति निराळ्या स्वरूपांत उभी आहे. हिंदुस्थानांत समाजक्रांन्ति होईल तरच जागतिक शांतता प्रस्थापित होऊं शकेल. कारण मग हिंदुस्थानाला आशियांतील राष्ट्रांचा एक प्रभावी गट निर्माण करतां येईल. जरा निराळ्या शब्दांत सांगावयाचें तर, पंडित जवाहरलाल नेहरूंची तटस्थता खऱ्या अर्थानें व्हावयास पाहिजे; आणि त्याची सुरुवात अंतर्गत धोरणापासूनच होणें आवश्यक आहे. हिंदी भांडवलदार आपली मक्तेदारी टिकविण्यासाठीं अँग्लो-अमेरिकन साम्राज्यवाद्यांच्या कच्छपीं लागले आहेत. देशाचा सत्यानाश करूं पाहणाऱ्या या भांडवलदारांना चुचकारण्याचें धोरण टाकून पंडितजींनीं जनतेचा खराखुरा पाठिंबा मिळविला पाहिजे. आपल्या व्याख्यानाला लक्षावधि लोक येतात एवढ्यावरून आपल्याला जनतेचा पाठिंबा आहे असें त्यांनीं मानूं नये. जनतेचा क्रियाशील पाठिंबा मिळविल्याशिवाय तटस्थतेचें हें धोरण यशस्वी होणार नाहीं. अन्न, वस्त्र आणि घर या जनतेच्या तांतडीच्या गरजा आहेत त्या भागविण्यासाठीं भांडवलदारी व्यवस्थेवर विसंबून राहिल्यास ते प्रश्न सुटण्याऐवजीं अधिकच बिकट होण्याची शक्यता आहे. त्यासाठीं मूलभूत धंद्यांचें राष्ट्रीयीकरण करून योजनाबद्ध अर्थव्यवस्थेचा पाया घातला पाहिजे. आर्थिक धोरणांत असा मूलभूत बदल केल्यास भांडवलदारवर्गाचा पाठिंबा आपल्याला मिळणार नाहीं आणि देशांत बेबंदशाही माजेल असा

युक्तिवाद केला जाणें शक्य आहे. परंतु तो बरोबर नाहीं. १९४२ सालीं देखील बेबंदशाहीचें बुजगावणें आपल्यापुढें करण्यांत आलें होतें. परंतु आपण त्याची पर्वा केली नाहीं. आजची परिस्थिति तर त्याहून पुष्कळच अनुकूल कारण राज्याची सूत्रें आपल्या हातीं आहेत. राज्यसत्तेचा उपयोग करून बेबंदशाही माजवूं पहाणाऱ्या प्रतिगामी शक्तींचा बीमोड करणें सहज शक्य आहे. अशा क्रान्तिकारक धोरणाचा पाठपुरावा जर आमचे पंतप्रधान करतील तर त्यांना समाजवादी पक्षाचें सहकार्य मागण्याचा हक्क प्राप्त होईल आणि जनतेचा उत्स्फूर्त पाठिंबा मिळूं शकेल. लोकशाहीचें आणि जागतिक शांततेचें आपलें ध्येय पूर्ण व्हावें असें वाटत असेल तर पंतप्रधानांनीं आत्मविश्वासपूर्वक आणि धडाडीनें पुढें येऊन जनतेला हा नवा मार्ग दाखविला पाहिजे.

काँग्रेसकडून आजच्या घटकेला या अपेक्षा करणें वेडेपणाचें ठरेल. परंतु परिस्थितीची निकड लक्षांत घेतली जावो आणि असें कांहीं तरी घडो अशी इच्छा आहे.

काँग्रेसनें केलें नाहीं तरी जनतेनें हात जोडून स्वस्थ बसावयाचें नाहीं. त्या दृष्टीनेंच समाजवादी पक्षाचें फार महत्त्व आहे. काँग्रेसचा विरोधी पक्ष म्हणून त्याला अत्यंत मोठी कामगिरी बजावावयाची आहे. आपल्या लढाऊ व विधायक कार्यक्रमाच्या द्वारां जनतेचा पाठिंबा त्यानें मिळविला पाहिजे. जें ध्येय त्यानें आपल्या डोळ्यापुढें ठेवलें आहे त्यासाठीं सतत परिश्रम करावयास हवेत. दुसऱ्यांनीं काय करावयास हवें याची मीमांसा करीत बसून भागणार नाहीं. आपण आपलें कर्तव्य बजावलें तर दुसरेहि त्यांचीं कर्तव्यें पार पाडतील, अशा निष्ठेनें कार्य केलें पाहिजे. समाजवादाच्या दृष्टीनें काल अनुकूल आहे. इतःपर भांडवलशाही समाजरचना टिकून राहू शकत नाहीं. आपल्या तत्त्वांशीं एकनिष्ठ राहून आपल्या ध्येयमार्गावर खंबीरपणें पावलें टाकीत पुढें गेल्यास समाजवादी पक्षाला त्याचें अवतारकार्य निश्चितपणें पूर्ण करतां येईल अशी माझी धारणा आहे.

◆ ◆ ◆

४. संयुक्त महाराष्ट्र :

एसेमनी आपले विचार मांडतांना आपली निष्ठा कधींहि सोडली नाहीं आणि अन्याय मग तो कितीहि मोठ्या व्यक्तींकडून वा पक्षाकडून झालेला असो, त्याच्या प्राणपणानें प्रतिकार केला याचें मूर्तिमंत उदाहरण म्हणून संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याचे त्यांनीं केलेले नेतृत्व होय. तरीहि केवळ एक भाषिक राज्याची हेतुतः डावलली गेलेली मागणी येवढ्याच दृष्टीनें ते त्या मागणीकडे बघत नव्हते. त्यांनीं त्या मागणींतहि हा लढा लोकशाही विरुद्ध हुकूमशाही, तत्त्व विरुद्ध सांधिसाधुपणा आणि सत्य विरुद्ध असत्य असल्याचें मनोगत मांडलें होतें. महाराष्ट्राविरुद्ध जे निंद्य प्रचार झाले ते खरें ठरलें तर वाटेल ती शिक्षा भोगण्याचें आव्हान दिलें होतें. बहुजन समाजाच्या हितासाठींच त्यांनीं महाराष्ट्राचा लढा दिला. तो इतका गाजला कीं, एस एम. ही आद्याक्षरें हीच संयुक्त महाराष्ट्राची आद्याक्षरें झाली. विधायक विरोध प्रखर रीतीनें करूनहि किती संयम पाळतां येतो हें त्यांनीं या लढ्यांत सिद्ध केलें आणि संयुक्त महाराष्ट्र आला कीं संपलें असें म्हणतां कामा नये हेंहि वेळोवेळीं बजावलें. संयुक्त महाराष्ट्र ही नुसती राजकीय मागणी नव्हे तर तो एक धर्म झाला पाहिजे. त्यांतून 'समता वर्तावी, अहंता खंडावी' असें व्हावें, आर्थिक विकासाची निकोप स्पर्धा निर्माण व्हावी, सामुदायिक नेतृत्व निर्माण व्हावें, जातीयवाद नष्ट व्हावा हें त्यांचें स्वप्न होतें. संयुक्त महाराष्टाचा मंगल कलश हा रिकामा, बाहेरून फक्त चकाकणारा नसावा, तर तो विशुद्ध कल्पना आणि सामाजिक समतेच्या व न्यायाच्या गंगोदकानें भरलेला पाहिजे यासाठीं त्यांनीं तें नेतृत्व घेतलें. तें भागिरथीजल भरण्यासाठीं भगीरथ प्रयत्न करण्याचें त्यांनीं

तरुणांना आवाहन केलें. संयुक्त महाराष्ट्र होऊन आतां चार वर्षें होऊन गेलीं आहेत, पण महाराष्ट्रांतील परिस्थिति 'घट तिचा रिकामा झन्यावरी' अशीच राहिली आहे. संयुक्त महाराष्ट्र म्हणजे सव्वीस जिल्ह्यांचें एकत्रीकरण नव्हे, तर एका नवीन प्रेरणेचा जन्म आहे व त्या भावनेनें तो जोपासला गेला पाहिजे. लढ्याच्या यशापूर्वीच त्यांनीं हें विचार अनेकदां लोकांपुढें मांडलें. पुढील कांहीं पानांवरून या मागणीचा मूलतः हेतु व दृष्टिकोन काय आणि असा लढा देतांना पथ्यें कुठलीं पाळावीं लागतात याचें सम्यक् दर्शन होऊं शकेल.

◆ ◆ ◆

संयुक्त महाराष्ट्र

दोन भाषणे : १३, १४ जुलै १९५७

संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नाबाबत राज्यपुनर्रचनामंडळ व सरकार यांनीं मराठी जनतेवर अन्याय केला आहे. हिंदु, हिंदुस्थान स्टॅन्डर्ड, हितवाद, स्टेट्समन... आदि अनेक स्वतंत्र दर्जाच्या, अखिल भारतीय प्रसार असलेल्या प्रतिष्ठित वृत्तपत्रांनीं आपली मागणी न्याय्य असल्याची ग्वाही दिली. परदेशी वृत्तपत्रांनींहि महाराष्ट्राच्या मागणीची न्याय्यता मान्य केली आहे. राज्यकर्त्यांपैकींहि कांहींना ही जाणीव असण्याची शक्यता आहे. राज्यपुनर्रचना मंडळानें संयुक्त महाराष्ट्र परिषदेनें मांडलेल्या भूमिकेची वाहवा केली. आम्ही असें अभिमानानें म्हणूं शकतों कीं, आमच्याच निवेदनांत राष्ट्रीय दृष्टीनें कांहीं मूलभूत तत्त्वांचा उद्घोष करण्यांत आला होता. हीं तत्त्वें केवळ महाराष्ट्रासाठीं नव्हे तर साऱ्या भारतासाठीं लागू करावी असें सुचविलें होतें. इतकें असूनहि महाराष्ट्रावरच घोर अन्याय करण्यांत आला. त्यामुळें जनता प्रक्षुब्ध व अन्यायाचा प्रतिकार करण्यास उद्युक्त झाली- हें जनतेच्या जिवन्तपणाचेंच लक्षण आहे. जनता आपल्यावरील अन्यायाचा प्रतिकार करण्यास सिद्ध झाली, तर त्यांत वावगें काय झालें ?

संयुक्त महाराष्ट्राच्या कार्यकर्त्यांनीं राज्यपुनर्रचनेचें प्रतिवृत्त प्रसिद्ध झाल्या' नंतर सर्व दृष्टींनीं विचार करून जनतेचें पुरेसें मार्गदर्शन केलें नाहीं, ही गोष्ट कबूल केली पाहिजे. नेत्यांच्या मार्गदर्शनाच्या अभावी लोकांनीं सुचेल त्या

मार्गानें अन्यायाचा प्रतिकार केला. मुंबईत पोलिसांनीं अमानुष अत्याचार केले. ४६० वेळां गोळीबार झाला. १०० वर माणसें ठार आणि कित्येक जखमी झालीं. लोकांकडूनहि मारहाणीचें, लुटालुटीचें अनुचित प्रकार तुरळक घडले. याचा परिणाम काय झाला ? या अनुचित प्रकारांकडे बोट दाखवून सरकारनें आपल्या अन्यायाचें समर्थन केलें. मुंबई कां दिली नाहीं, यांचें कारण म्हणून या घटनांचा सर्रास वापर करण्यांत आला. उत्तर प्रदेशाच्या 'पायोनियर' या वृत्तपत्रानें सरकारी भूमिकेवर यथार्थ टीका केली. तें पत्र म्हणतें : "जी वस्तु आपली आहे ती दगड मारून घेऊं नये हें खरें, पण त्याचबरोबर जी वस्तु दुसऱ्याची आहे ती घेऊं नये हेंहि तितकेंच खरें."

सरकारनें महाराष्ट्राचें जें हक्काचें आहे तें दिलें नाहीं. उलट महाराष्ट्राची देशभर बदनामी केली. ही बदनामी करण्यांत लब्धप्रतिष्ठित लोकांनींहि भाग घेतला. 'महाराष्ट्राकडून कांहीं प्रमाद झाला असें नव्हे, तर महाराष्ट्राचा हा स्वभावधर्म आहे' असेंहि म्हणण्यापर्यंत कांहींची मजल गेली !

या प्रचाराचा परिणाम वाईट झाला. महाराष्ट्राची जनता विफलतेच्या खोल गर्तेत पडली. पक्ष-शिस्तीचा बडगा डोक्यावर आला म्हणून म्हणा, किंवा विरोधी शक्तींचा प्रचार फार म्हणून म्हणा, काँग्रेसच्या पुढाऱ्यांनीं रणांगण सोडलें. जनतेचा आत्मविश्वास तुटला. राज्यकर्त्यांनीं या परिस्थितीचा पुरेपूर फायदा घेतला. "काँग्रेसचे प्रतिनिधि हे जनतेनें निवडून दिलें आहेत. त्यांनीं केंद्रशासित मुंबईचा पर्याय मान्य केला. त्यांत आमचा काय दोष ?" असा मुत्सद्दी पवित्रा केंद्र सरकारनें घेतला.

जनतेचा आत्मविश्वास स्थिर केला पाहिजे, तिच्यांत नव्यानें झालेली जागृति वायां जाऊं देतां कामा नये, या भावनेनें काँग्रेसेतर पक्षांनीं संयुक्त महाराष्ट्र समिति स्थापन केली. या समितीनें सर्व पक्षांच्या वतीनें सरकारकडे पुढील कैफियत मांडली. "सरकारनें राज्यपुर्रचनेचा प्रश्न हा केवळ पक्षीय प्रश्न

केला, ही सरकारची फार मोठी चूक झाली. जनतेनें या प्रश्नावर सरकार निबद्रून दिलें नाहीं. हा प्रश्न राष्ट्रीय आहे; तो त्या पातळीवरच सोडविला पाहिजे. म्हणून सरकारनें सर्व पक्षांची गोलमेज परिषद बोलावून ह्या प्रश्नाचा फैसला करावा, अन्यथा संयुक्त महाराष्ट्र समितीला सत्याग्रहाचा मार्ग चोखाळण्या-वांचून गत्यंतर नाहीं. सत्याग्रह करण्याची पाळी येऊं नये व हा प्रश्न वाटाघाटींच्या व सलोख्याच्या मार्गानें सुटावा, अशी आमचीहि इच्छा आहे." आचार्य नरेंद्र देवांनी अखेरीस हींच इच्छा प्रकट केली होती. त्यांच्या इच्छेप्रमाणें जयप्रकाशजींनीं दिल्लीतील बड्या नेत्यांच्या भेटीगांठीं घेतल्या. पण त्यांतून कांहींच निष्पन्न होऊं शकलें नाहीं. जयप्रकाशजींसारख्यांची मध्यस्थीहि वायां गेली.

राज्यकर्त्यांनीं समितीच्या आवाहनाचा मुळींच विचार केला नाहीं. शेवटीं सत्याग्रह झाला. झाला तो प्रचंड प्रमाणांवर आणि आश्चर्य हें कीं, ग्रामीण जनतेनें या सत्याग्रहाला 'न भूतो' अशी साथ दिली. लहान-थोर, स्त्री-पुरुष, म्हातारे-कोतारे .. सारे या लढ्यांत सामील झाले. एरवीं ज्या स्त्रियांचीं नखें दिसणार नाहींत अशा मराठी सरदार घराण्यांतील स्त्रिया सत्याग्रही म्हणून पुढें येऊं लागल्या. खरोखरच हा जनतेचा लढा झाला. संयुक्त महाराष्ट्र समिति ही निमित्तमात्र होती. तर्सें पाहिलें तर समितीनें काय केलें ! तिनें जनतेच्या मनांतील तीव्र भावना ओळखल्या. त्यांच्याशीं ती सहमत झाली. केलें सारें जनतेनें. समिति जनतेच्या आकांक्षांची प्रतिनिधि झाली एवढेंच. जनतेंत या प्रश्नावर एवढी जागृति झाली कीं, आज महाराष्ट्रांत काँग्रेसनेत्यांना सभा घेणें अशक्य झालें काँग्रेस श्रेष्ठींनाहि याची जाणीव झाली कीं, या प्रश्नावर महाराष्ट्र काँग्रेस जनतेचें प्रतिनिधित्व करीत नाहीं. सरकारनें गोलमेज-परिषदेची मागणी धुडकावून लावली पण निदान लोकशाही उदारता दाखवून काँग्रेसनें विधिमंडळांतील काँग्रेसजनांना आपले विचार बोलून दाखवण्याचें व त्यानुसार मत देण्याचें स्वातंत्र्य तरी द्यावें, अशी मागणी सर्व लोकशाहीवाद्यांनीं केली. पण काँग्रेसनें तेंहि मान्य केलें नाहीं.

अन्यायाच्या प्रतिकारासाठीं सत्याग्रह सुरू झाला. हा सत्याग्रह व्यापक प्रमाणावर झाला. आज आपल्यापुढें प्रश्न असा आहे कीं, या सत्याग्रहाची मर्यादा काय ? त्याची परिणति कशांत होणार ? महाराष्ट्रावर एवढा घोर अन्याय कां करण्यांत आला ? आपल्यांत कांहीं उणीवा आहेत कां ? त्या दूर करण्यासाठीं आपण काय करणार ? या प्रश्नांचीं उत्तरें प्रामाणिकपणें आपण दिलीं नाहींत तर जनतेंत झालेली जागृति वायां जाईल.

सत्याग्रहासंबंधीं दोन विरुद्ध टोकांचीं मतें व्यक्त करण्यांत येतात. हें आपलें लोकशाही राज्य आहे. लोकांनीं निवडून दिलेल्या प्रतिनिधींचें सरकार आहे. त्यामुळें तत्त्वतः अशा राज्यांत सत्याग्रहाला स्थानच नाहीं, असें कोणी सांगतात.

हा विचार मोठा भ्रामक आहे लोकशाही मार्गानीं निवडून दिलेले प्रतिनिधि संयुक्त महाराष्ट्रासारख्या जीवनमरणाच्या प्रश्नावर जनतेचें यथार्थ प्रतिनिधित्व करीत नाहींत; त्यांचें मत प्रदर्शित करूं शकत नाहींत, अशा वेळीं मग काय करायचें ? लोकशाहींत त्याला उपाय आहे. अस्तित्वांत असलेलें विधिमंडळ बरखास्त करून नव्या प्रश्नावर जनतेचा कौल घेणें आम्हीं विधिमंडळाचे राजीनामे दिले ते याच भावनेनें. परंतु नव्या निवडणुका घेऊन जनमत अजमाविण्याची तयारी सरकारनें दाखविली नाहीं. मुंबई कॉर्पोरेशननें मुंबईचा महाराष्ट्रांत समावेश करावा असा दिलेला कौलहि सरकारनें लाथाडला. कॉर्पोरेशनच्या संयुक्त महाराष्ट्रवादी सभासदांनीं राजीनामें दिल्यानंतर कॉर्पोरेशनच्या नव्या निवडणुका घेऊन सरकारला जनमताची कदर दाखवितां आली असती. परंतु असेंब्लींत या प्रश्नाबाबत लोकमताचें प्रतिनिधित्व करूं न शकणाऱ्या सभासदाच्या संख्याबलावर, कॉर्पोरेशनमधील राजीनामे दिलेल्या सभासदांच्या जागा निवडणुका घेऊन न भरतां तसाच लांडा कारभार हांकण्याची मुभा देणारा कायदा पास करून घेण्यांत आला. अशाप्रकारें लोकमताची दखल घेण्याचे सरकारनें नाकारल्यामुळें सत्याग्रह

करण्याशिवाय तरणोपायच उरला नाहीं. सत्याग्रहानें या प्रश्नाबाबत जनतेचे मत किती तीव्र आहे, हें दाखवून देण्याचें अतिशय विधायक काम केलें लोकशाही अधिक परिणामकारक व विशुद्ध करण्याचे एक साधन म्हणून सत्याग्रहाकडे पाहण्याचा हा एक दृष्टिकोन झाला.

दुसरें कांहीं, केवळ सेफ्टी व्हॉल्व म्हणून सत्याग्रहाची हेटाळणी करतात. या मतानुसार सत्याग्रह इतका तीव्र झाला पाहिजे कीं, सरकार उलथून पडावें. संयुक्त महाराष्ट्र समितीच्या सत्याग्रहाला हा विचार मुळींच अभिप्रेत नाहीं. आपण भारतीय घटनेचें छत्र मानतों आणि तिचाच एक अविभाज्य घटक म्हणून संयुक्त महाराष्ट्राची मागणी करीत आहों, हें विसरतां कामा नये. हा विचार मान्य असेल तर सत्याग्रहाकडे राज्ययंत्र उलथून टाकण्याचें साधन म्हणून पाहणें अयोग्य ठरेल.

श्री. शंकरराव देव म्हणतात : 'सत्याग्रह्याला राग येतां कामा नये.' आम्ही असें मानतों कीं, सत्याग्रह हें सामान्य मनुष्याला (Common man) देखील वापरतां येईल असें प्रतिकाराचें साधन आहे. सामान्य मनुष्याला राग येणारच. तो स्थितप्रज्ञ झाला असेल तर त्याला राग येणार नाहीं. पण स्थितप्रज्ञाच्या डोक्यांत सत्याग्रहाचा विचार तरी येईल किंवा काय, हाहि एक विवाद्य प्रश्न आहे.

जनशक्ति हा आपला खरा आधार आहे. सार्वत्रिक निवडणुकींत या शक्तीचें मत काय आहे तें आपण अजमावूं. महाराष्ट्रीय जनतेनें आपल्याला नापास केलें तर आपण असें मानलें पाहिजे कीं, संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर तिच्या वतीनें आपण बोलूं शकत नाहीं. म्हणून आपल्या मार्गाची परिणति कशांत करावयाची आहे, याचा बारकाईनें विचार केला पाहिजे. आपली वैचारिक भूमिका तयार करतांना आपण अशी खबरदारी घेतली पाहिजे कीं, त्याचा जनतेवर अनिष्ट परिणाम होणार नाहीं.

आतां महत्त्वाचा प्रश्न असा कीं, राज्यकर्ते हा अन्याय करायला प्रवृत्त कां झाले ! याची कांहीं मीमांसा शक्य आहे का ! मी एक समाजवादी या नात्याने असें मानतो कीं, मोठ्या सामाजिक घटनांमागें कांही वर्गीय संघर्ष असतो. आज तीन कोटि महाराष्ट्रीय दबळून निघाले आहेत. सरकारनें एवढी दडपशाही केली तरी जनता दबून गेली नाहीं. एवढी ईर्षा, एवढा संताप, एवढी विराट शक्ति. . . याचा कांहीं वर्गीय अन्वयार्थ आहे का ? या प्रश्नाचें उत्तर इतकें सोपें नाहीं

सरकारनें अन्याय कां केला, करायला धजलेंच कसें, याचें अनेक दृष्टींनी स्पष्टीकरण देतां येण्यासारखें आहे :

(१) या अन्यायामागें भांडवलदारांची आसक्ति आहे. तीहि एक वर्ग-भावना आहे आमच्या भांडवलानें, आमच्या व्यवसायकौशल्यानें, एन्टरप्राइझनें आम्ही मुंबई उभी केली तेव्हां मुंबईच्या दागिना आमच्या अंगावरच शोभला पाहिजे, तो आम्हीं कुणाला देणार नाहीं, असें भांडवलदार मानतात. भांडवल-दारांच्या हट्टापुढें सरकार नमलें आहे.

(२) भारताच्या पुढाऱ्यांचे महाराष्ट्राबद्दल कांही पूर्वग्रह आहेत. महाराष्ट्रीय लोक अर्बुज आहेत; लायक नाहींत. तेव्हां त्यांच्यावर मुंबईचा कारभार सोंपवून चालणार नाहीं, असें ते म्हणतात.

(३) महाराष्ट्राला प्रभावी व एकजिनसी नेतृत्व नाहीं. पांच नेत्यांचीं पांच मतें, अशी नेतृत्वाची शोचनीय अवस्था आहे.

महाराष्ट्राला मुंबई न देण्यांत जो अन्याय घडला आहे त्याची तीन संभाव्य कारणें कोणतीं तीं आपण पाहिलीं. भांडवलदार वर्गाची आसक्ति वाटत असल्यानें सरकारनें मुंबई महाराष्ट्रापासून वेगळी कढली, असें आपण म्हणतों. पण भांडवलदारांची तरी सरकारला आसक्ति कां वाटली आणि भांडवलदारांपुढें

सरकार कां नमलें, याचाहि आपण अधिक खोलवर विचार केला पाहिजे. सरकारला उत्पादनवाढ हवी आहे. उत्पादनवाढीच्या कार्यांत मांडवलदार आज अधिक उपयुक्त ठरणार आहे, असें सरकारला वाटतें. त्यामुळें सरकारनें मुंबई वगेळी काढली. येथेंच दुसरा एक मूलभूत मुद्दा उपस्थित होतो. तो म्हणजे लोकशाही आणि योजना यांच्या संबंधाचा. लोकशाही मार्गांनीं योजना यशस्वी करतां येईल का ? भारतीय गणराज्याच्या घटनेनें दिलेल्या मूलभूत हक्कांचा अपहार न करतां, उत्पादनवाढ करतां येईल का ?

नियोजकांचा भर ताबडतोबीच्या उत्पादनवाढीवर आहे. त्यामुळें ज्या मागासलेल्या भागांत ताबडतोब उत्पादनवाढ होण्याची शक्यता नाहीं, अशा भागांत सरकार सध्यां विशेष कांहींहि करूं इच्छीत नाहीं. योजनेचा भर उत्पादनवाढीवर असल्यामुळें मागासलेल्या भागांकडे अधिक लक्ष देण्यासाठीं जास्त पैसा खर्च करण्याचा सरकारची तयारी नाहीं. उत्पादनवाढीची योजना यशस्वी व्हावयाची तर उत्पादनवाढीच्या दृष्टीनें जेथें पैसा खर्च करणें किफायतशीर ठरेल तेथेंच योजनांचा भर असणार. महाराष्ट्र प्रदेश हा दरिद्री असल्यामुळें त्याच्याकडून उत्पादनवाढीची अपेक्षा करतां येत नाहीं व म्हणून तो भाग उपेक्षितच राहिला आहे. पश्चिम महाराष्ट्रांतील जेमतेम चार टक्के जमीन पाण्याखालीं आहे. शहाण्णव टक्के जमीन कसणारे शेतकरी आकाशाकडे डोळे लावून बसलेले असतात. येथें कांहीं भाग असा आहे कीं, चारपैकीं तीन वर्षें अवर्षणामुळें तेथें दुष्काळच असतो. अशा परिस्थितींतील शेतकरी प्रारब्धावर विसंबून राहणारा, दैववादी बनला तर नवल नाहीं. अर्धपोटीं शेतकरी जेव्हां खंडोबा म्हणजेच नवस करतो आणि कौल लावतो तेव्हां आपण शहरी लोक त्यांचा उपहास करतों, पण त्यांच्या या मनोवृत्तीच्या पाठीमागील कार्यकारणभाव आपण समजावून घेतला पाहिजे. या लोकांना प्रारब्धवादांतून प्रयत्नवादाकडे वळवायचें तर ताबडतोबीच्या उत्पादनवाढीकडे थोडें दुर्लक्ष करून त्यांच्याकडे अधिक लक्ष दिलें पाहिजे. परंतु जनशक्ति जागृत

केल्यामुळें 'होणाऱ्या उत्पादनवाढीपेक्षां पंडित नेहरूंना भांडवलदारांच्या उत्पादनवाढींतील साहाय्याची अधिक मातब्बरी वाटते. ज्यांच्या हातीं उद्योगधंदे आहेत त्या भांडवलदारांना दुखवून भागणार नाहीं, या भावनेपायीं पंडित नेहरूंनीं मुंबई महाराष्ट्रापासून वेगळी ठेवण्याचा त्यांचा 'जांवई हट्ट' पुरविण्याचें ठरविले. सबंध देशाचा केवळ उत्पादनवाढीच्या दृष्टीनें विचार केला म्हणजे त्यांतून अशा प्रकारचें सामाजिक अन्याय निर्माण होतात. भांडवलदारांचा हट्ट पुरविणें हा उत्पादनावर भर देणाऱ्या योजनेचा अपरिहार्य परिणाम आहे. म्हणून ज्याच्या पाठीशीं भांडवलदार वर्ग नाहीं अशा महाराष्ट्रावर अन्याय करण्यास सरकार बिनदिक्कत तयार झालें. महाराष्ट्राचें या बाबतींत दौर्बल्य आणिउत्पादनवाढीवर भर देणारें सरकारी धोरण यांतूनच मुंबईबाबतच्या अन्यायाची निर्मिति झालेली आहे.

एकीकडे सरकार समाजवादाच्या घोषणा करून दुसरीकडे गरीब जनतेवर अन्याय करीत आहे. सरकारचीं धोरणें प्रतिगामी व भांडवलदारांना अनुकूल आहेत, असें आपण म्हणतों परंतु दुसऱ्याला अशीं विशेषणें लावतांना आपण आत्मपरीक्षणहि केलें पाहिजे. आपलें धोरण धनिकांना अनुकूल आणि प्रतिगामी नाहीं ना, हें आपण तपासलें पाहिजे. याच दृष्टीनें संयुक्त महाराष्ट्राच्या पार्श्वभूमीवर भूदानाचें काम करणें शक्य आहे आणि केलें पाहिजे असें मी म्हणतों. जो न्याय सरकारनें महाराष्ट्राला द्यावा, असें आपण म्हणतों, तोच न्याय महाराष्ट्रानें आपल्या समाजांतील इतरानाहि दिला पाहिजे. सरकार ज्याप्रमाणें उत्पादन वाढीवर लक्ष देतें त्याचप्रमाणें आपल्याहि समाजांत घडत नाहीं ना, हें आपण पाहिलें पाहिजे. भूमिहीनांना निर्वाहासाठीं किमान जमीन आज हवी आहे. महाराष्ट्रांतील अशा भूमिहीनांना आपण जमीन दिली का ? जमीनदारांकडे जी जमीन आहे ती भूमिहीनांना विनामोबदला द्यावी, असा कायदा येथें कां झाला नाहीं ? त्यामागेंहि उत्पादनासंबंधींचें आपलें धोरणच आहे. जमीनदार आणि मोठे शेतकरी यांच्याजवळ असलेली जमीन, आदिवासी,

हरिजन आणि इतर भूमिहीन यांना वांटून दिली तर त्या दीनदलितांचा त्यावर निर्वाह होईल, पण अधिक उत्पादनासाठीं आवश्यक भांडवल ते जमिनींत गुंतवूं शकत नसल्यामुळें उत्पादनवाढ मात्र होणार नाहीं, अशी भीतिच जमीन वांटून देण्याच्या आड येत आहे. म्हणजे आपणहि उत्पादन-वाढीलाच अधिक महत्त्व देतो. उत्पादन वाढीलाच महत्त्व देणाऱ्या पंडितजींच्या धोरणापेक्षां हें धोरण कांहीं वेगळें म्हणतां येणार नाहीं. महाराष्ट्रीय आपल्या प्रदेशातील आदिवासी भूमिहीनांना ज्या तऱ्हेनें वागवितात, त्याच न्यायानें मुंबईबाबत भांडवलदारवर्ग व सरकार महाराष्ट्राला वागवीत आहे. ते महाराष्ट्राला या प्रश्नापुरते आदिवासीच मानीत आहेत. जो न्याय आपण मागतो तो न्याय आपणहि इतरांना द्यायला तयार असलें पाहिजे. म्हणून मी संयुक्त महाराष्ट्रवादी जमीनदार व मोठे शेतकरी यांना सांगेन कीं, मुंबई-बाबतचा अन्याय आपल्याला निवारण करावयाचा असेल तर, आपल्या शेजारच्या भूमिहीनांवरील अन्याय निवारण करण्यास तयार झालें पाहिजे. संयुक्त महाराष्ट्राच्या पार्श्वभूमीवर भूदानाचें काम करणें शक्य आहे, असें मी म्हणतों तें या अर्थानें.

महाराष्ट्रासंबंधीं इतरांच्या मनांत दूषित पूर्वग्रह कां आहेत, त्याचाहि शोध आपण घेतला पाहिजे. हे दूषित पूर्वग्रह काहीं अंशीं इतिहासांतून व कांहीं अंशीं महाराष्ट्रावर अन्याय करणारांच्या प्रचारकौशल्यांतून निर्माण झालेले आहेत. महाराष्ट्रावर अन्याय झाल्यामुळें येथील जनतेंत प्रक्षोभ निर्माण झाला. संयुक्त महाराष्ट्राच्या प्रस्थापनेची जाहीर ग्वाही देणारे त्या वेळचे अग्रणी रणांगणांतून अंतर्धान पावले होते. वेळींच योग्य मार्गदर्शन न मिळाल्यानें जनतेनें सुचेल त्या मार्गानें अन्यायाबद्दलची आपली चीड व्यक्त केली. त्या वेळीं जे तुरळक अनुचित प्रकार झाले त्यांचें भांडवल करून, 'हे मराठी लोक अतिच रानटी, अर्बुज आहेत. त्यामुळें त्याच्या हातीं मुंबई देणें घातक ठरेल. त्यांची मुंबईबाबतची मागणी मान्य करतां कामा नये, असें सांगून

अन्या'यावर मुलामा चढवून त्याचें समर्थन करण्यांत आलें. पंडित नेहरू सोळा जानेवारीच्या प्रकारानंतर म्हणाले, 'पूर्वी मुंबई महाराष्ट्राला न देण्याचीं कांहीं थोडीं कारणें असतील, तर आतां हजारों कारणें आहेत!' हा ह्या प्रचाराचाच एक भाग किंवा फार तर परिणाम, असें म्हणतां येईल. आमचें यावर म्हणणें इतकेंच कीं, हजारों कारणांचें तर जाऊं द्या पण पूर्वीचीं महाराष्ट्राला मुंबई न देण्याची जीं थोडीं कारणें आहेत तीं तरी आम्हांला कळूं द्या. महाराष्ट्राबद्दलचा हा दूषित प्रचार आपण संपूर्णपणें थांबवूं शकूं, असें नाहीं. पण अशा अपप्रचाराला आपल्याकडून कांहींहि निमित्त मिळूं नये, अशी दक्षता आपण घेतली पाहिजे. संयुक्त महाराष्ट्र समितीने चळवळीचें नेतृत्व घेतल्यानंतर अशा तऱ्हेचे प्रकार घडले नाहींत, व अशा तऱ्हेचा प्रकार मुळींच होणार नाहीं, असेंच चळवळींतील प्रकाराचें स्वरूपहि असलें पाहिजे.

गांधीजींच्या खुनाची नैतिक जबाबदारी हिंदुत्वनिष्ठांनीं गांधीजींच्या विरुद्ध केलेल्या प्रचारामुळें जर त्यांच्यावर टाकण्यांत आली तर संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळींत अनिष्ट प्रकार झाल्यास त्याचीहि जबाबदारी संयुक्त महाराष्ट्राचा प्रचार करणारांवर कोणी टाकूं शकेल. म्हणून आपण प्रचाराच्या बाबतींत अधिक दक्षता बाळगली पाहिजे. संयुक्त महाराष्ट्राचा प्रचार हा शुद्ध आणि तत्त्वाधिष्ठित असला पाहिजे. त्यांत अन्यायाबद्दलची चीड व्यक्त झाली तरी कोणत्याहि समाजाबद्दल द्वेष असतां कामा नये. प्रचार व्यक्तिनिरपेक्ष असावा आणि त्याची तात्त्विक बाजूच लोकांच्या मनावर बिंबवली पाहिजे. आपण भारतीय समाजाचे घटक आहोंत आणि भारतीय घटनेच्या छत्राखालींच नांदणार आहोंत, ही अखिल भारतीय दृष्टि विसरतां कामा नये. आपण केलेला प्रचार हा आपल्यावर उलटतां कामा नये. आपल्या विरोधकांच्या हातचें तें शस्त्र बनतां कामा नये. 'या लोकांचें मन किती घाणेरडें आणि हीन आहे पहा' असें म्हणून आपल्या प्रचाराचे उतारे आपले विरोधक उद्धृत करणार नाहींत, इतकी जबाबदारीची जाणीव प्रचार करतांना आपण

टेवली पाहिजे. महाराष्ट्राची निर्मिति मराठी रसवंतीनेंहि होणार आहे. शब्दांनीं आपण मराठो मनें घडवणार आहोंत आणि त्यांतूनच उद्यांचा महाराष्ट्र आकार घेणार आहे. नवमहाराष्ट्राचें मंदिर मांगल्यपूर्ण असेल तरच महाराष्ट्र सामर्थ्यशाली होईल.

आपल्यावरील अन्यायाची तात्त्विक भूमिका आपण पुढें मांडली तर आपल्यासंबंधींचे पूर्वग्रह आपण बऱ्याच अंशीं दूर करूं शकूं. मराठी लोक केवळ हटवादी नाहींत, त्यांच्या मागणीला तात्त्विक अधिष्ठान आहे, हें अन्य प्रांतीयांना आपण पटविलें पाहिजे. सत्यामागें निष्ठेचें आणि त्यागाचें सामर्थ्य नसेल तर, तें सत्य दुबळें ठरतें, त्याचा विजय होत नाहीं. सत्यामागें हें सामर्थ्य कसें उभें करायचें, याचा आपण विचार केला पाहिजे. आपला लढा तीव्र झाला पाहिजे आणि त्याचें सातत्यहि टिकलें पाहिजे. परंतु हें करतांना आपल्या मागणीच्या आड येणारीं कारणें नाहींशीं होतील आणि पूर्वग्रह निवारले जातील, अशी खबरदारी आपण घेतली पाहिजे.

महाराष्ट्राच्या न्याय्य मागणीला इतर प्रांतांतूनहि पाठिंबा मिळाला पाहिजे असें आपणाला वाटणें साहजिकच आहे. परंतु ते कितपत शक्य आहे, याचा आपण विचार केला पाहिजे. मुंबई प्रांतांतील जनता आणि विशेषतः मुंबई शहरांतील लोक जागृतीच्या दृष्टीनें अग्रेसर आहेत, हें खरें असलें तरी ग्रामीण विभागांत ज्या वेळीं दुष्काळ पडतो आणि लोकांवर उपासमारीची वेळ येते त्या वेळीं मुंबईतील लोकांना पोटतिडिकेनें त्याची जाणीव होत नाहीं. मग इतर प्रांतांतलें लोक आपल्याबाबत उदासीन असले तर त्यांत नवल तें काय? जागृतीबाबत अभिमान बाळगणारे आपण लोक आपल्याच आपत्कालीं जर एकमुखी नेतृत्व उभें करूं शकलों नाहीं तर इतरांना दोष देण्यांत काय अर्थ आहें? संयुक्त महाराष्ट्र परिषदेचे 'तीन तेरा' कसे झाले तें आपल्याला ठाऊक आहे. नेहरूंच्या विरुद्ध जाण्याची आमच्यापैकीं कांही मंडळींची

तयारी नसल्यामुळेच हा प्रकार झाला ना ? मग अन्य प्रांतांतील लोकांनीं आपल्याबद्दल जिव्हाळा बाळगून पंडितजींच्या इच्छेविरुद्ध वागावें, अशी अपेक्षा करण्यांत काय अर्थ आहे ? लोकशाही मूल्यांबाबत निष्ठा बाळगून त्यांनीं आपल्या बाजूनें यावें ही अपेक्षा ठीक, परंतु तसें होणें न होणें आपल्या कर्तृत्वावर अवलंबून आहे. शिवाय आपल्याविरुद्ध झालेल्या बेफाम अपप्रचारामुळें त्यांची मनें आपल्याबद्दल कलुषित झालेलीं असण्याचा संभव आहे. आपल्या खंबीर धोरणानें आणि शुद्ध आचरणानें आपण त्यांच्या मनांतील किल्मिष दूर केलें पाहिजे.

आपल्या मागणीचें स्वरूप दुहेरी आहे. एकाच प्रांतावर हा अन्याय होत आहे, असें नसून लोकशाही हक्कांचीच येथें पायमल्ली होत आहे. सरकारकडे सत्ता केंद्रित होत आहे. आणि दुसरें गाऱ्हाणें असें आहे कीं, सरकारकडून साधी माणुसकीची कदर केली जात नाहीं. म्हणून आपण अन्यायनिवारणाचा असा मार्ग चोखाळला पाहिजे कीं, ज्यामुळें शासनसंस्थेची पकड अधिक बळकट होणार नाहीं. दंगेधोपे, लुटालूट, मारझोड या हिंसात्मक प्रकारांमुळें पोलिसांची व शासनसंस्थेची शक्ति वाढते, हिंसात्मक घटना वरचेवर होऊं लागल्या तर नागरिकस्वातंत्र्यावरहि बंधनें येतात. या दृष्टीनें शांततेचा मार्ग हें आपलें पहिलें पथ्य आहे. लोकशाही व मानवी हक्क हें जर आपलें साध्य असेल तर त्याचीं साधनें साध्याला साजेशीं असलीं पाहिजेत.

महाराष्ट्राला प्रभावी व एकजिनसी नेतृत्व नाहीं, असें आपण म्हणतों दुर्बल आणि फुटीर नेतृत्वाचा दोष हा कांहीं केवळ एकाच पक्षाचा दोष आहे असें नाहीं. तो दोष साऱ्या मराठी समाजाचाच आहे. ह्या दुबळेपणाचीं कारणें आपल्या सामाजिक व आर्थिक इतिहासांत आपण शोधलीं पाहिजेत. सामाजिक इतिहासाचा मागोवा घेतां आपल्याला असें दिसून येईल कीं, आपल्या नेतृत्वाच्या दुबळेपणाच्या मुळाशीं जातिवाद आहे. जातिवाद हें

जातीयतेचें फळ आहे. जाती नष्ट केल्याशिवाय जातिभेद जाणार नाहीं. पण जाती कांहीं केवळ महाराष्ट्रांतच आहेत असें नाहीं. इतर प्रांतांतहि जाती आहेत, त्यांच्यांत उच्चनीच भाव आहे. वरिष्ठ जातींचें वर्चस्वहि आहे. आपल्याकडे सामाजिक समतेची जी जाणीव आहे ती तेथें अभावानेंच दिसतें. पण त्या प्रांतांत जाती असल्या तरी जातिवाद नाहीं, महाराष्ट्रांत मात्र तो आहे. हें असें कां ?

याचें एक कारण असें आहे कीं, महाराष्ट्रांत इतर प्रांतांपेक्षां जनता अधिक जागरूक आहे. इतर प्रांतांत थोडीफार राजकीय जागृति दिसली तरी महाराष्ट्रांत ज्याप्रमाणें राजकीय जागृतीबरोबर सामाजिक जागृति झाली तशी अन्य प्रांतांत झालेली दिसत नाहीं. लोकमान्य टिळकांप्रमाणें येथें आगरकर व फुले हे दोघेहि जन्मास आले. राजकीय क्रांतीबरोबर सामाजिक विषमतेवरहि येथें प्रहार झाले. येथील जागृति एकांगी नाहीं, हें आपलें एक वैशिष्ट्य आहे. या सर्वांगीण जागृतींतच पुढें विकृति निर्माण झाली, हें आपण लक्षांत घेतलें पाहिजे. राजकीय चळवळीवर सर्व शक्ति केंद्रित करतां यावी म्हणून लोकमान्य टिळकांनीं समाज-सुधारणेबाबत सबुरीचें धोरण ठेवलें आणि सनातनी लोकांनाहि जवळ केलें. लोकमान्य टिळक कांहीं कमी बुद्धिवादी होते असें नाहीं. पण स्वराज्याच्या लढ्याला त्यांनीं अधिक महत्त्व दिलें. सामाजिक विषमतेविरुद्ध आगरकर-फुले यांनीं चळवळ सुरू केली. ही मंडळी सामाजिक क्रांतीच्याबाबत आग्रह धरीत असली तरी परकीय सरकारच्याबाबत त्यांचें धोरण बरेचसे सलोख्याचें असे. महात्मा फुल्यांच्या सत्यशोधक समाजामुळें कनिष्ठ वर्गांत एक तीव्र सामाजिक जाणीव निर्माण झाली. आतांपर्यंत आम्ही पिळलें गेलों, हीन लेखलें गेलों, त्यामुळें आम्ही मागें राहिलों, आतां आम्ही मागें राहणार नाहीं, अशी भावना निर्माण झाली. सामाजिक अन्यायाचें निदान करून महात्मा फुले यांनीं त्याच्या निरसनासाठीं समतेचें तत्त्वज्ञान दिलें. परंतु त्यांच्यानंतर या सामाजिक समतेच्या तत्त्वज्ञानाचा विसर पडून

अन्यायाची जाणीव तेवढी तीव्र होत गेली. यांतून जातीयतेची विकृति निर्माण झाली आहे.

जातीयता म्हणजे केवळ ब्राह्मण-ब्राह्मणेतर नव्हे, तर ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर यांच्यामधील अनेक जाति आणि त्या प्रत्येक जातिउपजातीचा स्वतःबद्दलचा गुप्त किंवा प्रकट अहंकार. ब्राह्मण म्हटला तर तोहि एकसंध नाहीं. त्यांत अनेक पोट-जाती आहेत. ब्राह्मणेतरांच्या बाबतीतहि हीच गोष्ट आढळते. त्यामुळें सामाजिक जागृतीहि विकृत झालेली दिसते. सामाजिक जागृतीची परिणति सामाजिक समतेंत होण्याऐवजीं जातीय अहंकार तीव्र होण्यांत झालेली आहे. नेतृत्वाचें दुबळेपण या संकुचिततेंतून निर्माण झालेलें दिसतें. आमच्याकडील नेतृत्व हें तात्त्विक अधिष्ठानावर उभें झालेलें आढळत नाहीं. केवळ राजकीय मतभिन्नते-प्रमाणें नेतृत्वाचें वर्गीकरण न होतां अनेक वेळां तें जातीवरून ठरतांना दिसतें. आपल्यापैकीं कोण, याचें उत्तर आपल्या राजकीय मताचा कोण असें न होतां आपल्या जातीचा कोण, असेंच मिळतें. सर्व पक्षांच्याबाबत कमी-अधिक प्रमाणांत हें खरें आहे. कारण तें एकूण आपल्या समाजाबाबतच खरें आहे. डॉ. आंबेडकरांसारखा विद्वान् पुढारी अखिल भारताचा पुढारी म्हणून ओळखला न जातां महारजातीचा पुढारी म्हणूनच ओळखला जातो. त्यांच्याशीं मतभेद असलेले लोकच असें म्हणतात असें नव्हे तर त्यांच्या जातीच्या लोकांतहि हीच भावना असते. महाराष्ट्रांतील पुढारी कोणी ब्राह्मणांचे, कोणी मराठ्यांचे आणि अशाच वेगवेगळ्या जातींचे आहेत असें मानलें जातें. अशा रीतीनें येथील नेतृत्व पुष्कळ अंशीं छिन्नविछिन्न व संकुचित झालेलें दिसतें. त्यामुळें सत्ता हातीं येण्याचा प्रश्न आला कीं जातीय अभिमानाचा उपयोग करण्याचें प्रलोभन वाटतें आणि पुढारी जातिविशिष्ट आधारावर भांडूं लागतात.

नेतृत्व हें लोण्यासारखें असतें. वेगवेगळ्या मडक्यांत थोडें थोडें दूध विरजून तें घुसळल्यानें थोडें थोडें लोणी फार तर येतें. पण सर्व विरजण

एकत्र करून तें घुसळलें तर त्या मानानें अधिक लोणी हातीं येईल. यासाठीं जातीपातींची लहान लहान गाडगींमडकीं फोडून सर्व विरजण एकत्र केलें पाहिजे. आपल्या संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यामुळें हें कार्य-साधलें जात असून एकजिनसी जागृति निर्माण होत आहे. या लढ्यामुळें आपले दोष आपण पाहूं शकत आहोंत. या अर्थानें हा लढा विधायक (Positive) आहे.

जातीय वृत्ति ही सरंजामदारीचाच अवशेष आहे; कारण सरंजामदारी-प्रमाणेंच जातीयतेमुळें विषमतेला अनुकूलता लाभते. आपला लढा समतेसाठीं आहे. राजकीय, आर्थिक आणि सामाजिक या तीनहि क्षेत्रांत आपल्याला समता निर्माण करायची आहे. यासाठीं नेते आणि समाज यांच्या मनातील जातिविशिष्ट जाणीव नाहींशी झाली पाहिजे ती राजकारणांतून एकदम जाईल किंवा तेथून गेली म्हणजे तेवढ्यानें आपलें काम भागेल असें नव्हे. ही वृत्ति आपल्या दैनंदिन व्यवहारांतून गेली पाहिजे. समाजांतील वृत्तीचें नेत्यांत, आणि नेत्याच्या वृत्तीचें समाजांत प्रतिबिंब पडत असतें. आज जातिनिर्मूलनाची भावना सर्व जातींत थोडीफार दिसूं लागली आहे. ती अधिक तीव्र करण्यासाठीं सतत प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. त्यासाठीं जातिनिरपेक्ष वृत्तीनें व समाजव्यापी दृष्टीनें सर्व प्रश्नांचा विचार करण्याची संवय लागली पाहिजे. आत्मसंशोधनांतून ही संवय लागेल. संयुक्त महाराष्ट्रावर झालेल्या अन्यायानें जो एक धक्का दिला आहे त्यामुळें आत्मसंशोधनाची निकड सर्वांना प्रतीत होईल.

आज सर्वत्र १८५७ ची आठवण देऊन १९५७ बद्दल उत्सुकता वाढविली जात आहे पण मी म्हणतों, पुन्हां तुम्ही १८५७ चा लढा करणार कां ? १८५७ सालीं आपण ब्रिटिशांविरुद्ध लढा दिला; पण एकाअर्थानें सरंजामदारीनेंच तो लढा चालावला होता. ब्रिटिशांचीं युद्धाचीं साधनें आपल्यापेक्षां कितीतरी सुधारलेलीं होतीं. त्यांच्याजवळ संघटना होती, या सर्व प्रयत्नांमागें आवश्यक असलेलें नवीन तत्त्वज्ञान व प्रगत उत्पादनतंत्र होतें. आपल्यापाशीं

यांपैकीं कांहींच नव्हतें. लढाईचीं जुनीं हत्यारें, सोवळ्याओवळ्याचें जुनाट तत्त्वज्ञान व सघटनायोजनारहित प्रतिकार इत्यादि कारणांनीं आपण अयशस्वी झालों. १८८५ सालीं कॉंग्रेस स्थापण्यांत आली व प्रागतिक तत्त्वज्ञानाचा, संघटनेचा स्वीकार झाला. लढ्याच्या साधनांत सुधारणा झाली. पुढें लो. टिळकांसारख्यांनीं या प्रयत्नांत जहालपणा आणून लढा अधिक तीव्र केला. यामुळें आपण ब्रिटिशांना यशस्वी विरोध करूं शकलों. विरोधकापेक्षां प्रागतिक घोरण उच्च तत्त्वज्ञान आणि बलिष्ठ संघटना असल्याशिवाय त्याला पराभूत करतां येत नाहीं, हें आपण ध्यानांत ठेवलें पाहिजे.

ज्या भांडवलदाराविरुद्ध आमचा लढा आहे, त्यांच्यापेक्षां आम्ही जास्त प्रागतिक आहोत का ! आज हिंदुसभा, जनसंघ किंवा अशाच प्रतिगामी संस्थाहि गरिबांसाठीं कांहीं तरी केलें पाहिजे असें म्हणत आहेत. आम्ही म्हणतों, जमिनीची वांटणी झाली पाहिजे. पण आपण आपल्याजवळील जमिनीपैकीं निर्वाहक्षेत्राहून अधिक असलेली जमीन महाराष्ट्रांतील आदिवासी बंधूंना देतों का ? सर्वांनीं दिल्यावर आपणहि देऊं, या म्हणण्याला अर्थ नाहीं. कायद्याची अगर दुसऱ्याच्या सांगण्याची वाट न पाहतां, आपल्या अल्पशा अधिकारांत जें करणें शक्य आहे तें लगेच करण्याचा धडा आतां शिकला पाहिजे. मोठ्या भांडवलदारांवर आग पाखडतां; मग अर्धपोटी, नग्न, अज्ञानी, पशुवत् जीवन कंठावें लागणाऱ्या आदिवासी वा अस्पृश्य माणसाला जमीन कां देत नाहीं ? माझ्या भूदानप्रचाराची 'एक नवीन सर्वोदयाचें खूळ' म्हणून आमच्यांतील कांहीं शास्त्रीय समाजवादी हेटाळणी करतात. मला वाटतें प्रत्येकानें स्वेच्छया आपल्या शक्तीनुसार विषमता नष्ट करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. अन्याय करण्याचा हक्क असल्याप्रमाणें तुम्ही-आम्ही वागत असतों. सरकारनें मात्र न्यायानें वागावें अशी मागणी कोणत्या नैतिक बळावर आपण करूं शकूं ? आमच्या या लहानसहान अन्याय कायम ठेवण्यामुळेंच राज्यकर्ते व भांडवलदार यांना मोठे अन्याय करतां येतात. आमच्या लढ्याला आदिवासी,

अस्पृश्य व भूहीनांनीं कां बरें साथ द्यावी ? जरा गंभीरपणें विचार केला पाहिजे. दरवर्षीं हजारों मुलें-मुलीं एस् एस् सी होतात. सर्वांनाच वाटतें कीं, आपल्याला सरकारी नोकरी मिळावी व आपल्या पगाराची चढती कमान असावी. आपण केवळ स्वत:पुरतें पहावयास शिकलों आहोंत.

अठरा विश्वें दारिद्र्यांत जीवन कंठणाऱ्या आगरकरांनीं पदवी मिळविल्यावर आपल्या आईला काय पत्र लिहिलें ? पोटापुरतें मिळवून उरलेली सर्व शक्ति देशसेवेंत खर्च करण्याची त्यांनीं प्रतिज्ञा घेतली. आज संयुक्त महाराष्ट्रासाठीं-नवमहाराष्ट्र निर्मिण्यासाठीं किती लोक त्याग करायला तयार आहेत ? १९४२ पेक्षां जास्त जागृति झाली आहे, असें आपण म्हणतों परंतु बेचाळीस सालच्या तरुणांची हिम्मत व धमक आजच्या तरुणांत नाहीं. ते त्यागासाठीं जास्त तयार होते. आज महाराष्ट्रांत सेवादलाची ४०।५० माणसें कार्य करीत आहेत. पण आम्ही त्यांना पोटापुरतेंसुद्धां देऊं शकत नाहीं. हें असें कां ?

खेड्यांत जाण्यासाठींहि कोणी तयार नाहीं. भूदानानें जमिनीचे तुकडे होतात अशी आपण तक्रार करतों पण सहकारी पद्धतीनें शेती करायची म्हटली तरी माणसें आहेत कोठें ? आमच्या सहकारी सोसायट्यांची काय अवस्था आहे ? महाराष्ट्रांत वाणिज्य नाहीं, व्यापारधंदे यशस्वीपणें चालवितां येत नाहींत. सुशिक्षित कर्तृ-वत्वान् मनुष्य शहर सोडायला तयार नसतो; तो सेक्रेटरीएटमध्यें नोकरीचा प्रयत्न करतो. स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास वाचा. हजारों माणसांच्या स्वार्थत्यागी अहर्निश प्रयत्नांमुळेंच आज आपल्याला राजकीय स्वातंत्र्य मिळालें आहे. स्वातंत्र्यलढ्याच्या काळांत महात्मा गांधींजवळ कुष्ठ-रोग्याच्या सेवेपासून तों विविध क्षेत्रांत स्वत:ला पुरून घेणारे हजारों सेवक होते. सर्व्हेंटस् ऑफ इंडिया सोसायटींतून सर्वस्वार्पण करणारे देशसेवक मिळाले. पण आज समाजसेवक मिळण्याचें कार्य तर संपलेंच आहे. उलट त्यांची टिंगल होऊं लागली आहे. पूर्वी महाराष्ट्रांत फाटक्या जोड्याच्या पुढाऱ्याला

मान होता. इतर प्रांतांत कदाचित् त्याला कोणीं पुढारी मानलेंहि नसतें. हा फकिरी बाणा, निःस्वार्थ सेवावृत्ति, समर्पणाची भावना, शील आणि कार्यासाठीं पुरून घेण्याची तत्परता हें महाराष्ट्राचें वैभव आहे, हें ओळखा. आज ही भावना तर दूरच, पण आंधळ्याला पैसा देतात त्याभावनेनें कांहीजण सामाजिक कार्याला मदत करतात,

राजकीय स्वातंत्र्यासाठीं ज्या प्रमाणांत सेवक व त्याग यांची आवश्यकता होती त्यापेक्षां जास्त सेवक व अधिक त्यागाची आज गरज आहे. महाराष्ट्राचा आर्थिक व सामाजिक कणाच दुर्बल झाला आहे. नवमहाराष्ट्राची रचना नव्याच पायावर करावी लागेल. उत्पादनतंत्र बदलावें लागणार आहे. जीवनाचें साफल्य कशांत आहे, याचा तरुण पिढीनें विचार केला पाहिजे. आपल्या मनाला वाटेल तसें सांगून त्याचें समर्थन करणारे युक्तिवाद शोधण्यासाठीं बुद्धि वापरून भागणार नाहीं निर्मळ बुद्धीनें निर्णय करावा व मग त्यासाठीं त्यागाला सिद्ध रहावें.

महाराष्ट्राचा वारसा फार थोर आहे. ज्ञानेश्वर, तुकाराम, शिवाजी, टिळक, आगरकर, फुले यांचा वारसा पुढें चालवणारीं माणसें महाराष्ट्रांत किती आहेत ? गरिबांच्या दुःखाशीं समरस होण्याची अध्यात्मनिष्ठा आज महाराष्ट्रांत आहे ? भौतिक सुखांना लाथाडणारी तत्त्वनिष्ठा आहे ? आज 'जे का रंजले, गांजले' फक्त जिमेवर आहे. येथील जंगलांतील आदिवासींची व महारोग्याची सेवा परदेशांतील मिशनरी येऊन करीत आहेत. त्यांना घालवून देण्याचीं मागणी आपण करतों पण त्यांच्यामागून महारोग्याची सेवा कोण करणार ?- य प्रश्नाला उत्तर नाहीं, लोकमान्यांचें 'गीतारहस्य' आम्ही विसरलों आहोंत 'याचि देहीं याचि डोळां मरण पाहणाऱ्या' आगरकरांच्या निष्ठेची आम्हांला विस्मृति झाली आहे. टिळक-आगरकर १५० रुपये पगार घेत असत. त्यांचीं काय नेवढीच किंमत होती ? शिक्षणाच्या कार्याचें पावित्र्य त्यांनीं ओळखलें

होतें. आज शिक्षकांचें व प्राध्यापकांचे विद्यार्थी म्हणे ऐकत नाहींत. शाळांतून शिस्त नाहीं. विद्यार्थ्यांनीं त्यांचें ऐकावें तरी का ? ज्यांचें ऐकावें अशीं उज्वल जीवनें आज आहेत कोठें ?

'महाराष्ट्र हें कार्यकर्त्यांचें मोहोळ आहे' असें महात्माजी म्हणत असत. आज हें खरें करून दाखवण्याची वेळ आली आहे. नवीन ध्येयवादानें जर तरुणांचीं मनें अनुप्राणित होतील तर अनेकविध प्रवृत्तींचीं, सेवेची क्षेत्रें पुन्हां कार्यकर्त्यांनीं फुलून जातील. हे विविध क्षेत्रांतील कार्यकर्ते अन्य प्रांतांत जातील. त्यांच्यामुळें आपल्यासंबंधींचे पूर्वग्रह नष्ट होतील. स्वतःसाठीं अधिकाधिक मिळवीत राहण्याच्या हव्यासांत जीवनाचें साफल्य नाहीं. कांहींतरी पुरुषार्थ करण्याची प्रेरणा पाहिजे. शेती सुधारण्याचे प्रयोग, सेवापथकें, भूदानाचें कार्य, शिक्षण, सहकारी सोसायट्या कितीतरी कामें तुमची वाट पाहत आहेत. आज लहान मुलांसाठीं उत्कृष्ट वाङ्मय नाहीं, मुलांना आदर्श होतील असें शिक्षक नाहींत. उद्यां मुंबई केंद्रशासित झाल्यावर महाराष्ट्रीय जनतेवर व्यावसायिक क्षेत्रांत अन्याय होण्याची शक्यता आहे. त्या जनतेकडून अनेक तक्रारी येतील त्या नोंदवून त्यांची दाद लावून घ्यावी लागेल. हीं सारीं कामें करण्यास हजारोंच्या संख्येनें तरुण जेव्हां प्रतिज्ञाबद्ध होतील तेव्हां नवा महाराष्ट्र निर्माण होईल.

◆ ◆ ◆

महाराष्ट्रधर्म

लेखनकाल : जानेवारी १९६०

संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीकडे पाहण्याचा व्यक्तिशः माझा एक विशिष्ट दृष्टिकोन होता. भाषावार प्रांतांच्या निर्मितीवर एक आक्षेप असा घेतला जात होता कीं, अशा प्रांतरचनेनंतर प्रत्येक भाषावार राज्यांत एक विशिष्ट सामाजिक गटाचें फार मोठें वर्चस्व निर्माण होईल आणि त्याच्या हातीं फाजील राजकीय सत्ता जाऊं शकेल. या आक्षेपास महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनांत तर अधिकच गुंतागुंतीचें स्वरूप प्राप्त होतें. म्हणून संयुक्त महाराष्ट्र परिषदेंत भाग घेतांना वरील आक्षेप नजरेसमोर ठेवून हरिजन समाज व गिरिजन यांना कांहीं खास संरक्षण द्यावयास हवें अशी माझी भूमिका होती. इतर कांहीं मंडळींबरोबर, ही भूमिका संयुक्त महाराष्ट्र परिषदेनें राज्यपुनर्रचना-मंडळास सादर केलेल्या आपल्या निवेदनांत सुस्पष्ट मांडावी असा मी श्री. शंकरराव देव यांना आग्रह केला व सुदैवानें ती भूमिका सदर निवेदनाच्या १४ व्या परिच्छेदांत नमूद करण्यात आली. त्या परिच्छेदांत म्हटल्याप्रमाणें, भाषावार प्रांतांतील लहान विभागांना जसें संरक्षण देणें आवश्यक आहे तसेंच वरील मागासलेल्या वर्गांनाहि त्यांच्या पुढाऱ्यांच्या विचारानें खास संरक्षण द्यावयास हवें.

ही पार्श्वभूमि पाहतां, आपल्या समाजांत एकजिनसीपणा नाहीं, जातीय प्रश्न तीव्र आहे याची दखल घेऊन समाज एकसंघ बनविण्यासाठीं संयुक्त

महाराष्ट्राचा उपयोग होईल अशी माझी श्रद्धा होती. किंबहुना या प्रश्नाकडे पाहण्याची ती माझी मुख्य दृष्टि होती. आपल्या नांतांत आधींच पुढारलेले व मागासलेले यांच्यामध्यें मोठें अंतर पडलेलें आहे. तें अशा वेळीं अपप्रचारानें वाढलेंच असतें. द्वेषभावना व कटुता ज्यायोगें कमी होईल असा उपाय मला आवश्यक वाटत होता. ही कटुता दक्षिणेकडे जशी आहे तशी उत्तरेस नाहीं. गुजराथमध्येसुद्धां संपन्न वैश्यवर्ग जणूं काय 'राज्यांतर्गत राज्य' असल्यामुळें, त्याचें स्थान वरिष्ठ व कनिष्ठ यांच्यामध्ये 'बफर' प्रमाणे आहे. महाराष्ट्रांत मात्र केवळ सांस्कृतिक नव्हे तर आर्थिक वर्चस्वाच्या जाणिवेमुळें जातिभेद तीव्र स्वरूपांत दिसून येतो. म्हणून हें अंतर एका बाजूने तोडलें जावें असा माझा द्वैभाषिकाला विरोध करण्यांत उद्देश होता.

हा माझा दृष्टिकोन राज्यपुनर्रचनेच्या चळवळीच्या वेळीं बनलेला नाही. १९४९ मध्ये महाराष्ट्र मागे कां पडला या विषयाची चर्चा मुंबईच्या 'मौज' साप्ताहिकाने सुरू केली असतां तींत मीं माझ्या लेखांत याप्रमाणेंच महाराष्ट्रांतील जातिभेदाची सविस्तर मीमांसा केलेली आहे. आपण महाराष्ट्रीय लोक सहिष्णुतेंत उणे पडतों. मतभेद झाला की तात्त्विक असहिष्णुतेकडे व सामाजिक जीवनांत कटुता निर्माण करण्याकडे ठळक व्यक्तींचा कल दिसून येतो. हा प्रकार मीं माझ्या सार्वजनिक आयुष्यांत ३० वर्षें तरी अनुभवला आहे. कॉंग्रेसचे कार्य करीत असतांना आम्हां समाजवाद्यांना कट्टर गांधीवादी किती असहिष्णुतेनें वागवीत व त्याचा परिणाम समाजवाद्यांची प्रवृत्ति कॉंग्रेस सोडण्याकडे होण्यांत कसा दिसून आला हें कांहीं गुपित राहिलेलें नाही. मी विनोदानें म्हणत असतों, निरनिराळ्या पक्षांच्या महाराष्ट्रीय पुढाऱ्यांना जर पेपर घातला कीं, विरुद्ध मतांचीं पांच चांगलीं माणसें निवडून त्यांचीं नावे लिहा तर बहुतेकांना तें जमायचें नाहीं ! विरोध म्हणजे द्वेष नव्हे हें आपण

शिकलें पाहिजे म्हणून महाराष्ट्र मागे कां पडला याची मीमांसा करून मीं १० वर्षांपूर्वीच सुचविलें होतें कीं महाराष्ट्रास 'कलेक्टिव्ह लीडरशिप' हवी आहे.

संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीकडे महाराष्ट्रांतील सामाजिक विषमतेची ही भावना वरच्या पायाळीवर उचलून घेण्याचें व तिच्या उदात्तीकरणाचें एक प्रभावी साधन म्हणून मी पाहतों. या दृष्टिकोनांतून संयुक्त महाराष्ट्र परिषदेच्या कार्यांत मी भाग घेत असतांना, हा प्रश्न निवेदनाच्या अवस्थेंतून कृतीच्या अवस्थेपर्यंत जाऊन पोहोंचला. परंतु परिषदेचे नेते श्री. देव व महाराष्ट्र कॉंग्रेसचे पुढारी कृतीला तयार नव्हते. मुंबईंतल्या पहिल्या गोळीबारानंतर हा प्रश्न धसाला लागला तुम्हांला जी शांततामय व सनदशीर कृति करणें योग्य वाटेल ती करा असा माझा शंकररावांना आग्रह होता. दुसरीकडे आमच्या अपरोक्ष मुंबईतील कांहीं 'डाव्या' गटांनीं कृतिसमिति बनविण्याचा वाट घातला. दरम्यान पं. नेहरूंची दि. १६ जानेवारी १९५६ ला मुंबईविषयक कुप्रसिद्ध घोषणा झाली. तेव्हां महाराष्ट्र कॉंग्रेसनें राजीनामे देण्याचा ठराव केला पण कॉंग्रेसश्रेष्ठांच्या दडपणामुळें तो अमलांत आणला नाहीं; उलट संयुक्त महाराष्ट्र परिषदेंतून बाहेर पडण्याचा आदेश आपल्या अनुयायांना दिला अशा रीतीनें ऐनवेळीं कॉंग्रेसनें जनतेचा अवसानघात केल्यामुळें निर्माण झालेल्या परिस्थितींत महाराष्ट्र प्रजासमाजवादी पक्षानें मला पुढाकार घेऊन चळवळ चालूं ठेवण्यास सांगितलें.

त्याप्रमाणें सर्व महाराष्ट्रांतील कार्यकर्त्यांची बैठक पुण्यास कै. केशवराव जेधे यांच्या अध्यक्षतेखालीं मी बोलावली. परंतु आम्ही संयुक्त महाराष्ट्र परिषदेचें नांव वापरतां कामा नये असा श्री. देव यांचा हेका दिसला म्हणून संयुक्त महाराष्ट्र समिति असें नांव देण्यांत आलें. समितीच्या स्थापनेचा हेतु महाराष्ट्रीय जनतेची आकांक्षा प्रभावीपणें व्यक्त करणें व साध्य करणें हाच

होता. संयुक्त महाराष्ट्र स्थापन झाला म्हणजे महाराष्ट्राचें दारिद्र्य दूर करतां येईल, समाजजीवनांतील विषमता व विकृति कमी करतां येतील हा मूळ उद्देश. तो साधण्याकरितां या आंदोलनानें बरीच अनुकूलता निर्माण झाली. आपत्तीच्या योगानें समाज एकत्र आला. आम्ही जनतेबरोबर राहिलों म्हणून तिनें आपली निष्ठा समितीला दिली. अर्थात् आतां घुन्हां जुन्या खाल्ल्या पातळीवर परत न जाण्याची व जनतेच्या निष्ठेला पात्र ठरल्याची खबरदारी घेतली पाहिजे.

संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनांत ज्या विविध शक्ति एकत्र आल्या त्यामुळें एक उपकारक प्रवृत्ति निर्माण झाली. सर्वसामान्य जनतेला जातीयवाद त्याज्य आहे हा विचार रुचूं लागला. अशा सुसंस्कारामुळें वातावरण निवळल्यास सुरुवात झाली. याचा अर्थ असा नव्हे की वातावण पूर्णपणें निवळलें. अद्याप सामाजिक विषमता बहुजनसमाजास बोचतें; परंतु ती नष्ट करण्याचा मार्ग जातिद्वेष वाढविणें हा नव्हे, असा विचार सांगितला तर जनता तो ऐकून घेते, एवढेंच नव्हे तर तो तिला पटतो. हा विचार बहुजनसमाजापर्यंत पोहचूं शकला. त्यामुळें परस्परांपासून तुटक राहण्याचा तोटाहि तिच्या लक्षांत आला व लखोटबंद जातींची जुनी चाकोरी मोडली गेली. ज्याप्रमाणें कै. केशवराव जेधे यांनीं ब्राह्मणेतर चळवळीच्या मर्यादा ओळखून राष्ट्रीय आंदोलनांत भाग घेतला व पहिली चाकोरी मोडून टाकली, त्याचप्रमाणें संयुक्त महाराष्ट्र आंदोलनांतहि घडलें.

कै. डॉ. आंबेडकरांनीं आपल्या अनुयायांना संयुक्त महाराष्ट्र समितीच्या कामांत सहभागी होण्याचा आदेश दिला तो अशा जाणिवेनें कीं जातिनिष्ठ राजकारणापेक्षां व्यापक पायावर सर्वांनीं मिळून कार्य केलें पाहिजे. अर्थात् पुढारलेलें वर्ग कसें वागतील याविषयीं आंधळा विश्वास टाकण्यास ते तयार नव्हते. परंतु प्रयोग करण्यास त्यांची तयारी होती. मला

आनंद वाटतो कीं या विश्वासास आम्ही पात्र ठरलों. सर्वसाधारण जागांवर हरिजन उमेदवारांना निवडून आणून समितीनें मोठी कामगिरी बजाविली आहे. ब्राह्मण महिला परिश्रमपूर्वक हरिजन उमेदवारासाठीं काम करीत असलेल्या पाहून साहजिकच सत्प्रवृत्त व्यक्तींच्या मनावर खोल परिणाम झाला व त्याचा निर्देशहि अनेक ठिकाणीं प्रकटपणें श्री. गायकवाड प्रभृत्ति नेत्यांनीं केला आहे. विशेषतः नवबौद्ध समाजाची समस्या हें आंदोलन घडलें नसतें तर अधिक तीव्र बनली असती. खेड्यापाड्यांतून हिंदु व नवबौद्ध असा संघर्ष होण्याचें बऱ्याच प्रमाणांत समितीचे कार्यकर्ते टाळूं शकले हें लक्षांत घेतलें पाहिजे. तसेंच यापुढें समितीच्या आंदोलनामुळे जी वरची पातळी सामाजिक विचारास लाभली ती खालावूं न देण्याचें मुख्य उद्दिष्ट आपल्या नजरेसमोर राहिलें पाहिजे. जातींचीं भांडणें कमी करावयाचीं असतील तर आपल्या राजकारणांतून त्यांना चिथावणी दिली जातां कामा नये. कोणताहि पक्ष अमक्या एका जातीचा होणे अपायकारक ठरेल. मला तर असें वाटतें कीं, महाराष्ट्रांत सुस्थिर सरकार चालविण्याकरितां अनेक जातींचे कार्यकर्ते असलेला (Multi-caste party) पक्ष हवा. अर्थात् सुस्थिर सरकार निर्माण करण्यासाठीं समाजजीवनास स्थैर्य असलें पाहिजे. अस्थिर समाजांत शासनसंस्था स्थिर कशी राहूं शकेल ? दुर्दैवानें महाराष्ट्राच्या इतिहासांत अशी सामाजिक स्थिरता फारशी आढळून येत नाहीं. स्वतःचें घराणें, जातगोत पाहण्याच्या वृत्तीमुळें समाजजीवनांत कशी अस्थिरता निर्माण होतें याचा अनुभव घेऊनच छत्रपति श्रीशिवाजीमहाराजांनीं व्यापक दृष्टीनें सर्वांच्या हिताची अशी शासनसंस्था स्थापिली होती. अष्टप्रधानमंडळ बनवून भक्कम पायावर राज्याची बांधणी करण्याचा त्यांचा उपक्रम अत्यंत महत्त्वाचा व दूरदर्शीपणाचा होता. पण महाराष्ट्राच्या दुर्दैवानें पुन्हां तसा प्रयत्न गेल्या तीनशें वर्षांत झाला नाहीं. त्यामुळें महाराष्ट्राचें समाजजीवन सुस्थिर पायावर उभारण्याचें हें कार्य अद्याप शिल्लकच आहे. मराठी राज्यांत आतां त्यास निश्चयपूर्वक हात घातला तरच

सर्व जातींची मिळूत सामायिक स्वरूपाची राज्यव्यवस्था चालूं शकेल. राजकीय जीवनांत सर्वांना सहभागी होतां आलें पाहिजे. म्हणजे जातींच्या भांडणास राजकीय रंग चढणार नाहीं. महाराष्ट्राच्या भूमींतून वर आलेलें निरनिराळ्या जातींचे कार्यकर्ते सर्व पक्षांत असले म्हणजे समाजाच्या व शासनाच्याहि स्थैर्याचा प्रश्न सोडवितां येईल. सध्यांच्या या चालूं लोकशाहीच्या युगांत बहुमतानें राज्य असणें हें तर्कास धरूनच आहे. पण बहुमत व अल्पमत राजकीय दृष्टीनें अजमावलें गेलें पाहिजे, जातीय दृष्टीनें नको. तसें होण्य करितां जेथें जातीय दृष्टीनें सत्तास्पर्धा चालू होईल तेथें अल्पमतवाल्यांनीं आखाड्यांत न उतरतां बाजूस होणें योग्य. अर्थात् जेथे अन्यायाच्या प्रतिकाराचा प्रसंग उद्भवेल तेथें त्यांच्या कार्यकर्त्यांनीं जरूर पुढाकार घ्यावा. अशा धोरणानें त्यांना जातीय कटुता टाळून महत्त्वाची राजकीय कामगिरी बजावतां येईल. एकीकडे आर्थिक विकासाच्या प्रक्रियेंत जातीय कटुता हळूहळू कमी होत जाईल असें मला वाटतें. त्यायोगें ब्राह्मण ब्राह्मणेतर वादाचीहि धार बोथट होईल. औद्योगीकरण झपाट्यानें झालें पाहिजे म्हणजे आपोआपच सामाजिक विषमतेचा प्रश्न आर्थिक दृष्ट्या सोडविणें सुलभ होईल. म्हणून योग्य दिशनें वाहणारें पाणी आपण अडवितां कामा नये मग सांस्कृतिक दृष्ट्या जो फरक राहील त्याचें स्वरूप सौम्य विविधतेचें असेल, विरोधाचें राहणार नाहीं. अर्थात् समंजसपणा सर्वांनीं ठेवला पाहिजे व जातीयवादास निवडणुकीच्या राजकारणांतून जीवदान देण्याचें टाळलें पाहिजे. म्हणजे मनोवृत्ति निर्माण होण्याचें टळेल व भावनात्मक ऐक्य होण्याला अनुकूलता लाभेल. अशा रीतीनें एकजिनसी समाज बनविण्याचा हा मार्ग ध्येयवादाचा दिसला तरी प्रत्यक्ष राजकीय व्यवहाराच्या दृष्टीनें तोच सोयीचा व हितकर आहे हें थोड्या विचाराअंतीं सहज ध्यानांत येण्यासारखें आहे.

संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनांत महाराष्ट्र हा गरीब असल्यामुळें त्याची अवहेलना व उपेक्षा होते याची जाणीव सर्वांना पूर्णपणें झाली. एका दृष्टीनें हें

न्यांगलें झालें. कारण त्यामुळे आपलें दारिद्र्य दूर केलें पाहिजे, आर्थिक परिस्थिति सुधारली पाहिजे, औद्योगिक प्रगति झपाट्यानें केली पाहिजे याचीहि जाणीव प्रत्येकास झाली. मला तर असें वाटतें कीं, आर्थिक समृद्धि व समता निर्माण करण्यासाठीं मी स्वतः काय करूं शकतों असा विचार प्रत्येकानें केला पाहिजे. एंजिनिअर, विद्यार्थी, शिक्षक, कामगार अशा सर्वांना या दृष्टीनें नवा स्वधर्म शिकनां येईल. किंवहुना शाळेंत, स्वयंसेवक-संघटनांत, प्रत्येक मुलाला या गरीब देशाकरितां तूं तुझें कर्तव्य केलें पाहिजेस, असें बाळकडू पाजावयास हवें म्हणजे अन्यायामुळे जी सामाजिक अस्मितेची जाणीव निर्माण झाली आहे, ती विसरून न जातां तिला विध्वंसकतेऐवजी विधायक दृष्टीचें वळण लागूं शकेल. ज्याला त्याला प्रापंचिक चिंता आहेच, पण सर्वांना कर्दमातून बाहेर काढल्याशिवाय एकट्याचा स्वार्थहि फारसा साधत नाहीं हें ओळखून स्वार्थाला परमार्थाची जोड मिळूं शकेल. तसें घडेल तर सामूहिक पुरुषार्थास समाजाचें मन सिद्ध होईल. प्रतिकाराच्या वेळीं जागी झालेली शक्ति रचनात्मक कार्याकडे लागेल. नवीन मूल्यें ध्यानीं येऊन, अवहेलनेमुळें जागृत झालेला अभिमान आपला समाज संपन्न व समर्थ करण्याच्या कामीं उपयुक्त ठरेल. त्यायोगें संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनांत जी वरच्या पातळीवरील सामाजिक एकजूट दिसून आली ती टिकून राहील. हें न घडेल तर सत्ता-स्पर्धेच्या राजकारणांत पुन्हा सामाजिक फुटीरपणास वाव मिळेल. मी तर असें म्हणेन कीं, सत्तारूढ काँग्रेसनें जरी स्वार्थाखातर जातीयवादाचा आश्रय घेतला तरी विरोधी पक्षानें प्रतिक्रिया म्हणूनदेखील जातीयवादास वाव देऊं नये. महाराष्ट्राला सुस्थिर शासन हवें म्हणजे सामाजिक स्थैर्य टिकून राहूं शकेल असें मी समजतो तेव्हां विरोधी पक्षाचें धोरण विधायक दृष्टीनें विरोध करण्याचें असलें पाहिजे अशी माझी दृष्टि असते, विरोधी पक्ष नसावा अशी नसते. विरोधी पक्ष हवाच, तो नसेल तर राज्यकर्त्यांवरील विधायक विरोधाचें दडपण नाहींसें होऊन त्यांची शिरजोरी वाढेल. तिला आळा घालण्याकरितां

नुसता दैववादी दृष्टिकोन उपयोगाचा नाहीं, तर जें चांगलें असेल त्यास सहकार्य व वाईट असेल त्यास विरोध असें प्रतिसहकाराचें धोरण ठेवलें पाहिजे. या प्रतिसहकारामध्यें केवळ विरोधाकरितां विरोध बसत नाहीं. विधायक विरोधहि नसेल तर काँग्रेसची शिरजोरी वाढेल आणि विध्वंसक विरोध असेल तर सुस्थिर शासन न लाभतां सामाजिक पातळी खालावेल. येथें केरळ होतां कामा नये. केरळमध्यें निरनिराळ्या पक्षांत निरनिराळ्या जातींचें वर्चस्व झाल्यानें सामाजिक एकजूट नष्ट झाली व शासन अस्थिर झालें. अर्थात् महाराष्ट्रांत असा विधायक विरोधी पक्ष कितपत कार्य करूं शकेल हें काँग्रेसच्या शहाणपणावर अवलंबून आहे. उदाहरणार्थ, आपल्या अधिकारांचा दुरुपयोग कामगार-संघटना स्वतःच्या कच्छीं ठेवण्यासाठीं करणें योग्य नव्हे. अशा अनिष्ट धोरणानें काँग्रेसला पर्यायी असा लोकशाहीवादी पक्ष राहणें अवघड होतें. कांहीं वेळा तर काँग्रेसचें धोरण लोकशाहीवादी विरोधी पक्ष टिकूं न देण्याचें असावें असें वाटतें. कम्युनिस्टांशीं सहकार्य करून त्यांच्या लॉबींत तरी जा, किंवा विरोध सोडून काँग्रेसमध्यें विलीन व्हा असाच पर्याय टाकला जातो. काँग्रेसनें लोकशाहीवादी विरोधी शक्तींना वाटल्यास मदत करूं नये पण निदान त्यांचे पाय तरी तोडूं नयेत. एक आम्ही तरी राहूं, नाहीं तर कम्युनिस्ट तरी राहतील अशा वृत्तीनें अधिकाराचा दुरुपयोग केल्यास समाजजीवनांत विकृति निर्माण झाल्याशिवाय राहणार नाहीं. पुन्हां पूर्वीच्या विकृति समाजांत प्रबळ झाल्यास लोकशाहीला बाध येईल. लोकशाहीमध्यें विरोधी पक्ष असावा, तो लोकशाहीच्या पद्धतीनें काम करणारा. सार्वत्रिक निवडणुकींत बहुमत अनुकूल करून घेऊन तो सत्तारूढ पक्षास रीतसर पदच्युत करूं शकतो. अर्थात् लोकशाही चालावयाची तर सर्व पक्षांची मूलभूत निष्ठा स्वदेशावरच असली पाहिजे.

मात्र, अशा पक्षांतहि इतर तपशीलाच्या बरेच दोबळ फरक असल्यानें केवळ काँग्रेसचा निवडणुकींत पाडाव करून त्यांना आघाडीच्या स्वरूपांत एकत्र येऊन राज्य चालवणें हें कठीण जाईल. त्यांचा एकत्रित विधायक

विरोध होऊं शकेल, पण एकत्रित विधायक कार्यक्रम कितपत होईल हा प्रश्न सध्या फार महत्त्वाचा ठरतो. त्याबाबत प्रथमतः एक गोष्ट ध्यानांत घ्यावयास हवी ती अशी कीं, जनतेची एखादी मागणी पूर्ण करण्याकरितां व अन्यायाच्या प्रतिकारार्थ सर्वांनीं मिळून एकजुटीनें लढा देणें हें निराळें आणि राज्य करणें निराळें. हिटलरचा पाडाव करण्याच्या समान उद्दिष्टाखातर स्टॅलिन व रूझवेल्ट एकत्र आले खरे पण म्हणून त्यांचा संयुक्त कारभार होऊं शकला नाहीं हें उदबोधक होय. एकत्र राज्य कारभार करण्यासाठीं मूलभूत निष्ठा एक असणें आवश्यक आहे. लढा करतांना सर्व शक्ति एकवटण्याकरितां सहकार्य करण्याची गोष्ट अर्थातच वेगळी आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनांत पहिलीं दोन वर्षें कम्युनिस्टांनीं जें सहकार्य केलें त्यांत हानिकारक असें कांहीं दिसून आलें नाहीं. पुढें मात्र त्यांच्या पक्षीय राजकारणाचा अनुभव अधिकाधिक येऊं लागला. उदाहरणार्थ गुजराथमधील हुतात्मा-स्मारकाच्या चळवळीच्या निमित्तानें महाराष्ट्रांत 'दुसरी आघाडी' काढण्याचा जो प्रचार झाला तो गुजराथमधील कम्युनिस्ट पक्षाचें काम वाढविण्याकरितां. त्यामुळें महाराष्ट्राच्या हिताला गौण स्थान मिळून पक्षीय स्वार्थास प्राधान्य मिळालें. बेळगांव-कारवारच्या लढ्यांतहि म्हैसूरमधील कम्युनिस्टांच्या विरोधाखातर कुचराई करण्याची प्रवृत्ति दिसून आली अर्थात् या पक्षीय राजकारणामुळें सामुदायिक नेतृत्वाच्या प्रभावास तडे गेले. पक्षाची शक्ति वाढविण्याच्या डावपेचांमुळें फूट पडण्यास सुरुवात झाली. या अनुभवाचा निष्कर्ष वर सांगितला तो निघणेंच अपरिहार्य होतें.

काँग्रेसच्या विरोधी सर्व पक्षांनीं एकत्र येऊन द्वैभाषिक विरोधी लढा सुरूं केला त्या वेळेस खुद्द काँग्रेसमध्यंच याबाबत दोन तट होतें हें जगजाहीर आहे. द्वैभाषिक मोडतांना, काँग्रेसपुढारी जेव्हां द्वैभाषिकामध्यें 'इमोशनल इंटिग्रेशन' झालें नाहीं असें कारण देतात तेव्हां त्यांच्या नजरेसमोर खुद्द मंत्रिमंडळांतील मतभेदच असावेत. उदाहरणार्थ, अर्थमंत्री डॉ. जिवराज मेहता यांचा विकास खर्चाबाबत मुंबई शहराचा समावेश मराठी प्रदेशांत न करण्याचा कटाक्ष

होता. विधानसभेंत खरी आंकडेवारी न सांगण्यापर्यंत हा हेका पोहोंचला ! जी गोष्ट विकास-खर्चाबाबत झालेल्या मतभेदांची, तीच कामगारविषयक धोरणाची. या मतभेदांमुळें द्वैभाषिकाचें अस्तित्व किती कृत्रिम आहे हें तेव्हाच सर्व संबंधितांच्या लक्षांत येऊन चुकलें होतें. दुसरें कारण असें देतां येईल कीं, राजकीय दृष्ट्या द्वैभाषिकाचा प्रयोग यशस्वी झालेला नाहीं याची जाणीव यापूर्वीच मुंबईत व दिल्लींत स्पष्टपणें झालेली होता. परंतु फेरविचार होऊंच द्यावयाचा नाहीं, असा हेका काँग्रेसश्रेष्ठांपैकीं श्री. मोरारजी देसाईप्रभृतींनीं चालविला होता. त्यांना सार्वत्रिक निवडणुकी होईपर्यंत दडपून द्वैभाषिक राज्य चालवावयाचें होतें.

दरम्यान केरळमध्यें सार्वत्रिक निवडणुकींची वाट न पाहतां मध्येंच तेथील कम्युनिस्ट मंत्रिमंडळ बडतर्फ करून टाकण्याचा बूट निघाला अर्थात् केरळ-मध्यें लोकांना अप्रिय असलेलें मंत्रिमंडळ काढून टाकण्याकरितां सार्वत्रिक निवडणुकीपर्यंत वाट पाहण्याचें कारण नाहीं, असें एकीकडे म्हटल्यानंतर दुसरीकडे लोकांना अप्रिय झालेल्या द्वैभाषिक राज्याचा प्रयोग सार्वत्रिक निवडणुकीपर्यंत कां चालवावयाचा, असा प्रश्न काँग्रेसच्या अध्यक्ष श्री. इंदिरा गांधी यांना पडला असला पाहिजे. केरळमध्यें मंत्रिमंडळ उलथून टाकण्याच्या चळवळींस काँग्रेसश्रेष्ठांचा आशीर्वाद मिळाल्यानंतर द्वैभाषिक मोडण्यासाठीं आम्ही चळवळ उभारावयाची म्हटल्यास तिच्यावर आक्षेप घेण्यास काँग्रेसला नैतिक अधिकारच राहिला न हीं. संयुक्त महाराष्ट्र समितीच्या पार्लमेंटरी बोर्डानें काँग्रेसश्रेष्ठांच्या या भूमिकेचा उल्लेख करून व्यापक प्रमाणांत निकराचा तीव्र लढा देण्याचा ठराव केला. हा ठराव कम्युनिस्टांच्या प्रेरणेनें मुळींच केलेला नव्हता. किंबहुना कम्युनिस्टांचें धोरण केरळचा बदला घेण्याचें नव्हतें, हें सर्वांना आतां समजलें आहे. समितीची चळवळ केरळपेक्षां मोठी होईल असें एका मुलाखतींत मी म्हटलें होतें. आमच्या चळवळीच्या ठरावामुळें फेर-विचाराची निकड काँग्रेसला ताबडतोब भासली यांत संशय नाहीं. कारण

चळवळीविषयीं श्री. चव्हाण यांचा अंदाज समजावून घेण्याच्या निमित्तानें फेरविचारास प्रत्यक्ष तोंड पडलें. चळवळ दडपण्यासाठीं गोळीबारापर्यंत मजल मारण्याचा बदसल्ला श्री. चव्हाण यांनीं स्वीकारला नाहीं. साहजिकच स्वतः पं. नेहरू, पं. पंत व श्री इंदिरा गांधी यांना, जनतेला नको असलेलें द्वैभाषिक तिच्यावर कां लादावें व सार्वत्रिक निवडणुकीपर्यंत तरी कां थांबावें असा प्रश्न पडला असेल. मी मात्र असें म्हणेन कीं, द्वैभाषिकाचा फेरविचार राजकर्त्यांना करावयास लावण्याचें श्रेय मराठी जनतेच्या खंबीर निर्धारालाच दिलें पाहिजे. जनतेनें आपल्या इच्छाशक्तीनें अखेर काँग्रेसला नमविलें.

संयुक्त महाराष्ट्र मिळवून मराठी माणसांनीं न्याय्य लढा देण्यांत मोठे यश मिळवले आहे. पण हा लढा अन्यायाविरुद्ध होता. आपल्या दुसऱ्या राज्यांतील बंधवाविरुद्ध नव्हता. तेव्हां यापुढें गुजराथ व महाराष्ट्र हीं दोनहि राज्यें म्हैसूरबरोबर एका विभागांत राहावींत असें राष्ट्रीय एकतेचा विचार करतां मला वाटतें. एका पश्चिम विभागांत या तीन राज्यांचा समावेश झाल्यास महाराष्ट्र एकीकडे गुजराथमार्फत उत्तरेशीं व दुसरीकडे म्हैसूरद्वारा दक्षिणेशीं हितकर संबंध टेवूं शकेल. भौगोलिक दृष्टया महाराष्ट्र हा भारताचा कणाच आहे. राज्यकर्त्यांनीं या खंबीर आधारावर अन्यायाचा आघात केला होता ही भारतीय राजकारणाच्या दृष्टीनें अत्यंत अनिष्ट गोष्ट घडली होती. आतां अन्याय दूर होत असतांना, महाराष्ट्राने आपलें उत्तर व दक्षिण यांमधील दुव्याचें स्थान ओळखून अखिल भारतीय संदर्भ न सोडतां अंतर्गत प्रश्न निकालांत काढले पाहिजेत. प्रादेशिक विभागांमधील हितविरोध, जातीय भांडणें, वर्गकलह इत्यादि समस्या सोडवितांना अखिल भारतीय दृष्टिकोन विसरतां कामा नये. किंबहुना आपण हे प्रश्न सोडविण्याचा असा नमुना इतर राज्यांनां दाखवून दिला पाहिजे कीं, ज्यायोगें तींहि आपापलें प्रश्न सोडविण्यांत व तेढ कमी करण्यांत यशस्वी होतील. उदाहरणार्थ, हिंदी इंग्रजीच्या वादांत महाराष्ट्रास समन्वयाची भूमिका घेतां येईल. महाराष्ट्रानें इंग्रजी भाषेचें शिक्षण चालूं ठेवून

दाक्षिणात्यांबरोबर राहिलें पाहिजे, पण त्यांना हिंदीचा द्वेष नको असें सांगितलें पाहिजे. त्याचबरोबर कै. आचार्य नरेन्द्रदेव म्हणत असत त्याप्रमाणें उत्तर-भारतीयांनीं एक तरी दक्षिणी भाषा शिकली पाहिजे, असें आपण त्यांना आग्रहानें पटवून दिलें पाहिजे. अशी बहुभाषिकता सांस्कृतिक देवघेवीस उपयुक्त ठरेल. या दृष्टीनें सर्व भाषा देवनागरी लिपींत लिहाव्यात असें मला वाटतें.

स्वदेशसंरक्षणाच्या दृष्टीनेंसुद्धां महाराष्ट्रास महत्त्वाची कामगिरी बजावता येईल. चिनी आक्रमणाचेंच उदाहरण घ्या. हिमालयीन सीमेवरील पर्वतप्रदेशांत आक्रमकांचा समाचार घेण्यासाठीं नेपाळी गुरख्यांच्या खालोखाल महाराष्ट्र देशाला काटक सैनिक देऊं शकेल. याच दृष्टीनें संरक्षणास उपयोगी असे कारखाने महाराष्ट्रांत सुरू करण्याचा प्रयत्न राज्यानें केला पाहिजे.

गुजराथ व महाराष्ट्र राज्यें एकाच वेळीं निर्माण होत असून त्यांच्यामध्यें एक प्रकारची निकोप स्पर्धा आर्थिक विकासाबाबत स्वाभाविकपणें राहील. देशी-परदेशी उद्योगपतींना कारखाने काढण्याचें आमंत्रण गुजराथ देईल. महाराष्ट्रांतहि कारखानदारी झपाट्याने वाढली पाहिजे. आपल्याजवळ भरपूर मनुष्यबळ आहे. तेव्हां सहकारी पद्धतीनें त्याचा उपयोग करून घ्यावा. लोककल्याणाच्या दृष्टीने आर्थिक कारभार विकेंद्रित स्वरूपांत व्हावा. मात्र सहकारी सोसायट्या, कामगार-संघटना इत्यादींमध्यें राज्यकर्त्या पक्षाची मक्तेदारी सुरू होता कामा नये. राजकीय व आर्थिक सत्ता विखुरली गेली पाहिजे या दृष्टीनेच सहकारी शेती इष्ट वाटते. औद्योगिक क्षेत्रांतहि पांच वर्षांचा 'नो वॉर पॅक्ट' कारखानदार व कामगार यांच्यांत झाल्यास भांडणें कमी होतील व उत्पादनांत खंड पडणार नाहीं. कारखानदारी वाढविण्यास आवश्यक त्या सोयींसवलती स्थानिक स्वराज्यसंस्थांनी व राज्यसरकारांनी दिल्या पाहिजेत. नवे कारखाने निघावेत म्हणून आकर्षक परिसर ठिकठिकाणीं निर्माण करावयास हवेत. अशा रीतीने विधायक उपक्रमशीलता आपण दाखवूं शकलों तर आपोआपच गुजराथी लोकांच्या द्वेषावर आपली चळवळ उभारली नव्हती

हें सिद्ध होईल. संयुक्त महाराष्ट्र आम्ही मागतो तो आमचें घर नीट बांधण्या-साठीं याचा स्पष्ट प्रत्यय सर्वांस येईल. या बाबतींत पुढारलेल्या वर्गांने वर्गाने स्वावलंबनाची संवय सर्व समाजाला लावली पाहिजे, असें मला वाटतें. त्यायोगें प्रत्येक रचनात्मक कार्यासाठीं सरकारच्या तोंडाकडे पहात बसण्याची गरज न राहतां स्थानिक परिश्रमांनी कामें उरकलीं जातील व आर्थिक बोजाची वांटणी आपोआप होईल. आपण सहकारी तत्त्वाचा अवलंब केल्यास दलालांच्या वांट्याला जाणारा नफाहि उत्पादकांच्या संघठनांन। मिळूं शकेल.

हें रचनात्मक कार्य करीत असतांना, त्यास धक्का न लावतां संयुक्त महा-राष्ट्राच्या निर्मितींत कॉंग्रेसच्या विभाजन-योजनेमुळें आलेल्या उणीवा व झालेले अन्याय दूर करून घेण्याचा लढा चालविणेंहि शक्य आहे.

शैक्षणिक प्रयोग म्हणून उत्तम संस्कार करण्याचें कार्य त्वरित हातीं घ्यावयास हवें. उदारणार्थ, मुंबईसरकारने कांहीं रुपयांच्या आंत वार्षिक प्राप्ति असलेल्या पालकांच्या मुलामुलींकरिता सर्व शिक्षण मोफत देण्याचें ठरविलें आहे. या मुलमुांलींतून हुशार विद्यार्थी निवडून त्यांच्यासाठीं 'पब्लिक स्कूल'च्या धर्तीवर जिल्ह्यांच्या ठिकाणीं शाळा चालविण्याचा प्रयोग करण्यासारखा आहे. अशा शाळेशेजारींच सर्व जातींच्या मुलांकरितां वसतिगृह असावें.

नवीन सांस्कृतिक मूल्यें जोपासण्याच्या दृष्टीने मला वाटतें की द्रव्यो-पासनेचा ह्व्यास कमी करणें इष्ट होय. त्यायोगे आज दिसून येणारें नैतिक अधःपतन रोखलें जाईल. वैयक्तिक द्रव्यार्जनाबरोबरच समाजाच्या व राष्ट्राच्या संपत्तींत भर टाकण्याचा राजसभाव निर्माण करणें आवश्यक आहे. राज-कारणाला त्याचें योग्य तें स्थान देऊनहि, राजकारण म्हणजे समाजाचें सार-

सर्वस्व नव्हे, तें एक साधन आहे, ही भावना जनतेंत उत्पन्न करण्याचें ध्येय जाणत्या विचारवंतांनी ठेवलें पाहिजे. असें झालें तरच महाराष्ट्र स्थापन होण्यांत महत्त्वपूर्ण कामगिरी झाली असें म्हणतां येईल. महाराष्ट्राला स्वतःचा असा एक व्यवहार धर्म म्हणून सांगता आला पाहिजे. तो कांही तत्त्वावर आधारतां आला पाहिजे आणि हा महाराष्ट्र धर्म सगळीकडे वाढावा अशी तळमळ पाहिजे तरच महाराष्ट्र संस्थापनेला कांहीं अर्थ प्राप्त होईल. अन्यथा एक फाळणीचाच प्रकार येवढेच त्याचे स्वरूप राहील. ते तसें नसावे यासाठींच सारा अट्टाहास असला पाहिजे.

• • •

५. सामाजिक जीवन :

'एसेम' या व्यक्तीचं मोठेपण ते एक विधायक कार्य करणारे केवळ राजकीय कार्यकर्ते आहेत म्हणून नव्हे तर ते आगरकराप्रमाणें सामाजिक सुधारणा, समाजशिक्षण याबाबतहि प्रागतिक विचार मांडणारे व कार्य करणारेहि आहेत, यांत आहे. लोकशाही रुजायची असेल, समाजवाद यशस्वी व्हायचा असेल, महाराष्ट्र धर्म वाढायचा असेल तर समाजशिक्षण झालें पाहिजे, नव्या परिस्थितींत बरे वाईट काय तें शिकवलें गेलें पाहिजे, निराशेचें मळभ येऊं देतां कामा नये, त्यागाचें स्तोम माजवणें जरूर नसलें तरी त्यागाची कल्पना विकसनशील देशांत त्याज्य ठरवणें शक्यच नाहीं असें त्यांना नेहमींच वाटतें. ग्रामदान, कामगार चळवळ, यांसारख्या व अन्य सार्वजनिक कार्यक्रमांची त्यांना नेहमीं उपयुक्तता वाटतें. सार्वजनिक कार्य करतांना समाजाकडून 'फुलं कमी, फटकेच जास्ती' अशी स्थिति असते. पण खऱ्या कार्यकर्त्यानें वैफल्य भावना बळावूं देतां कामा नये. आपण काम करतो हें बघून अनेक तरुण लोकहि तो मार्ग घ्यायला प्रवृत्त होतात. त्यांच्यावर अशा भावनेचा काय परिणाम होईल हें विसरतां कामा नये. तसेंच एकदां हे जीवितकार्य पत्करल्यावर, कांहीं अपयश पदरांत पडले, तर संन्यास घेण्याचेहि मनांत येऊं देऊं नये. आतां आपल्याला स्वातंत्र्य मिळाले असले तरी सुराज्याची इमारत अजून पुरी व्हायचीच आहे. मतभेद, असले किंवा आपले कुणीं ऐकले नाहीं तर एकदम बाजूला होणें यांत एक प्रकारची भिरुता आहे. विधायक कार्य करणाऱ्यां जे अधिकाधिक निरपेक्ष, अधिकाधिक सहज ते विधायक असेंच मानले पाहिजे.

सामाजिक सुधारणेचा काळ संपला, आतां कशाचीच जरूरी नाहीं असें आपण अजून म्हणूं शकत नाहीं. समाजापुढें चांगल्याचांगल्या कल्पना मांडल्या पाहिजेत. नाहींतर पुढें दिसेल तेंच ग्रहण करण्याच्या प्रवृतिमुळें, सामाजिक शिक्षण न होता, वाईट प्रवृत्तीच समाजांत वाढीला लागतील. त्या दृष्टीनें भारतांत अजून बऱ्याच समाजसुधारकांची गरज आहे. विशेषतः वर्गविग्रहासारख्या कल्पना मांडल्या जात असतां संयम बाळगून, चांगल्या बाबींचे समाजाला शिक्षण देऊन संघर्षमय जीवनांत कटुता निर्माण होणार नाहीं हें पहाणें महत्त्वाचें ठरेल.

◆ ◆ ◆

ग्रामदान हाच
विधायक पुरुषार्थाचा मार्ग

लेखनकाल : मार्च १९५८

भूदान-आंदोलनाचा देशीं-परदेशीं आतां बराच बोलबाला झाला आहे. सतत सात वर्षें भारतांतील निरनिराळ्या राज्यांत पदयात्रा करून विनोबा आपला संदेश ग्रामीण जनतेला ऐकवीत आहेत. सुरुवातीला त्यांच्या उपक्रमाकडे कोणी विशेष लक्ष दिलें नाहीं, किंबहुना उपेक्षा आणि उपहास करण्यांतच पाढिक पंडितांनीं धन्यता मानली; राजकारणी लोकांनीं त्यांची अवहेलनाच केली; परंतु हळूहळू ही परिस्थिति निवळली विनोबांची कठोर तपस्या आणि त्यांच्या कार्यांत मिळूं लागलेलें यश याचाहि परिणाम झाल्याशिवाय राहिला नाही. हातांत राजसत्ता आली म्हणजे आपण सर्व कांहीं करूं शकतों ही शासनकर्त्यांचीं घमेंडहि हळूहळू ओसरली. 'अचूक धोरणें आंखून आम्ही देशाच्या अन्नधान्ययांचा प्रश्न सोडवूं, गरीब-श्रीमंत यांच्यांतील अमानुष विषमता दूर करूं, जमिनींचें फेरवांटप कायद्यानें करून टाकूं, बेकारी दूर करूं.' इत्यादि बढाया हवेंत विरून गेल्या. त्यामुळें-देखील विनोबा काय म्हणत आहेत याचा विचार करणें राज्यकर्त्यांना जरूरीचें वाटूं लागलें असावें.

विनोबांच्या आंदोलनाचीहि दिवसेंदिवस उत्क्रांति होत आहे. भूदानाचें रूपांतर आतां ग्रामदानांत झालें असून हा प्रश्न केवळ जमिनीच्या वांटपाचा नसून समग्र जीवनाकडे पाहण्याचा तो एक विशेष दृष्टिकोन आहे, असें

विचार आतां पुढे येऊं लागले आहेत. जयप्रकाश नारायण यांच्यासारखे प्रथम श्रेणींतील राजकारणी नेते पक्षीय राजकारणाला गौण लेखून विनोबांच्या आंदोलनांत सामील झाले आहेत. ज्या ध्येयांचा उद्घोष राजकीय पक्षांच्यामार्फत आपण करीत असतों तीं ध्येयें साध्य करून घेण्यास विद्यमान पक्ष, त्यांचीं धोरणें आणि कार्यपद्धति असमर्थ आहेत असें वाटल्यावरूनच आपण हा मार्ग स्वीकारला असें तें सांगतात.

भारतांत आज प्रकर्षानें दिसून येणारी आर्थिक आणि सामाजिक विषमता नष्ट करणें हें समाजवादी आंदोलनाचें प्रमुख कार्य आहे. शेतीवर गुजराण करणाऱ्या ७० टक्के लोकसंख्येला न्याय मिळवून देण्याचा निर्धार समाजवादी पक्षानें प्रथमपासूनच प्रकट केलेला आहे. त्या दृष्टीनें शेतकऱ्यांच्या शेतांत निर्माण होणारा माल आणि कारखान्यांत उत्पन्न होणाऱ्या वस्तु यांच्या किंमतींत दिसून येणारी विषमता दूर झाली पाहिजे. त्यासाठीं आम्ही कसोशीनें प्रयत्न करूं असें आश्वासन पक्षाकडून वेळोवेळीं दिलें गेलें. ७०–७५ टक्के लोक शेतीच्या धंद्यांवर आपली गुजराण करतात आणि देशांत निर्माण होणाऱ्या संपत्तीपैकीं जवळजवळ निम्मी संपत्ति शेतीच्या व्यवसायांतून निर्माण होतें. हा धंदा जोंपर्यंत सुस्थिर पायावर उभारला जात नाहीं तोंपर्यंत अन्नधान्यांचा प्रश्न कसा सुटणार ? आर्थिक विषमता कशी नष्ट होणार ? आणि लोकशाहीदेखील कशी दृढमूल होणार ?

हल्लीं आपण लक्षावधि टन धान्य परदेशांतून आयात करतों. अशोक समितीच्या अहवालानुसार आणखी कित्येक वर्षें प्रतिवर्षी २० ते ३० लक्ष टन धान्य आपल्याला आयात करावें लागेल.

अन्नधान्यांचा प्रश्न वाढत्या लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर सोडवावयाचा म्हणजे तर धान्याचें उत्पादन कितीतरी पटीनें वाढलें पाहिजे.

आमचे पंतप्रधान शेतीच्या व्यवसायाचें प्राधान्य मान्य करतात, परंतु आर्थिक नियोजनांत त्या व्यवसायाला अविभाज्यपणें गोवून घेण्याची त्यांची तयारी नाहीं. कांहीं घरणें बांधणें किंवा राष्ट्रीय विस्तार आणि 'कम्युनिटी प्रॉजक्टस्' सारख्या येजनांचा पुकारा करणें म्हणजे शेतीला नियोजनांत स्थान देणें नव्हे. शेतकऱ्यांच्या तोंडावर टाकण्यासाठीं निरनिराळ्या कार्यक्रमांची एक जंत्री यापेक्षां त्याला अधिक महत्त्व नाहीं. तो एक संकल्प आहे! त्यांतील कांहीं भाग पूर्ण झाला नाहीं तरी त्यामुळें विद्यमान पंचवार्षिक योजनेंत बिघाड येत नाहीं. अन्नधान्य कमी पडलें तरी गांठीला असलेली हुंडणावळ खर्चून धान्याची आयात करता येतें. लोक उपाशीच मरूं लागले तर स्वस्त धान्याच्या दुकानांची व्यवस्था केली म्हणजे झालें! ती व्यवस्था-देखील प्रामुख्यानें शहरी जनतेसाठीं, ग्रामीण जनतेची दाद अगदीं शेवटीं लागायची. जमीनदारीची प्रथा नष्ट करून कायद्यानें जमिनीचें फेरवांटप करण्यांत आलें तरी त्यामुळें शेतीच्या व्यवसायास प्रोत्साहन देऊन अन्नधान्याचें उत्पादन वाढविण्याचा हेतु साध्य झालेला नाहीं. शेतीचा धंदा किफायतशीर होईल अशा रीतीनें नियोजन झाल्याशिवाय अन्नधान्याचा प्रश्न सुटणार नाहीं आणि शेतकऱ्याच्या नशिबीं लिहिलेलें दारिद्र्य संपणार गाहीं.

शेतीच्या धंद्याबाबतींत आजचे राज्यकर्ते अशी भूमिका कां स्वीकारतात? सध्यां शेतीवर परिश्रम करणाऱ्या बहुसंख्य जनतेचें व्यापारी भांडवलदार-वर्गाकडून शोषण होत आहे याची त्यांना जाणीव नाहीं असें थोडेंच आहे? शेतीवर गुजराण करणाऱ्यांपैकीं शेंकडा ८० टक्के केवळ उदरनिर्वाहाचें साधन म्हणूनच शेतीचा व्यवसाय करतात आणि त्यांना अन्नधान्याव्यतिरिक्त अन्य जीवनावश्यक वस्तु शेतांत पिकलेला माल विकूनच खरेदी कराव्या लागतात. शेतमाल स्वस्त भावानें विकावयाचा आणि महाग दरानें वस्तु विकत घ्यायच्या असें दुहेरी शोषण चालूं आहे. परंतु बडे भांडवलदार आणि बडे व्यापारी यांची पकड शासनसंस्थेवर आहे आणि त्यांची मनधरणी केल्याशिवाय राष्ट्राचा

प्रपंच चालूं शकणार नाहीं, असें विद्यमान राज्यकर्त्यांना वाटतें. म्हणून त या वर्गाला नाराज करण्यास तयार नाहींत. प्राप्त परिस्थितींत राज्यकर्त्यांना औद्योगिक प्रगतीलाच प्राधान्य द्यावें लागत आहे. नियोजनांत त्याच गोष्टील अग्रक्रम दिला जातो किंबहुना नियोजन त्यासाठींच आहे असें म्हटलें तरी चालेल.

ब्रिटिश अंमलांत आम्ही असें सांगत असूं कीं, हिंदुस्थानवरील आपली पकड कायम टिकविण्यसाठींच सरकार लष्करावर इतका अवाढव्य खर्च करतें. ती ऑक्युपेशन आर्मी आहे. देश स्वतंत्र झाला म्हणजे फौजफाट्यावर इतका खर्च करण्याची आवश्यकता उरणार नाहीं. त्याचा वापर देशाच्या आर्थिक विकासासाठीं करणें शक्य होईल. आज देश स्वतंत्र झाला आहे; परंतु लष्करावर होणारा आमचा खर्च कमी न होतां वाढलाच आहे. ' देशाच्या संरक्षणाला प्राधान्य देऊं नका ' असें सांगण्याची कोणत्याहि राजकीय पक्षाची हिंमत नाहीं. लष्करी सुसज्जता म्हटली कीं त्यासाठीं लागणारी कारखानदारी आलीच. म्हणूनच शेतीच्या धंद्याचें प्राधान्य मान्य करूनहि त्याबाबत नियोजन आणि नियंत्रण करण्याचें धोरण आंखून तें अंमलांत आणणें पंतप्रधानांना शक्य नाहीं. विद्यमान परिस्थितींत दुसरा कोणताहि पक्ष राज्यावर आला तरी त्याची स्थितीहि जनजागृतीच्या अभावीं अशीच होणार. बडे कारखानदार आणि व्यापारी यांचा शहरी विभाग सुरक्षित आणि ७०–७५ टक्के लोकसंख्येचा ग्रामीण विभाग आर्थिक दृष्टया उपेक्षित, अशी ही अवस्था आहे. ही दुरवस्था दूर करून बहुसंख्य उपेक्षित समाजाला सुरक्षित, सुस्थिर आणि विकसनशील जीवन प्राप्त करून द्यावयाचें असेल तर या प्रश्नाचा मुळापासून विचार व्हावयास पाहिजे.

सर्वच राजकीय पक्ष लोकशाहीच्या आणि समाजवादाच्या घोषणा करतात. आर्थिक आणि सामाजिक विषमता नष्ट करणें हें आपलें ध्येय आहे असें

सांगतात. परंतु त्या ध्येयाची सिद्धि होण्यासाठीं लागणारें सामर्थ्य जनतेंत निर्माण करण्याच्या दृष्टीनें त्यांचे प्रयत्न होत नाहींत. थोड्या परिश्रमांत आणि अल्प मुदतींत संघटना करून, राज्यकर्त्या पक्षावर दडपण आणतां येईल अशा गोष्टींनाच त्यांच्या कार्यक्रमांत अग्रक्रम मिळतो. शेतीवर गुजराण करणाऱ्या जनतेमध्यें जागृति निर्माण करून तिला संघटित करणें अवघड असतें कारखान्यांतून आणि शहरी विभागामध्यें संघटनेचें काम सुलभ असतें. त्यामुळें खेड्यांतील जनतेवर होणाऱ्या अन्यायाकडे कोणी लक्ष देण्यास तयार होत नाहीं; तिचें गाऱ्हाणें वेशीवर टांगलें जात नाहीं. व्याख्यानांतून नक्राश्रु ढाळण्यापलीकडे फारसें कांहीं घडत नाहींत. विरोधी पक्षदेखील तिकडे पुरेसें लक्ष देत नाहींत. म्हणजेच ग्रामीण जनतेवर होणारा अन्याय दूर करण्याचें सामर्थ्य त्या जनतेंत निर्माण करण्याकडे दुर्लक्ष केलें जातें; परंतु त्या वर्गांत तसें सामर्थ्य निर्माण झाल्याशिवाय या देशांत लोकशाही आणि समाजवाद कसा प्रस्थापित होणार ?

राज्यकर्ते कोणत्याहि पक्षाचे असले तरी व्यवहार्य राजकारणाला मान देतात. आजचें व्यवहार्य राजकारण म्हणजे शस्त्रसज्ज सेना आणि त्यासाठीं लागणारी कारखानदारी. यालाच अग्रहक्क दिला जातो. अशा परिस्थितींत जयप्रकाश नारायण यांच्यासारख्यांनीं पक्षीय राजकारणाबद्दल औदासीन्य दाखविलें तर त्यांना दोष कसा देतां येईल ? याचा अर्थ देशांतील शासनयंत्र कोलमडून पडावें अगर देशांत निर्नायकी व्हावी आणि देशाच्या ऐक्यास बाधा आली तरी ती त्यांना मंजूर आहे असें मुळींच नाहीं. त्यांच्या प्रतिपादनाचा मथितार्थ इतकाच कीं लोकशाही अबाधित राखून देशाचें ऐक्य टिकावें आणि बहुसंख्य जनतेचें दुःखदारिद्र्य नष्ट व्हावें. त्यासाठीं जनतेचें आवश्यक तें सामर्थ्य निर्माण करण्यासाठीं आपण आपलीं जीवनें समर्पित केलीं पाहिजेत असा त्यांचा आग्रह आहे.

मागासलेल्या देशांत लोकशाहीच्या मार्गानें आर्थिक आणि सामाजिक प्रगति झपाट्यानें कशी घडवून आणावयाची ही समाजवादी आंदोलनाच्या दृष्टीनें एक कूट समस्या आहे. औद्योगिक दृष्ट्या पुढारलेल्या देशांत आर्थिक जीवनाची घडणच अशी असते कीं, बहुसंख्य जनतेला आपलें परस्परावलंबित्व सहजच प्रत्ययास येतें. समाजाच्या अस्तित्वावरच आपली उन्नति अवलंबून आहे याची जाणीव बहुसंख्य श्रमजीवि जनतेला करून देणें कांहींसें सुलभ जातें. मागासलेल्या देशांत मात्र परिस्थिति याच्या अगदीं उलटी असते. जनतेमध्यें सामाजिक जाणीव उत्पन्न करून देणें जमलें नाहीं म्हणजे देशाचें ऐक्य टिकवून आर्थिक प्रगति साधण्यासाठीं जनतेच्या लोकशाही हक्कांना कात्री लावावी लागते. लोकशाही समाजवादाच्या उपासकांना ही गोष्ट साहजिकच तिरस्करणीय वाटते; परंतु नुसता तिटकारा करून काय उपयोग ? ऐक्य, आर्थिक प्रगति आणि लोकशाही हक्क या तिन्हीं गोष्टी एकदम कशा साधावयाच्या या प्रश्नाचें उत्तर त्यांनीं दिलें पाहिजे.

आचार्य विनोबा भावे आणि जयप्रकाश नारायण ग्रामदान आंदोलनाच्या द्वारें हाच प्रश्न सोडवूं पहात आहेत. छत्तीस कोटींच्या आपल्या देशांत कोट्यवधि व्यक्ति आहेत, पण त्यांच्यांत सामूहिक जाणीव नाहीं. आपल्या देशावर परचक्र आल्यास ही जनता एकाच भावनेनें प्रेरित होऊन उठेलहि परंतु आपलें आणि आपल्या समाजाचें जीवनमान उंचावण्यासाठीं, समाजांतील दुःख, दारिद्र्य नष्ट करण्यासाठीं, आपल्याला काहींतरी सामुदायिक पुरुषार्थ केला पाहिजे, अशी ईर्ष्या जनतेमध्यें आपण निर्माण केलेली नाहीं. अशी प्रेरणा घेऊन लोकांनीं काम करावें म्हणून मोठमोठ्या पुढाऱ्यांकडून वेळोवेळीं आवाहनें केलीं जातात, परंतु त्यांतून फारसें कांहीं निष्पन्न होत नाहीं. विनोबा सांगतात की, आपण गांवापासून प्रारंभ करूं या. गांवांतील समूह-भावना सुप्तप्राय झाली आहे ती पुन्हां जागृत करूं या. गांवांतील समूह-भावना सुप्तप्राय आहे ती पुन्हां जागृत करू या. गांवांतील सर्व लोकांनीं आपलें एक कुटुंब आहे

अशा भावनेनें वागण्यास प्रारंभ करावा आणि सर्वांच्या योगक्षेमाची जबाबदारी ग्रामसंस्थेनें स्वीकारावी.

यावर कांहीं मंडळीं असा आक्षेप घेतात कीं, तुम्ही खेडेगांवाच्या बोकांडीं कां बसतां? प्रथम आपल्या कल्पना शहरांत मूर्त स्वरूपाला आणून दाखवा आणि मग इकडे या त्या बापड्यांच्या ही गोष्ट लक्षांत येत नाहीं कीं, शहरी लोकांना अशा उपक्रमाची फारशी आवश्यकताच नाहीं. शहरांतील बडे व्यापारी, सावकार, भांडवलदार आणि त्यांच्या आश्रयानें राहणारे लोक सुरक्षित आहेत; त्यांच्या आर्थिक जीवनाचें नियोजन सरकारनें सुरू केलें असून, तें पार पाडण्याचा निर्धार केला आहे. उपेक्षित आहे ग्रामीण जनता! तिच्या शोषणावरच शहरी जीवनाचें नियोजन आणि वैभव उभें करावयाचें आहे.

गांवोगांव जर ग्रामकुटुंबाची भावना निर्माण होऊं शकली, तर गांवांतील लोकांच्या भरण-पोषणाची जबाबदारी पार पाडण्याच्या दृष्टीनें विचार सुरू होतील आणि धनोत्पदनाचा प्रमुख व्यवसाय जो शेती त्याच्यावर ग्रामकुटुंबाचें लक्ष केंद्रित होईल. आपल्या गांवांतील सर्व साधनसामग्रीचा उपयोग अधिकाधिक धन निर्माण करण्यासाठीं झाला पाहिजे, या गोष्टीची निकड त्यांच्या प्रत्ययास येईल. त्यांतूनच सामुदायिक पुरुषार्थाची प्रेरणा मिळेल.

विद्यमान परिस्थितींत शेतीवर कसातरी उदरनिर्वाह करणाऱ्या ७० टक्के लोकांवर होणारा अन्याय दूर करण्यासाठीं अथवा त्यांचें दैन्य नष्ट करण्यासाठीं राज्यकर्तीमंडळी आपण होऊन पुढाकार घेतील अशी शक्यता नाहीं. राज्यकर्त्यांची इच्छा असली तरी केवळ घोषणा करण्यापलीकडे त्यांच्या हातून कांहीं घडेल अशी परिस्थिति नाहीं. मग ज्यांनीं हीं दुःखें आणि अन्याय दूर करण्याचा विडा उचलला आहे त्यांनी काय करावें? जयप्रकाशजी म्हणतात कीं, ग्रामदान आंदोलनाच्या द्वारां ग्रामीण जनतेमध्यें जागृति निर्माण करणें हाच एक रामबाण उपाय आहे.

शेतीचा व्यवसाय करून उपजीविका करणाऱ्या बहुसंख्य जनतेच्या अनेक अडचणी आणि गाऱ्हाणीं आहेत. आर्थिक नियोजनाच्या कितीहि गप्पा मारण्यांत येत असल्या तरी मुख्य व्यवसायाची त्यांत उपेक्षाच केलेली आहे. शेती सुधारण्यासाठीं आणि अन्नधान्याचें उत्पादन वाढविण्यासाठीं ज्या योजना आंखलेल्या आहेत त्या आर्थिक नियोजनाचें एक अविभाज्य अंग आहेत असें नाहीं. त्यांतील कांहीं भाग केला आणि अन्य गाळला तरी नियोजनाच्या गाभ्याला कांहीं हानि पोहोंचूं नये आणि पंचवार्षिक योजना कोलमडून पडूं नये अशीच व्यवस्था करून ठेवलेली आहे

शेतीविषयक कार्यक्रमांची ही जंत्री जरी समजा, पार पाडली, तरी त्यामुळें शेतीचा व्यवसाय करणारांचें आर्थिक जीवन सुस्थिर होईल अशी शाश्वति देणें अशक्य आहे. कारण शेतांत पिकणाऱ्या मालाच्या किमान किंमतीचे नियंत्रण करून जोपर्यंत शेतकऱ्याची शेती किफायतशीर करण्याची योजना नाहीं, तोपर्यंत शेतकऱ्याच्या पांचवीला पुजलेलें दारिद्र्य चालूंच राहणार !

अन्नधान्य विपुल झालें तरीहि त्याचें नियोजन आणि नियंत्रण करावेंच लागतें ! कारण आपला देश मागासलेला असून आमची शेतीदेखील जुनाट पद्धतीनें चालते. जवळजवळ ८० टक्के शेतकरी थोड्या शेतीचा आणि दरिद्री आहे. हा शेतकरी कूळ असला काय किंवा मालक असला काय त्याचें उत्पादन अतिशय अल्प असतें आणि पीक आल्याबरोबर त्याला त्यांतील बराचसा भाग विकावा लागतो. कापडचोपड, औजारें इत्यादि वस्तु खरीदण्या-साठीं आणि कर्जबाम फेडण्यासाठीं त्याला रोख पैशाची आवश्यकता असते. सुगीच्या वेळीं माल विकला गेला म्हणजे स्वाभाविकच व्यापारी भाव पाडून घेतात. माल विपुल झाला तरीहि व्यवहार आंतबट्ट्याचाच होतो, व शेत-कऱ्याचें दैन्य कधीं जात नाहीं आणि व्यवसाय करण्याला हुरूप रहात नाहीं.

खेड्यापासून शहरापर्यंत व्यापाऱ्याला जो नफा मिळतो त्यांत शेती-मालाच्या नफ्याचा भाग अधिकाधिक असूं शकेल. हें शोषण आणि परिणामतः

होणारी शेतकऱ्यांची लूट थांबवावयाची असेल, तर जालीम उपाय करावे लागतील. शेतीमालाच्या व्यापारांतून निदान घाऊक व्यापाराचें तरी उच्चाटन करणें व शेतकऱ्याच्या मालाला योग्य किंमत मिळेल अशी व्यवस्था करून धान्यभाव वर्षभर स्थिर राखणें हाच यावर प्रभावी उपाय होऊं शकेल. आजचें सरकार तशी कांहीं व्यवस्था करण्यास सुखासुखी तयार होईल असें वाटत नाहीं. कारण भांडवलदार आणि बड्या व्यापाऱ्यांचें आजच्या सरकार-दरबारीं प्रभुत्व आहे शेतीचा व्यवसाय इतका असुरक्षित आणि दैवाधीन असल्यावर त्यात सुधारणा कशी होणार आणि अन्नधान्याचा प्रश्न तरी कसा सुटणार ?

ग्रामदानाच्या आंदोलनाचें या दृष्टीनें फार महत्त्व आहे. गांवांतील जनतेनें एक कुटुंब म्हणून एकत्र यावें आणि सर्व लोकांचा योगक्षेम चालविण्याच्या उद्दिष्टानें सर्व आर्थिक व्यवहाराची पुनर्घटना करावी, ही या चळवळींतील मुख्य प्रेरणा आहे. गांवांतील सर्व साधनसामग्री गांवाच्या मालकीची आहे असें समजून तिच्यांतून अधिकाधिक धन कसें उत्पन्न होईल याचा विचार ग्रामकुटुंबानें करावा अशी अपेक्षा आहे. गांवाच्या जमिनींचा वापर, लहान उद्योगधंदे, शेतीसाठीं लागणारें भांडवल, शेतांत तयार होणाऱ्या मालाची विक्री इत्यादि गोष्टींचा सामुदायिकरीत्या विचार करून आर्थिक व्यवहार होऊं लागला म्हणजे सहकारी तत्त्वाच्या आधारें ग्रामीण जीवनाची नव्यानें बांधणी होऊं लागेल. अशी संघटना होऊं शकली तरच शेतकऱ्यांची व्यापारीवर्गाकडून होत असलेली लूट थांबविणें शक्य होईल. ग्रामदानाच्या चळवळींतील हें रहस्य ग्रामीण जनतेला समजावून देऊन तिला या कार्यासाठीं प्रवृत्त केलें तर आज न सुटणारें असे जे प्रश्न आहेत ते सुटण्याच्या मार्गास लागतील; शेतकऱ्यांचें शोषण थांबेल; इतकेंच नव्हे, तर शास्त्रीय पद्धतीचा अवलंब करणें, जमिनीचा मगदूर वाढविणें आणि अधिकाधिक पीक काढणें इत्यादि गोष्टी घडवून आणणें शक्य होईल.

विनोबांच्या आंदोलनांत ग्रामोद्योगांना प्राधान्य देण्यांत येतें म्हणून कांहीं मंडळी नाकें मुरडतात. त्यांना वाटतें कीं, ग्रामोद्योगांवर भर देणें हें प्रतिगामित्वाचें लक्षण आहे. परंतु थोडासा गंभीर विचार केला तर त्यांचें महत्त्व सहज लक्षात येण्यासारखें आहे. विद्यमान सरकार सर्वांना काम देऊं शकत नाहीं. बेकारी सारखी वाढत आहे, यासाठी गांवांत जो ग्रामसंस्था ग्रामीण जीवनाचें सर्वांगीण नियोजन करील तिनें काम करूं इच्छिणाराला काम देण्याची जबाबदारी स्वीकारावयास नको कां ? ही जबाबदारी स्वीकारली नाहीं तर ग्रामकुटुंबाची कल्पनाच फोल ठरेल. एकवेळ सर्वांना काम द्यावयाचें म्हटलें आणि उपलब्ध शेत-जमिनींत सर्वांना काम देण्यासारखें नसेल तर ग्रामोद्योगांचा उभारणी आणि संघटना करावी लागेल.

शिवाय, कारखान्यांत तयार होणारा आणि शेतकऱ्याला आवश्यक असा माल रास्त किमतीला देण्याची जबाबदारी जर सरकार घेणार नसेल, तर शेतकऱ्यांनीं तो माल विकत घेण्याचें टाळावें हेंच उचित होय. बडे कारखानदार आणि व्यापारी यांनीं चालविलेल्या पिळवणुकीस आळा घालण्याचा तो एक उपाय आहे. साम्राज्यशाहीकडून आमच्या देशाचें आर्थिक शोषण होत होतें तेव्हां स्वदेशी आणि बहिष्काराचा जो कार्यक्रम आंखण्यांत आला, त्याच्या मागचा भूमिका यापेक्षां निराळी होती काय ? आतां आम्हांला 'देशी बसाहतवादा'ला तोंड द्यावयाचें आहे. ग्रामीण जनतेनें आपणांस लागणारा माल शक्यतोंवर गांवांतच निर्माण करण्याचा निर्धार केला तर आपला कार्यभाग होऊं शकेल. गांवांतील लोकांना कामधंदा मिळेल आणि देशी बसाहतवादाच्या मुसक्या बांधण्यासहि त्यायोगें मदत होईल. ग्रामदान चळवळ यशस्वी होत गेली तर राज्यकर्त्यांवर तिचा प्रभाव पडल्यावांचून राहणार नाहीं आणि देशाच्या आर्थिक नियोजनामध्यें शेतीच्या उपेक्षित व्यवसायाचा खऱ्या अर्थानें समावेश करणें त्यांना भाग पडेल.

◆ ◆ ◆

निराशेनें मी सामाजिक जीवनास वैतागत नाहीं

लेखनकाल : नोव्हेंबर १९५३

एक काळ असा होता कीं, आपण सार्वजनिक कार्य करतों, असें सांगण्यांत माणसाला अभिमान वाटे. देशकार्य हें एक भूषण समजलें जाई. त्यामुळें सार्वजनिक कार्याकडे लोक— विशेषतः तरुण मंडळी स्वाभाविकपणेंच आकर्षिली जात असत. जीवन-साफल्याचा तो एक मार्ग होता; पुरुषार्थाचें तें एक साधन होतें. परंतु स्वातंत्र्यप्राप्तीनंतर परिस्थिति झपाट्यानें बदलत गेली. सार्वजनिक कार्याबद्दल आजकाल पूर्वीसारखी आस्था दिसून येत नाहीं. त्याची आवश्यकता आणि महति प्रतिपादन केली जात असली तरी त्या प्रतिपादनांत ओज नसतें; त्यांतून कार्य करण्याची स्फूर्ति मिळूं शकत नाहीं.

स्वातंत्र्यपूर्व काळांत देशसेवा हें एक चांगलें कार्यच नव्हे, तर प्रत्येकाचें कर्तव्य आहे अशी जाणीव असे. देशासाठीं स्वार्थत्याग करण्यांत पुरुषार्थ आहे अशी बहुसंख्य लोकांची धारणा होती; ती एक स्पृहणीय, श्रेष्ठ गोष्ट वाटे. त्यामुळें आपल्याला जरी शक्य झालें नाहीं तरी जो कोणी त्या मार्गाचा अवलंब करीत असे, त्याच्याबद्दल साहजिकच सहानुभूति आणि प्रेम वाटे. तो आपलेंच काम करीत आहे अशी भावना असे. आज मात्र ही भावना फारशी प्रत्ययास येत नाहीं. सार्वजनिक कार्यकर्त्यांबद्दल आस्था तर दूरच राहिली, परंतु बऱ्याच वेळीं एक प्रकारची उपेक्षावृत्ति दिसून येते. कारण, समाजासंबंधीं आपलें कांहीं कर्तव्य आहे ही कल्पनाच मागें पडल्यासारखी वाटते. जो तो

आपला स्वार्थ साधण्यांत दंग झालेला आहे. किंबहुना, तसें करणें हेंच श्रेयकर, अशी कल्पना दृढमूल होऊन सार्वजनिक कार्य म्हणजे लष्करच्या भाकरी असा ग्रह बनूं पहात आहे.

प्रत्येक मनुष्य केवळ स्वतःपुरताच विचार करूं लागल्यामुळें इतराकडे लक्ष देण्यास त्याला फुरसतहि नाहीं. स्वार्थ साधण्याची इतकी गर्दी झालेली आहे कीं, त्यांत सूक्ष्मासूक्ष विवेक करण्याची आवश्यकता भासत नाहीं. आपल्या स्वार्थापायीं दुसऱ्यांवर नाहक, अन्याय होत आहे याचीहि खंत वाटेनाशीं झाली अ‍ाहे. सत्ता आणि संपत्ति हींच सर्वश्रेष्ठ जीवनमूल्यें होऊन बसल्यासारखीं दिसतात. परंतु एकाचें सुख तेंच दुसऱ्याचें दुःख, एकाचें हित तेंच दुसऱ्याचें अनहित आणि एकाचा स्वार्थ तोच दुसऱ्याचा नाश, अशी आजची परिस्थिति असल्यामुळें प्रत्येकाच्या स्वार्थी धडपडींतून संघर्ष, कटुता, वैफल्य यांचीच निर्मिति होत राहते.

वैफल्याची भावना इतकी तीव्रतर होत चालली आहे की, तिची सावली सार्वजनिक कार्य करणाऱ्या उरल्यासुरल्या मूठभर लोकांवर पडल्यावांचून राहिलेली नाहीं. आपण करीत असलेल्या कार्यांची कदर होत नाहीं अशी रुखरुख त्यांच्या मनाला लागल्यासारखीं दिसते. आपल्या कार्याचें चीज कशांत आहे ? त्याच्या यशस्वितेचें गमक कोणतें ? इत्यादि प्रश्नांबाबत गंभीरपणें विचार करण्याचें भानहि त्यांना या बोचणीमुळें रहात नाहीं. साहजिकच हा सर्व खटाटोप कशाला करावयाचा, असा प्रश्न त्यांच्यापुढें उभा राहतो. म्हणूनच 'सार्वजनिक कार्याचा तुम्हांला अजून कंटाळा कसा आला नाहीं ?' हा प्रश्न मला तरी नवीन नाहीं त्याबद्दल आश्चर्यहि वाटत नाहीं. कारण, दुसरे लोकच हा प्रश्न मला विचारतात असें नसून, माझ्या मनांतहि अनेक वेळां तो उभा राहतो. अशा वेळीं मी मनाचें समाधान कसें करतों आणि सार्वजनिक कार्याची रजा कां घेत नाहीं हें सांगणें तितकेसें सोपें नाहीं.

तथापि या प्रश्नासंबंधीं माझें विचार मोकळया मनानें मांडलें, तर तें उद्बोधक जरी नाहीं तरी कांहींसें मनोरंजक होतील असें वाठतें.

सार्वजनिक जीवनाच्या आरंभीच्या काळात आमचे एक मित्र विनोदानें आम्हांस विचारीत, " काय रे, स्वराज्य मिळाल्यावर तुमचं काय होणार ? त्यांच्या प्रश्नाचा रोख असा होता कीं, स्वराज्य मिळाल्यावर आम्हांला कांहीं कामच उरणार नाहीं आणि बेकार होऊं ! त्या वेळीं अर्थातच आम्हांला या प्रश्नाबद्दल विशेष कांहीं वाटत नसे. एक विनोदाचा विषय म्हणूनच आम्ही हंसण्यावारी नेत असूं एक तर स्वराज्य इतक्या सहजासहजीं मिळेल असें आम्हांला कधींच वाटलें नाहीं. आणि दुसरें म्हणजे स्वराज्यप्राप्तीनंतर काय परिस्थिति निर्माण होईल याबद्दल आम्हांला फारच थोडी कल्पना होती. परंतु आज त्या गोष्टीची आठवण झाली म्हणजे गंमत वाटल्याशिवाय राहात नाहीं. विनोदानें विचारलेल्या या प्रश्नांत न कळत कां होईना, फार गंभीर आशय सामावलेला होता म्हणायचा ! स्वातंत्र्योत्तर काळांत पूर्वीसारखीं मानमान्यता राहणार नाही; पूर्वीच्या प्रमाणांत नवे कार्यकर्ते मिळणार नाहींत, इतकेंच नव्हे तर जुनीं माणसेंदेखील एकामागून एक गळूं पाहतील असें त्या वेळीं आम्हांला कोणीं सांगितलें असतें, तर तें खरें वाटलें नसतें. परंतु आज 'सार्वजनिक कार्याचा तुम्हांला अजून कंटाळा कसा आला नाहीं?' असें विचारण्यापर्यंत मजल येऊन पोहोंचली आहे !

तसं पाहिलं तर कांहीं न करतां आळसांत काळ काढणें हा कांहीं मनुष्याचा प्रकृतिधर्म नव्हे. कांहीतरी करीत राहावें असेंच प्रत्येक जिवाला वाटतें. हालचाल संपली कीं जीवन संपलें असें आपण समजत असतों; चैतन्य हें जीवनाचें मुख्य लक्षण आहे. नदीचें पाणी सारखें पुढें धाव घेत असतें; जीवन-सरितेलादेखील तोच न्याय लागूं आहे. निरनिराळ्या इच्छा, आकांक्षा, भावना आणि प्रेरणा मानवी जीवनाला चालना देत असतात. त्या जितक्या

प्रभावी, तितकी जीवनामध्यें तीव्रता अधिक. हृदयांत उफाळणाऱ्या असंख्य ऊर्मि आपल्याला पुढें रटीत असतात. त्यांच्यामुळेंच मानवी जीवनाला गतिमानता येते. माझें सार्वजनिक कार्य हेंदेखील अशाच इच्छा-आकांक्षांचा परिपाक आहे. ही सारी धडपड त्यांच्या पोटींच जन्माला येतें, असें म्हटलें पाहिजे. जन्माला आल्यावर मानवाला निरनिराळीं कर्में करावींच लागतात; तीं सुटत नाहींत. सार्वजनिक कार्य हेंदेखील अशाच कर्मांपैकीं एक आहे.

या कार्याचा मला कधींच कंटाळा येत नाहीं असें म्हटलें तर तें मोठ्या धाडान्त खोटेपणाचें होईल. कित्येकदां तर असें विचित्र अनुभव येतात कीं, मन अगदीं वैतागून जातें. आपली धडपड जरी सद्हेतुमूलक असली तरी लोकांना जर ती तापदायक होत असेल, तर हा अट्टाहास काय म्हणून चालूं ठेवायचा, असा विचार मनांत आल्यावांचून राहत नाहीं. परंतु हा वैताग फारच थोडा वेळ टिकतो. स्मशानवैराग्यासारखीच ही भावना अल्पजीवी ठरते. थोडा वेळ गेला म्हणजे पुन्हां आपलें 'ये रे माझ्या मागल्या' आहेच जीवनाचा ओघ थांबवूं म्हटल्यानें थोडाच थांबतो ?

एक वेळ जो मार्ग पत्करला तो खरोखरच चांगला आहे अशी खात्री पटल्यावरूनच मी त्याला चिकटून आहे हें तरी खरें असेल कां ? आजपर्यंत करीत आलो तें सोडून देण्यांत मानखंडना वाटत असल्यामुळेंच मी त्या मार्गाला चिटकून राहिलों नसेन कशावरून ? कदाचित् परत फिरण्याची शक्यताच नसेल. नारळी-पोफळीच्या झाडासारखेंच एकेरी जीवन असेल माझें ! दुसऱ्या फांद्या फुटणेंच शक्य नसेल; अन्य दिशेनें वाढ होण्यासारखीं नसल्यानें अगतिक होऊनच मीं हें कार्य करीत असेन. इतरांनादेखील अशा कार्याला वाहून घेण्याचा मी आग्रह करतों तेव्हां शेपूट तुटलेल्या कोल्ह्यासारखीच माझी मिका नसेल कशावरून ? – असेंहि विचार मनांत चमकून गेल्याशिवाय राहात नाहींत. अशा वेळीं साहाजिकच मन अंतर्मुख होऊन कार्य करण्यास

उद्युक्त करणाऱ्या प्रेरक शक्तींचा मागोवा घेऊं लागतें आणि गतायुष्याचा चित्रपट मनश्चक्षुंपुढें उभा राहतो.

सुमारें २५ वर्षांपूर्वीं मीं सार्वजनिक कार्यक्षेत्रांत पदार्पण केलें तेव्हां तारुण्यांतील रक्त नसांतून सळसळत होतें. अन्यायाची चीड आणि पुरुषार्थाची आस स्वस्थ बसूं देत नव्हती. परकीय लोक आपल्या देशावर जुलूम करीत आहेत; त्यांच्या सत्तेशीं दोन हात करण्यांत कृतकृत्यता वाटे. स्वातंत्र्य-लढ्याच्या सत्रांत पंडित नेहरू एक वेळ म्हणालेहि होते, "समरप्रसंगीं माझ्या मनाला आनंदोत्सवाचें भरतें येतें!" त्या वेळीं ते आम्हां तरुणांच्या हृदयांतील भावनाच जणूं व्यक्त करीत होते. परकीयांविरुद्ध लढा करण्याची इच्छा सतत आमच्या हृदयांत ठाण मांडून होती. अर्थातच त्यामध्यें महत्वाकांक्षेचा भागहि भरपूर होता, हें प्रांजलपणें कबूल केलें पाहिजे. कांहींतरी असामान्य करून दाखवावें आणि 'चमकावें' या तारुण्यसुलभ भावनेचा अंमल आमच्या मनावर होता; तो इतका कीं, अन्यायाचा प्रतिकार करतांकरतां मृत्यु यावा आणि आपण हुतात्मा व्हावें या विचारानें मन भारावलेलें असे.

आजदेखील तरुण मंडळीं प्रतिकारात्मक चळवळीसाठीं अधीर असतात त्याचें कारण हेंच आहे. त्यांत त्यांच्या पराक्रम करून दाखविण्याच्या नैसर्गिक आकांक्षांना वाव मिळतो. ही आकांक्षा निव्वळ स्वार्थी स्वरूपाची आहे, असें मात्र म्हणतां येणार नाहीं. वाटेल तें करून इतरांपेक्षां आपलें आगळेपण दाखवावें ही भावना त्यांत नाहीं. लढण्याची ईर्ष्या आहे म्हणून कोणालाहि मारीत सुटल्यानें मनाचें समाधान होत नाहीं; प्रत्येक कायदा मोडण्यास मन उद्युक्त होत नाहीं; त्याला सत्याग्रह हवा असतो. लोक ज्याला चांगला म्हणतील असा लढा हवा असतो. अर्थातच मानवी सहानुभूतीशीं त्याची आकांक्षा निगडित असते मानवी प्रेमाशीं या धडपडीचा अविभाज्य संबंध आहे याची जाणीव त्या वेळीं मनाला तितकीशी नसते. कारण, प्रेमापेक्षां पुरुषार्थाची आकांक्षाच अधिक प्रभावी असते.

सुरवातीला मनाची अवस्था अशा प्रकारची असली तरी कांलातरानें त्यांत फरक पडल्यावांचून राहत नाहीं. जीवनौघाच्या प्रगतीबरोबर निरनिराळ्या घटनांबाबत मनाच्या प्रतिक्रिया बदलत जातात. आपल्या इच्छा-आकांक्षा, आवडीनिवडी यांतहि बदल होत गेल्याचें प्रत्ययास येतें. निदान माझ्यापुरता तरी मला तसा अनुभव येत आहे. केवळ अन्यायाचा प्रतिकार करून मनाला पूर्वीइतकें समाधान होत नाहीं. या धडपडींतून काय निष्पन्न होत आहे हा प्रश्न वारंवार मनापुढें उभा राहतो. कारण, समाजामध्यें वैफल्याची भावना वाढीला लागत असल्याचें आपल्याला उघड दिसत आहे, आपलें प्रयत्न चालूं असतांना हें वैफल्य आणि बेदरकारी कां, असा विचार मनांत आल्यावांचून राहत नाहीं.

आपण लोकहितासाठीं धडपड करतों आणि लोकांना तर त्याबद्दल आस्था वाटत नाहीं, अशी आपली तक्रार आहे. लोक स्वार्थी झाले आहेत, जो तो आपल्या पोळीवर तूप ओढावयास पाहतो; ज्या कार्यामध्यें त्यांचा प्रत्यक्ष फायदा होत असेल तेथेंच त्यांच्याकडून साथ मिळते, सामाजिक हिताची भाषा त्यांनां पटत नाहीं आणि त्यासाठीं कराव्या लागणाऱ्या त्यागास त्यांची तयारी नाहीं, असें आम्ही म्हणतों. वैफल्याची भावना वाढत आहे असें जें प्रतिपादिलें जातें तेंहि याच अर्थाने. परंतु असें कां होत आहे याचा शोध आपण केला आहे काय ?

या सर्व प्रतिपादनामध्यें असें ध्वनित करण्यांत येत आहे कीं, लोक स्वार्थी आहेत आणि आम्हीच काय ते सामाजिक हिताच्या दृष्टीने कार्य करीत आहोंत ! आम्ही सुचविल्याप्रमाणें लोकांनीं वर्तन केलें, तर त्यामुळें सामाजिक हित साधेल असें मानलें तरी खरोखर आमच्या मनाचा व्यापार कसा चालला आहे याचें बारकाईनें निरीक्षण केल्यास असें दिसून येईल कीं, आमच्या या धडपडीमागेंहि महत्त्वाकांक्षेचा भाग आहेच ती महत्त्वाकांक्षा तृप्त करून घेण्यासाठीं अन्यायाचा प्रतिकार आणि सामाजिक कार्य हें एक साधन

म्हणूनच प्रामुख्यानें योजिलें जात आहे. अन्यायाच्या प्रतिकारांतील व्यापक सहानुभूतीचा अथवा मानवी प्रेमाचा जो अंश आहे त्याची ओळख, आम्हांला पटल्यामुळें आम्ही कार्यप्रवण झालों असें क्वचितच घडतें. अशा परिस्थितींत जनतेचें सहकार्य तरी आम्हाला कां लाभावें ? जनतेचा स्वार्थ आणि आमची महत्त्वाकांक्षा यांचा सांगड जेथें बसेल तेथें जनतेचें सहकार्य लाभेल. परंतु आमची महत्त्वाकांक्षा आणि जनतेचा मात्र समाजहितासाठीं स्वार्थत्याग ही सांगड जमावी कशी ? ज्या वेळीं महत्त्वाकांक्षेऐवजीं मानवी प्रेमाचा साक्षत्कार होऊन आम्ही कार्यास प्रवृत्त होऊं, त्या वेळीं आजच्यापेक्षां निराळा अनुभव येणार नाहीं कशावरून ? स्वातंत्र्यचळवळींत जनतेचें देशप्रेम आणि कार्यकर्त्यांचें देशप्रेम यांचें साहचर्य होतें. वैयक्तिक स्वार्थ अगर महत्त्वाकांक्षा यांना त्या मानानें कमी महत्त्व होतें. म्हणूनच जनतेचें उत्स्फूर्त सहकार्य त्या वेळीं लाभलें.

आम्ही लोकांचें भलें करण्यासाठीं म्हणून निघतों; परंतु त्यांना तें नको असेल तर ? तें भलें आहे याची जाणीव जोंवर त्यांना झालेली नाहीं, तोंवर त्यांनी आमच्याशीं सहकार्य करावें या म्हणण्यांत काय तथ्य आहे ? स्वार्थ हा सहज समजण्यासारखा असल्यानें त्या बाबतींत लोक सहज सहकार्य करतात. साहजिकच त्यांचें सहकार्य लाभावें म्हणून अधिक संकुचित स्वार्थाला आवाहन करण्याची प्रवृत्ति बळावत जाते. आणि हें दुष्ट चक्र तसेंच चालूं राहतें. त्यामुळें सामूहिक हिताच्या भूमिकेवर कार्य करणारे कार्यकर्ते निष्प्रभ आणि उदासीन होत आहेत. परंतु याचा सर्व दोष जनतेच्या माथीं मारणें योग्य होणार नाहीं. अजाणतेपणें कां होईना, त्यांची प्रेरणादेखील महत्त्वाकांक्षेचीच असेल, तर त्यांना जनतेकडून साथ तरी कशी मिळणार ! असें लोकच जनतेनें सहकार्य केलें नाहीं म्हणून हताश होतात; आणि कामाला कंटाळतात किंवा कित्येक वेळीं सवंग क्रांतिवादाची कांस धरतात; आणि मग 'जनतेमध्यें औदासीन्य पसरलें आहे,' अशी हाकाटी सुरू होते. वस्तुतः असले कार्यकर्तेच निराशेचीं केंद्रें बनवतात आणि त्यांच्यापासूनच वैफल्याची भावना पसरत जाते.

कार्यकर्त्यांच्या मनांत घर करून बसलेली ही निराशा जोंपर्यंत दूर होत नाहीं, तोंपर्यंत जनतेच्या औदासीन्याबद्दलची हाकाटी अशीच चालू राहाणार. जनतेमध्यें औदासीन्य नाहींच असें म्हणावयाचा मांझा हेतु नाहीं; परंतु त्यामुळें कार्यकर्त्यांनींहि निराश होऊन स्वस्थ बसावें अथवा आततायी मार्गांचा स्वीकार करावा हें इष्ट नाही.

कांहीतरी करावें अशी एक प्रकारची निकड मला नेहमीच जाणवते. सर्वांना तसें होत असलें पाहिजे; जीवनाचा तो धर्मच आहे. परंतु त्या प्रवृत्तीप्रमाणें कार्य करूं लागलें म्हणजे तेजोभंगाचे आणि निराशेचें प्रसंग वारंवार येतात आणि कार्याचा कंटाळादेखील येतो. कारण त्याकार्यांत अहंता एकसारखी प्रभावी होण्यासाठीं धडपडत असते. त्यावर दोनच उपाय संभवतात; एक तर त्या कर्मप्रवृत्तीचा निरोध म्हणजेच आत्महत्त्या करणें; तें नको असेल तर ती प्रवृत्ति अधिकाधिक निरपेक्ष आणि सहज होईल असा प्रयत्न करणें.

गेलीं वीस-पंचवीस वर्षें मी प्रामुख्यानें सार्वजनिक कार्यच करीत आलेलों आहे. माझा पिंडच जणूं त्यावर पोसलेला आहे. 'स्वस्थ बसूं नको' असा तगादा आंतून एकसारखा चालूं असतो. परंतु मोठेपणाचा, प्रसिद्धीचा अथवा लोकांनीं चांगलें म्हणावें हा लोभहि त्यांत दडलेला असण्याचा संभव असें म्हणून मी स्वस्थ बसलों तर मनाला शांति लाभण्याऐवजीं अधिकच क्लेश होतात. म्हणून सार्वजनिक कार्याचा कंटाळा येण्याचा म्हणजेच तें सोडून देण्याचा प्रश्नच निर्माण होत नाहीं. कारण, कंटाळा आला तरी पुढें काय हा प्रश्न शिल्लकच राहतो. कर्म तर चुकवतां येत नाहीं; दुसऱ्या क्षेत्रांत गेलें तरी काय होणार? असमाधानाचें कारण जर अंगभूत असेल, तर तोच अनुभव येणार. अशा परिस्थितींत आपल्या प्रवृत्तीनुसार कर्म करीत राहणें हेंच श्रेयस्कर वाटतें. म्हणून जेणेंकरून आपल्या मनाला समाधान होईलं

आणि दुसऱ्यांनाहि आनंद मिळेल अशा प्रकारचें कार्य मी करीत राहतों. विधायक स्वरूपाच्या कार्यात हें सामर्थ्य आहे असें मला वाटतें.

विधायक कार्याचा माझा अर्थ मात्र त्या शब्दाच्या रूढार्थाहून भिन्न वाटण्याचा संभव आहे. माझ्या दृष्टीनें जें अधिकाधिक स्वनिरपेक्ष, अधिकाधिक सहज तें विधायक. अर्थातच निसर्गतः मनुष्याच्या ठिकाणीं मानवतेबद्दल प्रेम आहे, सद्भावना आहे ही या व्याख्येतील अभिप्रेत कल्पना आहे. ज्याला रूढार्थानें विधायक संबोधलें जाते तें या दृष्टीनें विधायक नसण्याचीहि शक्यता आहे. आणि ज्याला प्रतिकारात्मक म्हटलें जातें तेंहि विधायक असण्याचा संभव आहे. प्रतिकारात्मक आणि विधायक यांमध्यें सदैव विरोध असलाच पाहिजे असें नाहीं. कित्येक वेळीं अन्यायाचा प्रतिकार हीच सहज प्रतिक्रिया असते. उलट, ज्याला आपण विधायकता म्हणतो त्यांत कृत्रिमता असल्याचें अनेक वेळां दिसून येतें. विधायक कार्य करीत असतांना कित्येक वेळीं अशा घटना घडतात कीं, ज्यांमुळें सर्वच गाडें अडून पडतें. मार्गात अडथळा आणणारे लोक प्रतिकार करण्यास जणूं भागच पाडतात. अशा वेळीं जो प्रतिकार करावा लागतो तो या विधायक कार्यातूनच उद्भवलेला असतो. अशा वेळीं मनांत कमीत कमी कटुता निर्माण होईल असा प्रयत्न करून, अन्यायाचा प्रतिकार करणें ही सहज प्रतिक्रिया आहे. तसें न होईल तर जीवनांतील गतिमानता नष्ट होऊन तें निर्जीव होईल.

सारांश, कार्यक्षेत्र बदलल्यानें अथवा स्वस्थ बसल्यानें प्रश्न सुटत नाहीं याबद्दल माझी खात्री पटलेली आहे. गणिताच्या पुस्तकांतील पान फाडून टाकलें म्हणजे त्यांत दिलेलीं गणितें सुटलीं असें होत नाहीं. आज आमचें कार्य परिणामकारक होत नाहीं हें एकप्रकारें आम्हां सर्वांना आव्हानच आहे. तें आपण स्वीकारलें पाहिजे. 'मला जें चांगलें वाटतें तें दुसऱ्याला चांगलें कां वाटत नाहीं ? जें कार्य केल्यानें मला आनंद होतो, तो दुसऱ्याला का

होत नाही ? ' असा प्रश्न मनाला सारखा विचारीत राहिलें पाहिजे. तें कार्य खऱ्या अर्थानें विधायक नसल्याची शक्यता आहे, त्यांत आत्मप्रौढीचा भाग अधिक असण्याचा संभव आहे आणि सद्भावनेचा अथवा प्रेमाचा अंश फारच कमी असेल ! म्हणून मनुष्यानें सदैव जागरूक राहून, जेणेंकरून सर्वांच्या आनंदांत भर पडले असें कार्य म्हणजेच विधायक कार्य करीत राहावें अशी माझी धारणा आहे. आज ना उद्यां त्याची महति लोकांना पटेल अशी श्रद्धा आपण बाळगली पाहिजे. त्यायोगें दुसऱ्यांबद्दल आस्था निर्माण होईल. काष्टवत् झालेल्या हृदयांत जिव्हाळा उत्पन्न होईल आणि मानवतेबद्दलची आस्तिक्यबुद्धि जागृत होऊन गढूळ झालेला जीवनप्रवाह निर्मळ होण्यास साहाय्य होईल.

प्रवाही ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रमांक ..... दिनांक .....

मी संन्यास कसा घेऊं ?

लेखनकाल : १९५४

राजकारण म्हटलें कीं नाकें मुरडण्याची प्रवृत्ति अलिकडे वाढीस लागल्याचें दिसून येते. किंबहुना राजकारणापासून अलग होण्यांतच मोठेपणा आहे असें मानण्यापर्यंत कांहीं मंडळींची मजल गेली आहे. राजकारण्यांच्या मागें जाऊं नका, त्यांचें ऐकूं नका, असें स्वतः राजकारणांत भाग घेणाऱ्यानींच सांगत सुटण्याची एक फॅशन बनूं पहात आहे. विद्यार्थ्यांत जा, कामगारांत जा अगर मध्यम वर्गीयांत जा सर्वत्र एकच सूर ऐकूं येतो. एक काळ कसा होता कीं सर्वांनींच राजकारणांत भाग घेतला पाहिजे असा प्रचार सर्रास चालूं असे. परंतु आतां वारा उलट्या दिशेनें वाहूं लागलेला दिसतो. राजकारणाला क्षुद्र आणि तुच्छ लेखण्याची ही प्रवृत्ति स्वागतार्ह आहे काय ?

राजकारणाचा उबग यावा असें प्रकार अनेक वेळां घडत असतात आणि त्यामुळें ' नको हें राजकारण ' असा विचार राजकीय क्षेत्रांत काम करणाऱ्या व्यक्तींच्या मनांत अधून मधून निश्चितच येत असला पाहिजे. निदान माझ्या मनांत तरी ही ऊर्मि अनेक वेळां निर्माण होते ही गोष्ट प्रांजलपणें कबूल करावयास हवी. परंतु तेवढ्यावरून राजकारणाचा त्याग करणें योग्य होईल काय याचा गंभीरपणानें विचार झाला पाहिजे. राजकारणाबद्दल तिटकारा निर्माण होण्याचें कारण काय, त्याचाहि शोध घेणें आवश्यक आहे.

मी राजकीय क्षेत्रांत पदार्पण केलें त्यावेळची आणि आजची परिस्थिति यांत फारच मोठा फरक झालेला आहे. त्यावेळीं परकीय सत्तेविरुद्ध स्वातंत्र्याचा लढा चालूं होता. राष्ट्राचें लक्ष त्याच एका ध्येयावर केंद्रीत झालेले होतें. बहुसंख्य लोकांच्या दृष्टीनें तें कार्य यशस्वी रीतीनें पार पाडण्यास लायक अशी एकच संस्था देशांत विद्यमान होती. आमचे जरी काँग्रेसबरोबर मतभेद होते आणि आम्ही जरी समाजवादी पक्ष स्थापन केला होता तरी काँग्रेस हीच एक लढाऊ संघटना असून स्वातंत्र्यलढा तिच्या निशाणाखालींच लढला पाहिजे याबद्दल आमची खात्री होती. मतभेद असले तरी तें विकोपाला गेले नव्हते, आणि त्यामुळें आपसांत हेवेदावे आणि कटुता फारशी निर्माण होत नसे.

स्वतंत्र्योत्तर कालांत मात्र ही परिस्थिति पुष्कळच बदलून गेली आहे. आतां परकीयांविरुद्ध लढा द्यावयाचा नसून दुःख, दारिद्र्य आणि विषमता नष्ट करण्याचा प्रश्न आहे. त्यासाठीं विषमतेवर आधारलेल्या जुन्यापुराण्या समाजरचनेविरुद्ध लढा करावा लागेल. हा लढा काँग्रेसच्या निशाणाखालीं यशस्वी रीतीनें लढला जाणें शक्य नाहीं. याची जाणीव झाल्यामुळें आम्ही वेगळ्या पक्षांची उभारणी केली आहे. त्यामुळें आतां परकीयांना नव्हे, तर स्वकीयांनाच विरोध करावा लागत आहे. एकेकाळच्या सहकाऱ्यांबरोबर भांडणतंट्याचा प्रसंग वेळोवेळीं येऊन कटुता वाढत जाते, मन अस्वस्थ होते आणि नको हें राजकारण असा विचार मनांत आल्यावांचून रहात नाहीं.

आणखीहि एका दृष्टीनें परिस्थितींत महत्त्वाचा फरक झालेला आहे. आतां स्वातंत्र्य मिळालें असून नवसमाज निर्मितिसाठीं त्याचा उपयोग करावयाचा आहे. हें राज्य कोणी चालवावें असाच खरोखरी आजचा प्रश्न आहे. त्यासाठीं आपण लोकशाही राज्यघटना बनवली आहे. राज्य कोणीं करावें या प्रश्नाचें उत्तर मतदारांनींच द्यावें अशी ही योजना आहे. अर्थातच निवडणुकी आल्या आणि पक्षोपक्षहि निर्माण झालें. सर्वच पक्ष आपापल्या परीनें उदात्त ध्येयावर

उभारलेले असतात परंतु सत्ता हस्तगत करून समाजक्रांतीसाठीं तिचा उपयोग करावयाचे सर्वांचेच उद्दिष्ट असल्यामुळें एकमेकांवर सत्ताभिलाषेचा आरोप सर्रास केला जाऊं लागतो. इतकेंच काय, परंतु पक्षान्तर्गत मतभेदांतहि त्यामुळें किल्मिष निर्माण झाल्यावांचून राहात नाहीं. निवडणुकी म्हटल्या म्हणजे डावपेंच आलेच. तर्कानें मुद्दा पटवून देतां आला नाहीं कीं, शेवटचें अस्त्र म्हणून दुसऱ्यावर सत्तालोलुपतेचा आरोप करण्याची प्रवृत्ति निर्माण होते. प्रजासमाजवादी पक्षाचेंच उदाहरण घेऊन ही गोष्ट अधिक स्पष्ट करतां येईल. विशिष्ट किमान कार्यक्रम काँग्रेस मान्य करीत असेलें, तर आपलें स्वतंत्र अस्तित्व टिकवून देशबांधणीच्या कामांत काँग्रेसबरोबर सहकार्य करण्यास हरकत नाहीं असें मत ज्यांनीं मांडलें त्यांच्यावर पक्षांतील लोकांनींदेखील सत्ताभिलाषेचा आरोप करण्यास कमी केलें नाहीं. त्यामुळें पक्षान्तर्गत वातावरण चांगलेंच दूषित झालें. अशा कटकटी वारंवार उत्पन्न होऊं लागल्या म्हणजे पक्षीय राजकारणांतून अंग बाहेर काढून घ्यावें असा विचार माझ्याहि मनांत आल्यावांचून राहत नाहीं; परंतु इतकीं वर्षें झटून मांडलेल्या या प्रपंचांतून मन काढून घेणें हें कांहीं सोपें काम नाहीं. गेल्या १५–२० वर्षांत अनेकांनीं एका ध्येयवादानें प्रेरित होऊन आपलें सर्वस्व त्यासाठीं अर्पण केलें आहे. इच्छा-आकांक्षांनीं रसरलेलीं त्यांचीं समर्पित जीवनें एकदम डोळ्यांसमोर उभीं राहतात. चळवळींत आले त्या वेळीं ते किती लहान होते ! आतां मोठे झाले असले तरी माझ्या दृष्टीला अजून ते लहानच दिसतात. त्यांचा आणि माझा पुष्कळ वेळीं मतभेदहि होतो. कित्येक प्रसंगीं ते चुकाहि करतात. हें खरें असलें तरी त्या सर्वांना अर्ध्या वाटेंत सोडून देऊन आपण दूर हटणें मला शक्य होत नाहीं. त्यांचा ध्येयवाद आणि कार्याची उभारी शिल्लक आहे तोपर्यंत मी त्यांच्यापासून अलग कसा होऊं ? त्यांना माझ्याकडून त्यांच्या कार्यांत थोडें फार साहाय्य मिळण्यासारखें असेल आणि त्यांना तें हवें असेल, तर मला तें कसें नाकारतां येईल ? मतभेद आहेत अगर माझ्या सहकाऱ्याप्रमाणें

तें वागत नाहींत म्हणून मी बाजूला झालों तर तो अहंतेचाच एक प्रकार होणार नाहीं काय ? जोपर्यंत ते आपल्या मतांशीं प्रामाणिक आहेत, आणि त्यांच्या जीवनांत बुद्धिपरस्पर खोटेपणा आलेला नाहीं, तोंपर्यंत मी अशा प्रकारच्या अहंतेला बळी पडणें केव्हांहि इष्ट नाहीं. कांहीं लोकांच्या चुकीच्या वागण्यामुळें आणि त्यांतून निर्माण होणाऱ्या कटकटी आणि कटुता यांना कंटाळून त्या कार्यांतून अंग काढून घेणें हा तर एक प्रकारच्या भेकडपणाच समजला पाहिजे.

शेंकडों कार्यकर्त्यांबद्दल वाटणाऱ्या महत्त्वाचें भाग सोडून दिला तरी तात्त्विकदृष्ट्यादेखील अशाप्रकारें निवृत्ति स्वीकारणें बरोबर होईल असें मला वाटत नाहीं. ज्याला विद्यमान राजकारणांत गुदमरल्यासारखें होत असेल त्यानें आपलें कार्यक्षेत्र बदललें, तर तें सर्वस्वीं चुकीचें आहे असें मी म्हणत नाहीं. ज्या समाजांत आपण जगतों त्याचें ऋण फेडण्यासाठीं राजकारण एवढें एकच कार्यक्षेत्र आहे असा माझा दावा नाहीं. परंतु राजकारणापासून निवृत्त होणें हेंच अधिक श्रेयस्कर असा आग्रह जेव्हां धरला जातो त्या वेळींच वादाचा प्रश्न निर्माण होतो. वास्तविक पाहतांना कोणाचींहि अशीच अपेक्षा असणार कीं, ज्या लोकांनीं एका विशिष्ट क्षेत्रामध्यें काम करून अनुभव मिळविला आहे, त्यांनीं त्या क्षेत्रांतच कार्य करावें आणि आपल्या ज्ञानाचा फायदा समाजाला द्यावा. प्राप्तकर्म अधिक शुद्ध बुद्धीनें आणि कार्यक्षमतेनें करीत राहण्यांतच खरा पुरुषार्थ समजला पाहिजे. तें कर्म करीत राहिल्यानें आपल्या जीवनांत वैगुण्य निर्माण होतें असें म्हणणें तर्काला धरून नाहीं. जें कर्म समाजधारणेला आवश्यक आहे तें कर्तव्यबुद्धीनें करीत राहिल्यास जीवनांत वैगुण्य कां निर्माण व्हावें ? आतां ही गोष्ट खरी कीं, कांहीं कर्में अशीं असतात कीं, ज्या ठिकाणीं सामान्य माणसाच्या पतनास अधिक वाव असतो; परंतु जे लोक चित्तशुद्धीचा विचार सातत्यानें वागवीत आहेत, त्यांनीं यताबद्दल एवढी धास्ती कां बाळगावी ? अशा लोकांनीं त्या क्षेत्रांतून अंग

काढून घेणें ही तर महान् आपत्तिच समजली पाहिजे. त्यांनाच जर शुद्धता राखून तीं कामें करणें शक्य नसेल, तर सामान्य मनुष्याचा टिकाव तेथें कसा लागणार ? आणि मग तीं कार्यक्षेत्रें अधिकाधिक दूषित आणि भयावह होणार नाहींत काय ?

आजच्या समाजांत राजकारण आवश्यक नाहीं असें कोणी म्हणूं शकेलसें वाटत नाहीं. ज्या समाजांत आपण आपलें जीवन जगत आहों त्यामध्यें शासनसंस्थेशिवाय तरणोपाय नाहीं हें उघड आहे. शासनसंस्थेची आणि राजकारणाची उपेक्षा सत्प्रवृत्त माणसें करूं लागतील, तर एक काळ असादेखील येईल कीं, ज्या वेळीं सत्प्रवृत्त माणसाला आपल्या प्रवृत्तीनुसार जीवन जगणें अशक्यप्राय व्हावें. व्यक्तींच्या जीवनांत वासना नित्य नव्या जोमानें उफाळत असतांना तिनें संन्यस्त होण्याचा अट्टाहास केला, तर त्यामुळें विकृति निर्माण होण्याचीं शक्यताच अधिक असते. कर्में त्यागून त्यागतां येत नाहींत, तीं गळून पडावीं लागतात. जो न्याय व्यक्ति-जीवनाला, तो समाजजीवनालादेखील लागूं पडतो. विशिष्ट समाजाच्या ज्या गरजा असतील त्या पुऱ्या करण्याठीं ठराविक कर्में करावींच लागतात. त्यांची उपेक्षा केली तर समाजांत विकृति निर्माण झाल्याशिवाय राहाणार नाहीं. बुभुक्षित मनुष्याला वेळींच सात्त्विक आहार दिला नाहीं, तर त्यावेळीं तो मिळेल तें कदान्न खाऊन आपली भूक भागवील. त्याचप्रमाणें समाजाला जर शासनसंस्थेची आवश्यकता असेल, तर ती त्यांतल्यात्यांत चांगल्या साधनांनीं पुरविली जाणें श्रेयस्कर आहे. नाहींपेक्षां, मिळेल त्या भल्याबुऱ्या साधनांनीं ती पूर्ण करण्याचा समाज अट्टाहासानें प्रयत्न करील. लोकशाही नसेल, तर हुकुमशाहीचेंदेखील लोक स्वागत करतील; कारण त्यांना बेबंदशाही नको असते. या दृष्टीनें विचार केल्यास राजकारणांतील कटकटी, कटुता आणि त्रास यांना कंटाळून त्यांपासून अजिबात दूर जाणें मला श्रेयस्कर तर नाहींच पण चुकीचें वाटतें.

राजकारण आणि त्यांतल्यात्यांत पक्षीय राजकारण, म्हणजे जीवनसर्वस्व नव्हे ही गोष्ट कोणीहि मान्य करील. परंतु राजकारण म्हणजे कांहीं तरी किळसवाणी वस्तु आहे अशी भावना निर्माण झाल्यास अनवस्था प्रसंग येईल. पार्लमेंटरी पद्धतीच्या लोकशाहींत राजकीय पक्षांची आवश्यकता असतेच. तसें नसेल, तर जनतेला आपल्या राजकर्त्यांची सुलभतेनें निवड करतां येणार नाहीं. मात्र, या लोकशाही पद्धतींत दोन तुल्यबल पक्षांची आवश्यकता असते म्हणून तसे पक्ष कृत्रिमतः निर्माण करणें शक्य नाहीं आणि इष्टहि नाहीं. किंबहुना भारतासारख्या आर्थिकदृष्ट्या मागसलेल्या देशांत दीर्घकालपर्यंत एखाद्या विशिष्ट पक्षाचीच राजवट चालू राहण्याची शक्यता अधिक आहे. अशा परिस्थितींत राजकर्त्या पक्षांविरुद्ध एक पर्यायी पक्ष उभा करण्याचें कार्य वाटतें तितकें सोपें नाहीं. केवळ कार्यक्रमाच्या जोरावर तें होईल अशी कल्पना असल्यास, तें खरें नाहीं. तोच कार्यक्रम थोड्याफार फरकानें आणि अल्प कालानंतर अंमलांत आणून राज्यकर्ता पक्ष जनतेचें समाधान करूं शकतो. विरोधी पक्षानें हा कार्यक्रम अगोदर मांडलेला होता म्हणून त्यालाच मतदान केलें पाहिजे इतकी जागृति मतदारांकडून अपेक्षित नाहीं. आजच्या परिस्थितींत तरी तें शक्य नाहीं. राज्यकर्ता पक्ष एका विशिष्ट वर्गाचा प्रतिनिधि असल्यानें त्याला आमचा कार्यक्रम अंमलांत आणताच येणार नाहीं, असाहि एक युक्तिवाद होऊं शकेल. परंतु राज्यकर्ता पक्ष एका विशिष्ट प्रतिगामी पक्षाचा पुरस्कर्ता आहे हें गृहीतमत पूर्णार्थानें खरें नसल्यानें हा युक्तिवाद अखेरीस फोल ठरतो.

अशा परिस्थितींत पर्यायी विरोधी पक्ष संघटित करणें..अवघड आहे; म्हणून राज्यकर्त्या पक्षांत सामील व्हावें असें कोणी प्रतिपादील तर ते सर्वस्वी चूक होय. राज्यकर्त्या पक्षांचे धोरण आणि कार्यक्रम ज्यांना पसंत नसेल त्यांनीं जनताजागृतिचें कार्य अव्याहतपणें चालूं ठेवणें हें देशाहिताच्या दृष्टीनें आवश्यक आहे. आपल्या देशांत लोकशाहीची वाढ होण्याच्या दृष्टीनें ती एक

ऐतिहासिक गरज आहे. कदाचित् निवडणुकींत यश येणार नाहीं. तसेंच प्रतिकारात्मक सत्याग्रही लढ्याची आवश्यकता नेहमींच असेल असें वाटत नाहीं. वेळींअवेळीं असें लढे करण्याचा प्रयत्न केल्यास पक्षाची आणि राष्ट्राची शक्ति वाढण्याऐवजीं क्षीणच होईल. आवश्यकतेनुसार त्या मार्गांचा अवलंब करणें श्रेयस्कर ठरेल. परंतु आपल्या दृष्टीकोनांतून जनतेची विधायक सेवा करीत रहाण्यास नेहमींच वाव आहे.

केवळ राज्ययंत्र आपल्या ताब्यांत आल्यानें आर्थिक आणि राजकीय समतेचें ध्येय साकार करण्यांत येईल, हाहि एक भ्रमच आहे. बहुसंख्य समाजांत जर समतेची आकांक्षा प्रज्वलित झाली नसेल, तर केवळ दंडशक्तीच्या जोरावर ती गोष्ट शक्य नाहीं. भारतासारख्या औद्योगिक दृष्ट्या मागासलेल्या आणि अफाट लोकवस्तीच्या देशांत तर अशा आकांक्षेच्या अभावीं समतेवर आधारलेल्या समाजाची कल्पना स्वप्नसृष्टींत राहील. ही समतेची प्रेरणा निर्माण करण्यासाठीं काय केलें पाहिजे याचा पर्यायी पक्ष उभारू पाहाणाऱ्या लोकांनीं गंभीरपणें विचार केला पाहिजे. त्या निष्कर्षावरच आपला कार्यक्रम तपासून पहावा. राज्ययंत्र आपल्या हातीं येत नाहीं हें लक्षांत घेऊन कोणत्या कार्यक्रमावर भर दिल्यानें समतेची आकांक्षा प्रभावी होईल आणि त्यासाठीं जनतेला त्याग करण्यास प्रवृत्त करील याचा विचार व्हावयास हवा. अशा परिस्थितींत विधायक कार्यक्रमाचें महत्त्व अनन्यसाधारण असेंच आहे. त्याचा आश्रय करूनच आपल्या पक्षाचें आणि देशाचें राजकीय जीवनांतील आरोग्य सांभाळतां येईल असें वाटतें. ह्या गोष्टीकडे दुर्लक्ष करणाऱ्यांना आत्मनाशाचा आततायी मार्ग अथवा राज्यकर्त्या पक्षाला शरणागति असें दोन मार्ग शिल्लक राहातात आणि या दोन्ही पर्यायाचें पर्यवसान हुकूमशाही प्रवृत्तीच्या वाढीतच होणें अपरिहार्य आहे.

या सर्व गोष्टीं डोळ्यासमोर दिसत असतांना राजकारणांस तुच्छ लेखून कसें चालेल ? विरोधी पक्षाच्या दृष्टीनें तरी राजकारणाचा त्याग करण्याऐवजीं

त्यामध्यें राहून तें अधिकाअधिक विशुद्ध बनविण्याचा प्रयत्न करा असें आग्रहानें सांगण्याची आतां वेळ आली आहे असें मला वाटतें. अर्थात् ही सर्व विचारसरणी एक विशिष्ट मनोवृत्ति कल्पूनच मांडलेली आहे. आपलीं कामें करीत असतांना चित्त अधिक निर्मळ आणि अंत:करण अधिक प्रेमळ बनविण्याची आपण आकांक्षा बाळगलेली आहे असें या प्रतिपादनांत गृहीत धरलेलें आहे. त्याबाबतींत आपण आपली आत्मवंचना करीत असल्याचा देखील संभव आहे. समाजहितासाठीं मी हें सर्व करीत आहे अशी तोंडानें बडबड चालू ठेवून अप्रत्यक्षपणें आपण अहंताच पोशीत असण्याची शक्यता नाहीं असें थोडेंच आहे ? म्हणून आपल्या कर्मामागील मुख्य प्रेरणा कोणती याचा मनुष्यानें नेहमीं शोध घेत राहिलें पाहिजे. कारण लोकहिताची कळकळ आणि मानवी प्रेम यामुळें मूलत: कार्यप्रवण झालेलीं माणसें हळूहळू कर्मासक्त बनून गेलेलीं पाहावयास मिळतात. मात्र जो साधक असेल तो तीं कर्में नव्यानें करतांना चित्तशुद्धि राखण्याचा प्रयत्न करीत राहतो. एकाद्यानें पूर्वीचें कार्यक्षेत्र सोडून दुसऱ्या कार्यक्षेत्राची निवड केली तर नवीन कार्य हें समाजहिताच्या दृष्टीनें अधिक आवश्यक आहे अशी त्याची खात्री असली पाहिजे आणि त्यानें इतरांना तसें पटवून दिलें पाहिजे. अशा परिस्थितींतदेखील त्याला पूर्वीच्या कार्यक्षेत्रांतील जबाबदाऱ्या अजिबात टाळतां येणार नाहींत. पूर्वी करीत असलेलें कार्य समाजाच्या दृष्टीनें आवश्यक नाहीं असें जोंपर्यंत सिद्ध झालेलें नाहीं तोंपर्यंत तें कार्य वाईट म्हणून त्याचा त्याग करतां येणार नाहीं. तें कार्य आपल्या मन:प्रवृत्तीला पेलण्यासारखें नाहीं असें वाटल्यास अन्य क्षेत्रांत जाण्यास प्रत्यवाय नसावा. परंतु मग तशी स्पष्ट कबुली देऊन बाहेर पडलें पाहिजे आज तरी जे लोक राजकारणनिवृत्तीचा आग्रह धरीत आहेत त्यांपैकीं बरेच या दुसऱ्या वर्गात पडतील असें वाटतें. कोणत्याहि कार्यात दोष नसून कार्याच्या ठिकाणीं वसत असलेल्या वासनासक्तीमुळें जीवनांत अशुद्ध निर्माण होते ही गोष्ट एकवेळ मान्य केल्यावर मी अमुक एका कार्याचा संन्यास घेतो असे म्हणण्यांत काय अर्थ आहे ?

◆ ◆ ◆

कामगार चळवळींतील
नवें पर्व

लेखनकाल : १९४२

भारतीय कामगार चळवळींतील एक पर्व संपून आतां दुसऱ्या पर्वास प्रारंभ होत आहे. असें म्हणावयास हरकत नाहीं. त्याचें मुख्य लक्षण म्हणून पुढाऱ्यांच्यांत आणि निरनिराळ्या कामगार पुढाऱ्यांच्यांत त्यासंबंधीं चाललेल्या विचारमंथनाकडे बोट दाखवतां येईल. आजपावेतों ज्या पद्धतीनें कार्य चालूं होतें त्याच पद्धतीनें यापुढेंहि तें चालूं ठेवणें प्रगतीच्या दृष्टीनें हितावह होणार नाहीं याची जाणीव आतां सर्वांनाच झाली असल्याचें दिसून येत आहे. चळवळीचें ध्येय आणि धोरण अधिक स्पष्ट आणि निश्चित स्वरुपाचें असणें आवश्यक आहे. याबद्दलहि आतां दुमत होईल असें वाटत नाहीं.

स्वातंत्र्योत्तर कालांतील हें नवें पर्व कामगाराच्या आणि देशांच्या हिताचे ठरावयाचे असल्यास चळवळीचे ध्येय, धोरण व कार्यपद्धति याबद्दल निश्चित स्वरूपाचा निर्णय घरला जाणें आवश्यक आहे. हिंदुस्थानांतील कामगार चळवळ बरीच जुनी असली तरी संघटनेच्या दृष्टीनें तिचा व्हावा तितका विकास झालेला नाहीं. स्वातंत्र्य लढ्याच्या वातावरणांत निर्माण झालेल्या या चळवळीला त्या वातावरणाचा फायदा अप्रत्यक्षरितीनें मिळत असे. संप लढ्याचें वेळीं परकीय-सरकार-विरोधी एक उठाव म्हणून जनतेची सहानुभूति आपोआपच कामगारांच्या बाजूस रहात असे. राष्ट्रीय विचारांच्या वृत्तपत्रांचा पाठिंबादेखील अनायासेंच मिळे. कामगारवर्गाचें राष्ट्रीय जीवनांतील स्थान कोणते,

त्यांचें कर्तव्यें कोणतीं आणि हक्क कोणतें इत्यादि प्रश्नांचा विचार चळवळींतील सर्वसाधारण कार्यकर्ते फारसा करीत नसत. सर्वच कामगार नेते या सदरांत पडतात असा याचा अर्थ नाहीं. परंतु खोल विचार करून कामगार चळवळीला स्थिर पायावर संघटित करण्याचें कार्य त्या वेळीं होऊं शकलें नव्हीं असेंच म्हणावें लागेल. राष्ट्रीय आंदोलनाला प्राधान्य असल्यामुळें कामगार चळवळीचा विधायक दृष्टीनें विचार करण्याचीं आवश्यकता तेव्हां फारशी भासली नाहीं. साहजिकच कामगार संघटनांचें स्वरूप संपसमित्या अगर आंदोलनसमित्या एवढेंच मर्यादित राहिलें. राजकीय स्वातंत्र्याच्या चळवळीचें एक अंग म्हणूनच तिच्याकडे पाहिलें गेलें. तिचें स्वतंत्र अस्तित्व आणि कार्य यासंबंधीं खोल विचार झाला नाहीं. युनियनची वर्गणी वेळच्या वेळीं देणें, संकटकाळीं उपयोगीं पडावा म्हणून निधी उभारणें, संघाचें कार्य करणेंसाठीं कामगारांतून कार्यकर्ते निर्माण करणें व त्यांना मानधन देऊन संघाचें कार्य दक्षतेनें चालविणें इत्यादि संघटनात्मक गोष्टींकडे कोणी विशेष लक्ष पुरविलें नाहीं फुकट कार्य करण्यास राजकीय चळवळे मिळत असल्यानेहि कामगारांना त्याची आवश्यकता भासली नाहीं.

अर्थातच तात्कालिक आर्थिक मागण्या पुढें करून संप घडवून आणण्यांवरच हे चळवळे विशेष भर देत असत. कामगारावर होणाऱ्या अन्यायाचा प्रचार करीत असत. परंतु त्यांच्या कर्तव्याची जाणीव करून देण्याच्या भानगडींत सहसा पडत नसत. न्याय मिळविण्यांसाठीं कामगारांनी एकजूट केली पाहिजे आणि त्यासाठीं कष्ट सहन केले पाहिजेत इत्यादि गोष्टी भाषणांतून प्रतिपादल्या गेल्या तरी कामगारांच्याकडून त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करून घेण्याचा प्रयत्न फारसा कोणीच केला नाहीं. कामगारांना त्यागाचा धडा देण्याची जबाबदारी घेण्यास कोणीच तयार होत नसे. मग वर्गण्या कशा जमणार व फंड कसें उभे रहाणार ? तीच परंपरा आजहि चालूं आहे. महिन्याकांटीं ६०-७५ रुपये पगार मिळत असूनहि युनियनची वर्गणी २ आण्यांच्या ऐवजीं ४ आणे

करण्याची शक्ति आमच्यामध्यें नाहीं. कारण आज दोन 'आणेहि वसूल करण्यास अवघड जाते. कर्तव्य बुद्धीनें स्वतःला तोशीस लावून घेण्यास अजून आमची तयारी नाहीं, त्यामुळें संपाच्या वेळीं अतोनात हालअपेष्टा सहन कराव्या लागतात. परिणामतः संपाचें हत्यार तितकें प्रभावी होऊं शकत नाहीं.

स्वातंत्र्य लढ्याच्या कालखंडांतदेखील कामगार चळवळीचीं अनेक वेळीं छकले झालेलीं आहेत. एका वेळीं तर देशामध्यें नॅशनल फेडरेशन ऑफ ट्रेड युनियन्स, अ. भा. ट्रेड युनियन कॉंग्रेस आणि रेड ट्रेड युनियन कॉंग्रेस अशा तीन अखिल भारतीय संघटना अस्तित्वांत होत्या. याशिवाय अहमदाबादची 'मजूर महाजन' ही संघटना होती ती वेगळीच. ही फाटाफूटहि प्रामुख्यानें राजकीय मतभिन्नतेमुळेंच झाली होती असें म्हणावयास कांहींच हरकत नाहीं, एन् एफ्. टी. यू. वर नेमस्त विचारांचा. ए. आय. टी. यु. सी. वर स्वातंत्र्यवादी लोकांचा, आर. टी. यु. सी. वर कम्युनिस्टांचा प्रभाव होता. कालांतरानें नेमस्तासकट सर्व स्वातंत्र्यवादी झाले आणि कम्युनिस्टांनीहि सोयीनुसार आपला पवित्रा बदलला. कॉंग्रेस समाजवादी पक्षानें ए. आय. टी.यु.सी. ला पाठिंबा देऊन कामगार संघटनांच्या एकजुटीचें उद्दिष्ट पुढें ठेविलें आणि महायुद्धापूर्वी एक दोन वर्षें ही एकजूट होऊं शकली. परंतु महायुद्ध सुरू होतांच पुन्हा फाटाफूट झाली. आजहि भारतांमध्यें तीन चार संघटना अस्तित्वांत आहेत. इंटक ही कॉंग्रेसप्रणीत संघटना असून सरकारचा तिला आशीर्वाद आहे. समाजवादी पक्ष आणि तत्सम विचारसरणीचे लोक 'हिंद मजदूर सभे' चा पुरस्कार करतात आणि कम्युनिस्ट आणि तत्सम पक्षांच्या प्रभावाखालीं ए. आय. टी. यु. सी. आहे. या सर्व संस्था मोडून कामगारांची एकच एक संस्था स्थापन व्हावी ही कल्पना मोठी आकर्षक वाटते. परंतु तें शक्य आहे काय? आणि पूर्वीप्रमाणेंच तात्पुरती एकजूट झाली तरी कामगार चळवळीच्या दृष्टीनें हितावह होईल काय याचा विचार केला पाहिजे.

राजकीय मतभेदांमुळें एकजूट शक्य नसेल तर कामगार चळवळींतून राजकारण अजिबात वर्ज्य करा असा युक्तिवाद केला जातो. हा युक्तिवाद सकृद्दर्शनीं सयुक्तिक वाटला तरी तो खरा नाहीं. राजकारण वर्ज्य करा म्हटल्यानें वर्ज्य होऊं शकत नाहीं. जोंपर्यंत एका विशिष्ट शासनसंस्थेच्या अंमलाखालीं आपणास राहावयाचें आहे तोंपर्यंत आम्हांस राजकारणाशीं कांहीं कर्तव्य नाहीं असें म्हणून भागणार नाहीं. कामगारांना आणि त्यांच्या संघटनांनादेखील राजकारणाचा विचार करावा लागतो. सर्वच प्रश्न कामगार संघांच्या मार्फत सोडविणें शक्य नसते. कामगारांच्या हितरक्षणासाठीं सरकारलाच कायदे करावे लागतात. हे कायदे जर मालकांच्या बाजूचे असतील तर कामगार संघांना तरी काम करणें कसें शक्य होईल ? म्हणून सरकारी धोरण काय आहे आणि कामगारविषयक कायदे कशा प्रकारचें आहेत या गोष्टीला महत्त्व द्यावेंच लागतें आणि कायदे व धोरण अनुकूल करून घेण्यासाठीं राजकारणांत भाग घेणें अपरिहार्य होतें. याचा अर्थ असा मात्र नव्हें कीं राज्यसत्ता हस्तगत करण्यासाठींच प्रामुख्यानें कामगार चळवळ चालविण्यांत यावी. राजकारणापासून ट्रेड युनियन चळवळीला संपूर्णतया अलिप्त राहतां येत नाहीं हें दाखविणें एवढाच या प्रतिपादनाचा हेतु आहे. राजकारण हें कामगार चळवळीचें मुख्य उद्दिष्ट नसावें हें म्हणणें बरोबरच आहे. मालकांबरोबर सामुदायिक सौदा पटवून कामगाराच्या हितसंबंधांचें रक्षण करणें हें आपलें मुख्य उद्दिष्ट असलें पाहिजे. परंतु हें उद्दिष्ट समाजांतच साध्य करून घ्यावयाचें असल्यानें समाजकारणाचा विचारहि करणें आवश्यक ठरतें कामगारवर्ग हा संबंध समाजाचा एक भाग आहे, त्याचें हित-अनहित इतर समाजाशीं निगडित आहे. इतर समाज तसाच मागें ठेवून केवळ कामगार वर्गाचें हित साधणें शक्य होणार नाहीं. कांहीं काल आपला स्वार्थ साधतां आला तरी त्यालाहि आपोआपच मर्यादा पडते. त्यापुढची प्रगति सर्व समाजाला बरोबर घेतल्याशिवाय साधतां यावयाची नाहीं. म्हणून कामगार

वर्गानें केवळ आपल्या स्वार्थाचा हिशेब करून भागणार नाहीं. 'सर्व समाजा'बाबत आपलें कर्तव्य काय आहे तेंहि त्याला जाणून घ्यावें लागेल. परिस्थितिचा साकल्यानें विचार करण्याची जबाबदारी समाजाच्या सर्व घटकांवर आहे, याच दृष्टीनें आपणाला राजकारणाचाहि विचार करावा लागतो. राजकारण अजिबात वर्ज्य करण्याचा आग्रह धरल्यास कामगार चळवळ एकांगी आणि स्वार्थी होण्याची शक्यता आहे हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

या अडचणींतून मार्ग काढावयाचा असेल तर कामगार चळवळीचें ध्येय धोरण ठरवितांना आपण व्यापक दृष्टिकोन ठेवला पाहिजे. चळवळीला एका व्यापक सामाजिक ध्येयाचें आधिष्ठान प्राप्त करून दिलें पाहिजे. सामाजिक ध्येयाच्या निकषांवरच योग्य कोणतें आणि अयोग्य कोणतें हें ठरविलें पाहिजे. हें सामाजिक ध्येय आणि तें प्राप्त करून घेण्याचें मार्ग याबाबत ज्यांचें ऐक्य असेल अशा सर्व लोकांनीं कामगार चळवळींतहि ऐक्य करावें हें क्रमप्राप्तच आहे. परंतु ज्यांचें ध्येय आणि विशेषतः कार्यपद्धति भिन्न आहे अशा सर्वांची सांगड घालण्याचा प्रयत्न परिणामीं हितावह होणार नाहीं. उदाहरणार्थ समाजवादी व कम्युनिस्ट यांचे मतभेद इतके मूलभूत स्वरूपाचें आहेत आणि कार्यपद्धति इतकी परस्परविरोधी आहे कीं, त्यांच्यापैकीं एकानें आपल्या तात्त्विक भूमिकेचा त्याग केल्याशिवाय त्यांचें ऐक्य होणें अशक्य आहे. या परस्पर-विरोधाची जाणीव कम्युनिस्टांना नसते असें मुळींच नाहीं, परंतु तात्कालिक डावपेंच म्हणून ते एकजुटीचा पुरस्कार करतात आणि त्याच्या दृष्टीनें योग्य वेळ येतांच एकजूट मोडून बाहेर पडतात. म्हणून क्वचित-प्रसंगीं विरोधी पक्षांशीं त्यांचें ऐक्य झालेलें दिसलें तरी तें एक षड्यंत्रच असतें. अशा ऐक्यापासून लोकशाही शक्ति वाढीस लागत नाहीं, किंबहुना हुकुमशाहीच्या प्रस्थापनेसच त्यामुळें मदत होण्याची शक्यता असते.

देशाचें परराष्ट्रीय धोरण काय असावें, क्रांतीनंतर समाजव्यवस्था कशी असावी, आणि समाजपरिवर्तन कोणत्या साधनांनीं घडवून आणावें या

प्रश्नांबाबत कम्युनिस्ट आणि समाजवादी यांच्यामध्यें तीव्र स्वरूपाचे मतभेद आहेतच, परंतु कामगार चळवळींतील त्यांची कार्यपद्धति जरी लक्षांत घेतली तरी त्यामध्येंहि मूलभूत विरोध दिसून येईल. संप हें एक कामगारांचें प्रभावी साधन आहे, परंतु त्याचा वापर कसा करावा यासंबंधीं कम्युनिस्टांचे विचार पाहिले तर ही गोष्ट स्पष्ट होऊं शकेल. समाजवाद्यांना संप करण्याचीच इच्छा नसते, संप टाळण्याचाच ते नेहमीं प्रयत्न करतात असा आरोप मोठ्या प्रौढीनें ते करीत असतात. जणूं कांहीं संप न करतां आपल्या मागण्या मिळवून घेण्याचें आटोकाट प्रयत्न करणें आणि संप हें एक निर्वाणीचें हत्यार म्हणून त्याचा वापर शक्य तो टाळणें हा एक गुन्हाच आहे ! त्यांचा हा आरोप त्यांच्या विचारसरणीशीं सुसंगत असाच आहे. कसेंहि करून संप घडवून आणला म्हणजे वर्गलढा तीव्र होतो, आणि वर्गलढा तीव्र करण्यांतच जगाचें भलें आहे अशी त्यांची जाज्वल्य निष्ठा आहे. संप केला म्हणजे तो मोडेपर्यंत चालविला तरच क्रांतिकारक शक्तीची वाढ होते असा फसवा युक्तिवादहि ते करतात. अर्थात् हें तत्त्वज्ञान संपाचें नेतृत्व त्यांच्या हातीं असेल त्या वेळीं नेहमींच लागू करण्यांत येईल असें मात्र नाहीं. तडजोड करावयाची किंवा नाहीं हें त्या वेळच्या त्यांच्या सर्वसाधारण धोरणावर अवलंबून राहील. परंतु संपाचें नेतृत्व अन्य कोणाकडे असेल तर मात्र योग्य तडजोड झाली तरी संप अधिक चालवावयास पाहिजे होता असा आग्रह धरण्यांत ते कमी करणार नाहींत. या धोरणामागील हेतु सहज समजण्यासारखा आहे. हें सर्व लक्षांत घेतल्यावर जे लोक संप टाळूं पहातात ते अक्षम्य पाप करीत आहेत असें त्यांनीं म्हटल्यास त्यांत आश्चर्य कसलें ? कम्युनिस्टांचे हें धोरण आणि तंत्र माहीत असूनहि त्यांच्याशीं ऐक्य करावें असा आग्रह धरण्यांत काय अर्थ आहे ? संप करावयाचा असल्यास तो वर्गलढा तीव्र करण्यासाठीं करावयाचा कीं सामुदायिक सौदा पटवून कामगारांच्या रास्त मागण्या मान्य करून घेण्यासाठीं

करावयाचा, हाच महत्वाचा प्रश्न आहे. विशिष्ठ परिस्थितींत कामगारांना राजकीय संपदेखील करावा लागण्याची शक्यता आहे. परंतु तो उघड उघड करण्यांत आला पाहिजे. कामगारांना संपाच्या हेतूबद्दल अंधारांत ठेवतां काम नये, पुढाऱ्यांचा हेतु राजकीय आणि कामगारांना मात्र आर्थिक मागण्याचें. प्रलोभन अशी फसवेगिरी असता उपयोगी नाहीं. या फसवेगिरीलाच कामगार चळवळीचा राजकारणासाठीं वापर असें म्हणता येईल.

संप चालविण्याच्या पद्धतीबद्दलहि कम्युनिस्टांची विचारसरणी निराळी आहे. शांतता पाळली पाहिजे असें आम्ही म्हणतो. या उलट ते उघड सांगतात कीं, शांतता राखणें ही पोलीसांची जबाबदारी आहे, कामगारांची नव्हे. आमच्या दृष्टीनें हीं जबाबदारी जितकी पोलीसांची तितकीच किंबहुना अधिक कामगारांचीदेखील आहे. कारण शांतताभंग झाल्यानें कामगारांना कोणताच फायदा मिळूं शकत नाहीं. कामगार आपली जबाबदारी निष्ठेनें पार पाडीत असतांना सरकारनें त्याबाबत टाळाटाळ केली. तर राज्यकर्त्यांचें खरें स्वरूप जनतेच्यापुढें उघड होईल. या गोष्टी कामगारांना समजावून सांगतां येतील आणि जनतेची राजकीय दृष्ट्या जागृति होऊन सरकारी बदलण्याची आवश्यकता त्यांना पटविता येईल. अधिकारारूढ पक्षानें आपलें धोरण बदललें तर ठीकच नाहीं तर निवडणुकींमध्यें ज्या पक्षांचे धोरण मान्य असेल त्यांना मतदार आपलीं मतें देऊन यशस्वी करतील, यालाच आम्हीं लोकशाहीचा आणि शांततेचा मार्ग असें म्हणतों. येथील जनतेची शक्ती वाढवून तिच्य बळावरच समाज परिवर्तन घडवून आणिलें पाहिजें असा आमचा आग्रह आहे. उलट रशियाच्या गटांत गेल्याशिवाय आपल्याला आणि जगाला तरणोपाय नाहीं असा त्यांचा अट्टाहास आहे. तेव्हां लोकक्रान्ति स्वाश्रयी व्हावी म्हणून लोकांचा आत्मविश्वास वाढविला पाहिजे असें प्रतिपादणाऱ्यांचें दुसऱ्यावर अवलंबून रहाणाऱ्या अवसानघातकी कम्युनिस्ट धोरणाशीं कसें जुळावे! सारांश अशा प्रकारचें मूलभूत मतभेद असणाऱ्या लोकांबरोबर एकजूट करा

असा आग्रह धरणें योग्य नाहीं. आणि जे कोणी तसें करण्यास नकार देतात त्यांना नांवे ठेवणें तर त्याहूनहि अन्यायाचें आहे.

भारतीय कामगार चळवळीचें ध्येय, धोरण व कार्यपद्धति कोणती असावी याची स्थूल कल्पना वरील विवेचनावरून येईल. त्याची मागणी अधिक स्पष्ट आणि निश्चित स्वरूपांत पुढीलप्रमाणे करतां येईल. कामगाराच्या हितसंबंधाचें रक्षण करणें हें कामगार चळवळीचें ध्येय असावयास पाहिजे, परंतु ही चळवळ एकांगी होऊन चालणार नाहीं. केवळ आपला स्वार्थ साधणें एवढेंच कामगारांचें ध्येय असता उपयोगी नाहीं. समाजाच्या सर्वांगीण उन्नतीच्या पार्श्वभूमीवरच कामगारांच्या उन्नतिची योजना आंखता येईल जरा वेगळ्या शब्दांत सांगावयाचें झाल्यास त्या चळवळीला एका व्यापक सामाजिक ध्येयाचें अधिष्ठान मिळवून दिलें तरच ती खऱ्या अर्थानें यशस्वी होऊं शकेल.

समाजातील प्रत्येक व्यक्तिमात्राला आपला अभ्युदय करून घेण्यांस संधि मिळेल अशी समाजरचना निर्माण करण्याच्या सामाजिक ध्येयासाठीं आपण झगडले पाहिजे यासंबंधी कोणाचे दुमत होऊं शकणार नाहीं. विषमतेवर आधारलेली जुनी समाजरचना मोडून आर्थिक आणि सामाजिक समतेच्या पायावर नवसमाज निर्मिती होईल तरच समान संधीचें हें ध्येय मूर्त स्वरूपाला येऊं शकेल. आजच्या घटकेला किमानपक्षीं प्रत्येकाला उपजीविकेचे साधन मिळवून देणें हें आपलें कर्तव्य आहे. सर्वांना काम मिळवून देणें ही एक सामुदायिक जबाबदारी आहे कामगार चळवळीचे ध्येय धोरणदेखील या सामाजिक कर्तव्याशीं सुसंगत असले पाहिजे. कामगारांनी आपलें ध्येय या सामाजिक ध्येयाशीं नुसतें सुसंगत ठेवून भागणार नाहीं. तर तें साध्य करून घेण्याचे मार्ग कोणते याचाहि त्यांनी निर्णय करावयास शिकलें पाहिजे आणि आपल्या चळवळींत या मार्गाचा कटाक्षानें अवलंब केला पाहिजे.

प्रत्येक व्यक्तीला अभ्युदयाची समान संधि मिळावयाची असेल तर हे ध्येय जागृत जनतेच्या संघटित बळानेंच सिद्ध होऊं शकेल. समाज परिवर्तन

स्वाश्रयी आणि स्वावलंबी होईल तरच खऱ्या अर्थानें अभ्युदयाची समान संधि उपलब्ध होऊं शकेल. म्हणजेच समाजपरिवर्तन लोकशाहीच्या आणि शांततेच्या मार्गानें होणें श्रेयस्कर आहे त्याबद्दल खात्री असावयास हवी. कामगार चळवळींत वावरतांनादेखील याच धोरणाचा पुरस्कार करावा लागेल.

आपली कार्यपद्धति ठरवितांनादेखील या मूलभूत सिद्धांताकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं. आपल्या मागण्या मांडतांनादेखील आपल्या राष्ट्रीय कर्तव्याची जाणीव ठेवूनच त्या मागितल्या पाहिजेत. उदा० कामगार कपातीचा प्रश्न सोडवितांना केवळ आपल्या स्वार्थाचाच विचार न करितां सर्वांना काम मिळवून द्यायच्या राष्ट्रीय उद्दिष्टाच्या दृष्टीनें आपण आपली विधायक कामगिरी ओळखली पाहिजे. आपण सरकारच्या जागीं असतो तर हा प्रश्न कसा सोडविला असता याचा विचार करूनच सूचना केल्या पाहिजेत. दुसरी नोकरी, बेकारीचा भत्ता, कामाची वांटणी, कपात, ग्रॅच्युइटी असें निरनिराळे उपाय सुचवितां येतील. परंतु कोणत्याहि सूचनेबद्दल आग्रह धरतांना राष्ट्राची उत्पादनक्षमता घटणार नाहीं याबद्दल दक्षता बाळगली जाणें आवश्यक आहे. कामगार चळवळ एकांगी आणि स्वार्थी होण्याचा धोका टाळावयाचा असेल तर अशी विधायक दृष्टि ठेवलीच पाहिजे.

कामगारांनीं अशी ध्येयनिष्ठा आणि समजूतदारपणा दाखविला तर मालक व मालकधार्जिणें सरकार त्याचा गैरफायदा घेतील अशी शंका साहजिकच निर्माण होतें. कामगारांनीं राष्ट्राचा विचार करून त्याग करावा आणि मालकांनीं मात्र आपल्याच पोळीवर तूप ओढावें हें कोणीच कबूल करणार नाहीं. मालक आणि अधिकारीवर्ग आपला स्वार्थ साधण्याचा प्रयत्न करणार नाहींच असें सांगतां येणार नाहीं. विद्यमान परिस्थितींत तसें होण्याचा बराच संभव आहे. परंतु या अनिष्ट प्रवृत्तींचा बंदोबस्त जर आपणाला करतां आला नाहीं तर आपलें नष्टचर्य कधींच संपणार नाहीं. तो बंदोबस्त करण्याची धमक

आपण बाळगली पाहिजे; त्यासाठीं कामगारांनीं आणि जनतेनें अखंड जागृत राहाण्याचा प्रयत्न करावयास हवा. राज्यसत्ता खऱ्या अर्थानें जागृत जनतेच्या हातीं येऊन लोकराज्य निर्माण झाल्याशिवाय हें धोरण पूर्णतया यशस्वी होणार नाहीं. म्हणून अशा प्रकारच्या लोकराज्यासाठीं यत्न करणें हें जसें प्रत्येक नागरिकाचें कर्तव्य आहे तसेंच कामगारांचेंदेखील आहे. या दृष्टीनें कामगारांनीं राजकारणामध्यें लक्ष घालणें आवश्यक ठरतें.

हीं गोष्ट अर्थातच तात्काळ होण्यासारखी नाहीं. त्यासाठीं एकंदर जनतेच्या जागृतीबरोबरच कामगारांनीं आपलें सामर्थ्यदेखील वाढविलें पाहिजे. एका विशिष्ट कार्यपद्धतीचा अंगीकार करूनच हें सामर्थ्य वाढवितां येईल. सामर्थ्य एक दोन दिवसांत वाढत नसतें, तें हळुहळू वाढवावें लागतें. कर्तव्यपालन आणि अन्यायाचा प्रतिकार या दोहोंचा समन्वय घडवून आणल्यानें आपली शक्ति वाढूं शकेल. तोच आपल्या सामर्थ्याचा पाया समजला पाहिजे. आपणास अन्याय नको असेल तर त्याच्या निवारणासाठीं त्याग करण्याची तयारी असावी लागते. ज्या प्रमाणांत आपली त्यागाची तयारी त्या प्रमाणांतच आपणाला यश मिळूं शकेल. मालकांबरोबर सामुदायिक सौदा करून कामगारांचें हितरक्षण करणें हें कामगार चळवळीचें वर्गीय उद्दिष्ट होय. परंतु सौदा पटविण्यासहि सामर्थ्याची आवश्यकता आहे. संप हें सामुदायिक सौद्याचें एक साधन समजलें जातें, परंतु नेहमीं हेंच हत्यार उपयोगी पडेल असें नाहीं. उठल्यासुटल्या संप केल्यानें फायदा होण्याऐवजीं नुकसान होण्याचीच भीति असते. कारण संपांतून आर्थिक लाभ झाला नाहीं म्हणजे संपामुळें झालेल्या नुकसानीबद्दल कामगार पश्चात्ताप करूं लागतात. या भावनेमुळें संघटनेची शक्ति वाढण्याऐवजीं विस्कळितच होते. म्हणून सर्व प्रयत्न संपल्यावर मगच या निर्वाणीच्या शस्त्राचा वापर करावयाचा असें आपलें धोरण पाहिजे.

आपलीं गाऱ्हाणीं सोडवून घ्यावयास विधिमंडळांचादेखील कामगारांनीं अधिकाधिक उपयोग करून घेतला पाहिजे. राजकारणापासून पूर्णतया अलिप्त

राहून तें जमणार नाहीं. हें कार्य कसें घडवून आणावयाचें याचा कामगारांनीं अधिक गंभीरपणानें विचार केला पाहिजे. किमानपक्षीं आपल्या प्रभांत रस घेणारे व आपल्या विचारांचे प्रतिनिधि विधिमंडळांत निवडून जातील या दृष्टीनें प्रयत्न होणें आवश्यक आहे. मात्र या खटपटींत आपल्या कामगार संघांतच फूट पडून एकाच्या दोन संघटना होणार नाहींत याबद्दल दक्षता बाळगली पाहिजे. कामगार संघानें संघाच्या वतीनें एकाद्या उमेदवाराची शिफारस करण्यास हरकत नाहीं, परंतु कामगारांना तसा आदेश देऊं नये अगर तो प्रश्न शिस्तीचा म्हणून समजला जाऊं नये. त्याबाबत प्रत्येकाला विचारस्वातंत्र्य असलें पाहिजे. आज कामगारांच्यामध्यें राजकारणाबद्दल एकप्रकारची उपेक्षावृत्ति निर्माण झाली आहे. परंतु हळूहळूं त्यांना मर्यादित स्वरूपाच्या राजकारणांत लक्ष घालावेच लागेल. त्याशिवाय त्यांचें वर्गीय उद्दिष्टदेखील साध्य होणें अशक्यप्राय आहे.

आपलीं गाऱ्हाणीं सोडवून घेण्याचें अन्य सर्व प्रयत्न संपल्यावर निर्वाणीचा उपाय म्हणूनच ज्या वेळीं संप करावा लागेल तेव्हांदेखील मागणी किमान ठेवून ती मिळविण्यासाठीं जास्तींत जास्त शक्ति लावली पाहिजे, म्हणजे कामगारांना पस्तावण्याचा प्रसंग सहसा येणार नाहीं. आज परिस्थिति आणि सरकारी धोरण असें आहे कीं, सामुदायिक सौदा पटविण्याचें साधन म्हणून संपाचा व्हावा तितका उपयोग होत नाहीं त्यामुळें कित्येक वेळीं अन्यायाचा प्रतिकार करण्याचें साधन म्हणूनच त्याचा वापर करणें अपरिहार्य होऊन बसतें. परंतु अशा प्रसंगींदेखील कामगारांना संपाच्या निषेधात्मक स्वरूपाची पूर्ण जाणीव करून दिलेली असावी. शक्यतोवर अशा संपाच्या वेळीं एकादी लहानशी मागणी पुढें ठेवून ती मिळविण्याचा प्रयत्न करणें अधिक श्रेयस्कर होईल. कामगारांचा आपल्या सामर्थ्यावरील विश्वास वाढविण्यास त्याचा निश्चितच उपयोग होईल.

कामगार चळवळीचें हें ध्येय-धोरण आणि कार्यपद्धति मान्य असेल अशा सर्व संघटनांनीं व कार्यकर्त्यांनीं पक्षोपपक्षांतील मतभेद मनांत न आणतां एकत्र यावें हें आवश्यक आहे. ध्येय-धोरणाच्या आणि कार्यपद्धतीच्या समान भूमिकेवर कामगारांची एकजूट झाली तर त्यायोगें चळवळीचें सामर्थ्य निश्चितच वाढेल. तसें प्रयत्न आवश्यक झाले पाहिजेत. परंतु ध्येय-धोरण आणि कार्यपद्धति यासंबंधीं ज्यांचे विचार परस्परविरोधी आहेत अशा लोकांची एकजूट बांधण्यांत अर्थ नाहीं. थोडा वेळ एकजूट झाल्यासारखी दिसली तरी ती टिकणार नाहीं. लवकरच पुन्हां फाटाफूट होऊन त्यामुळें कामगारांचा तेजोभंग होण्याची शक्यता अधिक आहे.

◆ ◆ ◆

७. व्यक्तिदर्शन :

एसेमनी गेल्या पस्तीस वर्षांत अनेकांशीं मैत्री जोडली. तत्त्वाबाबत मतभेद झाला म्हणून ती कधी तुटली नाहीं. या मित्रांवर, सहकाऱ्यांवर त्यांचा अमर्याद लोभ. कै. पंडितजी, जयप्रकाशजी, कै. सानेगुरुजी, यांच्याबद्दल तर त्यांना मैत्रीपेक्षांहि जास्त वेगळे वाटे. शिकण्यासारखं त्यांच्यांत खूप, त्यामुळें मित्राऐवजीं ते त्यांना वडिलकीचा मान देऊन वागत. पंडितजीवर, महाराष्ट्रावरील अन्यायाच्या वेळीं एसेमनी परखड टीका केली. तरी त्यांच्याबाबत त्यांना किती आदर होता, ते त्यांनीं १९४७ सालीं लिहिलेल्या एका चित्रदर्शनावरून लक्षांत येईल. कै. सानेगुरुजी तर त्यांना माऊली सारखेच. त्यांचेहि एसेमनी काढलेलें शब्दचित्र तितकेच हृद्य. हीं दोन्ही चित्रें एसेमच्या अंतःकरणाचीं, व्यक्ति म्हणून साक्ष देणारीं आहेत.

◆ ◆ ◆

हमारे बेताज बादशाह : (पंडितजी)

लेखनकाल : नोव्हेंबर १९४६

१९३७ सालची गोष्ट. अखिल भारतीय काँग्रेस कमिटीची बैठक दिल्ली येथें चालूं होती. मंत्रिपदें घ्यावयाची कीं नाहीं, या महत्त्वाच्या प्रश्नावर निर्णय घ्यावयाचा होता. पंडित जवाहरलाल आणि त्यांचें इतर जहाल तरुण मित्र यांचा मंत्रिपद-स्वीकाराला जोराचा विरोध होता. काँग्रेसनें अधिकारपदावर जाऊं नये असें त्यांना वाटत होते. आणि आश्चर्याची गोष्ट कशी कीं, त्याच वेळीं दिल्लीतील हमालांनीं पंडितजींना मानपत्र देऊन 'हमारे बेताज बादशाह' या शब्दांनीं त्यांचा गौरव केला होता. पंडितजी राजसिंहासनावर त्या वेळीं बसले नव्हते तरी जनतेच्या हृदयसिंहासनावर ते आरूढ झाले असल्याबद्दल माझी त्याच वेळीं खात्री झाली. पं. जवाहरलाल यांचे हिंदी राजकारणांतील स्थान अद्वितीय असें आहे. हिंदुस्थानचा ब्रिटनबरोबर संबंध आल्यापासून पाश्चात्य शिक्षण घेऊन तयार झालेल्या तरुण पिढीच्या मनाची घडण कांहीं निराळीच अशी बनली आहे. तसें पाहिल्यास आज हिंदुस्थानमध्यें दोन प्रकारचें लोक पहावयास मिळतात. पाश्चात्य विचारांनीं व युरोपीय संस्कृतिनें भारावून जी शहरी प्रवृत्ति निर्माण झाली ती आपल्या जुन्या संस्कृतिपरंपरेंत तयार झालेल्या अफाट ग्रामीण जनतेहून पुष्कळच भिन्न आहे हिंदी समाज जणूं दोन विभागांमध्यें वाटला गेल्यासारखा आहे. एका बाजूला असंख्य खेड्यापाड्यांत राहाणारे व भारतीय संस्कृत वाढलेले लोक तर दुसऱ्या बाजूला इंग्रजी विद्येचे 'वाघिणीचे दूध'

पिऊन पुष्ट झालेला आणि वैचारिकदृष्ट्या प्रगत झालेला शहरी समाज असें दृश्य आज आपणांस दिसते.

या दोन विभागांची एकजूट झाली तरच नवीन समाज आणि एकसंघ हिंदी राष्ट्र तयार होणें शक्य आहे. यापैकीं कोणत्याहि एका विभागाला लाथाडून राष्ट्राची प्रगती होणारच नाहीं. पंडित जवाहरलाल नेहरू आणि महात्मा गांधी या दोन महान व्यक्ति म्हणजेच या वर उल्लेखिलेल्या दोन विभागांची प्रतिनिधिक प्रतीकें होत आणि तीच त्यांचे हृदय बोलून दाखवूं शकतात. कोणीही सुशिक्षित तरुण पंडितजींची आत्मकथा वाचूं लागला तर तो पंडितजींशीं तन्मय होऊं शकतों. कित्येक ठिकाणीं मोठ्या प्रमाणावर आपल्याच इच्छा आकांक्षा पंडितजी बोलून दाखवीत आहेत असाही त्याला भास झाल्याशिवाय राहात नाहीं. आणि हिंदी युवकांना पंडितजीबद्दल जी असामान्य निष्ठा वाटते आणि त्यांचा शब्द हा आदेश म्हणून मानण्यास जे असंख्य तरुण पुढें येतात त्याचें बीज याच मनोभूमिकेंत रुजलें आहे असें आपणांस आढळून येते. पाश्चात्य विचार व जीवनमूल्यें ज्यांनीं मान्य केली आहेत अशा तरुण पिढीला पंडितजी अधिक जवळचे वाटावे हे अगदीं स्वाभाविक आहे. याच्या अगदीं उलट महात्मा गांधी हे आमच्या भारतीय संस्कृतींतील तत्त्वज्ञान व मूल्यें जनतेपुढें सतत चाळीस वर्षें ठेवीत आलेले आहेत. इतकच नव्हें तर त्यांनीं हें तत्त्वज्ञान आचराणांत आणण्याचाहि अहोरात्र यशस्वी प्रयत्न चालविलेला आहे. पोथ्या पुराणांतून आणि कथा कीर्तनांतून जे विचार आणि जीवननिष्ठा आज हजारों वर्षें आमच्या अज्ञानी समाजावर बिंबविण्यांत आले आहेत तेच विचार आणि जीवननिष्ठा राष्ट्राच्या वंदनीय पुढाऱ्याकडून आचरणांत येत असलेले पाहून वर उल्लेखलेल्या अफाट हिंदी ग्रामीण समाजाला गांधीजींच्या बद्दल निरतिशय आपुलकी वाटल्याशिवाय राहात नाहीं. प्रचलित परिस्थितींत काय केले पाहिजे याची शिकवण

गांधीजी देतात ती या जुन्या शब्दांच्या आणि आचारविचारांच्या परिभाषेतून देत असतात. पंडितजींची स्थिति या उलट आहे.

तेच विचार आणि त्याच कल्पना, पंडीतजी मांडूं लागलें म्हणजे जणूं ते इंग्रजींतूनच विचार करीत असावेत असें वाटतें. परंतु त्यांचे विचार इंग्रजींतून होत असले तरी सुशिक्षित समाजाच्या इच्छा आकांक्षा आणि प्रेरणाबरोबर ते इतके समरस झालेले आहेत कीं, अठ्ठावन्नाव्या वर्षींदेखील ते तरुणांचे पुढारीच समजले जातात. आणि त्यांच्यामुळेंच हिंदी स्वातंत्र्य संग्रामांत तरुण पिढी आघाडीवर लढण्यास नेहमीं सज्ज असते.

महात्मा गांधींचे श्रेष्ठत्व जर कशांत प्रामुख्यानें दिसून येत असेल तर जवाहरलालजीना नेहमी आपल्या बरोबर ठेवण्यांतच ! गांधींजींच्या सहकार्याशिवाय पंडितजींचे राजकारण पुढें जाऊं शकत नाहीं अशीं उदाहरणें अनेक दाखवितां येतील. १९३० सालीं संपूर्ण स्वातंत्र्याच्या ध्येयाची घोषणा केल्यानंतर प्रत्यक्ष लढ्याच्या दृष्टीनें पाऊल टाकण्याची वेळ आली तेव्हां जवाहरलालजीना बापूजींच्याकडेच जाणें भाग पडलें. याच्या उलट क्रिप्स शिष्टाई नंतर ' चले जाव ' चे नवें धोरण प्रतिपादण्यास सुरवात केल्यानंतर जवाहरचे मन वळविण्यासाठीं गांधीजीना कित्येक दिवस खर्ची घालावे लागले. जवाहरलालजीना बरोबर घेतल्याशिवाय स्वतंत्रपणें पुढें जाणें ही कल्पनाच त्याना शक्य कोटींतील वाटत नव्हती आणि म्हणून जवाहरलालना वळविण्यासाठीं यांनीं आपल्या भूमिकेंत महत्त्वाचे फेरबदल देखील केले ऑगस्ट ठरावांत हंगामी सरकारबाबत जी योजना आहे ती गांधीजींनी आपली भूमिका जवाहरलालना पटवून देण्यासाठींच स्वीकारली होती असे ऐकिवांत आहे.

" आंतरराष्ट्रीय राजकारणांत जवाहरलालच माझा शिक्षक आहे. " असें महात्माजी नेहमीं बोलून दाखवित. जवाहरलालजींनीं हिंदी राष्ट्रीय प्रश्न

आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या दृष्टिकोनांतून पहाण्यास कार्यकर्त्यांना शिकविलें आहे. म्हणूनच ' चले जाव ' चे धोरण मान्य करण्यास त्यांना अवधि लागला.

जवाहरलालजीचा आंतरराष्ट्रीय समाजवादी दृष्टीकोन व गांधीजींचा अहिंसात्मक भारतीय दृष्टिकोन यांमध्यें समन्वय घडून येण्यापर्यंतचा जो अवधि जातो त्यांतील संघर्षामुळें बऱ्याचशा लोकांना असें वाटतें कीं, जवाहरलाल यांची भूमिका मूलत:च गांधीजींच्या भूमिकेशीं विरोधी आहे आणि पुढें ज्यावेळीं दोघांमध्यें समझोता घडून आलेला दिसला तेव्हा जवाहरलालजींनी गांधीजींपुढें नांगी टाकली असा गैरसमज फार लोकांनीं करून घेतला. वास्तविक गांधीजीची भूमिक व जवाहरलालजींची भूमिका यामध्यें मूलभूत विरोध असा नाहींच. जवाहरलाल काय किंवा गांधीजी काय दोघांनाहि परस्परांना बरोबर घेऊनच पुढें जाणे भाग पडते; तसे झाले तरच हिंदी राष्ट्र प्रगतिपथावर पुढें सरकूं शकेल याची जाणीव दोघांनाहि सारखीच आहे.

पंडित जवाहरलालनी हिंदी राजकीय नकाशावर प्रथमत: समाजवाद दाखल केला. आणि तेव्हांपासून दिवसेंदिवस तो मान्यता पावत आहे. महात्माजींच्या मनांत जवाहरलालजींच्या पाश्चात्य समाजवादाला हिंदी संस्कृतीच्या जीवन मूल्याचे अधिष्ठान द्यावयाचें आहे. गेली कित्येक वर्षें गांधीजी आणि जवाहरलाल यांचे जे सहकार्य चालू आहे त्यांमधून ही गोष्ट हळूहळू सिद्ध होत आहे आणि म्हणूनच गांधीजी जवाहरलाल आपला वारस असे सांगतात. त्याचे हें बोलणें खुद्द जवाहरलालना देखील पसंत पडत नाहीं. कारण राजकीय क्षेत्रांत वारसदारी कसली असें स्यांचे म्हणणे असते पण वस्तुत: गांधीजी जे म्हणत आहेत ते खरे होऊं पाहात आहे. शिवाय जवाहरलाल हे माझे वारस याचा व्यापक अर्थ ध्यावयाचा आहे. गांधीजी ज्या जीवनमूल्यांची उपासना करीत आहेत ती जीवनमूल्यें पंडित जवाहरलालजींच्या ठिकाणी दुसऱ्या कोणाच्याहि पेक्षां जास्त आहेत याबद्दल गांधीजींची खात्री पटलेली आहे. आणि अर्थ गांधीजींना वारसदारीबद्दल अभिप्रेत असतो असें म्हणणें प्राप्त आहे.

महात्माजींच्या खालोखाल आज तरी जवाहरलालजाचि राष्ट्राचे लाडके नेते आहेत आणि तेच लेखाच्या प्रारंभीं म्हटल्याप्रमाणें जनतेचें 'बादशाह' होऊं शकतात. महात्मा गांधी ही एक थोर विभूति आहे. ते शासनदंड हातीं धरणार नाहींत, त्यासाठीं जवाहरलाल हवेत. जनतेवरील आपले प्रेम यत्किंचितहि कमी न होऊं देतां ते राजदंडहि निष्ठुरतेनें वापरूं शकतात. "बिहारमधील बहुसंख्य हिंदु समाज अल्पसंख्य मुस्लीम जनतेवर अमानुष अत्याचार करील तर मी विमानांतून बॉंबफेकहि करीन" असें जवाहरलालजी म्हणतात, परंतु त्याचबरोबर "एखाद्या निरपराध मुसलमान इसमाचा प्राण घ्यावयाचा असेल तर त्यासाठीं आपल्या प्रेतावरून जावें लागेल." असेंहि ते म्हणतात. जवाहरलालजींच्या प्रामाणिकपणाबद्दल कोणी शंका घेईल असें वाटत नाहीं. वर उल्लेखिलेलीं त्यांचीं वाक्यें ही त्यांच्या अंतःकरणांतील अत्यंत कडक व अतीव मृदू अशा भावनांची उत्कृष्ट प्रतिबिंबें आहेत असें म्हणावयास हरकत नाहींत.

आधुनिक भारतीय युद्धामध्यें जवाहरलालजींची तुलना भारतीय महा-युद्धांतील अर्जुनाबरोबरच होऊं शकेल.

◆ ● ◆

साने गुरुजींच्या सान्निध्यांत

लेखनकाल : जुलै १९५०

पूज्य साने गुरुजींच्या निधनाची दुष्ट वार्ता ऐकून अवघ्या महाराष्ट्राला धक्का बसला. कारखान्यांतून काम करणाऱ्या लाखो कामगारांचे हात जागच्या जागीं स्थिरावले असतील; लिहिणाऱ्यांच्या लेखण्या बंद पडल्या असतील, मायबहिणींच्या हातांतील काम तसेंच राहून थोडा वेळ त्या एखाद्या चित्रासारख्या अचल राहिल्या असतील ! क्रीडेमध्ये गर्क असलेली बालकें खेळ विसरून रित्या मनाने उगीचच कुठेतरी पहात उभीं राहिलीं असतील; शेंकडो अंतःकरणें दुःखानें विदीर्ण झाली असतील !

त्यांच्या निधनानें हजारों बालकें आज पोरकी झालीं आहेत. त्यांना आतां गोड गोष्टी कोण सांगेल ? पुरुषी अन्यायानें शोकविव्हल झालेल्या असाहाय्य बाया बापड्यांनीं आता कोणाकडे जावें ? कोणाची वाणी आणि लेखणी इतकी प्रभावशाली आहे, जी त्यांच्या दुःखाला वाचा फोडूं शकेल ! कोणाचें हृदय गुरुजींच्याइतकें भावपूर्ण आणि कनवाळू आहे ? सामाजिक अन्यायाने रक्तबंबाळ झालेलीं जखमीं हृदयें घेऊन आतां हरिजन तरुण कोठें जातील ? कवीच्या हळुवार अंतःकरणाने कोण त्या जखमा बांधणार ?

गुरुजींच्याजवळ काय होतें ? एकटी व्यक्ति समाजांत विशेष काय करूं शकणार ? परंतु उपेक्षितांचे हात आपल्या हातांत घेऊन त्यांनीं कुरवाळले म्हणजे देखील त्या दुःखी जीवांचें सांत्वन होई.

ज्यांच्यांशीं त्यांचा प्रत्यक्ष संबंध आला होता त्यांना निश्चितच आपल्या हृदयाचा तुकडा गळून पडल्यासारखें झालें असेल. कोठेंहि दुःखहि दिसलें, वेदना पाहिल्या की गुरुजींचें हृदय बाणासारखें धांव घेई. दुःख निवारणांस आपण पुरे पडत नाहीं याची जाणीव होऊन त्यांचें अंतःकरण व्याकुळ होई. त्यांच्या जिवाची आगआग होई. नेहमींच प्रेमाचा वर्षाव करणारी ही साधीभोळी मूर्ति दुःख संतापाने लाल होई. दुःखितांचीं अंतःकरणें उज्जवल करणारी ही मांगल्याची ज्योत एकदम एकाद्या वडवानलाचें रूप धारण करी. बुद्धिवादानें मनाचीं समजूत घालून सबुरींत समाधान मानणें त्यांना शक्य नव्हतें. कारण त्यांच्या हृदयांतील कालवाकालव फार प्रचंड होती. मग आपले प्राणदेखील ते पणाला लावीत. 'करूं वा मरूं' हा मंत्र राष्ट्राने कांहीं काळच अमलांत आणला; गुरुजींच्या मनाचो ती एक चिर अवस्था होती, स्थायी भाव होता त्यांचीं उपोषणें हा अशा मनस्थितीचाच परिपाक असे.

कामगारांसाठीं, आर्थिक अन्यायाविरुद्ध, हरिजनांसाठीं, सामाजिक विषमत्ते-विरुद्ध आणि सर्व समाजाच्या नैतिक उद्धारासाठीं आपणांसर्वांच्या नैतिक भ्रष्टतेविरुद्ध त्यांनीं उपोषणें केलीं. कित्येकांनीं त्यांचा उपहास केला. कोणी तर उपोषणाचें साधनच चुक आणि त्याज्य आहे असें प्रतिपादलें. त्यांच्या या टीकेने गुरुजींच्या अंतःकरणाला घरें पडलीं असतील. परंतु त्यांनीं त्याची पर्वा केली नाहीं. सरतेशेवटीं पंढरीचें विठ्ठलमंदिर हरिजनांना खुलें झाले त्यावेळीं जणूं विठोबामाऊलीने कौल द्यावा तसे महात्माजींनी धन्योद्‌गार काढले. त्या वेळीं गुरुजींना कृतार्थता वाटलीं यांत शंकाच नाहीं.

वितंडवादी आणि अहंमन्य लोकांना गुरुजींचीं उपोषणें समजलीं नसलीं तरी ज्यांच्यासाठीं त्यांनीं तीं दिव्यें केलीं ते लोक निश्चितच त्यांना दुवा देत असतील आणि त्यांच्या आकस्मिक निधनाबद्दल अश्रु गाळीत असतील.

तथाकथित विचारवंतांना गुरुजींचें मोठेपण मान्य नसेल, परंतु दऱ्याखोऱ्यांत आणि जंगलांत राहणाऱ्या आदिवासींपासून तों थेट शहरी वातावरणांत

राहणाऱ्या अद्यावत् लोकांपर्यंत समाजांतील सर्व थरांतील असंख्य हृदयें त्यांनीं जिंकलीं होतीं. अगदीं शब्दार्थानें असंख्य आबालवृद्धांना त्यांनीं रडविलें ! लोकमान्य टिळक सोडले तर आपल्या निर्याणानें लोकांना इतकें कोणींच रडविलें नाहीं.

लोकमान्य टिळक राजकारणी पुरुष होते. राष्ट्राचे महान् कर्णधार होते. गुरुजी तसें नव्हतें. राजकारणी पुरुष म्हणून त्यांना ही लोकप्रियता लाभली नव्हती. अंतःकरणाची विशालता, साधुत्व आणि दीनदुबळ्या जनतेबद्दल कमालीचें ममत्व यांत त्यांच्या लोकप्रियतेचें मूळ आहे. त्यांच्या जीवनांतील रहस्य शोधून काढण्याच्या दृष्टीनें त्यांनींच १९४४ सालीं केलेल्या भाषणाचा उतारा दिल्यास उपयुक्त ठरेल असें वाटतें.

• नाशिकच्या तुरुंगांत त्यांच्या मित्रांनीं त्यांचा वाढदिवस साजरा केला. मंडळी अगदीं थोडी होती आणि महिनोनुमहिने एकत्र राहिल्यानें सर्वांचें जणूं एक कुटुंबच झालें होतें. त्यामुळें गुरुजींनीं अधिक मोकळेपणानें आत्म-निवेदनपर भाषण केलें. ते म्हणाले—

" मी रागावतों तें चांगलें नाहीं. मला मिसळतां येत नाहीं. तेंहि चूकच. मुलांच्याशीं मी अधिक समरस होतों. मुलांनीं मागितलें म्हणजे माझ्याजवळ असेल तें मी देतों- लेख, कविता, व्याख्यान, पुस्तक जें असेल तें देतों. पण मोठ्यां माणसांच्याजवळ मी जाऊं शकत नाहीं. फक्त विनोबा आणि सेनापति बापट यांचें प्रेम मी जिंकूं शकलों. लोक समजतात मी निराश आहे. पण तें खरें नव्हे. मी हसरा आहें. मधूनें मला पत्र लिहिलें तें ' प्रिय हसरे ' म्हणून लिहिलें आहे. कधींकधीं मी निराश होतों. पण त्याचें कारण परिस्थिति असतें.

लोक मला साहित्यिक समजतात. पण ती खोटी गोष्ट आहे. मला सेवेमध्यें आनंद होतो. माझ्या जीवनांत साहित्यनिर्मिति ही दुय्यम वस्तु आहे. दुसरें कांहीं करतां येत नाहीं असें दिसलें म्हणजे मी लिहितो. माझें बहुतेक

सर्व लिखाण तर तुरुंगांतच झालें आहे. बाहेर मीं क्वचितच लिहिलें आहे. दुसऱ्या भाषांतलें विचार आपल्या मराठी वाचकांना मिळावें म्हणून मी भाषांतरें करून ठेवतों. लोक म्हणतात मला तंत्र नाहीं. मी म्हणतो नसेल तंत्र; पण वाचतात ना लोक ? मला तेवढें पुरे आहे.

माझें लग्न झालेलें नाहीं; पण कितीतरी दुःखीकष्टी बायाबापड्यांनीं आपलीं दुःखें माझ्याजवळ सांगितलीं आहेत. ज्या गोष्टी बायका नवऱ्याजवळ बोलत नाहींत त्यादेखील त्या मजजवळ सांगतात. मीं त्यांच्या दुःखांना वाचा फोडली आहे.

पूर्वी मी मत्सरी होतों. अजूनहि नाहीं असें नाही. परंतु आतां कमी होत चालले ते दोष. मीं स्वतःला गांधीवादी समजतो; कारण माझी वृत्ति तशी आहे. माझ्या ' काँग्रेस ' पत्राला पुष्कळांनीं विरोध केला. पण विनोबा म्हणाले, ' त्यांतला सूर मान्य आहे; भाषा बदला. '

मला मिसळतां येत नाहीं म्हणून सांगितलेंच; तरीपण मी सर्वांच्यासाठीं प्रार्थना करतों. रात्रीं झोपतांना मी जवळजवळ दोनशे माणसांची आठवण करतों. मी विरोधी पक्षांतल्या लोकांच्यासाठींदेखील प्रार्थना करतों त्यांना आनंद लाभूं दे, सुख होऊं दे अशी प्रार्थना करतों.

मी निरासक्त राहण्याचा प्रयत्न करतों. येरवड्याला असतांना एकदां पेढे मिळाले. मी एक पेढा खिशांत ठेऊन दिला बग्याला आवडतो म्हणून (बगाराम तुळपुळे); पुन्हां वाटलें कीं, कशाला ही आसक्ति ? बग्यानें खाल्ला काय आणि या पद्मा बरदाशाने खाल्ला काय, सारखेंच. पुन्हां म्हणालों, राहूं दे बग्यालाच, शेवटीं निर्णय करून देऊन टाकला बरदाशालाच. अशा प्रकारें मी निरासक्त होण्याचा यत्न करीत असतों....

१९३५ सालीं अमळनेरचीं मुलें आणि मी पुण्याला एकत्र राहत असूं. संक्रांतीच्या दिवशीं तिळगूळ कोणाला देणार ? भांडीं घासणारी बाई माझ्यापेक्षां वयानें मोठी होती तिला दिला आणि तिच्या पायांवर डोकें ठेवलें. ती जरा गांगरून गेली; पण मग ती आमच्यांतलीच झाली.

अशा एक ना अनेक गोष्टी आहेत. आपलें हें एक कुटुंब आहे म्हणून सांगितलें; इतरांना नाही सांगत. तुमची स्तुति मला आवडत नाही असें कसें म्हणूं ? मी अजून तितका मोठा नाही झालों. स्तुति हें हलाहल आहे तरी सामान्य मनुष्याला त्याच्याबद्दल लोभ वाटतो. आणि मीदेखील एक सामान्य मनुष्यच आहे. ''

महात्म्याचें विशाल आणि दयाशील अंतःकरण असूनहि आपण सामान्य माणसांपैकींच एक आहोत या जाणिवेंतच गुरुजींच्या जीवनाचें रहस्य सांठवलेलें आहे; आणि या दृष्टिकोनांतूनच त्यांच्या निर्णयाकडे पाहिलें पाहिजे. सर्वसामान्य जनतेबद्दलची ही अविभाज्यतेची भावना जाज्वल्य असल्यामुळेच ते जनतेच्या सुखदुःखाशीं एकरूप होऊं शकत. त्यांच्या भावोत्कट आणि स्फटिकासारख्या निर्मळ हृदयांत जनतेला आपल्या सुखदुःखांचें प्रतिबिंब दिसे. साहजिकच जनमनांतील रागलोभांचा आविष्कारहि गुरुजींच्या जीवनांत प्रकर्षानें व्यक्त होई. योग्याची स्थितप्रज्ञता त्यांच्या ठिकाणीं आली असती, तर कदाचित् जनतेला त्यांच्याबद्दल इतकी आत्मीयता वाटलीहि नसती.

भूमिगत चळवळींत आम्हां कार्यकर्त्यांचा त्यांच्याशीं निकट संबंध आला आणि त्यांच्या अंगच्या अलौकिक गुणांचा आम्हांला प्रत्यय आला. सेवाभाव तर त्यांच्या रोमरोमांत. कोणतेंहि काम त्यांना हलकें वाटलें नाहीं किंवा त्या कामाबद्दल लोकांनीं आस्था दाखविली नाहीं म्हणून त्यांनीं तें सोडूनहि दिलें नाहीं. सहकारी आपापल्या कामाला गेले म्हणजे त्यांनीं स्वयंपाकपाणी, धुणीं सर्व कांहीं करून ठेवावें. कोणाला काय आवडतें याबद्दलदेखील दक्षता ठेवावी,

असें मातेच्या हृदयाहूनहि कनवाळु असें त्यांचें हृदय होतें. मला थंडी फार लागते असें मी एक वेळ म्हणालों होतों; बस्स; तेव्हांपासून त्यांच्या मठीवर मी कधीं झोपण्यास थांबलों म्हणजे मला भरपूर पांघरुण आहे कीं नाहीं याबद्दल ते खबरदारी घेत. पुढे ते पकडले गेले. परंतु तुरुंगांतून जीं गुप्त पत्रें येत त्यांतहि त्यांनीं एक वेळ या गोष्टीचा उल्लेख केलेला मला आठवतो. "एस्. एम्.ना अनीमियामुळें थंडी फार वाजते, त्यांना भरपूर पांघरुणें द्या." असें त्यांनीं लिहिलें होतें.

आमच्या बुलेटिनमध्यें गुरुजी लिहीत त्या वेळीं हजारों लोक तें वाचण्यासाठीं धडपडत. हुतात्मा कोतवाल यांचें शब्दचित्र त्यांनीं लिहिलें आहे. तें हृदयाला जाऊन भिडणारें आहे. पंडितलोक त्यांच्या साहित्याचें कसेंहि मोजमाप करोत, जनतेनें तें अगोदरच हृदयाशीं धरलें आहे.

नाशिकच्या तुरुंगांत फुलांचे वाफे तयार केले होतें. गुरुजी त्या फुलांच्या शेजारीं जाऊन बसत. या बाजूनें पाहात, त्या बाजूनें पाहात, आपल्याशींच हंसत. हें सौंदर्य कोठें ठेवूं असें त्यांच्या कविहृदयाला होई.

गुरुजींना व्यवहार समजत नाहीं, ते बावळट आहेत, सहज फसतात असा लोकांचा समज असे; परंतु तें खरें नव्हे. समोर बसलेला मनुष्य आपल्याला लुबाडीत आहे हें ठाऊक असूनहि गुरुजी बोलत नसत. कारण नाहीं म्हणायचें त्यांच्या जिवावर येई. पैशाच्या व्यवहारांत एका माणसानें त्यांना फसवलें, तेव्हां आम्हीं म्हणालों, "कायदेशीर इलाज करूं." ते म्हणाले, "जाऊं दे. माणसें जोडायचीं असतात, तोडायला वेळ लागत नाहीं."

एका मित्राच्या चारित्र्याबद्दल आम्ही टीका केली. गुरुजींना त्यानें फसवलें होतें. आमची टीका गुरुजींना रुचली नाहीं. ते खवळून म्हणाले, "प्रत्येकानें आपलें अंतःकरण तपासावें. म्हणजे कोण चारित्र्यवान् तें कळेल."

मेघा भुवनांतला त्यांचा स्वयंपाकी छोकरा गणेश. बिचारा अगदी अशिक्षित. मातृभाषा कानडी असल्यानें धड मराठी बोलतां येत नसे. ते त्याला पोळ्या करायला मदत करायचे; चहाची भांडीं विसळायचे, कधीं एखादा नवा पदार्थ करायलादेखील शिकवायचे. इतरांना जमणें शक्य नाहीं तें त्यांनीं करून दाखवलें. त्याच्या अंत:करणांत ते शिरले. त्या अप्रगल्भ माणसाच्या मनावरहि त्यांनीं संस्कार केले.

साधना प्रेसमधील मंडळी म्हणजे त्यांचें कुटुंबच. एखाद्या कामगाराच्याकडे कोणी आजारी असलें तर त्याच्या औषधपाण्याची व्यवस्था आहे कीं नाहीं याबद्दल ते स्वत: काळजी वाहतील. एखादें वेळीं कंपॉझिटर्सना अधिक काम पडलें तर त्यांचा जीव वरखालीं होई. तेवढ्यांतल्या तेवढ्यांत लिमलेटच्या गोळ्या आणून हलकेंच त्यांना देतील. गुरुजींचें शव साधना प्रेसजवळ आलें त्या वेळीं ते सर्व लोक त्यांच्या पायां पडून दसदसा रडले. तें दृश्य कारुण्यपूर्ण होतें, दगडाला पाझर फोडणारे होते.

गुरुजींच्या भावोत्कट स्वभावामुळें कोणाला असें वाटण्याचा संभव आहे कीं, त्यांना संयम करतां येत नसे; दु:ख आवरतां येत नसे. परंतु तेंहि खरें नाहीं. वैयक्तिक जीवनामध्यें ते पुष्कळच संयमी असत. एकच उदाहरण सांगितलें म्हणजे पुरें. अंमळनेरच्या कामगारांसाठीं नाशिक तुरुंगांत त्यांनीं उपोषण आरंभलें होतें. उपवासाच्या सोळाव्या दिवशीं त्यांचें उद्दिष्ट साध्य होऊन त्यांनीं उपोषण सोडलें. दोनतीन दिवसांनीं ते हॉस्पिटलमधून परत आमच्या वॉर्डमध्यें आलें. वास्तविक तो आनंदाचा दिवस होता. परंतु त्यांच्या नशिबीं तें सुख नव्हतें. त्याच दिवशीं त्यांच्या वडील बंधूंचा मुलगा वसंता वारल्याचें पत्र आलें होतें. ती दु:खदायी बातमी गुरुजींना कशी सांगावी या चिंतेंत सर्व लोक होतें. त्यांच्या क्षीण झालेल्या प्रकृतींवर या दु:खाघातानें अनिष्ट परिणाम होईल अशी आम्हांला भीति वाटत होती. परंतु आश्चर्य

असें कीं, ती बातमी त्यांना सांगण्यांत आली त्या वेळीं त्यांनीं कमालीचा संयम दाखविला. वसंता त्यांना जीव कीं प्राण होता. परंतु आमच्यादेखत एका अश्रुदेखील त्यांनीं ढाळला नाहीं.

गुरुजींच्या ठिकाणीं एक अनोखें सामर्थ्य होतें. आपल्या अतुल बुद्धिमत्तेनें जनतेला चकित करून सोडणारीं माणसें पुष्कळ सांपडतात; परंतु आपल्या हृदयगुणांच्या जोरावर जनतेचीं अंत:करणें हालवून सोडींणारा माणसे विरळा. म्हणूनच पूज्य विनोबांनीं गुरुजींची गणना ज्ञानदेव, तुकारामादि संतांच्या खानदानांत केली आहे. मनुष्य त्याच्यां सान्निध्यांत आला म्हणजे त्या वेळेपुरत्या तरी त्याच्या तामस भावना निष्प्रभ होऊन जात. गुरुजींचें व्यक्तिमत्व प्रभावी होतें. महाराष्ट्रांतील तरुण पिढीला त्यांनीं कर्तव्यनिष्ठ, ध्येयवादी आणि त्यागी बनविलें आहे. नैतिक भ्रष्टतेच्या या काळांत त्यांनीं नवमहाराष्ट्राच्य जीवनाला नैतिक अधिष्ठान दिलें. त्यांचें हें सामर्थ्य केवळ तरुणांपुरतें मर्यादित नव्हतें. स्वत:ला बुद्धिवादी म्हणवणाऱ्या लोकांनादेखील अंतर्मुख करून, त्यांना एका निराळ्या पातळीवर नेण्याचें सामर्थ्य त्यांच्यापाशी होते. म्हणूनच गुरुजींना सगळ्यांचीं मनें जिंकण्याची किमया करतां आली. गुरुजींजवळ शिकण्यासारखं खूप होतं, पण त्याची जाण आपल्याला नव्हती, हें आतां जाणवतें नि मन दु:खानं जास्तच भरून येतें.

ग्रंथालय सभ्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रमांक ..... दिः .....
वर्गांक ..... नोंद दिः .....

८. तुळशीपत्रें :

सामाजिक किंवा राजकारणी पुढाऱ्यांच्या खासगी जीवनाबद्दलहि जनतेला एक कुतूहल असते. त्यांचा पत्रव्यवहारहि त्यामुळें खऱ्या अर्थानें खासगी राहूं शकत नाहीं. त्यांतून 'एसेम' सारख्या 'दिवसां नयनीं रात्रीं स्वप्नीं' लोकजागरणाचें कार्य बघणाऱ्या व्यक्तीच्या पत्रांतून तर वैयक्तिक जीवना-इतकेंच समाजजीवनाबद्दलचें उल्लेख असणें अपरिहार्य असतें. त्यांचीं पत्र जवळच्या नातेवाईकांना, स्नेह्यांसोबत्यांना, सहकाऱ्यांना आणि सैनिकांनाहि असणार. त्यांतींल बरींच पत्रें आतांपर्यंत वेगवेगळ्या ठिकाणीं प्रसिद्धहि झालीं आहेत. पुढील कांहीं पानांत कांहीं अप्रकाशित पत्रें व एक दोन पूर्व प्रकाशित पत्रें आहेत. व्यक्तीचीं पत्रें हीं अगदीं सहज लिहिलीं गेलेलीं असल्यानें त्यांत खरेखुरें अंतःकरण दिसून येते. तिच्या स्वभावाचा पत्र हा एक आरसाच असतो. 'एसेम' चीं पत्रें म्हणजे लेखांतून, भाषणांतून आणि कृतींतूनच सांगून संपलें असें न मानल्यामुळें समाजाला वाहिलेली, सेवावृत्तीची साक्ष देणारी, समाजांतल्या तरुण पिढीला नवा विचार देणारी, रुपानें साधी पण तागडीचं माप पुरं करणाऱ्या रुक्मिणीची जणं तुळशीपत्रें· त्यांतून त्यांच्या ऋजुतेची, निर्धाराची, तितकीच काव्यमय, भावमधुर अंतःकरणाची प्रचीति यावी .....

◆ ◆ ◆

सन १९४५

प्रिय सैनिकांनो,

आज कितीतरी दिवसांनी मी पुनः तुमच्यापुढें येऊन माझे कांहीं विचार मांडीत आहे. हा आपला चवथा सेवादल-दिन आहे. प्रत्येक सेवादल दिनाच्या दिवशीं आपण आपल्या कामाचा आढावा घेऊन पुढच्या वर्षासाठीं कार्याची योजना करीत असतों. बेचाळीस आणि त्रेचाळीस साल तर अत्यंत धामधुमीचें गेलें. पण अशा धामधुमीच्या काळांतच आपल्या राष्ट्रीय जीवनाला शक्ति मिळालेली आहे. फार उन्हाळा झाला म्हणजे पाऊस पडल्याबरोबर धरतीमाता हिरवीगार होऊन जाते. गुलाबाच्या झाडाच्या फांद्या कापल्या आणि मुळें उघडी करून टाकलीं म्हणून तें झाड कांहीं मरत नाहीं. उलट सूर्यप्रकाशानें त्यामध्यें नवें जीवन येतें आणि थोड्याच वेळांत झाड पुनः डवरून त्याला सुंदर फुलें येतात. आपल्या दलाचेंहि असेंच झालें मागल्या दोन वर्षीं. क्षणभर सर्वच थंडगार झाल्यासारखें वाटलें. पण ऑगस्ट आंदोलनानें ज्या शक्तींना जन्म दिला त्याचा परिणाम आपल्या संघटनेवर देखील झाल्याशिवाय राहिला नाहीं. विशेषतः गेल्या सालीं सेवादलाची वाढ फार झपाट्यानें झाली. सेवादलाचे हें लहानसें झाड वादळामध्यें देखील टिकाव धरून राहिल्यामुळें सर्वांचें लक्ष तिकडे आकृष्ट झालें. आपल्याच प्रांतांत नाहीं तर अन्य प्रांतांतही सेवादल संघटना निर्माण झाल्या. पूर्वी वडिलधारे पुढारी सेवादलासंबंधीं विशेष बोलतांना दिसत नव्हते. पण आतां प्रत्येक मनुष्य सेवादल कार्याला चालना दिली पाहिजे असें म्हणूं लागला आहे.

विशेष महत्त्वाची गोष्ट म्हणजे सेवादलानें जें एक कार्य करण्याचें योजिलें होतें त्याला गांधीजींनी देखील चालना दिली आहे. त्यांनी स्पष्ट सेवादलाचा मात्र उल्लेख केला नाहीं. पण प्रचलित शिक्षण पद्धतीमध्यें जी एक मोठी उणीव आहे ती भरून काढली पाहिजे असें त्यांनी सांगितलें आहे. आपण तर या गोष्टींचा पहिल्यापासूनच पुरस्कार करीत आलों आहो. राष्ट्रीय शिक्षणाचा प्रयोग फसल्यामुळें विद्यार्थी वर्गाकडे द्यावे तसें लक्ष दिलें नाहीं ही गोष्ट आपण सुरुवातीलाच सांगितली होती. आपल्या सुदैवानें आज गांधीजींनी त्या गोष्टीवर भर देण्यास सुरुवात केली आहे. चालूं शिक्षण-

पद्धतीला पूरक असे व राष्ट्रीय भावनेला चालना देणारे शिक्षण देणें आवश्यक आहे. हें उद्दिष्ट कोणत्या संस्थेमार्फत साध्य करायचें याबद्दल गांधीजींनी स्पष्ट निर्देश केलेला नाहीं. तरी पण नवाकाळ सारख्या प्रतिष्ठित पत्राने आपल्या संस्थेची शिफारस प्रामुख्यानें केली आहे हें तुम्हांला अभिमानास्पद आहे.

चालू शिक्षण पद्धतींत अनेक दोष आहेत. एका दृष्टीनें पहातां ते हमालखाने आहेत असेंच म्हणावें लागतें. आखाड्यामध्यें जोर बैठकी काढून जसें स्नायु सुदृढ बनविण्यांत येतात तसेंच बुद्धीचा पाठ करणारें शिक्षण येथें दिलें जातें. गणित सोडवा, हिशेब करा, भाषा शिका, अर्ज करायला शिका, राज्यकर्त्यांनी सांगितला तसा इतिहास-भूगोल पाठ करा असा हा कारभार चालत असतो. हमालाचे स्नायू तयार झालें म्हणजे तो जसें ओझे उचलतो तसेंच आपल्या परकीय राज्यकर्त्यांची बौद्धिक हमाली करणें हा आमचा उद्योग झाला. आम्ही स्वतःच्या भाईबंदांना विसरलो. स्वतः पुरतेंच पाहूं लागलों, आमची स्वतंत्र बुद्धी नाश पावली आणि कर्तेपणा म्हणतात त्याची आम्हांला ओळखहि राहिली नाहीं. असलें हें शिक्षण विद्यार्थ्यांना ओझ्याप्रमाणें वाटूं लागावें यांत नवल काय ? शिक्षणांतलें स्वारस्य आणि गोडी गेली. ती एक प्रकारची हमाली होऊन बसली आहे. या परिस्थितींत त्याच शिक्षणसंस्थांमध्यें या रोगांवर उपाय करणें अशक्यच आहे. कारण त्यासाठीं दोन गोष्टींची आवश्यकता आहे. सध्याची शिक्षण पद्धतीच सदोष आहे आणि दुसरें म्हणजे त्यामध्यें अरेरावी आहे. पद्धति बदलल्याशिवाय शिक्षण आकर्षक करतां येणार नाहीं. ज्ञान घेत असतांना हंसत खेळत तें त्यांना मिळालें पाहिजे. तशी पद्धति आज नाहीं. विद्यार्थी वर्गाला स्वातंत्र्य तर मुळीच नाहीं. थोडेसे स्वातंत्र्य दिलें कीं लगेच त्यावर शस्त्र धरून ते खच्ची करण्यांत येतें. त्यांना चुका करण्याला देखील संधि नसते. मग सुधारणा कशी होणार आणि कर्तेपणा (initiative) कसा येईल ? शाळेचें वार्षिक संमेलन असलें तरी मुलें अशा एखाद्या पुढाऱ्याला अध्यक्ष म्हणून बोलावूं इच्छितात कीं तें अधिकाऱ्यांना पसंतच नसतें. मग संमेलन तरी बंद ठेवा अगर अधिकारी म्हणतील तो हुकूमवाला अध्यक्ष म्हणून आणा. डिबेटिंग यूनियन असली तरी तेंच. जिथें जावें तिथें शिक्षणांत अरेरावी आहेच. मिळालें पाहिजे. तशी पद्धति आज नाहीं. विद्यार्थी वर्गाला स्वातंत्र्य तर मुळीच नाहीं. थोडेसे स्वातंत्र्य दिलें कीं लगेच त्यावर शस्त्र धरून ते खच्ची करण्यांत येतें. त्यांना चुका करण्याला देखील संधि नसते. मग सुधारणा कशी होणार आणि कर्तेपणा (initiative) कसा येईल ? शाळेचें वार्षिक संमेलन असलें तरी मुलें अशा एखाद्या पुढाऱ्याला अध्यक्ष म्हणून बोलावूं इच्छितात कीं तें अधिकाऱ्यांना पसंतच नसतें. मग संमेलन तरी बंद ठेवा अगर अधिकारी म्हणतील तो हुकूमवाला अध्यक्ष म्हणून आणा. डिबेटिंग यूनियन असली तरी तेंच. जिथें जावें तिथें शिक्षणांत अरेरावी आहेच.

तुम्ही गांधी जयंती साजरी करायची म्हणालांत तरी अधिकाऱ्यांना आवडणार नाहीं. म्हणजे प्रत्येक गोष्ट ते तुमच्यासाठीं स्वतःच ठरवणार. मग तुम्हांला त्यांत मौज काय वाटणार आणि तुमचे कर्तृत्व तरी कसें वाढीस लागणार ? यामुळें आजचे शिक्षण राष्ट्रसंवर्धनाच्या दृष्टीनें कुचकामाचें आहे. सरकारकडून सहाय्य घेणाऱ्या संस्थांमध्यें याहून दुसरें काय असणार ? ते कां स्वातंत्र्याचे धडे देणार ? कीं देशसेवेचा उपदेश करणार ? याच्या उलटच सांगावे लागतें त्यांना. आपल्या पुरते पहावें असेंच मुलांच्या मनावर बिंबविलें जातें.

राष्ट्राच्या तरुण पिढीला या रोगापासून वांचविण्यासाठीं आपल्याला कांहीं तरी योजना करणें आवश्यक आहे. म्हणूनच आपण सेवादलाची स्थापना केली. सेवादल म्हणजे राष्ट्रसेवक निर्माण करण्याची शाळा आहे असें आपण सांगत आलों आणि ते सेवक कसें, तर शिस्तनिष्ठ .आणि कर्तव्यनिष्ठ. हें उद्दिष्ट गांठण्यासाठीं अगदीं निराळ्या तत्त्वावर आपल्या संस्थेची उभारणी करण्यांत आली आहे. येथे अरेरावी नाहीं, लोकशाही आहे. आमची शिस्त जुलूमजबरदस्तीवर आधारलेली नाहीं, ती स्वखुशीची आहे. तुमच्यापैकीं एक सैनिकच तुमच्या शाखेची व्यवस्था पहातो. तो कांहीं छड्या मारून मुलांना रांगेत उभे करीत नाहीं. ते स्वखुषीनें आणि हौसेनें दलांत येतात. कवायत करतात, खेळतात, बौद्धिक चर्चा करतात. यामध्ये एक प्रकारची लोकशाही आहे. या कामांत अडचणी येतात त्या तुम्हांला अगर तुमच्या शाखानायकालाच इतरांच्या सहाय्यानें दूर कराव्या लागतात. एखादे काम जबाबदारीनें पार पाडावयाचें म्हटलें म्हणजे चार चौघांच्या मताला मान द्यावा लागतो. हेकटपणा करून चालत नाहीं. विचारांची देवाण घेवाण करावी लागते. दल चांगले चालावे अशी प्रत्येकाचीच इच्छा असल्यामुळें सर्वजण समंजसपणानें वागण्यास तयार असतात. अशांतूनच कर्तेपणा निर्माण होत असतो. सरकारचे बंधन शाळाधिकाऱ्यांच्यावर असतें तसें तुमच्यावर नसतें. त्यामानानें आपल्याला पुष्कळच स्वातंत्र्य असतें. या स्वातंत्र्याच्या वातावरणांत तुमच्या अंगच्या गुणांची भराभर वाढ होऊं लागते. सामुदायिक खेळ खेळणें अगर कवायत करणें यामुळें तुमचे समूहजीवन संपन्न होतें. दलासाठीं जे पैसे लागतात ते देखील शक्यतोंवर आपण जमा करतों

पण येथें कोणावर सक्ती नाहीं. वाटेल त्या पुढाऱ्याला आपण बोलावूं शकतों. त्याच्या व्यक्तिमत्त्वानें आपल्याला स्फूर्ति मिळूं शकते. चांगले काय आणि वाईट काय याबद्दल आपल्या कल्पना तयार होतात. खरा बंधुभाव आपल्यामध्यें निर्माण होतों. मी म्हणतों कीं शाळेंत जें इतिहासासारखें विषय शिकविले जातात ते अगदीं निराळ्या अशा दृष्टिकोणांतून आपल्या दलामध्यें पुनः शिकवायला देखील हरकत नाहीं. पण हें सर्व तुम्हीं स्वतःच संघटित करायचें आहे. सांगण्याचा मुद्दा असा कीं गांधीजींनी आपल्या सूचनांमध्यें या गोष्टींना महत्त्व दिलेलें आहे.

ही नवी जबाबदारी आपल्यावर येऊन पडली आहे. ती आपल्याला पार पाडलीच पाहिजे. नाहींतर लोकांच्या आपल्याकडून ज्या अपेक्षा आहेत त्या आपल्याला पुऱ्या करतां येणार नाहींत. १९४२ च्या आंदोलनाचा फायदा आपल्याला मिळाला पण त्याबरोबरच नव्या अडचणीही उत्पन्न झाल्या आहेत. देशांत जागृतीची नवी लाट [उत्पन्न झाल्यामुळें सरकारनें दडपशाहीचा वरवंटा देखील सुरू केला आहे. त्याला आपण पुरून उरले पाहिजे. म्हणजे पूर्वी जेवढी आपली कार्यक्षमता होती त्याहून अधिक असली पाहिजे. पूर्वी जेवढा त्याग करून भागत होतें त्याच्या कितीतरी पटीनी जास्त त्याग आतां आपल्याला करावयास हवा. आपले सर्व कार्यकर्ते आतां बाहेर आले आहेत. पण तेवढ्यानें काम उरकणार नाहीं. कामाची व्याप्ति वाढली आहे. परप्रांतांतून देखील आपल्याला बोलावणीं येत आहेत. म्हणून कार्यकर्त्यांची संख्या वाढली पाहिजे. एक वर्ष देणारे कार्यकर्ते गेल्या वर्षी कांहीं मिळालें पण यावर्षी त्याहून अधिक मिळाले पाहिजेत. त्यांना कार्य करण्यास सांगायचें म्हणजे त्यांच्या भाजीभाकरीची पण आपल्याला व्यवस्था केली पाहिजे. प्रत्येक सेवादलदिनाला आपण पुष्कळ निधि जमविला पाहिजे. त्यासाठीं अनेक प्रकारें खटपट करतां येण्यासारखी आहे. तुमच्यापैकीं कांहींनी नुसते नियमित सूत कातायचे म्हटलें तरी कितीतरी पैसे उभे होतील. दररोज एक तास सूत चरख्यावर काढलें तरी महिन्याला आठ गुंड्या होतील. आणि जवळजवळ एक रुपया उत्पन्न होईल. मी म्हणतों प्रत्येक शाखेवर ह्यासाठीं दररोज एक तास अधा तास सूत काढणारी कांहीं मंडळी कां निघूं नयेत ? चार चार लोकांना भेटून त्यांच्याकडून देणग्या मिळविण्याचा प्रत्येकानें यत्न केला

पाहिजे. दलासाठीं झोळी घेऊन धान्य-भिक्षा मागायला देखील हरकत नाहीं. ती देखील निष्ठेची एक कसोटीच आहे. माझ्या सांगण्याचा आशय इतकाच कीं कार्याचा व्याप वाढत आहे त्यासाठीं पैसे देखील अधिक लागतील. आणि पैसे नसले तर कार्यकर्ते आपले वर्ष द्यावयांस तयार असून देखील त्यांना आपणाला काम देतां येणार नाहीं. त्यासाठीं प्रयत्न सुरूं करा म्हणजे त्यांत तुम्हांला यश येईल.

आपण १९४१ सालीं दलाच्या पुनर्घटनेला सुरवात केली. त्यावेळीं त्याचा पाया एक राष्ट्रीयत्त्व असा ठेवला होता. आजहि आपल्या संस्थेची तीच बैठक आहे. त्यावेळीं विशेषतः आपल्या प्रातांत जातीय स्वयंसेवक संघटनाचा विशेष जोर होता. लहान लहान बालगोपाळांना जमवून त्याच्या संस्कारक्षम मनोभूमींत जातीयवादाचें बीज पेरण्यांत येते होतें. त्याचा विषवृक्ष झालेला आपण आपल्या डोळ्यांनीं पहात होतो आणि अजूनहि पहात आहो. अज्ञ बालकांना काय ? आकर्षक गणवेश, नाना प्रकारचें खेळ, आणि संघटकांचे चातुर्य यामुळें तीं पटकन त्यांत ओढलीं जात. आणि मग त्यांच्या मनावर जातीय वादाची शिकवण बिंबविण्यांत येई. त्यासाठीं इतिहासाला विकृत स्वरुप देऊन त्याचाहि उपयोग करण्यांत येई. कॉंग्रेससारख्या महान संस्थेबद्दल त्यांच्या मनांत द्वेष आणि तिरस्कार निर्माण करण्यांत येई. खोटें नाटें, सूक्त-असूक्त विधिनिषेध मुळींच पाळला जात नव्हता. तरीपण या जातीय संघटनांची पाळें बहुजन समाजापर्यंत पोचली नव्हतीं. श्रमजीवि समाज कॉंग्रेसलाच आपली संस्था मानीत होता. त्यांच्या मुलाबाळांना देखील कॉंग्रेसबद्दल प्रेम वाटत होतें. तरीपण लष्करी थाटाच्या या संघटनेनें तेहि मोहित होऊं पहात होते. त्यांना वाटे कीं अशी संस्था कॉंग्रेसवाल्यानीं कां काढूं नये ? नेमक्या याच परिस्थितीत आपली संघटना सुरू झाली आणि सर्वांकडून तिचें प्रचंड स्वागत झालें. कॉंग्रेस प्रणीत अजातीय राष्ट्रवादाचा आपण जोरानें पुरस्कार केला, जातीय संस्थांना पुष्कळच पायबंद बसला. इतकेंच नाहीं पण आपल्या उद्देशाप्रमाणें नवीन कार्यकर्त्यांची एक पिढी तयार झाली राष्ट्र सेवकांच्यामध्यें मोठीच भर पडली. या पार्श्वभूमीवर ९ ऑगस्टचा महान् स्वातंत्र्यसंग्रांम सुरू झाला. त्यामध्यें आपल्यातील अनेक कार्यकर्ते तावून सुलाखून निघाले. सर्व साधारणपणें सर्व सैनिकांची स्वातंत्र्य भावना तीव्र असून ध्येयवाद प्रखर झाला आहे. आतां आपल्याला जातीय संघटनांचे तसें भय वाटत नाहीं.

महात्मा गांधीनी जीनांबरोबर बोलणी सुरू केलीं त्यावेळीं कॉंग्रेसच्या म्हणजेच स्वातंत्र्याच्या हितशत्रूनीं कोल्हेकुई सुरू केली. कॉंग्रेसनें आपलें पन्नास वर्षांचें ध्येय सोडलें. एकराष्ट्रीयत्वाच्या तत्त्वाला फांटा दिला असें लोक ओरडूं लागले. पण वाटाघाटी फिसकटल्यावर या मंडळींचें दांत नेहमींप्रमाणें त्यांच्याच घशांत गेले. कॉंग्रेसला एकराष्ट्रीयत्व हवे आहे. गांधीजींनीं तें आपल्या पत्रांत स्पष्ट म्हटलें आहे. पण गांधीजी आणि कॉंग्रेस यांना जिवंत एकराष्ट्रीयत्व हवें आहे; एकराष्ट्रीयत्वाचें मढें नको आहे. ब्रिटिशांनीं येथें राहून आमचें एकराष्ट्र कायम ठेवावें यासारखी लाजीरवाणी गोष्ट दुसरी नाहीं. आपल्या भारतमातेची अब्रू राखण्यासाठीं इंग्रजांची आम्हाला कां आवश्यकता ? आमच्या बाहूंमध्यें मुळींच कां बळ नाहीं ? नसेल तर तें मिळविलें पाहिजे. पण भारतमातेची ही विटंबना जातीयवादी लोकांना दिसत नाहीं. ते स्वातंत्र्याचा जय करीत असले तरी तो स्वातंत्र्यवाद नकली आहे, मृतप्राय आहे. कॉंग्रेसचा स्वातंत्र्यवाद जिवन्त आहे. आणि त्याच स्वातंत्र्यवादाचे दलांतील सैनिक हे उपासक आहेत.

जिनांच्या बरोबर बोलणी करून गांधीजी राष्ट्राच्या बाहूमध्यें चैतन्य निर्माण करूं पहात होते. प्रतिकारशक्ति म्हणजेच जीवन. तिन्हीत्रिकाळ अन्याय होत असतांना ज्यांच्या बाहूंत स्फुरण येत नाहीं तो मनुष्य जिवन्त आहे असें कसें म्हणावें ? तो जिवंत असून मेल्यासारखाच आहे. जिनांचा जातीयवाद असाच आहे. ते तोंडानें स्वातंत्र्याच्या गप्पा मारीत असले तरी कृतीनें गुलामीच्या शृंखला, जातीयवाद दृढ करण्याकडेच त्यांचा उपयोग होतो. बुरसटलेल्या विचारसरणीची ही पडकी खिडारें पाडून तेजस्वी विचारांना वाव करून देण्याचा गांधीजीचा विचार होता. म्हणून आपण जरी एकराष्ट्रीयत्वाच्या भूमिकेवर उभे असलों तरी आमचा राष्ट्रवाद परावलंबी नाहीं. आम्हाला इंग्रजांचें छत्र नको. आपण नुसती अजातीय राष्ट्रवादाची जपमाळ घेऊन बसल्यानें काम भागणार नाहीं. आपल्या गुलाम राष्ट्रामध्यें प्रतिकारशक्ति निर्माण करणें हें आपलें काम आहे. त्यासाठीं नित्य नवें लढाऊ, त्यागी, कर्तव्यनिष्ठ, शिस्तप्रिय असें सैनिक आपण निर्माण करावयाचे आहेत. प्रत्येक घरांत, प्रत्येक झोपडींत आपला सैनिक असला पाहिजे. त्याच्या हृदयांत तेवत असलेल्या स्वातंत्र्यज्योतीनें आजूबाजूचें वातावरण प्रकाशित झालें पाहिजे. तसें झालें

तरच आपलें ध्येय आपल्याला गांठता येईल. दररोज आपण एक एक पाऊल पुढें जात आहोंत याची जाणीव झाली पाहिजे. स्वातंत्र्य अस्मानांतून पडणार नाहीं. तें आपणालाच मिळवावयाचें आहे. जसजशी आपली शक्ती वाढत जाईल तसतसा आपल्याला त्याचा अनुभव होत जाईल. अधिकाधिक त्यागाची आपली तयारी होईल. देशांत नवशक्ति निर्माण झाल्याची जाणीव असल्यामुळेंच सरकार निरनिराळें उपाय योजून त्या शक्ती चिरडून टाकण्याचा प्रयत्न करीत आहे. सभा नाहीं, संमेलनें नाहीं, शिबिरें नाहीं असा त्यांचा खाक्या आहे. सर्व नागरिक स्वातंत्र्याला मूठमाती दिलेली आहे. पण त्रास होणार कोणाला ? ज्यांना स्वातंत्र्याची चाड आहे त्यांनाच. जे ब्रिटिश सरकारच्या सहाय्यानेंच हिंदुस्तानचें ऐक्य अबाधित ठेवूं मागतात त्यांना काय ? ते त्यांच्याकडे जाऊन वाटेल त्या अटीवर परवानग्या मिळवतील आणि त्यांना त्या मिळतील देखील.

अशा परिस्थितींत आपण आपलें धोरण कसें ठेवावें हा प्रश्न आहे. ज्या नव्या शक्ती आपल्या राष्ट्रांत उत्पन्न झाल्या आहेत, म्हणजेच जे नवे तरुण कार्यकर्ते स्वातंत्र्य भावनेनें प्रेरित होऊन सेवा करण्यास उत्सुक झाले आहेत, त्यांना एकत्र आणून त्यांची सेवावृत्ति सत्कार्यी लावणें हे आपलें कर्तव्य आहे. आपल्यापासून त्यांना वेगळे करून त्यांचा उत्साह खच्ची करण्याचा सरकारचा डाव आहे. तो तर म्हणून पाडलाच पाहिजे. मोठ्या प्रमाणावर आपल्याला शिबिरें घेणें शक्य नाहीं. त्यामुळें आपण आतां निराळ्या प्रकारच्या तंत्राची योजना केली पाहिजे. अर्थात् मोठमोठी शिबिरें झालीं म्हणजे एकत्र राहिल्याने जो फायदा होतो, जी संघभावना निर्माण होते, ती लहान लहान वर्गात मिळणार नाहीं. इतउप्पर कचायतीवर सरकारची बंदी येणार असे दिसतच आहे. तेव्हां आपण आपल्या कार्याला शिक्षणाचें स्वरूप अधिक दिले पाहिजे. शिबिरांत निर्माण होणारी संघनिष्ठा अन्य मार्गानी मिळविली पाहिजे. आपण आतां ग्रीष्म विद्यालय, राष्ट्रीय विद्यालय अशी नांवे घेऊन राष्ट्र सेवक निर्माण करावें. हस्तलिखित मासिकें काढावीं, सूतकताईचे संघ काढावे. व्यायाम मंडळाच्या भोवती मुलें जमवावीं. अपमानास्पद अटी घातल्या जाणार नसतील तर परवानगी घेण्यासही हरकत नाहीं. आपला प्रयत्न असा पाहिजे कीं

आपलें स्वातंत्र्य जास्तीत जास्त शिल्लक रहावें. वादविवाद मंडळ, चरखामंडळ मासिक इत्यादि गोष्टीं दलाच्या नांवानें नसाव्या पण त्यात दलाच्या सैनिकांनीं भाग घ्यावा. असे झाल्यास नव्या शक्ती आपल्या प्रवाहांत येऊन मिळतील. मधल्या मध्येंच सुकून जाणार नाहींत. या अडचणीच्या वातावरणामध्यें आपली निष्ठा दृढ असली पाहिजे. आपसांतील भांडणामुळें आपले सामर्थ्य कमी होता उपयोगी नाही. अशावेळीच ऐक्याची आणि परिश्रमाची आवश्यकता असते.

आणखीही एक कल्पना मला सुचते. कित्येक दिवस मला असे वाटूं लागलें आहे कीं शिक्षणाच्या दृष्टीने आणि सैनिकांचे शील तयार व्हावें म्हणून बाहेर गांवाहून शिक्षणासाठी जे विद्यार्थी शहरांत शिक्षणाकरता येतात त्यांनी एके ठिकाणीं रहावें. जणु एक वसतिगृहच. तुम्ही मनांत आणल्यास कठीण नाहीं. मी म्हणतो कीं सुरवातीला पांच दहा विद्यार्थ्यांना अगोदर ठरवून एकाच घरामध्यें आपल्यासाठीं भाड्यानें जागा घ्यावी. आणि एकप्रकारचे सामूहिक जीवन सुरू करावें. कोणातरी अनुभवी माणसाचें सहाय्य घ्यावें. त्यामुळें खूप फायदा होईल. एक क्षणभर असा विचार करा कीं सानेगुरुजी-सारखा मनुष्य जर तुम्हाला लाभला तर त्याच्या सानिध्यांत रहाणारे विद्यार्थी कसे तयार होतील ? ते केव्हां सुटतील ते सांगता येत नाहीं. पण तूर्त लहान प्रमाणावर प्रयत्न करायला काय हरकत आहे ? चरख्यावर सूत कांता असे म्हटले म्हणजे विद्यार्थी म्हणतात कीं चरखा कोठून आणावा ? पण पांच दहा विद्यार्थी जर एकाच वाड्यांत रहात असतील तर तें काम किती सोपें होईल नाहीं कां ? एकत्र रहाणें, एकत्र विचारविनिमय, सर्वांनीं परस्परांच्या सुखदुःखांत सहभागी होणे, या गोष्टी शीलसंवर्धनाच्या दृष्टीनें फार पोषक आहेत. कोणत्याहि गोष्टीची जबाबदारी घेऊन काम करूं लागले म्हणजे मनुष्याच्या अंगच्या गुणांचा विकास होतो, आणि नवे गुण निर्माण होतात. कांहीं मंडळींचा आपल्या दलावर असा आक्षेप आहे कीं आपलें नांवापुरतेच सेवादल आहे. आपण प्रत्यक्ष अशी सेवा करीत नाहीं. त्यांचा हा आक्षेप खरा नाहीं. मुंबईच्या दलानें स्फोटामध्यें किती कामगिरी केली ती ठाऊकच आहे तुम्हांला. पण तेवढ्याने भागत नाहीं हे विसरूं नका. पहिली गोष्ट म्हणजे सेवावृत्ति आपल्यामध्यें असेल ती वाढविणे, नसेल तर उत्पन्न करणे

आणि त्या सेवावृत्तीचे प्रत्यक्षामध्ये रुपान्तर करणे या गोष्टी आपणास केल्या पाहिजेत. साक्षरता प्रसार, ग्रामसफाई, ग्रामशिक्षण, इत्यादि नित्याचे कार्यक्रम आणि जत्रा, दुष्काळ, पूर इत्यादि संकटामध्यें आपद्ग्रस्तांच्या मदतीला धावून जाणे हा आपल्या मनांत धर्मच झाला पाहिजे. अशा अनेक गोष्टी सांगता येतील. तुमचे स्थानिक संघटक तुम्हाला वेळोवेळीं याबद्दल मार्गदर्शन करतील. मी लिहीत गेलों तर संपणार नाहीं कधींच. सामान्यपणे माझ्या मनांत कोणते विचार घोळत आहेत याची माहिती तुम्हांला असावी इतकाच आज उद्देश आहे. ज्यावेळीं वडिलधारी मंडळी आपल्याकडे विशेष अपेक्षेने बघत नव्हती त्यावेळची गोष्ट निराळी. सर्वांना असे वाटूं लागलें आहे कीं या संस्थेचे भवितव्य उज्वल आहे. अशा वेळीं आपण त्यांच्या अपेक्षा फोल होऊं देतां कामा नये. खूप मेहनत करा, त्यागाची तयारी ठेवा आणि आपल्या ब्रीदाला जागा. स्वातंत्र्य फुकाफुकी मिळणार नाहीं. त्यासाठीं जबर किंमत द्यावी लागेल. आपला राष्ट्रीय प्रपंच हवा तसा थाटण्याचें सामर्थ्य म्हणजेच स्वातंत्र्य. आजच्या आपल्या परिस्थितीत आणि गुरांच्या गोठ्यांत फरक नाहीं. ही विटंबना आपल्याला थांबवायची ना ? मग त्यासाठीं आपल्या रक्ताश्रूंचें दान करण्यास मनाची सिद्धता करा आणि भारत मातेचे पांग फेडा. वंदेमातरम् ।

तुमचे अण्णा

• •

(मारुतिराव म्हणजे एसेम ह्यांचा पहिला मुलगा चि. अजेय याला १९४० व १०६० मध्यें एसेमनी लिहिलेलीं पत्रें.)

नाशिक रोड, सेंट्रल प्रिझन

चि. मारुतिराव,

माझे पत्र पाहून तुला आश्चर्य वाटेल. कदाचित् मी कोण व मला तुला पत्र पाठविण्याचा अधिकार तरी काय ? असें तूं विचारशील. आणि पत्र पाठविलें तरी उपदेश म्हणून हुकूम करण्याचा हक्क कसा ? तुझी शंका अगदी बरोबर आहे. तुझा जन्म झाल्या दिवसापासून मी तुझ्याजवळ कोठें आहे ? इकडे

येण्यापूर्वी चारदोन तुझे पापे घेतले ह्यापलीकडे मी तुझे कांहींच केलेलें नाहीं. पण मारुतिराव, तुझ्या जीवनामध्यें तुझे वडील विशेष गडबड करणार नाहींत. तुला पूर्ण स्वातंत्र्य देण्याचे मीं ठरविलें आहे. जन्मामुळेंच काय उपाधी तुझ्या मागे लागल्या असतील तेवढ्याच. तुझें नांव ठेवण्याबाबत देखील माझें मत असें होतें कीं आम्हीं ते ठरवूं नये. तुला कळूं लागल्यावर तुला हवें तें नांव तूं धारण करावेंस असें मला वाटे. तूं शनिवारी जन्माला आलास आणि तुझा चेहरादेखील मारुतिछाप असल्यामुळें मी तुला "मारुत्या" म्हणतो. पण तें कांहीं तुझें खरें नांव नाहीं. तूं आपले नांव ठरविलेस म्हणजे मी त्या नांवानें हाका मारीन. माझा हा विचार लोकांना आणि तुझ्या आईला चमत्कारिक वाटला आणि म्हणून तुझें नांव अजेयकुमार असें ठेवण्यांत आलें आहे. पण त्याविरुद्ध तूं बंड केलेंस तर मी तुझ्या बाजूनें लढेन. असे ! तुला अगदी पूर्ण स्वातंत्र्य द्यावें अशी माझी इच्छा आहे. लहान मुलांचें मन कोऱ्या पाटीप्रमाणें असतें. वास्तविक त्यानें आपण होऊन त्या पाटीवर लिहावें हें चांगले. फार झालें तर लोकांनीं त्या कामांत त्याला मदत करावी. पण आपल्याकडे याहून निराळा प्रकार आहे. आजूबाजूची माणसेंच त्याच्या मनावर निरनिराळें संस्कार करतात. चांगल्या वाईटाच्या, पाप पुण्याच्या कल्पना आम्ही तयार मालाप्रमाणें त्यांच्या मनावर लादतों आणि त्यांचा त्यांनीं स्वीकार केलाच पाहिजे असा हट्ट धरतो. कांहीं कांहीं गोष्टी मुलांना आपल्या आईबापांकडून घ्याव्याच लागतात. अशा अनुवंशिक अपरिहार्य गोष्टी सोडल्या तर आणखी त्यांच्यावर लादणूक कां करावी ? मनुष्याला बऱ्या वाईटाची जाणींव उपजत किंवा अंगभूत असते असें मला वाटत नाहीं. ती जाणीव एकतर त्याची त्याला स्वतः करावी लागते किंवा आजूबाजूचे लोक करून देत असतात. आणि विसाव्या शतकांत अठराव्या शतकांतील कल्पना त्यांच्या मनावर दृढमूल झाल्या म्हणजे लवकरच मुलांना त्याविरुद्ध बंड करावें लागतें. आणि नवमतवाद बोकाळतो. कारण त्या बंडांत सर्व शुद्धता असूं शकत नाहीं. ती एक प्रतिक्रिया असते. मी तुला अगदी पूर्ण स्वातंत्र्य देणार आहे. म्हणजे माझी जबाबदारी सोडणार असें नव्हे. माझ्या मताप्रमाणें खऱ्या खोट्याच्या नीति अनीतीच्या कल्पना मी तुझ्यापुढें मांडणार आहे आणि त्याप्रमाणें वागून त्याचा परिणाम तुझ्यावर होतो किंवा काय तें पहाणार आहे. त्यांत

अरेरावी मुळींच नाहीं. स्वतः प्रयोग करणार असल्यांमुळें त्या जुन्या पुराण्या असल्या तर अयशस्वी आणि फोंल ठरतील. मग मीच माझ्या कल्पना बदलीन. मी नुसते ग्रंथ पांडित्य करणार नाहीं. पण सध्यां मात्र पत्रद्वारां आणि तुरुंगाच्या कायद्याला संभाळून हें काम करणार आहें. मी तुझ्याजवळ येत नाहीं म्हणून लोक तुला चिडवतील. पण तुला चिडण्याचें कारण नाहीं. तूं हें पत्र लगेच त्यांना दाखव. मारूं नको हो त्यांच्या तोंडावर. नाहीं तर वडलांचा रागीटपणा तेव्हढा गिरवायचास.

तुझे,
अप्पा

● ●

आर्थररोड प्रिझन
१२ जुलै १९६०

प्रिय अजेय,

दिल्लीहून मीं काल सकाळच्या विमानानें आलों. तिकडे जातांना तडजोड होईल अशी-अंधुक आशा होती, परंतु सरकारच्या आग्रही आणि अडेलतट्टू प्रवृत्तीमुळें ती फोल ठरली. त्यांनीं तो आपल्या प्रतिष्ठेचा प्रश्न केल्यासारखें दिसलें. शेवटच्या घटकेला आम्ही एक तडजोड सुचविली होती. ती त्यांना सहज मान्य करतां आली असती. त्यांनीं ती मान्य केली असती तर संप टाळतां आला असता. अर्थात् कामगारांना ती समजावून देणें आम्हांलाच जड गेलें असतें. सरकारच्या या आक्रमक पवित्र्याच्या मागें कांहीं राजकीय हेतु असण्याचीहि शक्यता आहे. परंतु माणसाच्या मनांत काय आहे हें अचूक समजण्याचें यंत्र जोंवर निघत नाहीं तोंवर एकमेकांनीं एकमेकांवर हेत्वारोप करणें एवढेंच शिल्लक उरतें. असो.

मी काल सभेला जाण्यापूर्वी तुला भेटूं शकलों नाहीं. वेळच नव्हता. तुझ्या आईचा पुण्याहून फोन आला होता. या साऱ्या प्रकारामुळें तिला साहजिकच बुचकळ्यांत पडल्यासारखें झालें आहे. संयुक्त महाराष्ट्र मिळाल्यानंतर मला तुरुंगांत जावें लागेल असें तिला स्वप्नांतहि वाटलें नसेल ! स्वराज्य मिळाल्या-

वरदेखील तिची तशीच कल्पना होती. परंतु ती खोटी ठरली आणि दोन-तीन वेळां मला तुरुंगाची वारी करावी लागलीच. खरें म्हणशील तर तुरुंगांत गेल्यानें आपलीं माणसें शरीरानें दूर गेल्यासारखीं दिसलीं, तरी मनानें अधिक जवळ येतात. निदान माझा अनुभव तसा आहे. तुझ्या आईनें जर आमच्या प्रेम-प्रकरणाचा इतिहास मनोमन तपासला तर तिलादेखील ती गोष्ट पटेल.

काल रात्रीं साडे अकरा वाजतां बिस्तरा टाकून मी पडलों, तेव्हां पंचवीस वर्षांखालची मला आठवण झाली. १९३४ सालीं मला याच आर्थर रोड तुरुंगांत कैदी म्हणून यावें लागलें. त्या वेळीदेखील दहा नंबरच्या वार्डांत याच खोलींत मला ठेवलें होतें. त्यापूर्वी मला दोन-तीन वेळ कारावास भोगावा लागला होता. परंतु तो सत्याग्रहाच्या सामुदायिक चळवळीच्या निमित्तानें होता. शेंकडो राजबंद्यांच्याबरोबर शिक्षा भोगणें वेगळें आणि एकट्यानें तुरुंगाच्या कोठडींत कालक्रमणा करणें वेगळें. १९३४ सालीं मला राजद्रोहाच्या कलमाखालीं शिक्षा झालीं होती. स्वर्गीय मानवेंद्रनाथ रॉय हे तुरुंगांत आजारी होते. त्यांची प्रकृति चिंताजनक असल्याच्या बातम्या वर्तमानपत्रांत आल्या होत्या. निरनिराळ्या पक्षांच्या वतीनें चौपाटीवर एक सभा घेऊन आम्ही सरकारचा निषेध केला आणि कॉ. रॉय यांच्या सुटकेची मागणी केली. काँग्रेस समाजवादी पक्षाच्या वतीनें मीं हिंदींत भाषण केलें. सरकारला योग्य वेळीं शहाणपण सुचलें नाहीं तर हिंदुस्थानांत आज ना उद्यां फ्रेंच राजक्रांतीच्या वेळीं ज्या घटना घडल्या तशा घटना घडतील असा इशारा मीं माझ्या भाषणांत दिला होता. फ्रान्समधील जुलमी राजांनीं शेंकडो क्रांतिकारकांना बास्तिलच्या तुरुंगांत वर्षानुवर्षे डांबून ठेवलें होतें. राज्यक्रांति झाली तेव्हां तो तुरुंग फोडून जनतेनें त्यांची मुक्तता घडवून आणली होती. माझें हें भाषण हिंसात्मक राज्यक्रांतीला प्रोत्साहन देणारें आहे, असा आरोप ठेवून मला दोन वर्षांची शिक्षा फरमावण्यांत आली. मॅजिस्ट्रेटनें सुरुवातीला मला 'ब' वर्ग दिला होता. पंधरा दिवस 'ब' वर्गांत काढल्यावर त्यावेळच्या होम सेक्रेटरीनें आपले अधिकार वापरून माझी रवानगी 'क' वर्गांत केली होती!

'क' वर्गामध्यें दोन वर्षें काढणें म्हणजे पुष्कळच अवघड काम होतें. सक्त मजुरीची शिक्षा नांवांपुरती नसे. ठराविक वर्दी म्हणजे 'टास्क' आम्हांला करावेंच लागे. त्या वेळीं मला चरख्यावर सुताला पीळ घालण्याचे काम

देण्यांत आलें होतें. तीन पौंडांची वर्दी पुरी करावी लागे. पांच-सहा तास चरखा फिरवला म्हणजे कसे बसे दोन पौंड होत. मी अगदीं थकून जात असें. सकाळीं कांजी, दुपारीं दोन भाकरी आणि डाळ व दोन भाकरी आणि पालेभाजी संध्याकाळीं असा आहार मिळायचा. आजारी पडलांत तरच डॉक्टरच्या शिफारशीवरून भात. अतिशय आजारी पडून हॉस्पिटलमध्यें गेला नाहींत तर दूध बघायलादेखील मिळायचें नाहीं. त्या दोन वर्षांत माझी प्रकृति अतिशय ढांसळली, एकशें विसावरून माझें वजन १०३ वर आलें तें पुन्हां कधींच ११० च्या वर जाऊं शकलें नाहीं ! माझी लवकर सुटका व्हावी म्हणून माझे मित्र बॅरिस्टर भाऊसाहेब तारकुंडे यांनीं माझ्या वतीनें हायकोर्टांत अपील दाखल केलें होतें. त्यांनीं शिक्षा कमी व्हावी म्हणून उत्कृष्ट युक्तिवाद केला, परंतु त्या वेळच्या मुंबई हायकोर्टाच्या न्यायमूर्तीनीं खालच्या कोर्टाची शिक्षाच कायम केली. आज तेच भाऊसाहेब तारकुंडे महाराष्ट्र हायकोर्टाचे न्यायाधीश आहेत ! मला काल त्या गोष्टीची आठवण झाली, तेव्हां गंमत वाटली. कालाचा महिमा अगाध आहे, असें म्हणतात तें उगीच नाहीं.

तुरुंगांत गेल्यानें प्रेमाचीं माणसें शरीरानें दूर गेलीं तरी मनानें जवळ येतात असें मी लिहून गेलों, त्या संदर्भांतच या साऱ्या आठवणी कालपासून माझ्या मनांत गर्दी करीत आहेत. तुझ्या आईची आणि माझी १९३४ च्या प्रारंभीं ओळख झाली. ती त्यावेळीं एस्. एन्. डी. टी. कॉलेजमध्यें शिकत होती. युवक संघाच्या चळवळींत ती भाग घेई. त्यामुळेंच तिचा आणि माझा परिचय झाला. समाजवादाचीं तत्त्वें समजून घेण्यासाठीं कोणतें पुस्तक वाचावें म्हणून तिनें विचारलें होतें. त्याचें उत्तर म्हणून मीं एक पत्र तिला कॉलेजच्या पत्त्यावर लिहिलें. तें पत्र त्यांच्या प्रिन्सिपॉलबाईंच्या हातीं पडलें आणि त्यावर एक ग्रंथच तयार झाला ! तें पत्र त्यांनीं तुझ्या मोठ्या मामांच्याकडे पाठवलें आणि मग काय ? प्रिन्सिपॉलबाईंच्या दृष्टीनें व्हायला नको होतें तेंच झालें ! आमचें परस्परांवर प्रेम बसलें आणि बसलें तें कायमचें ! आम्हीं दोघांनीं तें उठवून लावण्याचा अनेक वेळ प्रयत्न केला, पण फुकट ! सांगायचा मुद्दा असा कीं, त्यावेळीं आर्थर रोड तुरुंगांत मला ताराची नेहमीं आठवण येई आणि मी तिला पत्र लिही. अगदीं हळूवार मनानें, तिची समजूत पटेल

अशा पद्धतीनें आणि अक्षर सुरेख काढून मी तेव्हां लिहीत असें. त्यावेळीं जेम्स नांवाचा एक अँग्लोइंडियन वॉर्डर होता. मी रात्रींच्या वेळीं पत्र लिहिण्यास बसलों म्हणजे 'प्रेमपत्र लिहितो आहेस काय?' म्हणून तो माझी चेष्टा करी. तरुण माणसाची चेष्टा करण्याचा तो एक सामान्य प्रकार होता. परंतु त्याला काय माहीत कीं त्याचा अंदाज अगदीं बरोबर होता! मी जर त्यावेळीं तुरुंगांत गेलो नसतों, तर आमच्या प्रेमाचा धागा बळकट होण्याऐवजीं कदाचित् तुट्टूनहि गेला असता! बाह्य जगांत निरनिराळीं आकर्षणें असतात. त्यांच्यांतील जें अधिक प्रभावी होईल तिकडे मनुष्य खेंचला जातो.

पंचवीस वर्षांपूर्वीची परिस्थिति किती निराळी आहे, नाहीं का? वैयक्तिकदृष्ट्या पाहिलें तरीदेखील हा फरक जाणवतो. त्यावेळीं देखील मी तुझ्या आईबद्दल तुरुंगांतील कोठडींत पडल्यापडल्या विचार करीत असें. आजहि तिची राहून राहून आठवण होते. ती आजारी आहे. तूंहि तिच्याजवळ नाहींस. बजा अजून लहान आहे. तो आपल्याच नादांत असणार. त्याचे टेबलटेनिस आणि त्याचे मित्र आहेतच. त्याला आईची सेवाशुश्रूषा करायला सवड मिळाली पाहिजे ना? मातेबद्दलचीं कर्तव्यें ओळखण्याचें त्याचें वय नाहीं. तो तर बेटा आपल्या हक्काबद्दलच हाकाटी करीत असेल. आणि मग तिला माझी आठवण येत असेल. कदाचित् ती माझ्यावर रागावली असेल, पण रागाचीं कारणें विविध असतील.

१९३४ सालीं मी तुरुंगांत गेलों तेंव्हां सारेच लोक माझें कौतुक करीत होते. त्यामुळें तिला आपल्या अंगावर मूठभर मांस आल्यागत होई. आज तर लोक उलट-सुलट बोलत असणार. तिच्याशीं वादविवाद करणार आणि मग माझ्या बाजूनें ती आवेशानें बोलणार. मी जें करीन त्यांत मला यश मिळावें असें तिला वाटत असतें. त्यामुळें माझ्याशीं बोलतांना जरी ती विरुद्ध बाजूनें भांडली तरी इतरांशीं बोलतांना माझी बाजूच उचलून धरते हें मला माहीत आहे. १९५७ सालच्या निवडणुकींत मी शुक्रवार मतदार संघातून उभें राहण्याचें ठरवलें. तेव्हां ती फार रागावली. तीन दिवस माझ्याशीं प्रेमानें बोललीच नाहीं. कारण तिला माहीत होतें कीं, निवडणूक जिंकणें फार कठीण आहे. एस. एम. चा निवडणुकींत पराभव होणें ही गोष्ट तिच्या मनाला सहन

होण्यासारखी नव्हती. परंतु हळूंहळूं तिनें आपल्या मनाची समजूत केली आणि मी विजयी झालों, तेव्हां तिला अतीव आनंद झाला ! असो, एवढें सारें तुला लिहिण्याचा हेतु इतकाच कीं, तूं एक वेळ पुण्यास जा आणि तिची समजूत घाल. कांहीं झालें तरी महिना-पंधरा दिवसांपेक्षां जास्त मला येथें राहावें लागणार नाहीं. अधिक दिवस राहावें लागलें तर येरवडा जेल-मध्यें बदली करून घेईन असें तिला सांग. तिच्या मनाला समाधान होईल असें कर. बजाला म्हणावें कीं, हट्ट करायचा नाहीं म्हणून अण्णांनीं सांगितलें आहे, आईला त्रास देऊं नकोस. चांगला वागलास तर तुला छानपैकीं टेबल टेनिसची रॅकेट–घेऊन देईन.

माझ्याबद्दल काळजी करूं नका. माझी व्यवस्था ठीक आहे. प्रभूभाई मला काय हवें नको त्याची दररोज चौकशी करीत असतो. तो आहे तोंवर तुम्हांला माझ्याबद्दल मुळींच चिंता नको. पुण्याला जाण्यापूर्वी प्रभूभाईंना भेटून जा. मावशींना नमस्कार आणि सर्व मुलांना आशीर्वाद. अरुणा आणि वसंताला गोड पापा.

तुझा
अण्णा

● ●

(आपल्या पत्नीस एसेमनी लिहिलेली ही पत्रें :)

२५ नोव्हेंबर १९६३

प्रिय तारा,

मुंबईहून पाठवलेलें कार्ड मिळालें असेलच. तुझ्या सांगण्याप्रमाणें मी कॉलऱ्याचें इंजेक्शन टोचून घेतलें. अजय आला होता. परंतु त्याच्याजवळ बोलण्यास पुरेशी फुरसत मिळाली नाहीं. कॉलऱ्याचें आणि बी. १२ चें इंजेक्शन घेतलेलें असल्यामुळें मला जरा विश्रांति घ्यावीशी वाटत होती. त्याची प्रकृति बरी दिसली. कलकत्ता मेलमध्यें बसल्यापासून एक एक घटना अशा विचित्र आणि क्लेशदायक घडत गेल्या कीं कांहीं विचारायची सोय

नाहीं ! अलाहाबादपर्यंत प्रवास चांगला झाला. त्यानंतर पहिल्या वर्गाच्या डब्यांतहि गर्दी विशेष जाणवूं लागली. दिवस असल्यामुळें विशेष वाटलें नाहीं. प्रथम लष्करी अधिकाऱ्यांच्या आकस्मिक निधनाची बातमी ट्रॅन्झिस्टरवर ऐकली आणि सकाळीं जाग आली ती केनेडीच्या हत्येची बातमी ऐकून. निग्रो लोकांच्या प्रश्नाबाबत केनेडींनीं जी भूमिका घेतली होती ती पाहतां असें कांहीतरी होणार अशी शंका मला नेहमीं येत असें. कित्येक वेळीं मीं ती बोलूनहि दाखविली होती. परंतु तरीहि अमेरिकेमध्यें अद्ययावत विज्ञानसाधनें उपलब्ध आहेत, तेथील सरकार अध्यक्षांच्या प्राणांची खबरदारी घेईल अशी माझी कल्पना होती. परंतु विज्ञानाची वाढ कितीहि झाली तरी मनुष्याचें जीवन अगदी अशाश्वत आहे हेंच खरें. आम्हांला जर इतकें वाईट वाटतें तर अमेरिकेंतील लोकांना किती दुःख झालें असेल ? त्यांच्या कुटुंबियांना तर एक पहाड कोसळल्यासारखेंच झालें असेल. आपल्या सैन्यांतील पांच अधिकारी ही मृत्युमुखीं पडावेत म्हणजे केवढी आपत्ति ! अनुभवी अधिकारी चार-दोन दिवसांत तयार करता येत नाहींत. एक डाकोटा विमान असेंच चुकलें आहे. त्यांतहि मेजर दर्जाचे अधिकारी आहेत. त्यानंतर आपले मुख्यमंत्री कन्नमवार यांच्या मृत्यूची बातमी समजली. किशनगंजला जयप्रकाश आले होते, त्यांच्याकडूनच मला ही बातमी प्रथम समजली. त्यांनीं आकाशवाणीवर ऐकली होती. मारोतरावांच्या धोरणाबाबत माझें मत कसेंहि असलें तरी त्यांचा असा आकस्मिक मृत्यु झाल्याचें ऐकून मला फार वाईट वाटलें. त्या ओस्वाल्डला देखील गोळी घालून ठार केल्याचें वृत्त आलें. एकंदरीत हे दोन-तीन दिवस अत्यंत अस्वस्थतेचे गेले.

इकडे आल्यावर पहिल्या दिवशींच तुला पत्र लिहिण्याचा मानस होता. परंतु वेळ मुळीच मिळाला नाहीं. प्रेम भसीन, फरीद अन्सारी बरौनी स्टेशनवरून बरोबरच आले. फरीदभाई आणि मी एकाच खोलींत आहोंत. लोकल बोर्डाच्या डाक बंगल्यांत उतरण्याची सोय केलेली आहे. जेवण्याखाण्याचा प्रश्न सोडला तर बाकी सर्व ठीक आहे. स्नानाला गरम पाणी मिळतें. त्यामुळें अडचण नाहीं. परंतु नॉनव्हेजिटेरियन स्वयंपाक्यांना व्हेजिटेरियन स्वयंपाक करणें जमत नाहीं. शिवाय त्यांची मसाले आणि तेलाची भरमार. यामुळें मला तें अन्न आवडत नाहीं.

परिषदेला प्रतिनिधि पुष्कळ आले आहेत. काल माझें उद्घाटनाचें भाषण झालें. वर्तमानपत्रांत भाषणाचा उल्लेख काय येईल ते ईश्वरच जाणे. परंतु माझ्या मतें भाषण बरें झालें. अगोदर संपूर्ण लिहिलें नव्हतें तरी कांहीं मुद्दे लिहून काढले होते. रात्रीं लगेच प्रतिनिधींच्या पुढें जयप्रकाशांचें भाषण झालें. भूदान आणि ग्रामदान याबाबतची त्यांची आजची भूमिका त्यांनीं विशद करून सांगितली. पक्षांच्या आवश्यकतेबद्दल प्रतिपादन केलें नसलें तरी त्याची आज आवश्यकता नाहीं असेंहि सांगितलें नाहीं. जोंवर आवश्यकता आहे तोंवर पक्ष राहतील, परंतु केवळ राजसत्तेच्या जोरावर मूलग्राही क्रांति होऊं शकत नाहीं. राजशक्ति आणि जनशक्ति हे दोन पंख आहेत. त्या दोन्ही पंखांच्या साहाय्यानें समाजपक्षी उडत असतो. कोणत्याहि एका पंखाकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं. जनशक्ति जागृत करावयाची असल्यास कार्यकर्त्यांनीं चिंतन आणि मनन केलें पाहिजे. लोकांच्या शिक्षणाचें कार्य त्यांच्याबरोबर सतत संपर्क साधून विधायक आणि विरोधात्मक अशा दोन्ही मार्गांनीं करीत राहिलें पाहिजे. एकंदरींत त्यांचे विचार पुष्कळच साहाय्यक वाटले. अशोकभाईंच्या भूमिकेबद्दल त्यांना आस्था वाटत नाहीं. त्याबाबत त्यांच्याबरोबर थोडा वेळ बोलणें झालें. गुरुपादस्वामी यांनीं मद्रास, मुंबई, कलकत्ता वगैरे भागांत ज्या पद्धतीनें हालचाल केली आहे ती गंगाबाबूंनाहि नापसंत आहे. काँग्रेसची भूमिका कामराज योजना अथवा जयपूर प्रबंध यामुळें बदलली आहे हें त्यांना मुळींच मान्य नाहीं. पक्षामध्यें कृतिस्वातंत्र्य नाहीं ही गोष्टहि त्यांना मंजूर नाहीं. शिवाय अगोदर जागा स्वीकारून मग त्यावर चर्चा ही पद्धति चुकीची आहे. योजना आयोगावर जावें किंवा नाहीं एवढाच प्रश्न चर्चेसाठीं घेतला असतां तर त्याला गंगाबाबूंची तयारी होती. एकंदरींत पक्षकार्यकर्त्यांमध्यें अशोकांच्या भूमिकेबद्दल आस्था दिसत नाहीं. उलट रागच दिसतो. फरीदभाई म्हणाले कीं, पक्षकार्यकर्त्यांना विचारलें तर अशोकांची भूमिका पसंत नाहीं हें उघड आहे. दोन्ही बाबींचा समन्वय करणें जवळपास अशक्यच आहे. खास अधिवेशन बोलावण्याला फरीदभाई आणि गंगाबाबू यांचा विरोधच दिसतो. खास अधिवेशन आम्हालाहि आवश्यक वाटत नाहीं. बिहारमध्यें वैचारिक दृष्ट्या अशोकांच्या बाजूचे कोणी दिसले नाहींत. पूर्वी खासदार असलेले एक सज्जन आहेत. परंतु त्यांची डाळ शिजत नाहीं. त्यामुळें ते गप्प गप्पच

आहेत. महाराष्ट्रांतील परिस्थिति पुष्कळच चांगली म्हटली पाहिजे. इकडे पक्षाला सामान्य जनतेंत आणि शेतकऱ्यांच्या वर्गांत चांगला पाठिंबा आहे. पक्षाची मुळें सामान्य जनतेंत पोंचलीं आहेत. मात्र संघटना आणि प्रचार त्यांचा अभाव दिसून येतो. पक्षाच्या पुढाऱ्यांनीं संघटनेची चिंता केली नाहीं. त्यामुळें असें झालें असावें असें मला वाटतें. अध्यक्ष झाल्यामुळें प्रवास फार करावा लागत असला तरी देशांतील परिस्थितीबद्दल सम्यक् ज्ञान प्राप्त करून घेण्याची संधि मिळत आहे. असो. ता. २७ रोजीं सकाळच्या गाडीनें अथवा ता. २६ रोजीं संध्याकाळच्या गाडीनें मी जावें अशी योजना येथील मंडळींनीं केली आहे. परंतु ता. २९ रोजीं सकाळीं मला पुण्याला पोंचलेंच पाहिजे. कारण त्या दिवशीं महानगरपालिकेची महत्त्वाची बैठक आहे. म्हणून मी उद्यांच म्हणजे ता. २६ रोजीं सकाळच्या गाडीनें निघणार आहे. गाडी तीन वेळां बदलावी लागेल. रिझर्वेशन केलेलें नाहीं. त्यांनीं ता. २७ चें केलेलें होतें. किशनगंज ते बरौनी, बरौनी ते अलाहाबाद आणि अलाहाबाद ते मुंबई असा जवळ जवळ साठ तासांचा प्रवास आहे. मी ता. २८ रोजीं दुपारीं तीनच्या सुमारास मुंबईस पोंचेन. आणि ता. २९च्या सकाळच्या गाडीनें नेहमीप्रमाणें ११-१२ पर्यंत पुण्यास येऊन पोंचेन. मुंबईस डॉक्टरांना भेटून मुख्यमंत्र्यांच्या निधनानंतर काय अवस्था आहे त्याबद्दल माहिती करून घेईन. बेडिंग आणि बॅग मुंबईस ठेवून येण्याचा विचार आहे. कपडे वगैरे धुण्यास देईन. म्हणजे गोव्याला वगैरे जातांना धुतलेले कपडे घेऊन जातां येतील. त्याच दिवशीं येत नाहीं म्हणून रागावूं नकोस. इतक्या दूरच्या प्रवासानंतर आणि दोन रात्री गाडींत काढल्यामुळें विश्रांतिची आवश्यकता आहे. येण्याआधीं ता. २८ रोजीं एक इंजेक्शन घेऊन येईन म्हणतो. म्हणजे पुण्यास आल्यावर गडबड नको. पुढच्या महिन्यांतहि प्रवास बराच करावा लागणार आहे. बाकी अलीकडे प्रवास सारखाच चालूं आहे. पक्षाचे अध्यक्षपद आणि नियोजन प्रसिद्धि अभ्यास मंडळाचा सभासद म्हणून करावा लागणारा प्रवास यामुळें हा ताण सहन करावा लागत आहे. प्रकृति साधारण बरी आहे. जेवणाखाण्याच्या गैरसोयीमुळें जरा जास्त त्रास होतो. अभ्यास-प्रवासांत तो त्रास नसतो. कारण सर्व व्यवस्था सरकारी अधिकाऱ्यांकडून केलीं जाते. असो. तुझी प्रकृति कशी आहे? तूं आतां जरा अधिक विश्रांति घे. धडपड आणि मनाची ओढाताण

करूं नकोस. प्रपंचांतून लक्ष काढून घेण्याचा प्रयत्न कर. लिहिण्याचा प्रयत्न कर. निदान आपल्या आठवणी तरी लिहून ठेव. त्याचा फार उपयोग होईल. तुला आणि लोकांना देखील ! बजा काय म्हणतो आहे ? त्याच्या मेरिट लिस्टचा रिझल्ट लागून तो एकदां सैनिकी प्रबोधिकेमध्यें गेला म्हणजे मला आनंद होईल. तूं त्याच्या जीवाची चिंता उगीच करीत असतेस. मुलांनीं साहस केलेंच पाहिजे. ह्याशिवाय पुरुषार्थ कसा होऊं शकेल ? बजाला आशीर्वाद. शुभदाला आणि वरील बच्चे लोकांनाहि.

तुझाच

एस. एम्.

● ●

नाशिक रोड प्रिझन

ता. ११–२–१९४५

प्रियतम तारा,

तुझें ता. ७ चें पत्र पावलें. माझें या आठवड्यांतलें पहिलें पत्र तुला मिळालें असेलच. तुझें पत्र आल्याबरोबर लगेच मी तुला लिहिणार होतों. पण कालचा दिवस थोडासा गडबडींत गेला. त्यामुळें पत्र लिहिण्यास लागणारा निवांतपणा मिळूं शकला नाहीं. आमच्या येथील एक सहजीवी मित्र बाहेर गेले त्यामुळें जरा धावपळ होती. तुरुंगांत असल्या लहानसहान गोष्टींनादेखील फार महत्त्व प्राप्त होतें. बाहेर आपण ज्या गोष्टी करीत नाहीं त्या येथें आम्ही करतों. समाजापासून अगदीं बाजूला पडल्यामुळें मनुष्याचें मनाला एक प्रकारची भावुकता येते असं वाटतं. बाहेर असतांना आकाशांतले तारे बारकाईनें पहाण्याचा मी कधीं प्रयत्न केलेला मला स्मरत नाहीं. अंधाऱ्या रात्रीं आकाशामध्यें तारे आणि ग्रह कसे कसे आणि केव्हां उगवतात व मावळतात याचें निरीक्षण करण्यांत गंमत वाटते. हा महिना कोणता ? मार्गशीर्ष. मग मृग नक्षत्र सूर्यास्ताच्या वेळीं पूर्व क्षितिजावर दिसलें पाहिजें. सप्तर्षि केव्हां

दिसतात ? ध्रुव तारा कसा ओळखावा ? इत्यादि गोष्टींत मन रमून जाते. माझा स्वभाव तसा रुक्ष आहे; पण पूर्णिमेचें चांदणें पडलें म्हणजे बाहेरच्यापेक्षां येथें मनावर परिणाम अधिक होतो. रात्रीच्या वेळीं एखादे वेळीं उठावें; चंद्र अस्ताला जात असलेला दिसावा. तें दृश्य पाहून कांहींतरी अनिर्वचनीय भाव मनांत निर्माण होतात. तो अनुभव शब्दांत सांगणें अशक्यप्रायच आहे. जणूं रानावनांत घेतलेली एखादी सभा पहाटपर्यंत चालावी. एखादा अतिशय गंभीर निर्णय करून परत घराकडे वळावें आणि क्षितिजावर मावळता चंद्र दिसावा; अगर आपल्या प्रिय मनुष्याबरोबर रात्रीच्यावेळीं गांवाबाहेर दूर दूर फिरायला जावे, जिव्हाळ्याच्या बाहेर गोष्टी बोलण्यांत वेळेचें भान राहू नये आणि मग परत येतांना कृष्ण पक्षांतला चंद्र पूर्व क्षितिजावर उगवताना दिसावा आणि मन अस्वस्थ व्हावें. अशा सारखे विविध भाव मनांत ओसंडूं लागतात. क्वचित् प्रसंगीं निसर्गाची सुंदर दृश्यें पाहून देखील मनाला एक अकारण उदासीनता जाणवते. हा सगळा कशाचा परिणाम म्हणून विचारशील तर या अनैसर्गिक जीवनाचा. मन उगीच हळवं बनतं.

माझ्या मागल्या पत्रामुळें तुझें मन व्याकुळ झाल्याचें तूं लिहिलेंस तेव्हां मी विचार करूं लागलों. आपल्या पत्रांत तरी असला मजकूर कां येतो असा प्रश्न केला. परिस्थितीमुळें आमच्या मनाला प्राप्त झालेला फाजील हळुवारपणा हेंच त्याचेदेखील कारण असावें असें मला वाटतें. तूं म्हणतेस मी तुझ्यापेक्षां मनाने श्रेष्ठ आहे. पण खरें विचारशील तर तुरुंगांत आलेल्या कोणाहि माणसाला, थोडा विचारी असेल तर, सद्भाव आणि सात्त्विक विचार सुचतात. तो बाहेर असता तर त्याला ते क्वचितच सुचले असते. बहुसंख्य लोकांच्या बाबत तरी ही गोष्ट खरी असावी असा माझा अंदाज आहे. आणि मीहि त्या बहुसंख्य लोकांतलाच एक आहे. त्यांना जशी ईश्वराची आठवण होते तसे मलाहि सद्विचार स्फुरतात. अर्थात उदात्त विचार आणि सद्भावनांची आकांक्षा धरल्याने, अगर त्यासाठीं प्रयत्न केल्यानें कोणाचें कधींहि नुकसान झालेलें नाहीं. झाला तर फायदाच होण्याचा संभव असतो. माझ्या सांगण्याचा मुद्दा इतकाच कीं माझ्या जीवनांतील निर्मल होण्याची आकांक्षाहि परिस्थितिसापेक्ष आहे. इतकेंच नव्हे तर तो एक केवळ प्रयत्न आहे. म्हणून तूं मला उगाच मोठा समजूं नकोस. तुझ्या पत्रात

मला लिहिलेस कीं तूं महात्मा आहेस. मला ते वाचून शरम वाटली. ज्याला अजून आत्म्याचीदेखील ओळख नाहीं त्याला तूं एकदम महात्मा बनवून टाकलेंस. चूक होते आहे तुझी. मी अगदीं तुझ्या इतकाच हाडामांसाचा आणि सामान्य इच्छा अभिलाषांनी पछाडलेला एक जीव आहे. पण या इच्छा अभिलाषांच्या मगरमिठींतून आपण सुटलें पाहिजे असा माझा विचार आहे. आणि एखादा क्षण जेव्हां तो विचार मनांत येतो तेव्हां कसें मुक्त झाल्यासारखें वाटतें. एरवीं जीव कसा कासावीस झाल्यासारखा वाटतो.

पण जेव्हां त्या विचाराचे शिडकाव मी माझ्या मनावर टाकतो तेव्हां वादळांतील फेसाळ समुद्रावर तेलाची वृष्टि केल्यामुळें निर्माण होणाऱ्या क्षणिक शांततेची अनुभूति येते. म्हणूनच मी तुला पुनः पुनः तसें लिहितों. कारण मला वाटतें कीं अशा विचारानेंच तुझ्या प्रक्षुब्ध मनाला शांतता प्राप्त होईल.

तूं म्हणतेस कीं आपल्यामध्यें अद्याप वैचारिक ऐक्य निर्माण झालेलें नाहीं. पण मला तें खरें वाटत नाहीं. तुला ते विचार येत आहेत पण तुला अजून त्याची अनुभूति झालेली नाहीं. त्या अपूर्व सुखाचा एकदाच जर आस्वाद घेतां आला तर पुनः पुनः त्याचा अनुभव घ्यावा असें वाटूं लागेल. आपल्यामध्यें वैचारिक ऐक्य आहे पण तुझे विचार अजुन फलित झालेलें नाहींत. एवढाच फरक आहे. तूं लिहितेस कीं, "आपलें दुःख आपल्याजवळच ठेवावें. तुला कशाला लिहावें ?" असा विचार तुझ्या मनांत कां आला ? हा तर परकेपणाचा विचार आहे. तूं वेडी आहेस. तूं आपलें दुःख माझ्याजवळ सांगायचें नाहीं तर कोणाजवळ ? एकमेकांनी आपलें दुःख विभागायचें नाहीं तर मग सहजीवनाचा अर्थ काय आणि प्रेम म्हणजे तरी काय ? सुख विभागण्यानेंच प्रेमी जीवांना आनंद होतो असें कां तुला वाटते ? दुःख विभागण्यातहि आनंद असतोच. दुसऱ्याचे दुःखाशीं समरस होण्यांत पुरुषार्थ मानणाराला आपल्या प्रिय माणसाच्या दुःखाबरोबर समरस होण्यांत आनंद होणार नाहीं वाटतें ? मला वाटतें कीं प्रेमाची सुरुवात दुःखांतूनच होत असते. दुःखाच्या वेळीं संवेदना होण्यानेच माणसें जवळ येतात. आनंदाच्या प्रसंगी असे क्वचितच होते. म्हणून तूं तो विचार मनांतून अगदी काढून टाक. हां, माझ्या मनांत एक गोष्ट मात्र नेहमी येते. आणि त्यावेळीं मी तुझ्यावर मनांतून रागावतोंदेखील. कोणती बरें ती गोष्ट ? मला वाटतें कीं तूं कित्येकवेळीं

खऱ्या दुःखाच्या ऐवजी काल्पनिक दुखें निर्माण करून उगीच त्रास करून घेतेस. अमक्यांनी अमुक गोष्ट केली नाहीं ती बुध्याच केली नाहीं अशी कल्पना करून घेऊन मनाला वृथा शीण देणें हा त्यांतलाचा एक प्रकार आहे. या काल्पनिक दुःखानें तूं हताश झालेली पाहिली म्हणजे मला राग येतो. You are manufacturing your own misery असें मी तुला नेहमी चिडवतों तें आठवतें का तुला ? असो ही सुखदुःख मीमांसा आतां पुरे !

तुझाच,
एस्. एम्.

●●●

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे स्थलप्रत.
अनुक्रम ... ३७९०१७ वि: ...निबंध.....
दि: .....
REFBK-0013725
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्र. क्र. 93625.
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

"राजशक्ति आणि जनशक्ति हे दोन पंख आहेत. त्या दोन्ही पंखांच्या साह्यानें समाजपक्षी उडत असतो. कोणत्याही एका पंखाकडे दुर्लक्ष्य करुन चालणार नाहीं. जनशक्ति जागृत करावयाची असल्यास कार्यकर्त्यानीं चिंतन आणि मनन केलें पाहिजें. लोकांच्या शिक्षणाचें कार्य त्यांच्या बरोबर सतत संपर्क साधून विधायक आणि विरोधात्मक अशा दोन मार्गांनीं करीत राहीलें पाहिजे"